जेव्हा फनाच्या प्रथम अवस्थेनंतर लगेच फनाफिल्लाहची[२०] दुसरी अवस्था येते, तेव्हा काहिंच्या बाबतीत मर्यादित ''मी'' ''स्व'' मन, प्राणशक्ती, शरीर व जगत यांची चेतना परत येत नाही, परंतु विश्वात्मक 'स्व' शी म्हणजे परमात्म्याशी तादात्म्य केल्यामुळे ती अमर्याद 'मी' ची चेतना आता महाचैतन्य म्हणून अस्तित्वात असते. ती सर्वश्रेष्ठ चेतना (महाचैतन्य) आता ''मी परमात्मा आहे'' 'अहं ब्रह्मास्मि किंवा 'अनल हक' या अवस्थेचा अनुभव घेते. हा निर्विकल्प समाधीचा अनुभव असतो.

ज्याचा अर्थ आहे ''मी निःसंदेह परमात्मा आहे'' हा अनुभव येण्याचे कारण असे की, फनाफिल्लाह मध्ये आत्मा जाणीवपूर्वक परमात्म्यात पूर्णतः विलीन होतो किंवा फनाफिल्लाहमध्ये आत्मा परमात्म्यात पूर्णतः एकरुपता प्राप्त करतो.

हा अनुभव हे लक्ष्य आहे व ते ''काही नाहीत'' अंतर्हित असलेल्या चेतनेच्या उत्क्रांतीनंतरच प्राप्त झाले व असे तेव्हाच घडले जेव्हा अंतर्हित मर्यादित ''काही नाही'' अनंत ''काही नसल्याचे'' रुपात अभिव्यक्त झाले. उत्क्रांत चेतनेने ''काही नसण्याचे'' क्षेत्रात अनंततेने स्वतःला अडकवून घेत असताना, या खोट्या सीमित ''काही नसण्याचा'' यथार्थ व अनंत म्हणून अनुभव घेतला. शेवटी ही चेतना जेव्हा आत्मानुवर्ती उत्क्रमित झाली तेव्हा ती अनंततेने खोट्या ''काही नसण्याचा'' अनंत खोटेपणा हळूहळू अनुभवू शकली व शेवटी अनंत परमात्म्याच्या अनंत सत्यतेचा हा अनुभव घेण्यास समर्थ झाली की, तो निःसंदेह मर्यादेपलिकडे असून ''सर्व काही'' आहे व ''फनफिल्लाह'' च्या ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेत शाश्वत अस्तित्व म्हणून आहे.

ज्या ठिकाणी ''मी परमात्मा आहे'' ही अवस्था अनुभविली जाते ती 'फनाफिल्लाह' हे 'लक्ष्य' आहे. उदाहरणार्थ : ज्या लोकांना हा अनुभव होतो त्यांना ''मज्झूब्स'' (असा मनुष्य जो परमात्म्याकडून प्रभावित झाला आहे किंवा असा मनुष्य की ज्याचेवर परमात्म्याचे नियंत्रण आहे) असे म्हटल्या जाते. अशा व्यक्तिंना ''ब्रह्मीभूत'' देखील समजल्या जाते. या अवस्थेत तो सातत्याने निरंतरतेने व चेतनायुक्त ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेचा अनुभव घेतो आणि त्याचबरोबर तो परमात्म्याच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीचा ''सत–चित–आनंद'' (याचा अर्थ अनंतशक्ती, अनंतज्ञान व अनंतआनंद) याचा

आपली स्वतःची अनंत प्रकृती समजून सतत व चेतनायुक्त अनुभव घेतो.

अशाप्रकारे सातव्या भूमिकेतील आत्मचेतन परमात्मा मानवअवस्थेतील मानव म्हणून आता अनंत आणि शाश्वत म्हणून स्वतःच्या 'स्व' बद्दल पूर्णपणे सचेत आहे. त्याला आता प्राणशक्ती व मनाच्या स्त्रोतासंबंधी (उगमासंबंधी) देखील जाणीव असते जे दुसरे काही नसून त्याच्या स्वतःच्याच अनंत शक्ती व अनंत ज्ञानाचे सीमित पैलू होते ज्याचा अनुभव तो आता सतत अनंत आनंदात असताना करतो.

अविभाज्य शाश्वत परमात्म्याने त्याच्या अनंत अवस्थेची जाणीव नसल्यामुळे आत्मचेतना प्राप्त करण्याच्या त्याच्या कठोर परिश्रमात असंख्य व विविध संस्कार संकलित केले व त्याचा अनुभव घेतला आणि हे सर्व अनुभव घेत असताना व स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचा विस्तार करीत असताना तसेच स्थूल जगताच्या स्थूल चेतनेला उत्क्रांत करीत असताना व सूक्ष्म व मनोजगताच्या सूक्ष्म व मनोभूमिकांच्या चेतनेचे आत्मानुवर्ती उत्क्रमण करीत असताना आपले स्वतःचे साहचर्य सतत सीमित व नश्वर अस्तित्वांशी केले. परमात्म्याच्या चेतनेचे अंतिम आत्मानुवर्ती उत्क्रमण त्याच्या अनंत अवस्थेतील चरमसीमेवर पोहोचल्यामुळे त्याला आपल्या 'स्व' चा सचेत साक्षात्कार झाला.

परिणामतः जेव्हा परमात्म्याच्या चेतनेने ''स्व'' ची चेतना प्राप्त केली व अनंत ज्ञान, अनंत शक्ती व अनंत आनंदाचा अनुभव घेतला तेव्हा परमात्म्याला अनुभव आला की, त्याचे अस्तित्व शाश्वतरित्या अनंत आनंदात विद्यमान आहे व आत्मचेतना प्राप्त करण्याच्या काळातील संघर्षमय यातना, स्थूल सूक्ष्म व मनोदेहांचे व जगतांचे संस्कार व अनुभव, साहचर्ये व असाहचर्ये ही ''काही नाही'' ची होती व ती केवळ रिक्त स्वप्ने होती. परमात्म्याला हा देखील अनुभव आला की, त्याची चेतना जोपर्यंत अपरिपक्क होती तोपर्यंत स्थूल शरीरांशी, प्राण्यांशी व मानव प्राण्यांशी त्याने केलेले तादात्म्य व तिन्ही भुवनांच्या व सहा भूमिकांच्या त्यांच्या त्यांच्या सर्व लवाजम्यासह घेतलेल्या सर्व अनुभवांना सापेक्ष अस्तित्वे होती जी धारण केली होती व राखल्या गेली होती. परिपक्कता केवळ सातव्या भूमिकेवरच प्राप्त झाली. ज्यावेळेस चेतनेची परिपूर्ण आत्मानुवर्ती उत्क्रांती झाली होती. या प्रक्रियेमुळे परमात्म्याला आत्मसाक्षात्कार झाला अथवा परमात्म्याला त्याच्या आत्मसाक्षात्काराची पूर्ण चेतना प्राप्त झाली.

दुसऱ्या शब्दात, परमात्म्याला आपल्या स्वतःच्या म्हणजे परमात्म्याच्या अनंत अवस्थेचा चेतनायुक्त अनुभव आला जेव्हा त्याने ''मी परमात्मा आहे'' ही* अवस्था प्राप्त केली.

अन्य शब्दात सांगायचे म्हणजे परमात्मा प्रथम स्थूलाच्या जडणघडणीच्या प्रक्रियेतून जातो. म्हणजेच स्थूलात परमात्मा अन्नभुवनाचे शरीर बनतो. त्यानंतर तो सूक्ष्मात प्राणभुवनाची प्राणशक्ती बनतो. त्यानंतर मनाचे प्रदेशात तो मनोभुवनाचे मन बनतो. या पलिकडे विज्ञानात परमात्मा, परमात्मा बनतो, जो तो हाता, आहे व सदैव राहिल, म्हणून परमात्मा जो मूलतः अचेत होता त्याला आता विस्मृतीचीच विस्मृती होते आणि त्याला त्याच्या मूळ प्रथम शब्दाला ''मी कोण आहे?'' ला ''मी परमात्मा आहे'' यथार्थ अंतीम उत्तर मिळते. अशाप्रकारे स्थूल, सूक्ष्म व मनोभुवनामध्ये परमात्मा प्रत्यक्षात बनतो जे तो वास्तविक नव्हता व विज्ञानात जो तो यर्थार्थतः बनतो जे तो यथार्थता असतो. मूळ अवस्थेत परमात्मा, परमात्मा होता, आता परमात्मा परमात्मा बनला आहे.

ज्याअर्थी परमात्म्याला मनाच्या प्रथम स्थितीत त्याच्या पूर्ण पोकळीच्या मूळ अवस्थेत प्रविष्ट झाल्यानंतर, फनाच्या दुसऱ्या स्थितीत ''मी परमात्मा आहे'' या आपल्या स्वतःच्या अनंत अवस्थेचा साक्षात्कार होतो, त्यामुळे ही 'फना' स्थिती (अर्थात फना फिल्लाह) लक्ष्य बनते व लक्ष्य आहे.

या लक्ष्याच्या प्राप्तीचा अर्थ आहे 'पहिल्या दिव्य प्रवासाचा' अन्त ज्याचा प्रारंभ आध्यात्मिक गूढ ज्ञानापासून झाला व चेतनेच्या सर्व भूमिकातून प्रवास केल्यानंतर शेवट परमात्म्याच्या प्राप्तीत झाला.

फनाची दुसरी अवस्था ही परमात्म्याच्या प्राप्तीची आहे. ज्याचा अर्थ मनुष्य परमात्मा झाला असा आहे. मनुष्य आता परमात्मा आहे, आणि तो परमात्म्याच्या ज्ञानाचा परमात्म्याच्या शक्तीचा व परमात्म्याच्या परमानंदाचा अनुभव घेतो. हे जरी लक्ष्य असले तरी ही अजुनही पूर्णतः नाही. फनाच्या

---

* (टीप– परमात्म्याच्या साक्षात्काराचा परमानंद प्राप्त करणे हे सर्व सृष्टीचे लक्ष्य आहे. परमात्म्याच्या साक्षात्काराव्दारां जे खरे सौख्य प्राप्त होते ते विश्वातील सर्व शारीरिक व मानसिक हालअपेष्टांच्या मोलाच्या बरोबर असते. त्यानंतर मात्र सर्व क्लेश जणू ते नव्हतेच असा अनुभव येतो. परमेश्वराच्या साक्षात्काराचे सौख्य ''स्व'' धारित आहे, ते शाश्वतरित्या नुतन, अटळ, अनिर्बंध व अवर्णनिय असते आणि याच परमानंदाकरिता हे सर्व जग एकाएक उसळून वर अस्तित्वात आले आहे. )

दुसऱ्या अवस्थेच्या म्हणजे 'फनाफिल्लाह' च्या अवस्थेत जेथे पहिल्या दिव्यप्रवासाचा शेवट होतो, तेथे मनुष्य परमात्म्यात प्रविष्ट झाला आहे व अशाप्रकारे तो परमात्मा बनला आहे, परंतु तो अजुनही परमात्म्याच्या जीवनात प्रविष्ट झाला नाही. मनुष्य प्रथम दिव्य प्रवासाचे शेवटी ''तो परमात्मा आहे'' हे पूर्णपणे अनुभवतो व केवळ ''मी परमात्मा आहे' या अवस्थेचा अनुभव घेतो व त्याच बरोबर अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाचा अनुभव घेतो व अनंत आनंदाच्या अवस्थेचा आस्वाद घेतो.

पहिल्या दिव्य प्रवासाच्या शेवटी लक्ष्य प्राप्त केल्यानंतर परमात्मा मनुष्य म्हणून आता परमात्म्याच्या अवस्थेत असताना, असे तथापि फारच क्वचित घडते की त्याला अनंत आनंदाची अवस्था सोडून ''मी परमात्मा आहे.'' या सर्वश्रेष्ठ चेतनेच्या अवस्थेपासून सर्वसामान्य चेतनेप्रत खाली उतरणे शक्य होते व तो बकाच्या अवस्थेचा अनुभव घेणे सुरु करतो आणि अशाप्रकारे दुसऱ्या दिव्य प्रवासात प्रवेश करु शकतो.

सुफी परिभाषेत  बकाचा अर्थ आहे आंतरनिवास करणे[२१]

''मी परमात्मा आहे'' या सर्वश्रेष्ठ चेतनेपासून सर्वसाधारण चेतनेप्रत खाली येणे व परमात्म अवस्थेत 'आंतर निवास' करणे याचा अर्थ असा होईल की परमात्म्याच्या प्रत्यक्ष जीवनात प्रस्थापित करवून घेणे. अशाप्रकारे बका अवस्थेत एका मानवीप्राण्याचे आत परमात्म्याचे जीवन प्रस्थापित केले जाते. याचा अर्थ असा आहे की, 'बका' मध्ये मनुष्य स्वतःला परमात्मा म्हणून जाणीवपूर्वक प्रस्थापित करतो. या चेतनेला ''सुलुकियत'' किंवा ''परमात्म्याच्या जीवनात प्रस्थापित झालेली'' सामान्य चेतना असे म्हणतात. या पेक्षा मज्झूबियत' किंवा ''मी'' परमात्मा आहे'' या अवस्थेत ''अनंत आनंदात डूंबून जाणे किंवा तल्लीन होणे'' ही वेगळी चेतना आहे. तद्नुसार परमात्मा मनुष्य म्हणून जो बका अवस्थेचा अनुभव घेतो त्याला सुफी परिभाषेत यथार्थ 'सालिक' असे म्हटले आहे. सत्याची आणि दिव्यत्वाची ही बका अवस्था याला ''बका–बिल्हाह'' असे म्हटले आहे. वेदान्तात याला ''आत्मप्रतिष्ठापना'' असे म्हणतात.

सालिक अनंत आनंदात असताना केवळ अनंत शक्ती व अनंत ज्ञानाचा 'मज्झूबियत' मध्ये असल्याप्रमाणे अनुभव घेत नसून आता तो सालिक असल्यामुळे आपल्या सुलुकियतच्या सामान्य चेतनेसह परमेश्वरी जीवनात

प्रस्थापित होत असताना जाणीवपूर्वक संपूर्ण अनंतशक्ती अनंतज्ञान व अनंतआनंद गोळा करतो.

परंतु अगदी शेवटी फना–फिल्लाहच्या अवस्थेच्या सत्यात पूर्ण परिपक्व परिपूर्ण चेतनेसह अंतिमतः व यथार्थाने प्रविष्ट होण्यापूर्वी व दिव्यत्वाच्या अंतिम बका–बिल्लाह मध्ये प्रस्थापित करवून घेण्यापूर्वी सामान्यतः भ्रमात्मक मायेच्या परिभाषेत म्हणता येईल की, फना – बकाचे इतके अनेक व्यक्तिगत अनुभव आहेत की, सृष्टीत जितक्या विविध व असंख्य जीवनाच्या उपजाती व अवस्था आहेत.

असे असले तरी फना–बकाच्या मूलभूत तीन प्रकारात सर्व व्यक्तिगत अनुभवांचा समावेश होतो.

या तीन मूलभूत प्रकारापैकी पहिला प्रकार अविकसित स्वरुपाचा असतो. हा प्रकार मायेच्या अंतर्गत चमत्कारीक मिथ्या जिवनाच्या फना–बका प्रकारचा आहे, ज्याचा अनुभव सर्वांना होतो जे रोज फनात अंतर्गत होत असताना मायेत निवास करण्यासाठी बका प्राप्त करतात. सामान्य चमत्कारीक मिथ्या जीवनाची ही अविकसित स्वरुपाची फना–बका ही सामान्य गाढ निद्रावस्था व सामान्य जागृतावस्थेपासून घडलेली आहे.

जसे यापूर्वीच सांगीतल्याप्रमाणे जरी एखादा मायेचे सर्व संस्कार बरोबर घेऊन गाढ निद्रेत 'प्रविष्ट होतो' तेव्हा ''परमात्मा आहे'' या अवस्थेची तीच मूळ दैवी निर्वात पोकळी प्रस्थापित होते. ज्या ठिकाणी कधीच काही अस्तित्वात नव्हते व जेथे केवळ एक अनंत, केवळ एक सत्य 'परमात्मा' म्हणून अपवाद सोडला तर कधी काही अस्तित्वातही राहत नाही, ज्याला त्याच्या ''परमात्मा आहे'' अवस्थेत ''परमात्म्याची अनन्तता'' असे म्हटले जाते. मनुष्य जेव्हा मायेचे संस्कार बरोबर घेऊन झोपतो तेव्हा त्याला ते संस्कार जागे करतात तेव्हा मनुष्य जागृत अवस्थेत स्वतः मायेत वास करतो व मायेच्या अंतर्गत दैनंदिन जीवन प्रस्थापित करतो.

त्यामुळे दैनंदिन जीवनात जेव्हा मनुष्य गाढनिद्रेत झोपी जातो तेव्हा 'फना' प्रस्थापित होते, जसे मनुष्य दररोज 'चेतने शिवाय' मूळ परमात्म अवस्थेत 'प्रविष्ट' होतो व जेव्हा मनुष्य दररोज जागा होतो तेव्हा मायेच्या जीवनात निवास करण्यासाठी बका प्राप्त होते, जो पर्यंत गाढनिद्रा त्याला प्रभावित करुन पून्हा एकदा दैनंदिन फना अवस्थेत खेचून नेत नाही जी फना

मनुष्याच्या केवळ निर्वात पोकळीची मूळ दिव्य अवस्था आहे.

हा दुसऱ्या प्रकारचा 'फना–बका' लक्ष्य प्राप्तीच्या मार्गावरील भूमिकांचा आहे व तो मायेच्या भ्रमात्मक सामान्य चमत्कारीक मिथ्या जीवनाच्या अविकसित स्वरुपाच्या प्रकारापेक्षा वेगळा आहे, असे असले तरी भूमिकांचा हा दुसऱ्या प्रकारचा फना–बका देखील भ्रमच आहे.

अध्यात्मपथावरील प्रत्येक भूमिकेत पहिल्यापासून तो सहाव्या भूमिकेपर्यंत उत्क्रांत झालेली परिपूर्ण चेतना क्रमशः आंतरिक दिशेने ओढली जाते किंवा प्रतिवर्धित होते म्हणून भूमिकांची 'फना–बका' संस्कारानुसार असते. जे संस्कार आत्मानुवर्ती उत्क्रमित होणाऱ्या चेतनेत भरत राहतात व जी (फना–बका) पूर्ण उत्क्रांत किंवा उत्क्रांतीच्या प्रक्रियेत असणाऱ्या संस्कारीत चेतनेच्या ''फना–बकाच्या'' प्रथम अविकसित प्रकारापासून भिन्न असते.

जोपर्यंत परिपूर्ण उत्क्रांत चेतना क्रमशः पुढे पुढे जाणाऱ्या प्रगतीबरोबर प्रतिवर्धित होत राहते तो पर्यंत फना–फिल्लाहच्या लक्ष्याच्या दिशेने जाणाऱ्या अध्यात्मपथावरील प्रत्येक भूमिकेची वेगळी 'फना–बका' आहे.

परंतु सुफी शब्द 'फना' चा सामान्यपणे अर्थ मूळ ''मी परमात्मा आहे.'' या अवस्थेच्या निव्वळ निर्वात पोकळीच्या अंतर्गत होणे हा आहे, म्हणून फना ही सामान्य चमत्कारी मिथ्या जीवनाच्या अविकसित प्रकारची असो किंवा अध्यात्मपथावरील भूमिकांच्या दुसऱ्या प्रकारची असो त्यामुळे मुळीच फरक पडत नाही. या दोन्हीही प्रकारात 'फना' (अंतर्गत होणे) मूलतः तीच एकमेव असते. कारण रोज गाढनिद्रावस्थेत संस्कारीत चेतना निव्वळ निर्वात पोकळीत त्याच अवस्थेत अंतर्गत होते व मायेच्या संस्कारांच्या प्रकारांनी भरलेल्या सर्व फरकावर लक्ष देत नाही.

ही उत्क्रांत होणारी चेतना व आत्मानुवर्ती उत्क्रमित होणारी चेतना या दोन्हीच्या संदर्भात फना जरी तीच असली तरी जागृत अवस्थेच्या दरम्यान मायेच्या अंतर्गत निवास करते तेव्हा ती मायेच्या संस्कारांनी भरलेली असते. ज्यावेळी जागृतावस्थेच्या दरम्यान ती मायेत निवास करते तेव्हा ती खऱ्या अर्थाने महत्वाची ठरते व गाढनिद्रावस्थेत किंवा फना अवस्थेत अंतर्गत होताना मात्र भिन्नत्व निर्माण करते.

उदाहरणार्थ, प्राण्यांच्या किंवा सजीवांच्या गाढनिद्रावस्थेतील त्यांच्या विशिष्ट मायेच्या संस्कारासह अगदी निर्वात पोकळीत प्रविष्ट होणारी 'फना' ही

मनुष्यप्राण्यांच्या गाढनिद्रावस्थेत त्यांच्या विशिष्ट मायेच्या संस्कारासह अगदी निर्वात पोकळीत प्रविष्ट होणाऱ्या फनापासून पूर्णतः भिन्न असते. त्याचप्रमाणे एका सामान्य मानवप्राण्याच्या मायेचे संस्कार हे भूमिकांच्या पथावर असलेल्या मानवप्राण्यांच्या मायेच्या संस्कारापासून अगदीच भिन्न राहतील.

सर्व स्थितीत फनाचे निरनिराळे प्रकार जरी सदैव फना म्हणूनच राहतात तरी विभिन्न संस्कार जागृतावस्थेत 'बका' मध्ये व्यक्तिगत चेतनेत भरलेले असतात, ते सृष्टीतील जीवनाच्या प्रत्येक व सर्व जाती–उपजातींच्या व अवस्थांच्या व्यक्तिगत 'फनाला' जन्म देतात.

त्या विपरित, फनाच्या गाढनिद्रावस्थेत नंतर जागृतावस्थेत व्यक्तिगत जीवनाची बका जेव्हा प्राप्त केली जाते तेव्हा बका, जिचा सुफी परिभाषेत अर्थ होतो ''आत निवास करणे'' मायेचे प्रत्येक दिवसाचे व्यक्तिगत जीवन मायेत प्रस्थापित करते. ही प्रस्थापना प्रबळ संस्कारानुसार घडते. ज्यामुळे मायेच्या विविध प्रकारच्या संस्कारापासून व्यक्तिगत जीवन गाढनिद्रावस्थेत फनाच्या त्याच्या व्यक्तिगत अवस्थेत विगत झाले (passed away) होते. असे असल्यामुळे, प्रत्येक व्यक्तिगत बका आज अन्य बकापासून भिन्न राहते कारण, जेव्हा ही व्यक्तिगत बका जागृतावस्थेत प्राप्त केली जाते, तेव्हा प्रत्येक व्यक्तिगत जीवनाच्या संस्कारीत चेतनेचे संस्कार मायेचे व्यक्तिगत जीवन मायेत प्रस्थापित करण्यास पूर्णतः जबाबदार असतात.

शेवटी अशाप्रकारे नियमित कधीही न चूकणाऱ्या क्रमाने गाढनिद्रावस्थेतील मायेच्या जगातील फनानंतर जागृतावस्थेतील मायेच्या जगातील बका निरपवादपणे येते, जी पाळीने अनिवार्यतः फनात हरविली जाते, दिवसा मागून दिवस, वर्षामागून वर्ष व जीवनामागून जीवनापर्यंत केवळ वारंवार बदलणे व पुनर्स्थापित होण्यासाठी – फनात लुप्त होते यावर कोणत्याही प्रकारचे लक्ष न देता की, ह्या फना किंवा बका सामान्य चमत्कारिक मिथ्या जीवनाच्या आहेत किंवा भूमिकांच्या अध्यात्मपथावरील आहेत. ती जोपर्यंत मायेच्या जगताशी जोडलेली आहे तोपर्यंत ती कधीही स्थिर राहणार नाही.

जोपर्यत व्यक्तिगत जीवन सत्याच्या 'फनाफिल्लाह' मध्ये अंतिमतः खऱ्या अर्थाने सामावल्या जात नाही व दिव्यत्वाच्या बकाबिल्लाह मध्ये प्रस्थापित होत नाही तोपर्यंत हे स्पष्ट आहे की, मायेचे फना–बकाचे असंख्य व विविध प्रकार व समुह चिकटून राहणाऱ्या बकामधील व्यक्तिगत जीवनाच्या उत्क्रमित

व प्रतिवर्धित चेतनेला संस्कारीत करीत राहतात.

प्रत्येक भूमिकेत देखील पहिल्या भूमिकेपासून तो आत्मानुवर्ती उत्क्रांत होणाऱ्या चेतनेच्या सहाव्या भूमिकेपर्यंत, सहा भूमिकांच्या प्रत्येक भूमिकेची विशिष्ट प्रकारची बका प्रत्येक भूमिकेच्या मायेच्या विशिष्ट संस्कारानुसार राहणे हे अनिवार्य आहे.

मनुष्य जेव्हा प्रथम भूमिकेवर आहे असे म्हटले जाते तेव्हा त्याची परिपूर्ण उत्क्रांत चेतना प्रतिवर्धित होणे सुरु झाले आहे व त्याची संपूर्ण चेतना सूक्ष्म भुवनाच्या पहिल्या भूमिकेवर केन्द्रित होऊन राहते. कारण पहिल्या भूमिकेचे संस्कार त्याच्या प्रतिवर्धित होणाऱ्या चेतनेला सातत्याने युक्त करीत त्याला पहिल्या भूमिकेत निवास करण्यासाठी विवश करतात व त्याला भूमिकेच्या मायेचा अनुभव घेण्याकरिता अग्रेसर करतात. जरी पहिल्या भूमिकेतील मनुष्याचे स्थूलशरीर हे जरी अगदी त्या मनुष्याच्या स्थूल शरीरासारखेच असते, जो पहिल्या भूमिकेवर नसतो व जरी पहिल्या भूमिकेवरील मनुष्य देखील तंतोतंत रोजच्या सामान्य विस्मयकारक मिथ्या जीवनातील मनुष्यासारखाच झोपतो व जागा होतो, तरीही त्याची प्रतिवर्धित होत असलेली चेतना पहिल्या भूमिकेवर अगदी सरळ सरळ केन्द्रित झालेली असते व यामुळे तो पहिल्या भूमिकेच्या मायेच्या संस्कारासोबत पहिल्या भूमिकेच्या फनाच्या गाढनिद्रावस्थेत ''प्रविष्ठ होतो' व पहिल्या भूमिकेच्या बकात पहिल्या भूमिकेत निवास करण्यासाठी व त्या भूमिकेचे संस्कार अनुभवण्यासाठी तो दररोज पहिल्या भूमिकेत प्रस्थापित होतो व जागा होतो.

अध्यात्मपथावरील भूमिकात प्रवेश करणाऱ्या मनुष्याच्या फना-बकामध्ये व पथावरील भूमिकात नसणाऱ्या मनुष्याच्या फना-बकामध्ये फरक हा आहे की, पहिल्या फना-बकाचे साम्य अशा एका मनुष्याशी करता येईल की, जो एका विशिष्ट ठिकाणी अनेक वर्षे राहिल्यानंतर गतायुष्यातील सर्व संबंध तोडतो व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करीत व एका खंडानंतर दुसरा पार करीत जग प्रवासाला निघतो. जरी या मनुष्याला दररोज झोपी जाण्याची व जागे होणयाची आधीची संवय असल्यामुळे तो दररोज झोपी जात असेल व दुसरे दिवशी जागा होत असेल तरी आता त्याच्या जगप्रवासात तो गाढनिद्रेच्या आधीन होत असेल व पूर्णपणे बदललेल्या सभोवतीच्या परिस्थितीच्या आणि नूतन-अपूर्व अनुभवांच्या संस्कारासह निश्चितच दररोज

जागाही होत असेल.[२२]

थोडक्यात म्हणजे जो मनुष्य आत्मानुवर्ती चेतनेच्या पहिल्या भूमिकेत प्रवेश करतो तो अंततः पहिल्या भूमिकेचा परिपूर्ण अनुभव प्राप्त करतो. हा मनुष्य जो स्वतःला पहिल्या भूमिकेत प्रस्थापित करवून घेतो तो त्याचे जीवन ह्या ''त्याच्या स्वतःच्या विश्वात'' प्रस्थापित करतो व त्यामुले तो या भूमिकेत झोपी जातो व याच भूमिकेत तो रोज जागाही होतो. अगदी तंतोतंत याच पद्धतीनुसार सर्व व्यक्तिगत चेतना सर्व इतर भूमिकात त्या विशिष्ट भूमिकांच्या फनात अंतर्गत होते आणि अशा भूमिकांमध्ये जागे होण्यासाठी व या विशिष्ट भूमिकात दैनिक जीवनाच्या बकाला स्थापित करण्याकरिता जागृत होते.

असे असले तरी पथाच्या प्रत्येक भूमिकेची फना–बका मूलतः सारख्याच प्रकारची असते, कारण ती क्रमशः प्रतिवर्धित होणाऱ्या चेतनेशी संबंधीत असते, परंतु तिचा संबंध ना तो उत्क्रांत होणाऱ्या चेतनेच्या फनाबकाशी असतो, ना तो उत्क्रांत झालेल्या चेतनेच्या फना–बकाशी असतो. एका भूमिकेच्या फना–बकाचा दुसऱ्या भूमिकेच्या फना–बका पासून वेगळेपणा दाखविण्यासाठी जो काय फरक असेल तो असाच असेल की जो एकाच पृथ्वीवरील वेगवेगळ्या दोन खंडात राहणाऱ्या दोन मनुष्यांच्यामध्ये असेल व त्यांच्या पृथ्वीवरील विशिष्ट भागाचे जेथे त्यांच्यापैकी प्रत्येकजण राहतो त्यांचे स्वतःचे व्यक्तिगत संस्कार यात जो फरक असतो, त्यानुसार असेल. अमेरिकेतील मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनाचे त्याचे स्वतःचे संस्कार व त्या संबंधित अनुभव असतात, तसेच हे खरे आहे की, आशियातील मनुष्याचे त्याचे स्वतःचे संस्कार व अनुभव त्यांच्या खंडाशी संबंधित असतात जे अमेरिकेपेक्षा अगदीच भिन्न असतात.

परंतु मूलभूत वस्तूस्थिती कायमच असते की, ह्या दोन्हीही व्यक्ती एकाच पृथ्वीर राहतात, त्या दोघांच्या संस्कारात व तदनुषंगिक अनुभवात प्रचंड फरक असूनही जेव्हा दोघे झोपी जातात तेव्हा ते दोघेही गाढनिद्रेच्या अंतर्गत होतात. जेव्हा ते दोघेही गाढनिद्रेचा एकसारखाच आनंद उपभोगू शकतात तेव्हा एक मखमली शय्येवर झोपला काय व दुसरा गवताच्या चटईवर झोपला काय याला मुळीच महत्व राहत नाही. त्याचप्रमाणे जेव्हा दोघेही जागे होतात तेव्हा वेगवेगळ्या खंडातील जीवन जगण्यापायी असणाऱ्या त्यांच्या संस्कारात व त्यांच्या तदनुषंगिक सापेक्ष अनुभवाचा फरक असला तरी ते त्याच पृथ्वीवर

मायेतील आपआपले व्यक्तिगत जीवन जगू शकतात. अशाप्रकारे पृथ्वीवरील भूमिकांच्या फना–बकामध्ये मूलतः कोणत्याच प्रकारचा फरक नसतो. जेव्हा भूमिकांवरील व्यक्तिगत जीवन विचाराधिन असते तेव्हा पथावरील प्रत्येक भूमिकेची आपापली स्वतःची फना–बका असते.

अगदी ज्याप्रमाणे अविकसित पहिल्या प्रकारच्या फना व बकात कुत्र्यांच्या, घोड्यांच्या हत्तींच्या, उंटांच्या सर्व सजीवांच्या व मानवप्राण्यांच्या जे स्थूल जगतात मायेच्या विलक्षण मिथ्या जीवनात जीवन जगत आहेत त्यांच्या व्यक्तिगत फना व बकाचा समावेश होतो, अगदी त्याचप्रमाणे पथावरील भूमिकांच्या फना–बकाच्या दुसऱ्या प्रकारात मायेतील सूक्ष्म व मनोजगताच्या प्रत्येक भूमिकेवर प्रथम भूमिकेपासून तो सहाव्या भूमिकेपर्यंत प्रत्येकाच्या व सर्वांच्या फना–बकाचा अंतर्भाव होतो.

एका विशिष्ट भूमिकेत क्रमशः आत्मानुवर्ती उत्क्रमित होणाऱ्या चेतनेसह जेव्हा भूमिकेच्या संमोहित करणाऱ्या अनुभवांनी मनुष्याची मनःस्थिती पूर्णपणे बधिरलेली होते तेव्हा त्या मनुष्याला विशिष्ट भूमिकेचा मज्झूब* असे म्हटले जाते. असा मज्झूब भूमिकेच्या मायेच्या संस्कारांनी पूर्णतः निमग्न व अत्यंत प्रभावित होतो, जे संस्कार सातत्याने त्याच्या चेतनेत भरलेले असतात. जागृतावस्थेत देखील भूमिकेचा हा मज्झूब असा वागतो की, जणू तो नशेत पूर्णतः उन्मत झाला आहे व भूमिकेच्या संमोहनात पूर्णपणे निमग्न आहे. अशा मनुष्याला सामान्यतः 'मस्त' म्हणतात. याचा अर्थ असा होतो की, तो मनुष्य ''ईश्वरोन्मत्त'' झाला आहे.

याउलट दृष्टीने पाहता, विशिष्ट भूमिकेतील एखादा मनुष्य भूमिकेच्या संमोहित करणाऱ्या अनुभवांनी त्यात निमग्न व प्रभावित होत नाही परंतु त्याची प्रतिवर्धित होणारी चेतना त्या भूमिकेच्या मायेच्या संस्कारांनी सतत संस्कारित होते तरी तो आपल्या मनाचे संतुलन सारखे राखून ठेवतो व अशा मनुष्याला त्या विशिष्ट भूमिकेचा* सालिक म्हटल्या जाते. असा सालिक बाह्य देखाव्यावरुन जगातील अगदी सामान्य मनुष्यासारखा वागतांना दिसतो, जरी त्याची चेतना

* (टीप– भूमिकांचे मज्झूब व सालिक यांना सातव्या भूमिकेचे यथार्थ मज्झूब ज्यांना ''मज्झूब–ए–कामिल'' म्हणतात. (पूर्ण मज्झूब) त्यांना सातव्या भूमिकेचे यथार्थ सालिक समजण्याची चूक करु नये.

प्रगमनशिलतेने प्रतिवर्धित होत असते व ती विशिष्ट भूमिकेवर पूर्णपणे केन्द्रित झाल्यामुळे तिचे स्थूल जगतापासून पूर्णपणे साहचर्य सुटते. 'सुलुकियत' आणि 'मस्ती' प्रत्येक भूमिकेच्या वेगळ्य आहेत.

असे असले तरी अशीकाही उदाहरणे आहेत की, एखाद्या विशिष्ट भूमिकेतील मनुष्य कधीकधी त्या भूमिकेच्या अनुभवांच्या संमोहनाने त्यात पूर्णपणे डुंबून राहतो व निमग्न होतो व मज्झूब सारखा वागतो व अन्यवेळी आपल्या मनाचे सन्तुलन प्राप्तकरुन त्याभूमिकेतील सामान्य साधारण सालिक सारखा वागतो. त्याची वागणूक जर प्राबल्याने मज्झूब सारखी असेल तर त्याला त्या भूमिकेचा 'मज्झूब–सालिक' म्हटले जाते. तसेच जर त्याची वागणूक प्राबल्याने सालिक सारखी असेल तर त्याला त्या भूमिकेचा 'सालिक मज्झूब' म्हटल्या जाते. मायेतील अशा अवस्थेची तुलना सत्यातील दैवी संगमस्थानी असलेल्या ''तुरीया'' अवस्थेची करता येईल.

फना–बाकाचा तिसरा प्रकार हा चेतनेच्या अंतिम आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या सातव्या भूमिकेचा आहे व तो सत्याचा यथार्थ 'फना–फिल्लाह' आहे व दिव्यत्वाचा यथार्थ 'बका–बिल्लाह' आहे. व्यक्तिगत जीवनाची संस्कारीत चेतना जेव्हा मायेच्या संपूर्ण संस्कारापासून पूर्णतः व अंतिमतः मुक्त होते व जेव्हा हा निर्भार किंवा संस्काररहित व्यक्तिगत ''स्व'' जाणीवपूर्वक ''फना–फिल्लाह'' किंवा ''मी परमात्मा आहे.'' ही अवस्था प्राप्तकरण्यासाठी मूळ दिव्य संपूर्ण निर्वात मध्ये ''प्रविष्ट'' होतो तेव्हा लक्ष्य अंतिमतः प्राप्त झालेले असते ही खरी'मज्झूबियत'[२३] ची अवस्था आहे.

संपूर्ण विभिन्न व्यक्तिगत जाती–उपजाती व मायावी जीवनाच्या अवस्थेतील फनात व दिव्यजीवनाच्या अंतीम व यथार्थ फनात केवळ एक अनंत फरक हा आहे की, पहिल्यात चेतना मुळीच नसते व दुसऱ्यात ती परिपूर्ण असते.

'फना फिल्लाहच्या'' अवस्थेनंतर, 'बका बिल्लाह' ची अवस्था प्रस्थापित होते, व ती अवस्था काही व्यक्तिगत झालेल्या आत्म्यांच्याव्दारां पृथ्वीवर 'नर–नारायणा' च्या (Man God) रुपात व्यवहारात परमात्म्याचे जीवन आणण्याकरिता प्रस्थापित होते. असा 'नर–नारायण' एकाच वेळी

जीवनाच्या सर्व अवस्थांमध्ये व सर्व भूमिकांमध्ये मायेतील मनुष्याचे जीवन जगतो, हे समजून की, माया ही माया आहे, हे समजून तो परमात्म्याचे जीवन यथार्थाने जगतो, ही खरी सुलुकियतची अवस्था आहे.

'फना–फिल्लाह' ची अवस्था प्राप्त केल्यावर व बका–बिल्लाहची अवस्था प्राप्त करण्यापूर्वी, त्या ठिकाणी फना–फिल्लाह व बका–बिल्लाह यांच्या मध्ये दैवीसंगमावर एक 'तुरिया' अवस्था देखील आहे. या अवस्थेत कधी फना–फिल्लाह यथार्थ मज्झूबियतचा अनुभव असतो तर कधी बका–बिल्लाह च्या यथार्थ सुलुकियतचा अनुभव असतो. ही यथार्थ 'मज्झूब सालिक' किंवा 'सालिक–मज्झूब' ची अवस्था परिस्थितीनुसार असू शकते.

फनापूर्वी असलेली सीमित मिथ्या 'मी' ची चेतना आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारां परिपक्व झाली व फना–फिल्लाहच्या अवस्थेत सीमित मिथ्या ''मी'' ची जागा यथार्थ अमर्याद ''मी'' ने घेतली. बका–बिल्लाह मध्ये ही परिपक्व चेतना आता परत एकदा पून्हा केन्द्रित होऊन यथार्थ असीमित 'मी' च्या रुपात, ''मी'' वर विश्वात्मक मनाचे रुपात मनावर, अमर्याद प्राणशक्तिच्या रुपात शक्तिवर व विश्वात्मक शरीर म्हणून शरीरावर ज्याला **महाकारण** शरीर असे म्हटल्या जाते, ती चेतना स्थिर होते. एक महत्वाची गोष्ट येथे लक्षात घेतली पाहिजे की, बका–बिल्लाह च्या अवस्थेमध्ये तीच चेतना एकाच वेळी मर्यादित 'मी', मन, प्राणशक्ती व शरीरावर केन्द्रित व स्थिर होते. ज्या कारणास्तव सालिक जाणीवपूर्वक मिथ्याचा मायेच्या व्दारा मिथ्यत्व म्हणून अनुभव घेतो व सत्याच्या सत्यतेच्याव्दारा 'सत्यता' म्हणून अनुभव घेतो.

याचा परिणाम असा होतो की, 'बका–बिल्लाहच्या' परमात्म अवस्थेत तीच चेतना एकाचवेळी ''मी परमात्मा आहे'' व ''मी मानव आहे'' हा दुहेरी अनुभव घेते. या दुहेरी अनुभवाचे सोबत तीच चेतना उत्स्फुर्तपणे परमात्म्याच्या अनंतज्ञान, शक्ती व परमानंदाच्या बरोबरच मानवतेच्या कमजोरीचा व हालअपेष्टांचा देखील सतत अनुभव घेते.

यावरुन हा निष्कर्ष निघतो की, बका–बिल्लाहच्या परमात्मअवस्थेत परमात्मा एका साधारण मानवप्राण्याच्या रुपात आपल्या स्वतःला आपल्या दिव्यजीवनात प्रस्थापित करतो किंवा मनुष्य परमात्म्याच्या जीवनात निवास

करतो.

थोडक्यात म्हणजे 'बका–बिल्लाह' परमात्म्याची ती अवस्था आहे की, जेथे ''आत निवास करणे'' (abiding in) किंवा परमात्म्यात प्रस्थापित करवून घेण्याचा अनुभव ज्या लोकांना होतो त्याचे वर्णन 'सालिक' किंवा 'जीवन–मुक्त'[२४, २५] या शब्दांनी केले जाते. सालिक निरंतर व जाणीवपूर्वक 'मी परमात्मा आहे' या अवस्थेचा व 'मी मानव आहे' या अवस्थेचा एकाचवेळी दुहेरी अनुभव घेत असतो व अशा तऱ्हेने अनंतज्ञान, शक्ती व परमानंदाचा संचय करतो व त्याचवेळी मानवी कमजोरीचा व हालअपेष्टांचा अनुभव घेत असताना हे जाणत असतो की त्यांचे मिथ्यापन सीमित मायेच्या अभिव्यक्तिवर आधारित आहे, जे त्याच्या स्वतःच्या ''सर्वकाही'' व अनंत अवस्थेतून अभिव्यक्त झाले.

बका–बिल्लाह मध्ये मानवीप्राण्यात परमात्म्याचे जीवन प्रस्थापित झाल्यामुळे मनुष्य परमात्मा म्हणून 'सहज समाधीचा' अनुभव घेतो. याचा अर्थ असा आहे की, मनुष्य परमात्मा म्हणून किंचीत मात्रही प्रयत्न न करता, एकाच वेळी व सतत स्वतः परमात्मा असल्याचा व मनुष्य असल्याचा आपसूकच दुहेरी अनुभव घेतो ही आहे परिपूर्णतेची अवस्था.

पूर्णता (perfection) या शब्दाला सामान्यतः सर्वात उच्च अवस्था किंवा पराकाष्टेच्या प्रकारची उपलब्धी असा अर्थ अभिप्रेत आहे म्हणून 'पूर्णता' ही काही अधिक जास्त परिपूर्ण होऊ शकत नाही, परंतु दिव्यत्वाच्या परिभाषेत जेव्हा पूर्ण हा शब्द उपयोगात आणल्या जातो तेव्हा 'बका–बिल्लाहच्या' सुलुकियत अवस्थेत पूर्णत्वाचे तीन प्रकार असतात.

पहिला प्रकार ''कामिल'' पूर्ण पुरुष म्हणून संबोधल्या जातो.

दुसरा प्रकार ''अक्मल'' अत्यंत पूर्ण पुरुष म्हणून संबोधल्या जातो.


तीसरा प्रकार ''मुकम्मिल'' ज्याला परम पूर्ण पुरुष असे म्हटले जाते.

शाश्वत सत्याच्या त्यांच्या निरंतर व जाणीवपूर्वक अनुभवात कोणत्याच प्रकारचा मुळीच फरक असत नाही, परंतु पूर्णत्वाला ज्या तुलनेच्या पायऱ्या जोडल्या आहेत त्या 'पूर्णत्वाच्या' अधिकाराचा वापर करणाऱ्या फरकामुळे आहेत. म्हणून कार्य करण्याच्या फरकामुळे पूर्णत्वाच्या प्रत्येक प्रकाराला निरनिराळे गुणविशेष लावलेले आहेत.

'कामिल' आपल्या मर्जीने केवळ एकाच मनुष्याला परमात्म्याच्या साक्षात्काराचा सचेत अनुभव देऊ शकतो व केवळ त्याच मनुष्याला सत्याच्या

# चार यात्रा

रेखाचित्र- ६




मेहेर बाबांच्या
दिग्दर्शनाखाली पूर्ण केला

दी एव्हरीथिंग अॅन्ड नथिंग वरुन पुनर्मुदित मेहेर हाऊस पब्लिकेशन, ऑस्ट्रेलिया कडून प्रकाशित

शाश्वत अनुभवात आपल्या सारखा बनवू शकतो. 'अकमल' अनुभवाचे संदर्भात अनेकांना आपल्यासारखे करु शकतो, उलटपक्षी 'मुकम्मिल' न केवळ कितीही लोकांना इतकेच नव्हे तर सृष्टीतील* सर्वांना सत्याच्या शाश्वत अनुभवात आपल्या सारखे बनवू शकतो. परंतु तो आपल्या मर्जीने कितीही लोकांच्या भौतिक शरीरांचे परिवर्तन (transfiguration) प्रदान करु शकतो व एवढेच नव्हे तर तो सत्याच्या शाश्वत व सचेत अनुभवासह त्या सर्वांची शरीरे आपल्या स्वतःच्या स्थूल जगतातील शरीरासारखी दिसतील, जगू शकतील व अनुभवू शकतील असे करु शकतो.

'बका-बिल्लाह' दुसऱ्या दिव्यप्रवासाचा शेवट आहे. 'फना-फिल्लाह' व 'बका-बिल्लाह' या दोन अवस्थांच्यामध्ये दिव्य-संगमस्थानी (मुकाम-ए-फुरुतत) 'तुरीया' अवस्था आहे. (फना-मा-अल्-बका)

'तुरीया' अवस्था ही अशी स्थिती आहे की जेथे श्रेष्ठ चेतना कधी कधी 'मी परमात्मा आहे' या अवस्थेचा अनुभव देते व कधीकधी तेथे श्रेष्ठ चेतना 'मी मानव आहे' या सामान्य चेतनेच्या अवस्थेचा अनुभव देते.

ज्यांना ''मज्झूब-सालिक'' किंवा ''परमहंस'' म्हटले जाते ते ही स्थिती अनुभवितात व जे या ''तुरीया अवस्थेत असतात ते कधी-कधी'' मी आपल्या स्वतःचा परमात्मा आहे.'' असा चेतनापूर्वक अनुभव घेतात व कधी-कधी 'मी आपल्या स्वतःचा सजीव प्राणी आहे' असा चेतनापूर्वक अनुभव घेतात.

पहिल्या दिव्य प्रवासाच्या शेवटी व दुसऱ्या दिव्य प्रवासाच्या प्रारंभी, यांच्या मध्ये दैवी संगमावर ''दिव्यत्वाचे'' व ''मानवी'' चढ उतार होणारे दिव्य अनुभव, जोपर्यंत एकाचवेळी 'फना-फिल्लाहची'' 'मी परमात्मा आहे'' ही

---

* (टीप- जर त्याची मर्जी झाली तर 'मुकम्मिल' सर्व सृष्टीला परमात्म्याचा साक्षात्कार प्रदान करु शकतो. सर्व सृष्टीचा अर्थ म्हणजे सर्व मानवप्राणी व सृष्टीत असलेल्या धुळिकणापासून तो हत्तीपर्यंतच्या सर्व वस्तू. परंतु 'मुकम्मिल' असे करण्याची कदापिही इच्छा करणार नाही कारण, अशा प्रकारची इच्छा कार्यान्वित करणे म्हणजे वैश्विक मायेचा (समग्र सृष्टीचा) अंत करणे होईल. वैश्विक मायेचा अंत करणे म्हणजे दैवीलिलेचा अंत करण्यासारखे होईल. दैवीलिलेचा अंत करणे म्हणजे परमात्म्याच्या मूळ प्रकृतीच्या किंवा त्याच्या मूळ दुसऱ्या अवस्थेच्या गुणविशेषांच्या विरुद्ध जाण्यासारखे होईल. (परमात्म्याच्या दहा अवस्था या भागातील अवस्था दुसरी मध्ये हे वर्णिले आहे.) ज्या अवस्थेत परमात्मा अनंतपणे सचेत असतो व त्याच वेळेस अनंतपणे अचेत असतो.

अवस्था क्रमशः ’बका–बिल्लाह’ अवस्थेत प्रस्थापित होत नाही तोपर्यंत आळीपाळीने अनुभवले जातात, ज्या ’बका–बिल्लाह’ अवस्थेत परमात्म्याच्या अवस्थेच्या अंतर्गत निवास प्रस्थापित होतो व जेथे मनुष्य परमात्मा म्हणून अगदी नगण्य प्रयत्नानी, आपोआपच परमात्मा व मानवाच्या व्दिधा अनुभवातून एकाच वेळी जातो.

दिव्य संगमस्थान ओलांडल्यानंतर ’फना–फिल्लाहची’ मज्झूबियत ’बका–बिल्लाह मध्ये’ सुलूकियत म्हणून प्रस्थापित होते. मज्झूबियतचा मज्झूब अनंत आनंदात डूंबलेला* असतानाच अनंतज्ञान व शक्तीचा अनुभव जाणीवपूर्वक घेऊ शकतो. सुलूकियतचा सालिक तथापि न केवळ जाणीवपूर्वक अनुभव घेतो परंतु अनंत ज्ञान, शक्ती व आनंद यांचा अनुभव देखील घेतो व त्यांचा जाणीवपूर्वक संचयही करतो, जरी कुतुबियत अवस्थेतील कुतूब ज्या प्रमाणे दुसऱ्याकरिता या अनंत पैलूंचा उपयोग करतात त्याप्रमाणे तो उपयोग करीत नाही.

दुसऱ्या दैवी प्रवासाचा शेवट तिसऱ्या दैवी प्रवासाकडे घेऊन जातो जी कुतुबियतची अवस्था आहे, ज्या ठिकाणी परमात्म्याचे जीवन जगण्याचा यथार्थाने अनुभव घेणाऱ्यांना ’’कुतूब’’ किंवा ’’सद्‌गुरु’’ किंवा ’’परमपुरुष’’ म्हटले जाते. कुतुबियतची अवस्था, ’’बका–बिल्लाह’’ च्या सुलुकियत नंतर येते, ज्या ठिकाणी मनुष्य परमात्मा म्हणून बका–बिल्लाहमध्ये परमात्म्याच्या जीवनात प्रस्थापित झाला व आता तो कुतुबियतच्या अवस्थेत कुतूब किंवा सद्‌गुरु म्हणून परमात्म्याचे जीवन जगणे प्रारंभ करतो. तो आता अनंत ज्ञान, शक्ती व परमानंद यांचा न केवळ ’’फना–फिल्लाहच्या’’ अवस्थेसारखा

* (टीप– मेहेरबाबांना विचारले होते की जर मज्झूबना सर्व भवनांबद्दल (स्थूल, सूक्ष्म व मन) तसेच सर्व वस्तूंबद्दल चेतना नसते व ते फक्त ’’मी परमात्मा आहे’’ या अवस्थेबद्दलच सचेत असतात तर हे कसे की, ते जीवनाच्या भौतिक बाजुची प्रतिक्रिया व्यक्त करतात. (जसे– खाणे, पिणे व काही गोष्टींच्या संदर्भात आपली पसंती व काहींच्या बाबतीत नापसंती व्यक्त करतात ?) यावर मेहेरबाबांनी सांगितले, मज्झूबला आवडेल किंवा नावडेल, तो मागेल किंवा नाकारेल, आनंदी दिसेल किंवा रुष्ट दिसेल, असे वरपांगी काहीही दिसत असले तरी ती एक आपोआप परावृत्त होणारी प्रतिक्रिया असते, ज्या बद्दल त्याला मुळीच जाणीव नसते, ज्याप्रमाणे मनुष्य निद्रावस्थेत घोरताना काढलेल्या आवाजाबद्दल अचेत असतो जसे झोपेत चालणाऱ्या मनुष्याला त्याच्या कृत्याची जाणीव नसते, मग त्याची क्रिया कितीही सर्वसामान्य किंवा विविध प्रकारच्या असोत. मज्झूबला आपल्या शरीराची व सभोवतालची विस्मृती असते व त्याला फक्त आपल्या दैवी अवस्थेची ’’मी परमात्मा आहे’’ जाणीव असते. – संपादक)

जाणीवपूर्वक अनुभव घेतो व न केवळ 'बका–बिल्लाहच्या' अवस्थेसारखा जाणीवपूर्वक त्यांचा संचय करतो, परंतु ह्या अनंत पैलूंचा कुतुबियत अवस्थेमध्ये अजुनही मायेत असलेल्यांसाठी उपयोग करतो. 'कुतुबियत' अवस्थेत असलेल्या अशा 'नर–नारायणाला' सद्‌गुरु (पूर्ण पुरुष)[२६] असे म्हणतात. जो मनुष्य न केवळ परमात्मा झाला व परमात्म्यात प्रस्थापित झाला तर जो मायेत परमेश्वराचा व्यक्तिगत प्रतिनिधी म्हणून परमात्म्याचे जीवन जगतो.

''मी परमात्मा आहे'' व ''मी मानव आहे'' ही दुहेरी भूमिका जी ''बका–बिल्लाह'' मध्ये प्रस्थापित झाली होती ती आता न केवळ एकाच वेळी अनुभविली जाते तर कुतुबियतच्या अवस्थेमधून जगलिही जाते व 'नर–नारायण' (कुतूब, सद्‌गुरु किंवा पूर्ण पुरुष) आता एकाच वेळी परमात्म्याचे व मानवाचे जीवन जगतो व ते जीवन परमात्म्याच्या अवस्थेच्या अनंत ज्ञान, शक्ती व परमानंदाच्या सर्व सामर्थ्यासह व मनुष्य अवस्थेतील सर्व दौर्बल्य व हालअपेष्टांसह जगतो.

तिसऱ्या दिव्यप्रवासाचे शेवटी सद्‌गुरु न केवळ दुहेरी भूमिकेत जगतो व एकाचवेळी तो सामर्थ्य व कमजोरी प्रदर्शित करतो तर तो एकाचवेळी अनंत शक्तीच्या प्रदर्शनाचा उपयोग अनंत ज्ञान, शक्ती व आनंदाव्दारा तसेच अपरिमित दौर्बल्याच्या प्रदर्शनाचा हालअपेष्टांव्दारां त्यांच्याकरिता उपयोग करतो जे अज्ञानात असूनही मिथ्या सीमित मायेला अनंत सत्य समजतात. या अवस्थेच्या उलट 'बका–बिल्लाहच्या' अवस्थेत परमात्मा त्याच्या परमात्म स्थितीचा अनुभव निरंतर व एकाच वेळी मनुष्यत्वाच्या सतत व निरंतर अनुभवासह करतो व असे असले तरी तो अज्ञानात जे आहेत त्यांच्यासाठी अनंत ज्ञान, शक्ती व परमानंदाचा उपयोग करु शकत नाही, तसेच तो अपरिमित दुबळेपणा व हालअपेष्टांचा देखील त्यांच्याकरिता उपयोग करु शकत नाही, कारण परमात्मा या अवस्थेत कुतुबियतच्या अवस्थेप्रमाणे परमात्म्याचे जीवन जगत नाही.

अगदी फारच विरळा व अगदी फारच क्वचित थोडे आपल्या तिसऱ्या दिव्य प्रवासाचा आरंभ व शेवट कुतूब किंवा सद्‌गुरु या अवस्थेत करतात. या अवस्थेत मनुष्य परमात्मा म्हणून परमात्म्याचे जीवन जगतो. तो आता अनंतज्ञान, शक्ती व परमानंदाचा जो अनुभव घेतो त्याचा उपयोग करतो. तो

आता ''परमात्मा व मनुष्य'' किंवा ''नर–नारायण आहे'', ज्याने एक अविभाज्य अस्तित्व अनेकात उतरविले आहे. तो एक ''नर–नारायण'' आहे की, ज्याने स्वतंत्र सत्याला (Independent Reality) मायेच्या रुपात खाली उतरविले आहे व तो त्याच्या परब्रह्म अवस्थेच्या, विज्ञान भूमिकेच्या किंवा ''मुकाम–ए–मुहम्मदीच्या'' [२७] दिव्य अधिकाराने मायेला नियंत्रित करतो.

''सहज समाधीत'' असणे हे या ''नर–नारायणाचे'' किंवा ''सद्‌गुरुचे'' स्वयं जीवनच असते. असा सद्‌गुरु एकाच क्षणी एकसमयावच्छेदेकरुन सर्व विश्वात, सर्व भुवनात, सर्व स्तरावर व सर्व भूमिकांवर ''एकाचे तसेच सर्वांचे'' जीवन जगत असतो. त्याचे जीवन – विशिष्ट स्तरावर, विशिष्ट भूमिकांवर प्रत्येक प्राणी म्हणून व त्या खास स्तरावरील व त्या विशिष्ट भूमिकेवरील व्यक्ती म्हणून तो जीवन व्यतीत देखील करतो. परमात्म्याचे जीवन जगत असतांनाच म्हणजे एकाचवेळी तो (सद्‌गुरु) मनुष्याचे जीवन देखील पृथ्वीवर* जगत असतो. या कुतुबियतच्या अवस्थेत असे म्हणता येईल की, परमात्मा परमात्मा–स्थितीला पूर्णपणे व्यापून टाकतो, याचा अर्थ असा की, परमात्म्याची चेतना प्रत्येक गोष्टीत व्यापल्या गेल्यावरही परमात्म्याची परब्रह्म अवस्थेतही (Beyond State) ती चेतना अनंत, अमर्याद व अनिर्बंध राहते व त्याचवेळेस परमात्म्याच्या 'परात्पर परब्रह्म' अवस्थेबद्दल ती शाश्वततः सचेत असते.

चवथा दिव्यप्रवास ''कुतूबचे'' शरीर सोडण्याशी संबंधित आहे.

कुतूब आपले शरीर सोडल्यावर देखील जाणीवपूर्वक शाश्वतरित्या व्यक्तिशः अनंत परमात्मा म्हणून राहतो व 'फना–फिल्लाह' अवस्था जी 'लक्ष्य' आहे, त्या ''मी परमात्मा आहे'' या अविभाज्य व व्यक्तिगत अवस्थेचा चिरस्थायी अनुभव घेत राहतो. म्हणजेच चवथ्या दिव्यप्रवासात शरीर नसताना किंवा मानवी देह त्यागल्यानंतर देखील हा अनंत, अविभाज्य व्यक्तिमत्वाचा

(*टीप – मेहेरबाबांच्या शब्दात पूर्णता ही परमात्म्याची परमात्मा म्हणून नाही, ना ती मनुष्याची मनुष्य म्हणून असते – सीमित प्राणी ज्याला आपल्या सीमिततेची जाणीव आहे तो निश्चीतच पूणतेपेक्षा कमी आहे, परंतु त्याला जेव्हा अनंताशी (परमात्म्याशी) एक असल्याची चेतना प्राप्त होते तेव्हा तो 'पूर्ण' होतो. अशाप्रकारे आपल्याला पूर्णत्व प्राप्त होते, जेव्हा सीमितता तिची मर्यादा पार करुन अनंताचा अनुभव घेते किंवा जेव्हा अनंत आत्मा त्याने कल्पिलेले वेगळेपण टाकून मनुष्य बनतो, या दोन्हीही स्थितीत सीमित व अनंत एकमेकांचे बाहेर असत नाहीत. जेव्हा तेथे सीमित व अनंताचे सुखद व सचेत मिलन होते तेव्हा आपल्याला 'पूर्णत्व' प्राप्त होते.– संपादक)

सचेत अनुभव ''मी परमात्मा आहे'' 'सर्वकाही' आहे, अनंत व अमर्याद 'एकमेवा व्दितीय' आहे, (हा अनुभव) शाश्वतरित्या कायमचा टिकून राहतो.

याचप्रमाणे परमात्मा ''बका-बिल्लाहच्या'' अवस्थेत ज्या ठिकाणी ''मी परमात्मा आहे'' व ''मी मानव आहे'' ही चेतनेची वरपांगी दुहेरी भूमिका प्रगट होते व ती स्वाभाविकपणे वठविली जाते. जोपर्यंत मायेचे आवरण, जे जाणून-बुजून व चेतनापूर्वक धारण केलेल असते ते टाकून दिल्या जात नाही, म्हणजेच जेव्हा मानवीदेह किंवा शरीर त्यागले जाते तेव्हा सचेत, अनंत, अविभाज्य व्यक्तिमत्वाचा अनुभव ''मी परमात्मा आहे'' ''मी सर्वकाही आहे', अनंत आहे व असीमित आहे, ''एकमेवा व्दितीय आहे.'' हा अनुभव शाश्वतरीतीने राखल्या जातो.

परमात्मा म्हणजे शाश्वत अनंत व चराचराला व्यापणारे सर्वव्यापी ''अस्तित्व'' ज्याअर्थी परमात्मा शाश्वतरीतीने अनंत अस्तित्व आहे, त्या अर्थी अनंततेने शाश्वतरित्या अस्तित्वात असणाऱ्या परमात्म्याच्या अनंत संख्येनी अवस्था आहेत

परंतु मूलतः परमात्म्याच्या फक्त दोनच अवस्था आहेत, मूळ अवस्था व अंतिम अवस्था

परमात्म्याची ''परात्पर परब्रह्म अवस्था'' ही मूळ अवस्था आहे, जेथे परमात्मा शाश्वतरित्या ''आहे'' व चेतना ''नाही'' ''परब्रह्म अवस्था'' ही परमात्म्याची अंतिम अवस्था आहे जेथे परमात्म्याच्या ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेच्या''परमात्मा आहे'' या अवस्थेची चेतना शाश्वतरीतीने असते.

परमात्मा म्हणून तेच 'अस्तित्व' शाश्वतरित्या सर्वव्यापक होते मग ते ''परमात्म्याच्या परात्पर परब्रह्म अवस्थेचे असो किंवा ''परमात्म्याच्या परब्रह्म'' अवस्थेचे असो, तेथे केवळ एकच फरक आहे, तो आहे चेतनेचा परमात्म्याच्या ''परब्रह्म'' अवस्थेत ''अस्तित्व'' स्वतः जाणीवपूर्णक हे अनुभविते की, ते ''परमात्मा आहे'' ची ''परात्पर परब्रह्म'' अवस्था म्हणून शाश्वतरित्या अस्तित्वात आहे.

म्हणून ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेचा अनुभव घेणे हे दिव्यलक्ष्य आहे जेथे अस्तित्व ''परमात्मा आहे'' च्या अवस्थेची ''परात्पर परब्रह्म'' अवस्था म्हणून शाश्वतरित्या अस्तित्व स्वतः अस्तित्वात असल्याचा जाणीवपूर्वक अनुभव घेते, ही सत्यता आहे व या सत्याचा जाणीवपूर्वक अनुभव

एकदा प्राप्त झाला की, तो शाश्वतरित्या स्थायी राहतो. अनिवार्यतः ही सत्यता स्वतः कोणत्याच रुपात अभिव्यक्त होत नाही तर ती केवळ पृथवीवरील मानवरुपात परमात्म्याच्या वेगवेगळ्या दिव्य अवस्थांमध्ये– मज्झूबियतच्या तुरीया अवस्थेद्वारां किंवा 'फना–मा–अल–बकाच्या' सुलुकियतच्या व कुतुबियतच्या अशा निरानिराळ्या दैवी स्थितींच्या अवस्थांद्वारां अभिव्यक्त होते.

परमात्म्याच्या इतर सर्व मधल्या अवस्था भ्रामक अवस्था आहेत– ज्या ठिकाणी तेच शाश्वत, अनंत, सर्वव्यापी, एकमेव, अविभाज्य निराकार अस्तित्व 'परमात्मा' म्हणून असते, जरी त्याचा शाश्वत सत्य म्हणून अनुभव आला नाही तरी, ते त्याच्याच अस्तित्वाद्वारां प्रतिपादित करते व हे अनंत अस्तित्वाच्या शाश्वत सत्याची परिपूर्ण चेतना प्राप्त करण्याच्या प्रक्रियेच्या काळात अपरिमितपणे असंख्य निर्जीव व सजीव वस्तूंची वा प्राण्यांची परमात्म्याच्या निर्जीव व सजीव अवस्था म्हणून अनेक रुपे धारण करीत, प्रतिपादित करते.

परमात्म्याच्या ह्या सर्व मधल्या मायावी अवस्था मायेच्या नानाविध व विविध स्थूल, सूक्ष्म व मनोसंस्कारांद्वारां, व मायेच्या अंतर्गत संपूर्ण वैश्विक सृष्टिच्या माध्यमातून पोसल्या जातात, व जरी सर्व वैश्विक सृष्टि माया असली तरी ती दैवी अंडी उबवणाऱ्या पेटीचे कार्य करते, जेथे दैवी चेतना उबविली जाते व जेथे असले उबविणे वैश्विक सृष्टिचे स्थूल, सूक्ष्म व मनोरुप किंवा जगतांच्या द्वंद्वाच्या नानाविध, विविध व सीमित सस्किारांचे द्वारां वा अनुभवांचे द्वारां चेतनेची परिपुष्टी व क्रमशः विकसित झाल्यानंतर शाश्वत सत्याचा अनुभव प्राप्त करण्यासाठी, परिपक्वता निर्माण करते.

परमात्म्याच्या मायावी अवस्थेत, शाश्वत निराकार अनंत परमात्मा आपल्या स्वतःच्याच वैश्विक सृष्टिनी संस्कारीत होत असताना, प्रथम स्थूल योनीची चेतना प्राप्त करतो व स्थूल जगतांचा अनुभव घेतो, त्यानंतर तो सूक्ष्म रुपांची चेतना प्राप्त करतो व सूक्ष्म जगतांचा अनुभव घेतो, त्यानंतर मनोरुपांची चेतना प्राप्त करतो व मनोजगतांचा अनुभव घेतो व अगदी शेवटी तो आपल्या अमर्याद 'स्व'(Self) ची चेतना प्राप्त करुन आपल्या शाश्वत अवस्थेचा अनुभव घेतो.

परिणामतः जेव्हा परमात्मा आपल्या स्थूल रुपांविषयी सचेत असतो तेव्हा तो स्थूलशरीरांशी एकरुप होतो व एका विशिष्ट स्थूलशरीराकडे आपले

शरीर म्हणून पाहतो याचा अर्थ अनंत, शाश्वत, निराकार परमात्मा स्वतःला सीमित, मर्त्य व स्थूल रुपात असलेला पाहतो, या अज्ञानाचे कारण केवळ संस्कारच असतात.

अशाप्रकारे परमात्मा जो शाश्वतरित्या 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत आहे किंवा ''परमात्मा आहे'' च्या अवस्थेच्या अनंततेत आहे तो अगदी सुरुवातीला संस्कारांद्वारां संस्कारित झाल्यामुळे आपल्या स्वतःलाा सत्यतेचे ज्ञान प्राप्त करण्याऐवाजी अज्ञानच प्राप्त करतो.

म्हणून जेव्हा परमात्मा विशिष्ट संस्कारांनुसार विशिष्ट रुप किंवा शरीर प्राप्त करतो तेव्हा त्याला वाटते व अनुभव येतो की, तो ते विशिष्ट रुप किंवा शरीर आहे, परमात्मा त्याच्या पाषाणरुपात असे अनुभवतो की, तो पाषाण आहे, तदनुसार सुसंगत संस्कार व त्यांच्या चेतनेसह परमात्म्याला संवेदना होते व अनुभव येतो की तो धातू वनस्पती, कृमी कीटक, मत्स्य, पक्षी, प्राणी किंवा मानव आहे, स्थूल रुपांचा कोणताही प्रकार असो व कोणताही आकार असो.

परमात्म्याची उत्कांत होणारी चेतना, उत्स्फुर्तपणे परमात्म्याला त्याचे साहचर्य त्या रुपाशी, शरीराशी व आकाराशी करण्यासाठी प्रवृत्त करते व त्याचप्रमाणे त्याला स्वतःला संस्कारांद्वारां अनुभव घेण्यासाठी प्रवृत्त करते की, तो ते रुप शरीर व आकार आहे.

अशाप्रकारे जेव्हा परमात्मा सूक्ष्मदेहाविषयी (म्हणजे प्राणशरीर) सचेत असतो तेव्हा स्वतःला तो सूक्ष्मदेह किंवा प्राणशरीर समजतो. याचप्रमाणे तेव्हा परमात्मा मनोशरीराविषयी सचेत होतो (म्हणजे मना विषयी) तेव्हा तो मनोजगताचा अनुभव घेतो व स्वतःला मनोदेह किंवा मन मानतो.

अनंत परमात्मा – सर्वव्यापी आत्मा, जो निराकार, व अनंत आहे, तो अनुभवितो की तो खरोखरच केवळ स्थूल भुवनात सीमित स्थूल शरीर (म्हणजे अन्न भुवनात जीवात्मा ) किंवा सूक्ष्म भुवनात सूक्ष्म शरीर (म्हणजे प्राणभुवनात जीवत्मा) किंवा मनोभुवनात मनोशरीर आहे ( म्हणजे मनोभुवनात जीवात्मा) परमात्मा स्थूल देहांद्वारा स्थूल जगताचा अनुभव घेताना असंख्य स्थूल रुपांशी साहचर्य साधतो व साहचर्य सोडतो ज्याला अनुक्रमे 'जन्म' व 'मृत्यू' असे म्हटले जाते.

शाश्वत, अमर, निराकार परमात्म्याला किंवा ''सर्वोच्च आत्म्याला'' (OverSoul) ज्याला जन्म–मृत्यू नाही अशा परमात्म्याला केवळ संस्कारामुळेच

असंख्य वेळा जन्म–मृत्यूचा अनुभव घ्यावा लागतो. संस्कारामुळे जो पावेतो परमात्म्याला ह्या असंख्य जन्म–मृत्यूचा अनुभव घ्यावा लागतो तो पावेतो जे सीमित असल्यामुळेच मिथ्या असलेल्या केवळ स्थूल जगताचाच अनुभव घ्याव लागतो असे नसून त्याला त्या जगताच्या सुख–दुःखाचा तसेच सद्‌गुणांचा व दुर्गुणांचा देखील त्यासोबत अनुभव घ्यावा लागतो.

सर्व रुपे, सर्व शरीरे आणि घडण, सर्व भुवने व भूमिका, सर्व जन्म व मृत्यू, सर्व सद्‌गुण व दुर्गुण, सर्व सुखे व दुःखे, जी शाश्वत, निराकार व अनंत असलेल्या परमात्म्याने अनुभविली ही सर्व संस्कारांचा ठसा उमटलेल्या चेतनेची उत्पत्ती असते. सारे संस्कार ''काही नाही'' तून उत्पन्न झालेल्या ''काही नसण्याची'' अभिव्यक्ती असल्यामुळे स्थूल, सूक्ष्म आणि मनोभुवनात परमात्मा जे काही त्याच्या उत्क्रांत चेतनेद्वारा अनुभवितो ते सर्व ''काही नाही'' चे अनुभव आहेत आणि हे ''काही नाही'' स्वभातःच ''काहीच नसल्यामुळे'' परमात्म्याच्या मधल्या मायावी अवस्थात सर्व अनुभव शून्य असतात व अक्षरशः भ्रमवत असतात व म्हणून ते मिथ्या आणि सीमित आहेत.

जेव्हा संस्कारांचा ठसा उमटलेली चेतना सर्व संस्कारांपासून मुक्त होते तेव्हाच केवळ मुक्ती मानवरुपात 'निर्वाण' किंवा 'फना' म्हणून प्राप्त होते, जेथे केवळ चेतना 'आहे' व जेथे 'काही नाही' चे सर्वकाही जे 'काही नसण्याचे' असते ते सर्व कायमचे लुप्त होते. निर्वाणा नंतर तीन ते चार दिवस* जो आपले शरीर राखून ठेवतो** त्याची मुक्त (किंवा संस्कारांच्या ठसा नसलेली किंवा संस्कारविरहित) चेतना अनिवार्यतः फनाच्या दुसऱ्या अवस्थेत (म्हणजे फना फिल्लाह) मध्ये शाश्वत परमात्म्याचा अनुभव घेते व स्वतः ''मी परमात्मा आहे'' असे निःसंदेह प्रतिपादन करते. ही– ''मी निःसंदेह परमात्मा आहे'' ची निर्विकल्प अवस्था आहे. जेव्हा अक्षरशः संस्कारविरहित किंवा संस्काराचा ठसा नसलेली चेतना मानवरुपाशी निगडीत असते तेव्हा अनुभविते की, ''मी

---

*टीप– मेहेरबाबांनी स्पष्टीकरण दिले– जे आपले शरीर निर्वाण नंतर तीन ते चार दिवस राखून न ठेवता, निर्वाणनंतर लगेच आपले शरीर सोडतात त्यांना मुक्ती मिळते – संपादक

**निर्वाण अवस्थेत असलेल्यांना किंवा ज्यांना मुक्ती प्राप्त झाली आहे त्यांच्याकरिता काळाचे अस्तित्व नसते. उल्लेखित कालावधीला (तीन ते चार दिवस) याचा त्यांचेसाठी अर्थ आहे की जे स्थूल सचेत आहेत व ज्यांना वेळेची बंधने आहेत. – संपादक

परमात्मा आहे, मी परमात्मा होतो व सदैव यानंतरही परमात्मा म्हणून राहिल'' शाश्वत व सचेत अस्तित्व म्हणून राहिल. अशाप्रकारे मनुष्य परमात्मा होतो व मनुष्याला परमात्म्याचा साक्षात्कार झाला असे म्हटले जाते किंवा परमात्म्यातील 'जीवात्मा' परमात्म्यातील किंवा सर्वव्यापी परमात्म्यातील 'शिवात्मा' झाला असे म्हटले जाते.

हे शाश्वत सत्य आहे की, आत्मा हाच परमात्मा किंवा सर्वोच्च परमेश्वर आहे आणि या सत्याचा अनुभव तेव्हाच येतो की, जेव्हा जीवात्म्यात असलेली संस्काराचे ठसे उमटलेली चेतना परमात्म्याच्या स्वरुपाचा साक्षात्कार करण्याकरिता व त्याचे अधिकारपूर्वक प्रतिपादन करण्याच्या उद्देशाने परमात्म्यात निमग्न होऊन 'शिवात्मा' म्हणून संस्कार विरहित किंवा संस्काराचे ठसे नसलेली चेतना बनते.

वास्तविकपणे आत्मा जर परमात्मा आहे तर आत्म्याला परमात्म्यात एकजीव होण्यासाठी कोणती स्थिती कशी काय निर्माण होऊ शकते ?

ही स्थिती जास्त स्पष्ट करण्याकरिता व समजण्यासाठी की, वास्तविक आत्मा हाच परमात्मा आहे, आपण परमात्म्याची तुलना एका अनंत, मर्याद व किनारा नसलेल्या महासागराशी करु. म्हणून आत्मा जो परमात्मा आहे तो अमर्याद व तटरहित महासागराच्या (म्हणजे परमात्म्याच्या) मर्यादेबाहेर कधीच राहू शकणार नाही कारण परमात्मा ज्याची तुलना आपण अमर्याद व तटरहित महासागराशी केलेली आहे, तो अनंत व अमर्याद आहे. जेव्हा आत्मा हा परमात्मा आहे तेव्हा तो अमर्याद विस्ताराच्या कसा काय बाहेर येऊ शकतो किंवा त्याला सीमारहिततेच्या पलिकडे कसे काय स्थान राहू शकते ?

म्हणून आत्मा हा परमात्म्यात सुध्दा आहे. आता आत्मा जो परमात्मा आहे तो वस्तुतः स्वतःच परमात्मा आहे, हे समजण्यासाठी आपण कल्पना करु की, अमर्याद व तटरहित महासागराच्या अमर्याद विस्तारातून महासागराचा एक बिंदू वेगळा करणे किंवा वेगळा काढणे शक्य आहे. तेव्हा निष्कर्ष असा निघतो की, महासागराचा हा बिंदू जेव्हा अमर्याद महासागरात असतो तेव्हा तो वेगळा करण्यापूर्वी स्वतः महासागरच असतो व तो अमर्याद महासागरातच होता तर एक महासागराचा बिंदू म्हणून नव्हे तर स्वतः महासागर म्हणूनच तो होता (कारण महासागराचा प्रत्येक बिंदू जेव्हा बिंदू होण्याच्या बंधनांनी मर्यादित असत नाही तेव्हा तो स्वतः असीमित महासागरच असतो.)

केवळ हा महासागराचा बिंदू जेव्हा अमर्याद महासागरापासून वेगळा केल्या जातो किंवा त्या अमर्याद महासागरातून तो थेंब म्हणून बाहेर काढल्या जातो, तेव्हा महासागराच्या या वेगळ्या केलेल्या बिंदूला असीम महासागराचा सीमित थेंब म्हणून मानल्या जाते.

वेगळ्या शब्दात, अनंत, अपरिमित व तटरहित महासागर आता थेंबाचे माध्यमातून त्या अनंत, अमर्याद व तटरहित महासागराचा केवळ एक मर्यादित थेंब म्हणून मानल्या जातो. आणि अनंत, अमर्याद व तटरहित महासागराच्या तुलनेत हा महासागराचा थेंब अगदी सीमित व अगदीच मर्यादित असतो व त्याला आता अनंत मर्यादा असतात.

याचप्रमाणे आत्म्याची अनंत महासागराच्या थेंबाशी तुलना केली असताना असे दिसेल की, तो अमर्याद व अनंत परमात्म्याच्या कोणत्याच मर्यादेबाहेर कदापिही असू शकत नाही, जेव्हा परमात्म्याची तुलना असीमित, अनंत व तटरहित महासागराशी केली जाते.

परंतु जसा हा महासागराचा बिंदू म्हणून महासागराच्या पृष्ठभागावरील बुडबुड्याचेद्वारा मर्यादा प्राप्त करतो, तसा हा बुडबुडा महासागराच्या बिंदूला बाह्यतः अनंत महासागरापासून वेगळे व मर्यादित अस्तित्व बहाल करतो. त्याचप्रमाणे आत्मा जो केवळ परमात्म्यातच आहे असे नसून तो स्वःच परमात्मा आहे. असे असून तो बाह्यतः अनंत व अमर्याद परमात्म्यापासून आपले वेगळे अस्तित्व अनुभवितो व प्रतिपादित करतो. संस्कारांच्या बुडबुड्यांच्या बंधनाद्वारां जे संस्कार जाणीवपूर्वक अज्ञान प्रदान करतात व ज्यांनी आत्मा आच्छादला जातो व त्यामुळे आत्मा परमात्म्यापासून स्वतः मर्यादित व वेगळे अस्थित्व अनुभवितो.

जी बंधने संस्कारांच्या बुडबुड्यामुळे आकारास आलीत व जी आत्म्याने स्वतःच निर्माण केलीत ह्या बंधनाद्वारां आत्मा बाह्यतः परमात्म्यापासून वेगळ्या व मर्यादित अस्तित्वाचा वारसा घेतो, व अनंत परमात्म्यापासून स्वनिर्मित वेगळेपणामुळे आत्मा जो स्वतः अनंत, अमर्याद व अनिर्बंध आहे तो संस्कारांचेद्वारा प्राप्त झालेल्या अनंत मर्यादेमुळे आपल्यावर अत्यंत सीमित व अत्यंत परिमित असल्याचा गुण बहाल करतो.

चेतनेची संपूर्ण आत्मानुवर्ती उत्क्रांती पूर्ण झाल्याबरोबर जेव्हा संस्कारांचा बुडबुडा फुटतो व संस्कारित चेतना म्हणून असलेले जाणीव पूर्वक

अज्ञान, संस्काराचा ठसा न उमटलेली चेतना म्हणून सचेत ज्ञानात परिवर्तीत होते, तेव्हा आत्म्याचे मर्यादित व अत्यंत सीमित अनुभव नाहिसे होतात. आत्मा वरपांगी वेगळ्या सीमित अस्तित्वापासून मुक्त झाल्यावर आपोआपच स्वतःला परमात्म्याशी एकरुप झालेला किंवा आपल्याला परमात्म्यात विलिन आणि निमग्न तसेच परमात्म्याच्या शाश्वतरित्या, अनंत, अमर्याद व अनिर्बंध 'परब्रह्म अवस्थेत' असल्याचे पाहतो, व यालाच म्हणतात परमात्म्याशी किंवा अल्लाशी आत्म्याचे मिलन. चेतनेच्या या अवस्थेत, आत्मा आता परमात्म्याच्या 'परात्पर परब्रह्म' या अचेत अवस्थेबाबत पूर्णपणे सचेत असतो, जी परमात्म्याची मूळ अवस्था आहे व जेव्हा ''परमात्मा आहे'' असे म्हटले जाते . सुफी परिभाषेत 'परब्रह्म' अवस्थेतील परमात्म्याला'अल्लाह्' म्हटले आहे व ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेतील परमात्म्याला ''वरा–उल–वरा'' किंवा ''गैब–उल–गैब'' असे म्हटले जाते.

परमात्म्याची मानवी रुपात उच्चतम व अत्यंत उन्नत दैवी अवस्था ही कुतुबियतची असते जेथे कुतूब किंवा सद्गुरु किंवा पूर्ण पुरुष न केवळ अनंत ज्ञान, अनंत शक्ती व अनंत आनंद व सर्व सत्कृत्यांचा तसेच सर्व ऐश्वर्य या अर्थाने अनंत सौंदर्याचा जाणीवपूर्वक अनुभव घेतो. परंतु तो ह्या अनंत पैलूंचा त्या जीवात्म्यांसाठी जाणीवपूर्वक अपयोग करतो की जे अजूनही मायेच्या अंतर्गत परमात्म्याच्या मायावी अवस्थेतून जात आहेत.

कुतुबियतच्या या दिव्य उन्नत अवस्थेत मनुष्य केवळ परमात्माच होत नाही तर मनुष्य परमात्म्याचे जीवन देखील जगतो, या नर–नारायणाची पूजा करणे म्हणजे अनंत गुणविशेष असलेल्या  परमात्म्याची पूजा करणे होय.

जीवात्म्याच्या रुपात असलेले अचेतन आत्मे उत्क्रांती, पुनर्जन्म व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून पार झाल्यानंतर निर्वाण प्राप्त करुन त्यानंतर मानवरुपात जाणीवपूर्वक परमात्म्याचे जीवन जगण्याची ही उच्चतम दिव्य अवस्था फारफार विरळा व फारफार थोड्या शिवात्म्यांना प्राप्त होते यानंतर काही उदाहरणात महाचैतन्याची निर्विकल्प समाधी लगेच अनुसरली जाते व 'शिवात्म्याचे' रुपात प्रतिपादित करते.

सदा सर्वकाळ सर्व युगात व एकाच वेळी या पृथ्वीवर नेहमी छप्पन 'शिवात्मे' किंवा परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त झालेले आत्मे असतात. या छप्पन शिवात्म्यापैकी काही मज्झूबियतच्या अवस्थेत असतात व काही

दिव्यसंगमावर 'तुरिया' अवस्थेत असताता ज्यांना सुफी परिभाषेत '' फना – मा–अल– बका '' असे म्हटले आहे. यापैकी फारच कमी आत्मे दिव्य संगम पार करुन ''सुलुकियत''च्या अवस्थेत रहातात व त्यापैकी पाचच नेहमी 'कुतुबियतच्या' अवस्थेत असतात, जोपर्यंत हे सर्व मानवी रुपे धारण करुन असतात तोपर्यंतच ते त्या त्या अवस्थेत असतात.

अशाप्रकारे सदासर्वकाळ व सर्व युगात नेहमी पाच कुतूब (सद्‌गुरु किंवा पूर्ण पुरुष) मानव जातीमध्ये पृथ्वीवर राहतात व ते ''अर्श –ए– आला''च्या 'अहदियतचे' किंवा परमात्म्याच्या परब्रह्म अवस्थेच्या विज्ञान भूमिकेच्या विज्ञानाच्या अनंत पैलूंचा, मायेच्या क्षेत्रातील सर्वांच्या प्रगमनशील मुक्तीसाठी, अनंत ज्ञान, शक्ती व आनंदाच्या रुपात उपयोग करतात.

हे पाच कुतूब किंवा सद्‌गुरु किंवा पूर्णपुरुष प्रत्येक कालचक्राचे शेवटी दैवी विधानानुसार पृथ्वीवर मनुष्य म्हणून परमात्म्याचे सरळसरळ अवतरण घडवून आणतात. म्हणून प्रत्येक कालचक्राचे शेवटी जेव्हा परमात्मा पृथ्वीवर मनुष्य रुपात प्रकट होतो व मानवजातीला स्वतःचे दिव्यत्व प्रकट करतो तेव्हा तो अवतार–मसिहा–ईशप्रेषित (Prophet) म्हणून ओळखल्या जातो. अवतार म्हणून परमात्म्याचे सरळसरळ अवतरण हा परमात्म्याचा एक स्वतंत्र दर्जा (Status)आहे की, जेव्हा परमात्मा प्रत्यक्षपणे चेतनेच्या उत्क्रांती, पुनर्जन्म व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून पार न होता किंवा त्याचा अनुभव न घेता सरळसरळ मनुष्य बनतो* यास्तव परमात्मा प्रत्यक्षपणे 'ईश–पुरुष'(God-Man) बनतो. मानवजातीमध्ये तो मानवाचे जीवन व्यतीत करतो व त्याच काळातील हे सर्व 'कुतूब', 'सद्‌गुरु' व 'पूर्णपुरुष' यांचेद्वारां श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठ किंवा पुराण पुरुष म्हणून आपल्या दैवी दर्जाचा अनुभव घेतो [२८]

'शिवात्मे' मग ते 'मज्झूबियतच्या', 'तुरिया अवस्थेच्या', 'सुलुकियतच्या' किंवा 'कुतूबियत' च्या, या कोणत्याही दैवी दर्जात असोत

---

* फना – उल– फना– परमात्म्याची मनुष्य होण्याची अवस्था (अवतार म्हणून परमात्माचे सरळसरळ पृथ्वीवर अवतरण)'बका–उल–बका'– परमात्म्याची ईश–पुरुष होण्याची अवस्था (परमात्म्याला स्वतःला अवतार असल्याचे ज्ञान) सामान्य मानवाची अवस्था ही मानवरुपात परमात्म्याची अवस्था आहे.

परंतु मूलतः त्यांच्या सत्याच्या अनुभवात मुळीच फरक नसतो. एकदा लक्ष्य प्राप्ती झाली की, सर्व शिवात्मे सर्व दैवी दर्जांमध्ये निःसंदेह व जाणीवपूर्वक अनंत आनंदाच्या दैवी वारसाचा उत्स्फूर्तपणे व जाणीवपूर्वक सदासर्वकाळाकरिता उपभोग करणे सुरु करतात व तेव्हाच, त्याच बरोबर स्वेच्छेने निरंतर अनंत ज्ञान, अनंत शक्ती व अनंत आनंदाच्या[२९] आपल्या त्रिगुणात्मक प्रकृतीचा सतत अनुभव घेत असतात.

काहिही प्रमाणात असला तरी त्यांच्या दैवी दर्जातील (स्थितितील) फरक हा त्यांच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीच्या अनुभवामुळे नसून तो जो फरक असतो तो अनंत ज्ञानाच्या विज्ञान भूमिकेत किंवा सुलुकियतमध्ये त्यांच्या प्रस्थापणेनंतर व त्यानंतर कुतूब म्हणून नर–नारायणाचे जीवन जगत असताना, अनंत आनंदाचा उपभोग घेत असताना, आपली अनंत शक्ति हाताळण्यासाठी अनंत ज्ञानाचा उपयोग करण्याची जी पूर्ण मोकळीक असते त्यामुळे (फरक)असतो

कुतूब किंवा सद्‌गुरु व युगावतार याच्यामध्ये जो फरक आहे तो हा आहे की, कुतूब वैश्विक उत्क्रांतीच्या समग्र प्रक्रियेतून गेल्यावर नर–नारायण म्हणून परमात्म्याच्या जीवनात प्रवेश करुन ते जीवन जगतो परंतु अवताराला उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून मूळीच जावे लागत नाही कारण अवतार ही परमात्म्याची सर्वोच्च स्थिती आहे जेथे परमात्मा सरळसरळ मानव बनतो व पृथ्वीवर ईश–पुरुषाचे रुपात जीवन जगतो.

परमात्म्याचे जीवन जगण्याच्या संदर्भात सद्‌गुरु (किंवा कुतूब) व अवतार (किंवा साहेब–ए–जमा) हे दोघेही तोच अनुभव घेण्यात एक सारखेच आहेत. दोघेही परमात्म्याचे जीवन जगतात व दोघेही मायेच्या जीवनाच्या प्रत्येक स्तरावर व प्रत्येक भूमिकेवर असतात. ते दोघेही एकाच वेळी अगदीच खालच्या स्तरांपासून तो सर्वोच्च स्तरावर असतात. असे असलेतरी अत्यंत महत्वाचा व केवळ एक जो फरक आहे तो म्हणजे कुतूब त्या स्तरावर अभिनय करतो व अवतार त्या स्तरावर स्वतः तेच बनतो.[३०]

’अभिनय करण्याचा’ व ’बनण्याचा’ मुद्‌दा स्पष्ट करावयाचा झाल्यास, पुष्कळ व असंख्य उदाहरणे देणे शक्य आहे, परंतु सामान्य माणसाला समजण्यासाठी आजारीपणाचे उदाहरण म्हणून उपयोगी होईल.

उदाहरणार्थ, कुतूब किंवा सद्‌गुरु आजारी पडू शकत नाही व पडणार

नाही आणि तो जेव्हा आजारी पडल्याचे निदर्शनास येते तेव्हा तो त्याच्या आजारपणाचा केवळ अभिनय असतो. लोक जेव्हा त्याला प्रत्यक्षात आजारी असलेले पाहतात तेव्हा ते त्याला आजारी असलेले पाहत नाहीत तर यथार्थाने केलेला आजाराचा परिपूर्ण अभिनय पाहतात कारण तो सद्‌गुरु आहे आणि पूर्णतेचे मूर्तिमंत रुप आहे. तो अशाप्रकारे अभिनय करतो की, तो प्रत्यक्ष आजारीच आहे. या उलट लोक जेव्हा अवताराला आजारी पडलेले पाहतात तेव्हा तो प्रत्यक्षात आजारी पडलेला असतो व तो तेव्हा अक्षरशः आजारीच असतो परंतु अवतार प्रत्यक्षात आजारी झाला तरी त्याचवेळी त्याच्या पाठीशी अंनत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंद उभे असतात.

सद्‌गुरु प्रत्येक स्तरावर, प्रत्येक अवस्थेत व सर्व भूमिकात एकाच वेळी त्या स्तराचा व अवस्थेचा प्राणी किंवा वस्तू म्हणून व त्या भूमिकेचा मनुष्य म्हणून वर्तन करतो. उलटपक्षी अवतार हा त्या स्तराचा किंवा अवस्थेचा प्राणी किंवा वस्तू बनतो व त्या भूमिकेचा मनुष्य म्हणून एकाच वेळी सर्वांबरोबर सर्व काही बनतो. सर्व स्तरावर, सर्व अवस्थांत व सर्व भूमिकांत एकाच वेळी अवतार एक तसेच सर्वकाही असतो व बनतो तसेच तो त्याचवेळी सर्व स्तरांच्या अवस्थांच्या व भूमिकांच्या पलिकडेही असतो. केवळ एकमेव अवतारच असा आहे की, जो एकाचवेळी सर्व वस्तूंना, सर्व प्राण्यांना व सर्व मानवयोनीला विश्वात्मक धक्का देण्यासाठी चेतनेच्या परिपक्वेतला गतीमान करण्यात अनंतपणे समर्थ असतो.

वास्तविक परमात्मा सर्वकाही आहे व तो प्रत्येकात विद्यमान आहे. परमात्म्याचा अवतार हा केवळ सर्वकाही आहे व प्रत्येक वस्तूत आहे, एवढेच नसून तो प्रत्यक्षात सर्वकाही व प्रत्येक जण बनतो.

म्हणून अवतार व सद्‌गुरुमध्ये मूलगामी व एकमेव फरक हा आहे की सद्‌गुरु प्रत्येक स्तरावर व सर्व भूमिकाांवर अभिनय करतो परंतु अवतार, अभिनय करीत नाही तर तो ते प्रत्यक्षात बनतो.[३१]

थोडक्यात, सदा सर्वकाळ व सर्व युगात नेहमी मानवी देहात छप्पन परमात्म्याचा साक्षात्कार पावलेले आत्मे किंवा शिवात्मे पृथ्वीवर असतात.[३२]

ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या सर्व छप्पन आत्म्यांना पूर्ण व्यक्ती म्हणता येईल परंतु हे छप्पन शिवात्मे सर्वचे सर्व सद्‌गुरु नसतात. जरी सर्व छप्पन त्या अनुभवात तिळमात्र फरक नसलेला

शाश्वत सत्याचा तोच अनुभव घेतात आणि जरी सर्व छप्पन अंतिम लक्ष्याच्या चेतनेच्या बाबतीत सर्व एक असले व सर्व बाबतीत परिपूर्ण असले व परमात्म्याचा साक्षात्कार झालेले असले तरीही त्यांच्या कार्यात फरक असतो. म्हणून छप्पन साक्षात्कारितासाठी ''पूर्ण पुरुष'' हा शब्द प्रयोग होऊ शकेल परंतु ''सद्‌गुरु'' किंवा ''कुतूब '' हा शब्द प्रयोग होऊ शकणार नाही.

मानवी रुपात असलेल्या छप्पन 'शिवात्म्या' पैकी किंवा पूर्ण व्यक्तींपैकी सदा सर्वकाळ नेहमी सर्व युगात पाच 'पूर्ण गुरु' किंवा सद्‌गुरु किंवा 'कुतूब' असतातच व हे पाच सर्व विश्वाच्या घडामोडींचे नियंत्रण करतात.

जेव्हा युग'अवतार' काळाचे नसते तेव्हा हे पाच सद्‌गुरु संयुक्तपणे विश्वाच्या घडामोडींकडे लक्ष देतात. आणि या पाच सद्‌गुरुंपैकी एकावर समग्र विश्वाच्या घडामोडींवर नियंत्रण ठेवण्याचे उत्तरदायित्व असते व याला सुफींनी ''कुतूब–ए –ईर्शाद'' म्हटले आहे.

परंतु प्रत्येक कालचक्राच्या* शेवटी जेव्हा 'अवतार' काळाचे युग असते, तेव्हा अवताराला (पुराण–पुरुष –श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठ) स्वतंत्र सत्याला (परमात्म्याच्या परब्रह्म अवस्थेची अनंत चेतना) पुरुष रुपात सरळ सरळ मायेत पृथ्वीवर प्रकट होण्यास भाग पाडले जाते. परमेश्वराच्या परब्रह्म अवस्थेच्या अनंत चेतनेचे सरळ सरळ मानवी पुरुषरुपाद्वारां होणाऱ्या पृथ्वीवरील प्रकटीकरणाला सामान्यतः परमात्म्याचे सरळ सरळ ''पृथ्वीवरील अवतरण '' म्हटले जाते. या पृथ्वीवरील परमात्म्याच्या अवतरणाला सामान्यतः ''अवतार'' असे म्हटले जाते.

म्हणून हे स्पष्ट आहे की जेव्हा युग हे 'अवतार काळाचे' असते व जेव्हा अवताराला (किंवा सत्याला किंवा परमात्म्याच्या परब्रह्म अवस्थेच्या परमेश्वरी चेतनेला) मायेत पृथ्वीवर प्रकट होण्यासाठी भाग पाडले जाते व जगाच्या मानवजाती समोर उपस्थित करण्यासाठी योग्य व्हावे म्हणून या सत्याला मानवरुप दिले जाते व म्हणून हा अवतार किंवा ईशपुरुष, अनिवार्यतः छप्पन ईश साक्षात्कारितांपेक्षा कोणीतरी वेगळा असलाच पाहिजे.

---

(*टीप – मायेतील सर्व कालचक्रांचा अंत व प्रारंभ ७०० ते १४०० वर्षानंतर होतो व कालचक्राच्या कालचक्रात अशी कोट्यावधी अब्जावधी कालचक्रे होऊन गेलीत व होतील, याप्रमाणे मायेला अंत नाही, ती सदैव माया म्हणूनच राहते.

त्यावेळी अस्तित्वात असलेले व कार्य करणारे पाच सद्‌गुरु, अवतार काळातील योग्य वेळी व्यक्तिशः व संयुक्तपणे अवताराला [३३] पृथ्वीवर अवतीर्ण करतात व सृष्टितील अज्ञानात खितपत पडलेल्या व मायावी जीवन जगत असणाऱ्या सर्वांसाठी आपल्या अनंत कृपेचा व प्रेमाचा वापर करुन तसेच आपल्या अनंत शक्तीचा व कृपेचा उपयोग या अवताराचे पृथ्वीवर आगमन घडवून आणण्या करिता करतात व परब्रह्म अवस्थेतील शाश्वत अनंत परमात्म्याच्या चेतनेच्या अनंत ''सत्याला'' मायेच्या अंतर्गत या पृथ्वीवर प्रकट करतात व ते (सद्‌गुरु) आपल्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाचेद्वारां 'सत्याला' मानवी पुरुष देहाचे रुपात मायेचे अगदी उचित आवरण (Cloak) प्रदान करतात की ज्यामुळे सत्यतेची दिव्यता, मायेच्या जगतात अत्यंत दर्शनीय व्हावी.

अशा प्रकारे 'अनंत सत्य'(म्हणजे परमात्मा) पृथ्वीवर जेव्हा मानव रुपात प्रकट होतो व मानवजातीला आपले दिव्यत्व प्रकट करतो तेव्हा तो अवतार, मसीहा, ईशप्रेषित म्हणून ओळखल्या जातो. परमात्मा अशा प्रकारे मनुष्य बनतो.

अशाप्रकारे अनंत परमात्मा युगायुगांतरात व सर्व कालचक्रात आपल्या अनंत करुणेने प्रेरित होऊन आपल्या इच्छाशक्तीने मानवी पातळीवर खाली उतरुन मानवरुप धारण करतो परंतु मानवजातीमध्ये अशाप्रकारे उपस्थित झालेल्या परमात्म्याच्या भौतिक उपस्थितीची ओळख न पटल्यामुळे लोक त्याच्याकडे जगातील एक सामान्य व्यक्ती म्हणूनच पाहतात तथापि जेव्हा तो स्वतःला या युगाचा अवतार असल्याचे घोषित करुन पृथवीवर आपले दैवी व्यक्तिमत्व प्रस्थापित करतो तेव्हा काही मानव त्याचा परमात्मा म्हणून स्वीकार करुन त्याची पूजा करतात आणि तो पृथवीवर मानवरुपात परमात्मा असल्याचे ज्यांना ज्ञान असते असे काही मोजके मानव त्याचा परमात्मा म्हणून गौरव करतात. तथापि तो जेव्हा प्रत्यक्ष शरीराने मानवामध्ये उपस्थित असतो तेव्हा त्याची तिरस्कारयुक्त उपेक्षा, अवहेलना व निंदा करणे हेच उरलेल्या बहुतांश मानवजातीच्या वाट्याला येते अशा प्रकारे मानवरुपात आलेला परमात्मा स्वतःला अवतार घोषीत करुन ज्या मानवजाती करिता आपल्या अपार प्रेमामुळे त्यांच्या स्तरावर एवढा खाली उतरला, त्याच मानवजातीकडून छळ करवून भयंकर यातना ओढवून घेतो, निंदा व अपमान सहन करतो. ते

यासाठी की, मानवजातीने अवतराच्यारुपात असलेल्या परमात्म्याच्या प्रकटीकरणाची निर्भत्सना करीत असताना जरी अप्रत्यक्षपणे असले तरी त्याच्या अनंत सत्याच्या शाश्वत अवस्थेत असलेल्या परमात्म्याच्या अस्तित्वाची ठामपणे पुष्टी करावी.

अवतार हा नेहमी एकमेव तोच तो असतो* कारण परमात्मा नेहमी एकमेव तोच तो असतो. शाश्वत, अखंड, अनंत व अविभाज्य असलेला परमात्मा या भूतळावर अवतार, मसिहा, प्रेषित, बुध्द व पुराण पुरुष, श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठ म्हणून मानव रुपात स्वतः प्रकट होतो. त्याच शाश्वत पुरुषाला, त्याच अवताराला वेळोवेळी प्रकट होणे भाग पाडले जाते, तो निरनिराळ्या कालचक्रात निरनिराळी नावे धारण करीत, निरनिराळ्या मानव देहात, निरनिराळ्या ठिकाणी अज्ञानाच्या गर्तेत पडलेल्या मानव जातीच्या उद्धाराकरिता आणि व्दैताच्या भ्रमात्मक बंधनातून सूटका होण्यास मदत करण्याकरिता विविध रुपकांद्वारां व विविध रीतीनेअनेक भाषातून ते एकच सत्य प्रकट करतो.

अवतार काळात जीवंत असलेल्या पाच सद्गुरु मधून एक जो 'कुतूब – ए– ईर्शाद' म्हणून कार्य करीत असतो तो अवतार पृथ्वीवर आल्यावर या दिव्य पदाचा त्याग करतो व आपली कर्तव्ये व विश्वाच्या कार्याच्या एकमेव उत्तरदायित्वाचा कार्यभार, जेव्हा अवतार त्याचे **ख्राईस्ट म्हणून–युगावतार** म्हणून असलेल्या आपल्या पदाचा कार्यभार सांभाळण्यास योग्य होतो तेव्हा ''कुतूब–ए–ईर्शाद'' चे पद अवताराचे हातात सोपवितो आणि ''कुतुब–ए–ईर्शाद'' म्हणून असलेला सद्गुरु त्यानंतर स्थूल शरीरात असे पर्यंत इतर चार कुतूब प्रमाणे एक कुतूब म्हणून पद सांभाळतो.

अवताराचे आगमन झाले तरी मानवी शरीरात परमात्म्याचा साक्षात्कार झालेले छप्पन आत्मे असलेच पाहिजेत आणि या छप्पन मधून पाच सद्गुरु पृथ्वीवर जीवंत असलेच पाहिजेत. या पाचापैकी एखादा जेव्हा भौतिक देह सोडतो तेव्हा त्याचे पद कधीच रिक्त रहात नाही ते अनिवार्यतः ज्याला त्यावेळेस शाश्वत सत्याचा साक्षात्कार झालेला असतो अशा परमात्म्याच्या साक्षात्कार झालेल्या विद्यमान आत्म्याकडून भरले जाते. म्हणून 'अवतार'

(*टीप – सद्गुरु देहत्यागानंतर पृथ्वीवर कधिकाळी परत येतो का म्हणजे तो कधिकाळी परत जन्म घेतो का ? असे मेहेर बाबांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले – '' नाही, कधीच नाही. फक्त अवतार पुन्हा पुन्हा जन्म घेतो'' – संपादक

पृथ्वीवर विद्यमान असला तरी परमात्म्याचा साक्षात्कार झालेले छप्पन आत्मे, पाच सद्‌गुरु धरुन मानवरुपात असतातच परंतु अवतार एकमेव सत्ताधारी असतो.

**मेहेर बाबांचे स्पष्टीकरण**

या पृष्ठाचे समोरील रेखाचित्र ७ बाबत

सूक्ष्म, भुवनाच्या प्राणशक्ती पासून व मनोभुवनाच्या तेजापासून अगणित अब्जावधी वर्षेपर्यंत (Trillions upon Trillions) भूतकाळात व भविष्यात स्थूल विश्व हे असंख्य तारे, सूर्य, ग्रह, जगत, चंद्र व उल्का या रुपात निर्माण होत गेलेत व नष्ट होत गेलेत व असेच निर्माण होत राहतील व नष्ट होत राहतील. असे असले तरी वास्तविक पाहता तेथे काळ व अवकाश अशी काही गोष्ट नाही. मायेपासून एकदा आत्म्याची मुक्तता झाली की, मायेचे केवळ अस्तित्वच रहात नाही तर त्यानंतर असे आढळून येते की, तिचे कधी मुळी अस्तित्वच नव्हते.

स्थूल विश्वाच्या खनिज, वनस्पती व प्राणी साम्राज्यांच्या क्रमशः उत्क्रातीनंतर निश्चित पण अगणित लक्षावधी, कोट्यावधी, अब्जावधी वर्षात मनुष्यातील चेतना पूर्णत्वास पोहचते. मनुष्याला तेव्हा यथार्थपणे परमात्म्याची चेतना प्राप्त व्हावयास पाहिजे होती परंतु तसे होत नाही करण चेतनेच्या उत्क्रांती क्रमात मायावी अनुभवांच्या संस्कारामुळे संस्कारांचे बंधन निर्माण होते अशा प्रकारे मनुष्य केवळ स्थूल सचेत राहतो.

मनुष्याची पूर्ण परंतु स्थूल चेतना परमात्मचेतनेच्या सत्यात आत्मानुवर्ती उत्क्रांत होण्यापूर्वी तिला प्रथम सूक्ष्म चेतनेत आत्मानुवर्ती उत्क्रांत व्हावे लागते व सूक्ष्मातून पूर्ण मनःचेतनेत उत्क्रमित व्हावे लागते. याकरिता स्थूल संस्कारांना प्रथम सूक्ष्म संस्कारात व नंतर सूक्ष्माचे मनःसंस्कारात वनस्पती व खनिज योनीत पूर्वी संकलित केलेल्या संस्कारांची क्षीणता व सूक्ष्मता लहान प्रमाणात पुन्हा प्राप्त करीत परिवर्तीत व्हावे लागते. फरक हा मूलतः चेतनेत असतो.

उत्क्रातीच्या प्रक्रियेत अनुसरलेल्या सुनिश्चित मार्गापेक्षा भिन्न असलेल्या मार्गाचा मनुष्य, मनुष्य म्हणून त्याच्या चेतनेचा पूर्णपणे व स्वतंत्रपणे उपयोग करू शकतो. म्हणून परिपूर्ण स्थूल सचेत मनुष्य फलस्वरुप संस्कारांच्या शिथिल किंवा दृढ बंधनानुसार पूर्ण सूक्ष्म सचेत व त्यानंतर पूर्ण मनःसचेत होऊ शकतो. आपल्या चेतनेच्या प्रत्येक दोन आत्मानुवर्ती उत्क्रांतीमधील कधीकधी थोड्या व कधीकधी असंख्य मानवी पुनर्जन्मानंतर

असे तो होऊ शकतो. आणि जर एखाद्याला एखाद्या ''इश–प्रेमिकडून'' दिव्य प्रेमाने अनुग्रहि होण्याचे भाग्य प्राप्त झाले किंवा एखाद्याला सद्‌गुरुचे मार्गदर्शन लाभले, तर सर्व बंधनातून मग ती बंधने कितीही मोठी व गुंतागुंतीची असोत, तर त्याला मुक्ती अधिक सहज व लवकर प्राप्त होते. काहींना तर अपवाद म्हणून एकही पुनर्जन्म न घेता देखील तत्काळ मुक्ती प्राप्त होऊ शकते.

मायेच्या द्वैताच्या म्हणजेच सुख व दुःख, चांगले–वाईट, स्त्री–पुरुष, सशक्त व अशक्त इत्यादिंच्या विपरीत नानाविध अनुभवांद्वारां स्वतःहून बंधनांना शिथिल करण्यासाठी मनुष्याला जवळपास या रुपाने पन्नास कोटी मृत्युंच्या निद्रांद्वारां चवऱ्यांशी लक्ष वेळा विविध अनुभवांची चेतना ठेवावी लागते. तरी अनिवार्यतः परमात्म्याच्या सर्वव्यापी कृतीमुळे मनुष्य सूक्ष्म चेतन व मनःचेतन बनतो व अशाप्रकारे शारिरीक जन्म–मृत्यूची काही प्रमाणात आवर्तने कमी करण्यास समर्थ होतो.

अन्ततः अवताराच्या किंवा ईश–साक्षात्कारी पुरुषाच्या कृपेने एका क्षणापेक्षाही कमी वेळात मनुष्य पूर्ण चेतन परमात्मा बनतो आणि त्याला असा अनुभव येतो की, काळ आणि अवकाश त्याच्या स्वतःच्या शाश्वततातून व अनंतत्वातून जन्माला आलेले आहेत ज्यामध्ये वेळ आणि अवकाशाला मुळीच अस्तित्व नसते.*

✻ ✻ ✻

---

* अधिक स्पष्टीकरण मागितले असता एरच बी. जेसावाला यांनी उत्तरादाखल लिहिले–

'' पन्नास कोटी मृत्यू– निद्रांचा उल्लेख जवळ जवळ असा आहे की, एका आत्म्याला चेतनेच्या उत्क्रांती प्रक्रियेच्या कालावधित उत्क्रांती प्रक्रियेच्या माध्यमात होणाऱ्या बदलांच्या मदतीने जावे लागते याचा अर्थ असा की, विविध योनींच्या विविध उपजातींशी साहचर्य व असाहचर्य करुन जावे लागते

'' मनुष्य योनीत चवऱ्यांशी लक्ष झटके किंवा पुनर्जन्म होतात परंतु 'मृत्यूच्या पन्नास कोटी निद्रेत' मानव पूर्व योनींच्या माध्यमांशी साहचर्य व असाहचर्य व त्यांच्या संस्कारांचा अनुभव यांचा समावेश होतो.

''मनुष्य जितक्या वेळा जन्माला येऊ शकतो त्यापेक्षा अधिक वेळा त्याला मरणे आवश्यक नसते. मनुष्य मनाच्या जन्माबरोबर एकदाच जन्माला येतो व मनोनाश झाल्यावर तो एकदाच मृत्यू पावतो. त्यामुळे खरे पाहता पुनर्जन्म नाहीच ती मनाकरिता 'मृत्युच्या कोट्यावधी निद्रांची'प्रक्रिया आहे, जे मन एकदाच जन्माला येते व एकदाच मरते. मनाच्या जन्मात उत्क्रांती, पुनर्जन्म व आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया अंतर्भूत आहे. मनाचा मृत्यू म्हणजे ''स्व''– आत्म्याचा साक्षात्कार – संपादक

# परमात्म्याच्या प्रमुख दहा अवस्था

**–एरच. बी. जेसावाला**

हा पुढील भाग ''**परमात्म्याच्या प्रमुख दहा अवस्था**''– एरच. बी जेसावाला यांनी मेहेर बाबांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली मेहेर बाबांनी दिलेल्या मूळ आकृतीचे (चार्ट) ''परमात्म्याच्या दहा अवस्था'' चे स्पष्टीकरण व वर्णन देणारा म्हणून लिहिला आहे. – संपादक

# परमात्म्याच्या प्रमुख दहा अवस्था

**– मेहेरबाबांव्दारा चित्रित***

अवस्था – १ : **परमात्मा** – परात्पर परब्रह्म अवस्थेत

अवस्था – २ : **परमात्मा** – परब्रह्म अवस्थेत उप–अवस्था– अ,ब,क

अवस्था – ३ : **परमात्मा** – स्रष्टा, संवर्धक आणि संहारक या अवस्थेत

अवस्था – ४ : **परमात्मा** – जीवात्म्याच्या अवस्थेत

अवस्था – ५ : **परमात्मा** – उत्क्रांतीच्या अवस्थेतील आत्म्याचे रूपात

अवस्था – ६ : **परमात्मा** – पुनर्जन्माच्या अवस्थेत मानवी आत्म्यांचे रूपात

अवस्था – ७ : **परमात्मा** – आध्यात्मिक उन्नतावस्थेतील आत्म्याचे रूपात

अवस्था – ८ : **परमात्मा** – दिव्यतेत तल्लीन

अवस्था – ९ : **परमात्मा** – देहात असलेल्या जीवनमुक्ताचे रूपात

अवस्था – १० : **परमात्मा** – सद्गुरु व अवताराचे रूपात

---

* टिप– रेखाचित्र पहावे

# भाग ९

# परमात्म्याच्या प्रमुख दहा अवस्था

या प्रकरणाच्या पानातून रेखा चित्रात (diagram) चित्रित केलेल्या ''**परमात्म्याच्या दहा अवस्था**'' सांगितल्या आहेत. हे रेखाचित्र स्वतः मेहेर बाबांनी दिलेले आहे. हे त्यांच्या परमज्ञानाच्या अगाध खजिन्यातील एक रत्न आहे. ह्या रेखाचित्रातील आध्यात्मिक पारिभाषिक शब्दांचा संबंध अत्यंत सामान्यपणे मान्य अशा सुफी, वेदांती व ख्रिश्चन यांच्या रहस्यवादी समानार्थी शब्दांशी जोडला आहे.

आपण या रेखाचित्रावर जर एक विहंगम दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला असे आढळेल की, हे रेखाचित्र म्हणजे खरोखरच परमात्म्याचे मनुष्य म्हणून (ईन्सान–जीवात्मा) सर्वात खालच्या बिंदूपर्यंत उत्क्रांतीच्या–अधोगामी प्रवासाचे आणि चेतनेच्या भूमिकांच्या अभिव्यक्तीतून परत–मूळ उगमस्थानाकडे, पुन्हा परत उर्ध्वगामी प्रवासाचे वर्णन आहे – प्रथम दिव्यत्वात (परब्रह्मात) मग्न मज्झूब–ए–कामिल म्हणून तो अंततः कळसावर पोहोचलेल्या पूर्ण–पुरुषाचे (इन्सान–ए–कामिल, शिव–आत्मा) रुपात–रेखाटलेले चित्र आहे.

''परमात्म्याच्या वेगवेगळ्या दहा अवस्था'' या प्रवासातील प्रमुख अवस्था आहेत. ही ती यात्रा आहे की, ज्यामध्ये सचेत परमात्मा बनण्याकरिता अचेत परमात्मा सचेत मनुष्य बनतो.

परमात्म्याच्या ह्या अवस्था जरी बाह्यता एकामेकापासून वेगळ्या चित्रित केलेल्या असल्या तरी परिणामतः ते एकाच परमात्म्याचे दहा पैलू होत–जो परमात्मा एकच आहे व सदैव एकच राहिल. सर्वोच्च आत्म्याचे अवतरण व आरोहण हे केवळ कल्पनेत आहे व कल्पना करणे थांबविले की, व्यक्तिगत आत्म्याला पूर्ण चेतनेसह अनुभव येतो की, केवळ परमात्म्याचेच एकमेव अस्तित्व आहे व अस्तित्वात आहे अशी दिसत असलेली इतर कोणतीही वस्तू व प्रत्येक वस्तू त्याच्या छाया आहेत.

मेहेर बाबांचे आध्यात्मिक गूढज्ञान (Gnosis) ऐक्यवादाचा सिध्दांत

(वहदत्त–उल्–वजूद)[३४] व अव्दैतवादाचा सिध्दांत या दोन्हीचे निस्सदिग्धपणे समर्थन करते. मेहेर बाबांच्या ''परमात्म्याच्या दहा अवस्था'' या रेखाचित्रात हे स्पष्ट केलेले आहे की, हा केवळ परमात्माच आहे की, जो सत्य व काल्पनिक अशा विविध भूमिका वठवितो. आदि परमात्मा आहे व अन्ती परमात्मा आहे. मधल्या ज्या अवस्था आहेत त्या परमात्म्याशिवाय दुसऱ्या असू शकत नाहीत. इस्लाम धर्मशास्त्राचे आध्यात्मिक वचन ''हुवाल अव्वल, हुवाल आखिर, हुवाल जाहिर, हुवाल बातीन'' जो आदि आहे तोच अंती आहे, तोच व्यक्त आहे, तोच अव्यक्त आहे.

''गुलशन–ए–राज'' मध्ये मौलाना शबिस्तरी यांनी म्हटले आहे.

दर अंदर आमद अव्वल हम बिदर शुद

अगर्चे दर मऑद अज दर बिदर शुद ।

''तो त्याच व्दारावर परत येतो ज्या व्दारातून तो प्रथम बाहेर आला होता, जरी तो त्याच्या यात्रेच्या काळात दारोदारी भटकला.''

आता आपण मेहेरबाबांनी स्पष्ट केलेल्या परमात्म्याच्या दहा अवस्थांपैकी प्रत्येक अवस्थेचे थोडक्यात वर्णन करण्याचा प्रयत्न करु.

**अवस्था – १**

**''परमात्मा–परात्पर परब्रह्म अवस्थेत''**

परमात्म्यांची ही अवस्था इतकी अनुभवातीत आहे की, खरे पाहिले असता त्याची किंचितमात्रही कल्पना करता येणे शक्य नाही. ती सर्वथा शुद्ध व निष्कलंक आहे व तिच्यामध्ये 'अन्यपणाची' छटा नाही. ती सर्व गूढज्ञानाचे गूढज्ञान आहे व सर्व अंतर्यामीच्या सत्यतांमध्ये ती अंतर्यामीची सत्यता आहे. ती सर्व शब्दांच्या पलिकडे आहे व त्यामुळे तिचे पर्याप्त वर्णन करता येत नाही. ना ती साकार आहे, ना ती निराकार आहे, ना ती निर्गुण आहे, ना ती सगुण आहे.

या क्षेत्रात विचार, अनुमान, विवेक आणि आकलन यांचे पंख पंगू व निरुपयोगी आहेत.

''बेखयाल दर न गुंजन, तु खयाल–ए–खुद मरन्जॉ

जे जहत बुवद मुबरा मतलब बेहिच सूयश । – हाफिज

'' तो मनाने समजू शकत नाही, त्यामुळे त्याला समजण्यासाठी –

तुम्ही स्वतः धडपड करु नका, तो सर्वदिशेपासून मुक्त आहे, म्हणून त्याला कुठेच शोधण्याचा प्रयत्न करु नका.''

मेहेरबाबा म्हणतात की, ज्याला या अवस्थेचा साक्षात्कार झाला आहे व तो जेव्हा या अवस्थेचे वर्णन दुसऱ्यांना सांगण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते वर्णन परमात्म्याच्या पहिल्या अवस्थेचे नसते तर दुसऱ्या अवस्थेचे असते, जी परमात्म्याची 'परब्रह्म' अवस्था असते. हे सर्व शाश्वततेची शाश्वतता (Eternity) (अज्ल–उल–अजल) असते कारण कोणतीही शाश्वतता या पूर्वीची किंवा या नंतरची असल्याची कल्पना करणे शक्य नाही. या ठिकाणी सर्व लक्षणे लुप्त होतात. ( मुन्कता–उल्–इजहारात) कारण अशी कोणतीच अन्य वस्तू अस्तित्वात असत नाही की, जिच्याकडे संकेत केल्या जाऊ शकते किंवा जिचा संदर्भ दिल्या जाऊ शकते. या विशुध्द तत्वाला (जात–अल्–बाहूत) कशाचेही भान नसते–आपल्या स्वतःचे देखील.

या अवस्थेला सुफींनी संदर्भित केले आहे. ''वरा–उल–वरा''– दि बियाँड बियाँड स्टेट ऑफ गॉड – वेदान्ती याला ''परात्पर परब्रह्म'' अवस्था असे म्हणतात.

ही ती अवस्था आहे की ज्यात परमात्मा ना निर्गुण ना सगुण, ना निराकार ना साकार आहे.

परमात्म्याच्या दहा प्रमुख अवस्थांपैकी प्रथम व अगदी मूळ अवस्था ही परमात्म्याची ''परात्पर परब्रह्म'' अवस्था होय.

परमात्म्याच्या मूळारंभाच्या प्रारंभापूर्वी जेव्हा परमात्म्याची दुसरी कोणतीच अवस्था नव्हती तेव्हा फक्त परमात्म्याची अत्यंत मूळ अनंत अवस्था (अर्थात ''परमात्मा आहे'' ही अवस्था) परमात्म्याच्या ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेच्या रुपात सर्वत्र व्यापून होती.

परमात्म्याच्या या ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेच्या अनंतत्वात केवळ अनंतत्वाची अनंतता ही अनिर्बंध, निव्वळ, अनंत, दिव्य शुन्यता (निर्वात) म्हणून अभिव्यक्त असते व ''सर्वकाही'' चे रुपात वास करणाऱ्या अनंत निरपेक्ष व अमर्याद दिव्य निर्वात पोकळीच्या अनंतत्वाच्या अंतर्गत, परमात्म्याच्या इतर सर्व अवस्था, गुणविशेष व सर्व पैलूंसह, तसेच अनंत चेतना

व अनंत अचेतनेसह ''काही नाही'' चे रुपात अंतर्हित असतात. (''सर्वकाही'' मध्ये ''काही नाही'' देखील समाविष्ट आहे.)

अशा प्रकारे परमात्म्याची अत्यंत मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्था ती आहे की, जेथे आपण फक्त असे म्हणू शकतो की, शाश्वतरित्या ''परमात्मा आहे'' आणि या अगदी मूळ अवस्थेत परमात्मा त्याच्या ''स्व'' बद्दल किंवा त्यांच्या स्वतःच्या अनंततेच्या अवस्थेबद्दल, ना तो अनंततेने सचेत आहे, ना तो परिमितपणे सचेत आहे, ना तो अचेत आहे, या अवस्थेत परमात्मा मायेविषयी (illusion) किंवा सत्याविषयी ना सचेत आहे, ना अचेत आहे.

**अवस्था– २**

**परमात्मा–परब्रह्म अवस्थेत**

आपण यापूर्वीच विशद केले आहे की, परमात्म्याच्या परात्पर परब्रह्म अवस्थेचे यथोचित वर्णन करणे कदापिही शक्य नाही. परमात्म्याचा साक्षात्कार झालेले आत्मे जेव्हा ते ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा ते केवळ परमात्म्याच्या ''परब्रह्म'' अवस्थेचे वर्णन करण्यात यशस्वी होतात. जी अवस्था सुफींची अल्लाह, झोरोस्ट्रियनांची अहूरमज्द, वेदांतीची परमात्मा, ख्रिश्चनांची पिता–परमेश्वर व काही दार्शनिकांची सर्वोच्च परमात्मा (over soul) आहे. परमात्मा ''परब्रह्म'' अवस्थेत निरपेक्ष, अमर्याद व अनंत आहे – एकमेवाद्वितीय आहे.

परमात्म्याच्या दुसऱ्या अवस्थेचे वर्णन करताना मेहेर बाबांनी विशेष भर देऊन सांगितले की, मूलतः दुसरी अवस्था परमात्म्याच्या पहिल्या अवस्थेपेक्षा कोणत्याच प्रकारे वेगळी नाही. जो काय फरक आहे तो परमात्म्याच्या दुसऱ्या अवस्थेतील अ, ब व क ह्या उपअवस्थांनी निर्माण केला आहे.

मेहेरबाबांच्या स्पष्टीकरणाचे आधारे हा फरक कसा केव्हा व कोठे अस्तित्वात आला याचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

ज्या क्षणी अनंत परमात्म्याची जेव्हा स्वतःला जाणून घेण्याची ''मी कोण आहे'' अंतर्हित मूळ अनंत लहर परमात्म्याच्या अनंत मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेच्या अनिर्बंध, निरपेक्ष, अनंत दिव्य – पोकळीची (शुन्याची) अनिर्बंध समानतेत उसळून (surge) येण्याच्या बेतात असते तेव्हा

परमात्म्याच्या अनिर्बंध, निरंकुश, अनंत दिव्य पोकळीतील परमात्म्याच्या शाश्वतरित्या निष्कंप संतुलनास प्रक्षुब्ध (उद्युक्त) करीत असता, या स्वतःला जाणून घेण्याच्या अनंत लहरीची प्रत्यक्ष अपेक्षा (prospect) कल्पनातीत बनते.

परंतु अनंत लहरीच्या उसळण्याची बाब व तिची केवळ अकल्पनीयता ही वस्तुस्थिती अनिर्बंध निरपेक्ष, अनंत दिव्य पोकळीच्या (शुन्याच्या) अगदी मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्थे व्यतिरिक्त वेगळ्या अशा परमात्म्याच्या अवस्थेच्या एका पैलूला उत्स्फूर्तपणे निर्माण करते, जेथे ना पैलूची अपेक्षा, ना गुणधर्म, ना अनंत किंवा सीमित चेतना, ना अपरिमित किंवा परिमित अचेतना असते व जेथे अनंतता शाश्वतरित्या अभिव्यक्त झालेली असते, अशा परमात्म्याच्या अनंततेचा अपवाद सोडल्यास तेथे इतर सर्व वस्तू अनंत लहर व तिच्यापासून उत्पन्न झालेली जाणून घेण्याची अनंत उर्मी अंतर्हित असते.

अशाप्रकारे 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत उसळणाऱ्या अनंत लहरिच्या विश्वास ठेवण्यास कठीण अशा संभावनेची आपोआप संभाव्यतः उघड करते – जी देखील अनंत अवस्थेत अंतर्हित असते व हे (संभाव्यतेचे) उघड होणे (manifestation) परमात्म्याच्या अत्यंत मूळ परात्पर परब्रह्म अवस्थेला अनंत पैलूची संभावना, अत्यंत मूळ व शाश्वत अवस्थेपेक्षा वेगळा पैलू प्रदान करते.

परमात्म्याची दुसरी अवस्था, तदनुसार अत्यंत मूळ पहिल्या अवस्थेचा केवळ अन्य अनंत पैलू म्हणून, अस्तित्वात येते. परमात्म्याच्या प्रमुख दहा अवस्थांपैकी ह्या दुसऱ्या अवस्थेला परमात्म्याची मूळ 'परब्रह्म अवस्था' असे म्हटले जाते.

या गोष्टीवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे की, ही परमात्म्याची दुसरी अवस्था जी रेखाचित्रावर २ अशी दुसरी म्हणून निर्देशित केली आहे व त्या अवस्थेला ''परमात्मा परब्रह्म अवस्थेत'' असे म्हटले जाते. परमात्म्याची ही अवस्था जणू परमात्म्याच्या अत्यंत मूळ पहिल्या अवस्थेपेक्षा भिन्न आहे, असे कोणत्याच प्रकारे गृहित धरता कामा नये, जी रेखा चित्रावर पहिली म्हणून

दाखविल्या गेली आहे. व जिला ''परमात्मा परात्पर परब्रह्म अवस्थेत'' असे म्हटले जाते.

परमात्म्याच्या पहिल्या व दुसऱ्या अवस्थेत केवळ एवढाच फरक आहे की, अवस्था १ ही पहिली अवस्था अनिर्बंध परिपूर्ण अनंत दिव्य पोकळीची आहे, जेथे अनंत लहरीच्या उसळण्याच्या नगण्य संभाव्यतेची देखील कल्पना करता येत नाही. म्हणून केवळ त्याक्षणी जेव्हा मूळ अनंत लहर ''परमात्मा आहे'' या अवस्थेच्या अनंतात उसळून येते तेव्हा कुठे अनंत मूळ तीव्र जिज्ञासेची (urge to know) '' मी कोण आहे'' या रुपात जाणून घेण्याची अनंत परमात्मा कल्पना करु शकला. अर्थात केवळ त्यावेळी जेव्हा परमात्म्यात परात्पर परब्रह्म अवस्था १ ची पैलूरहित अवस्था, ''परब्रह्म परमात्मा'' अवस्थेच्या अवस्था २ च्या पैलूला प्राप्त करते. अशा प्रकारे ''परात्पर परब्रह्मा'' ला परमात्म्याचे अनंत रुप प्राप्त होते.

हे सुध्दा अगदी काळजीपूर्वक लक्षात घेतले पाहिजे की, ''परब्रह्म'' अवस्था जी रेखा चित्रात दुसरी अवस्था म्हणून चिन्हांकित केली आहे ती मूलतः तीच ''परात्पर परब्रह्म'' अवस्था आहे, जी रेखा चित्रात १ पहिली अवस्था म्हणून चिन्हांकित केली आहे. परंतु रेखा चित्रात ह्या दोन अवस्था, पहिली अवस्था १ व दुसरी अवस्था २ अशा वेगळ्या दाखविल्या गेल्या आहेत, कारण ''परब्रह्म'' अवस्थेतील अवस्था २ जरी ती परमात्म्याची मूळ अवस्था असली तरी ती परमात्म्याची अत्यंत मूळ अवस्था नव्हे जी ''परात्पर परब्रह्म'' अवस्था आहे. असा निष्कर्ष काढणे अनिवार्य आहे कारण की, परमात्मा केवळ अवस्था २ मध्येच अनंत मूळ लहरीच्या उसळण्याची कल्पना करु शकला व ''मी कोण आहे?'' च्या रुपात स्वतःला जाणून घेण्याची अनंत मूळ लहरीची अनंत मूळ प्रेरणा प्राप्त करु शकला जेव्हा शाश्वत अवस्था १ मध्ये स्थित परमात्म्याने अवस्था २ चे अनंत मूळ रुप धारण केले – स्वतः आपल्या शाश्वत अवस्था १ च्या अतंर्गत जी अत्यंत मूळ 'परात्पर परब्रह्म' अवस्था आहे.

वरील मुद्दा अधिक स्पष्ट करावयाचे झाल्यास परमात्म्याच्या या दोन्ही अवस्थांमध्ये (अवस्था १ व अवस्था २) परमात्म्याच्या शाश्वत अनंतत्वाची

अभिव्यक्त झालेली अनंतता वगळता (अमर्याद, निरपेक्ष, अनंत दिव्य पोकळी म्हणून) परमात्म्याचे सर्व गुण, सर्व पैलू, सर्व अवस्था परमत्म्याची अनंत व अत्यंत सीमित चेतना तसेच अचेतना, परमात्म्याची शक्ती व ज्ञान व आनंदाची त्रिगुणात्मक–प्रकृती व अन्य सर्व गोष्टी धरुन सर्व काही अमर्याद निरपेक्ष, अनंत दिव्य पोकळीत अंतर्हित असतात.

हे जे ''सर्व काही'' अनंतत्वात अंतर्हित आहे त्याला केवळ परमात्म्याच्या दुसऱ्या अवस्थेत अभिव्यक्त होण्याचा अवकाश शक्य झाला असता जे केवळ या अर्थाने अवस्था पहिली पासून भिन्न आहे असे म्हटले जाऊ शकते. कारण केवळ याच अवस्थेत त्या 'सर्व काही' ला जे 'सर्व काही' च्या रुपात, परमात्म्याच्या अनंतत्वात अनंत तसेच अत्यंत सीमित रुपात 'काही नाही' म्हणून अंतर्हित आहे, त्याला अभिव्यक्त होण्याची अमर्याद सुसंधी उपलब्ध असते.

यामुळे परमात्म्याच्या अनंत मूळ लहरीला जेव्हा ती एकदा उसळली तेव्हा परमात्म्याच्या दुसऱ्या अवस्थेमध्येच केवळ उसळण्याची शक्यता होती व जेव्हा ती लहर उसळली, तेव्हा ती परमात्म्याच्या अनंततेत समानतेने उसळली. परंतु जेव्हा लहर उसळली तरी या लहरीच्या उसळण्याचा परमात्मा आपल्या अनंत अत्यंत स्वतंत्र 'परात्पर परब्रह्म' पहिल्या अवस्थेत कदापिही अनुभव घेऊ शकत नाही. याचा अनुभव परमात्म्याने शाश्वतरित्या, अत्यंत मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेत केवळ आपल्या अवस्था २ च्या ''परब्रह्म अवस्थेत'' परमात्मा म्हणून अनंत पैलूंव्दारां घेतला होता.

म्हणून अनंत मूळ लहरीचे अनंत उसळणे आणि त्याचा परिणामस्वरुप अनंत प्रतिक्रिया खरे पाहिले असता परमात्म्याच्या दुसऱ्या अवस्थेत 'परब्रह्म अवस्थेत' घडवून आणल्या जातात.

ज्याक्षणी जेव्हा अनंत मूळ लहर उसळी व परमात्म्याला ''मी कोण आहे ?'' हे जाणून घेण्याची अनंत मूळ जिज्ञासा निर्माण झाली तेव्हा लहरीच्या अनंत उसळण्याच्या अनंत समानतेने उत्स्फूर्तपणे परमात्म्याच्या मूळ 'परब्रह्म' अवस्थेच्या अंतर्गत परमात्म्याची अंतर्हित अनंत चेतना व अंतर्हित अनंत

अचेतना या दोन्हींना स्वतः एकाच वेळी प्रकट केले जो (परमात्मा) तथापि शाश्वततः अत्यंत मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेत असतो.

सुप्त अवस्थेत असलेल्या अनंत चेतनेचे व अनंत अचेतनेचे एकाचवेळी उत्स्फुर्त प्रकटीकरण समजणे व आत्मसात करणे मानवी बुद्धिच्या आकलना पलिकडे आहे. सत्याच्या क्षेत्रातील हा खरोखरच विरोधाभास आहे व या ठिकाणी मानवी समज पराभूत होते.

परमात्मा आपली स्वतःची अनंत चेतना व अनंत अचेतना उत्स्फूर्तपणे एकाचवेळी कशी प्राप्त करु शकतो ? हे स्पष्ट करीत असताना मेहेर बाबांनी ठासून सांगितले आहे की, ही एक सत्य गोष्ट आहे व ही सत्याच्या क्षेत्रातील गोष्ट आहे परंतु ती मनाला कदापिही गम्य व आकलन होणार नाही, ती केवळ 'सत्याच्या' साक्षात्कारानंतरच अनुभविता येईल. त्याचवेळी सत्याच्या क्षेत्रात घडून येणाऱ्या या तथ्याची काहीतरी कल्पना आपल्याला यावी व आपण हे केवळ विरोधाभासात्मक गूढ आहे म्हणून गृहित धरु नये, यामुळे मेहेरबाबांनी आईच्या गर्भातील बाळाच्या उदाहरणाव्दारे हा वरपांगी विरोधाभास समजाऊन दिला आहे.

जेव्हा आई गर्भवती होते तेव्हा आईचे गर्भाशयात मूल विकसित होत असते व जेव्हा विकास एका विशिष्ट अवस्थेला येऊन पोहोचतो तेव्हा इतर विकासाबरोबर बाळाचे डोळे पूर्ण घडविले गेलेले असतात व तेव्हा त्या बाळाला एकाच वेळी ''पाहण्याची'' व न ''पाहण्याची'' या दोन्ही स्थिती प्राप्त होतात. जन्मानंतर मूल पाहाते किंवा पाहत नाही हा भाग वेगळा. परंतु त्याच्या आईच्या गर्भात बाळाचे डोळे घडविले गेले आहेत हे तथ्यच बाळाला त्याच्या स्वतःच्या डोळ्याचे दुहेरु पैलू प्रदान करतात. डोळ्याचा विकास झाल्याबरोबर डोळ्यात एकाचवेळी पाहण्याची व न पाहाण्याची शक्ती अंतर्हित असते. जेव्हा मूल आपले डोळे उघडते तेव्हा ते पाहिल व जेव्हा मूल आपेल डोळे बंद करते तेव्हा ते पाहणार नाही, परंतु जसे डोळे विकसित झालेत त्याच क्षणी एकाचवेळी पाहाण्याची व न पाहाण्याची दुहेरी शक्ती त्याच्यात उत्पन्न झाली होती, हे तथ्य मात्र कायम राहते.

याचप्रमाणे, परमात्म्यातील मूळ अनंत लहरीच्या उसळण्यासह (insurge) परमात्म्यात अंतर्हित असलेल्या दोन्हीही अनंत चेतना व अनंत अचेतना एकाच वेळी प्रकट झाल्या व हे तथ्य मर्यादित मनाला विरोधाभासात्मक प्रतीत होते.

अशा प्रकारे परमात्म्याने आपल्या ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेच्या अनंत मूळ अवस्था १ मध्ये ''परब्रह्म परमात्म्याची'' आपल्या मूळ अवस्था २ चे व्दारा आपली स्वतःची अनंत, अचेत अवस्था व आपली स्वतःची अनंत सचेत अवस्था एकाचवेळी प्राप्त केली – रेखाचित्रात ह्या अवस्था अनुक्रमे ''अ'' व अवस्था ''ब'' म्हणून दाखविल्या गेल्या आहेत.

परिणामतः एका बाजुने अनंत अचेतनेच्या सहज अभिव्यक्तीसह, परमात्मा आपल्या अनंत अचेत ''परब्रह्म' अवस्थेत – रेखाचित्रात ''अ'' म्हणून दाखविलेली आहे, न केवळ आपल्या स्वतःच्या शाश्वत, अनंत, अस्तित्वाविषयी अनंततेने अचेत असतो, तर ज्याप्रमाणे तो शाश्वतरित्या अनंतपणे अत्यंत मूळ निरंकुश परम अनंततेच्या ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेत असल्याप्रमाणे अचेत असतो, परंतु तो आपण स्वतः प्राप्त केलेल्या अनंत मूळ 'परब्रह्म' अवस्थेतही शाश्वतरित्या अनंततेने अचेत राहतो, रेखाचित्रात २ मध्ये दाखविल्याप्रमाणे.

दुसऱ्या बाजुने एकाचवेळी अनंत चेतनेच्या सहज प्रकटीकरणासह परमात्मा आपल्या अनंत सचेत 'परब्रह्म' अवस्थेत ज्याप्रमाणे रेखाचित्रात ''ब'' चे रुपात दाखविल्या गेले आहे तो सहज आपल्या स्वतःच्या शाश्वत अनंत अस्तित्वाविषयी न केवळ अनंतपणे सचेत होतो, जसे निरंकुश अनंततेच्या अत्यंत मूळ 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत असतो, परंतु अगदी स्पष्टपणे तो आपल्या स्वतःच्या निर्मिलेल्या अनंत मूळ 'परब्रह्म' अवस्थेविषयी देखील अनंतपणे सचेत होतो, जे रेखाचित्रात २ च्या अंकाने निर्देशित केले आहे.

दुसऱ्या शब्दात, परमात्म्याच्या केवळ ''परब्रह्म'' अवस्थेत, रेखाचित्रात ज्याप्रमाणे २ चे रुपात दाखविल्या गेले आहे, परमात्मा उत्स्फूर्तपणे अनंत मूळ लहरीच्या उसळण्याबरोबरच एकाचवेळी आपल्या शाश्वत अनंत

अचेत अवस्थेला उत्पन्न करतो, जसे उप–अवस्था 'अ' म्हणून चिन्हांकित केली आहे व आपली शाश्वत अनंत सचेत अवस्था उत्पन्न करतो जी उप–अवस्था ''ब'' म्हणून चिन्हांकित केली आहे.

**उप–अवस्था ''अ''** ही 'परब्रह्म' अवस्थेत परमात्म्याची अवस्था आहे, जी अवस्था २ म्हणून दाखविण्यात आली आहे. ही उप–अवस्था ''अ'' परमात्म्याच्या स्वतःच्या अनंत शक्ती अनंत ज्ञान व अनंत आनंदाची अनंत दिव्य अचेतनेची अवस्था होय. परमात्मा उप–अवस्था 'अ' मध्ये आपल्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंद या त्रिगुणात्मक प्रकृतीचा न जाणीवपूर्वक अनुभव घेतो न त्याचा उपयो करतो.

**उप अवस्था ''ब''** ही देखील परमात्म्याची परब्रह्म अवस्था होय, जी अवस्था २ री म्हणून चिन्हांकित केलेली आहे. ही उप–अवस्था ''ब'' निर्गुण निराकार आहे, परंतु ती परमात्म्याच्या स्वतःच्या उच्चतम दिव्य चेतनेच्या, आपल्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाच्या त्रिगुणात्मक प्रकृतिची अवस्था होय. परमात्म्या या उप–अवस्था ''ब'' मध्ये आपल्या स्वतःच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाचा जाणीवपूर्वक अनुभव घेतो परंतु त्यांचा उपयोग करीत नाही. तो आपल्या सत्यस्वरुपाविषयी सचेत असतो परंतु मायेविषयी मात्र अचेत असतो.

वेदांती परिभाषेत १ पहिली अवस्था जी ''परात्पर परब्रह्माची'' आहे ती परमात्म्याच्या २ दुसऱ्या अवस्थेला निर्माण करते. या दुसऱ्या अवस्थेत परमात्मा ''परमात्मा'' म्हणून आपल्या अत्यंत मूळ ''परात्पर परब्रह्म'' अवस्थे विषयी एकाच वेळी शाश्वततः अचेत व शाश्वततः सचेत असतो. परमात्म्याच्या अवस्थेचा हा अनंत व्दिधा पैलू रेखाचित्रात अनुक्रमे अवस्था ''अ'' व अवस्था ''ब'' म्हणून निर्देशित केलेला आहे.

यामुळे स्वाभाविक असा निष्कर्ष निघतो की, परमात्म्याची शाश्वत अचेत अवस्था जी ''अ'' ने चिन्हांकित केली आहे, ती शाश्वत मूळ 'परब्रह्म' अवस्थेमध्ये, जी २ ने चिन्हांकित केली आहे, ती शाश्वतरित्या परमात्म्याची शाश्वत सचेत अवस्था प्राप्त करण्याची निरंतर अभिलाषा करते जी ''ब'' ने

निर्देशित केली आहे, जी मूळ 'परब्रह्म' परमात्मा अवस्था (परमात्म्याची) व्दिधा अनंत पैलूचे दुसरे अंग (परमात्म्याचे) होय जी '२' अंकाने चिन्हांकित केली आहे.

यास्तव दिव्य लक्ष्य हे आहे की, ''अ'' मध्ये असलेल्या परमात्म्याच्या अचेत अवस्थेत ''ब'' अवस्थेमधील परमात्म्याच्या सचेत अवस्थेचे सचेत सत्य प्राप्त करावे.

थोडक्यात जेव्हा ''अ'' अवस्था जाणीवपूर्वक अवस्था ''ब'' चा अनुभव घेते तेव्हा दिव्य लक्ष्य प्राप्त होते. कारण अवस्था ''ब'' चा जाणीवपूर्वक अनुभव घेण्यासाठी अवस्था ''अ'' ला दुसरा पर्याय नाही. परंतु अवस्था ''अ'' ने क्रमशः अवस्था ''ब'' मध्ये अवस्थांतरित होण्याचा अनुभव घेतलाच पाहिजे व सरतेशेवटी जाणीवपूर्वक सर्व प्रकारे अवस्था ''ब'' बनले पाहिजे.

परमात्म्याच्या अचेत अनंत अवस्थेचे सचेत अनंत अवस्थेतील हे क्रमशः परिवर्तन अवस्था ३, ४, ५, ६ व ७ व्दारे ''परमात्म्याच्या दहा अवस्था'' या रेखाचित्रात परमात्म्याच्या निरनिराळ्या अवस्था म्हणून दाखविल्या आहेत. अवस्था ८ वी मध्ये परमात्म्याची अवस्था ''अ'' ही अवस्था ''ब'' विषयी परिपूर्ण सचेत होते.

या अवस्था ''८'' आठवी मध्ये परमात्म्याची अचेत अनंत अवस्था ''अ'' न केवळ ''ब'' ची उच्चतम दिव्य चेतना प्राप्त करते परंतु परमात्मा आपल्या स्वतःच्या अनंत सचेत अवस्थेच्या 'सत्यात्' दिव्यत्वाने निमग्न होतो व अशा प्रकारे त्याची अनंत चेतन अवस्था ''ब'' च्या बरोबर त्याची शाश्वत एकरुपता असल्याचा अनुभव घेते.

अवस्था ''८'' आठवीमध्ये दाखविल्याप्रमाणे जर परमात्मा दिव्यत्वाने निमग्न होतो व एका संपूर्ण मानवाच्या साकार मूर्तीच्या रुपात आपल्या सूक्ष्म आणि स्थूल पैलूंव्दारां मनोभुवन, सूक्ष्म भुवन व स्थूल भुवनाची सामान्य चेतना पुन्हा प्राप्त करतो व ती टिकवून ठेवतो, तेव्हा अवस्था ८ व अवस्था १० च्या मधली दिव्य संगमाची अवस्था, अवस्था ''९'' प्राप्त केली जाते. या नवव्या अवस्थेनंतर परमात्म्याची दहावी अवस्था रेखाचित्रात दाखविली आहे व ती परमात्म्याच्या 'क' अवस्थेशी जोडली आहे.

परमात्म्याची ही दहावी अवस्था सद्‌गुरुच्या मानवीरुपात प्रकट झालेली सगुण व साकार परमात्म्याची अवस्था असते. या दहाव्या अवस्थेत परमात्मा आपल्या स्वतःच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाची त्रिगुणात्मक प्रकृती जाणीवपूर्वक (चेतनेने) अनुभवितो व रेखाचित्रात ''क'' ने चिन्हांकित केलेल्या परमात्म्याच्या दहाव्या अवस्थेच्या दिव्याधिकाराव्दारे त्यांचा उपयोगही करतो.

हे देखील विशेष लक्षात घेतले पाहिजे की, परमात्मा आपल्या अनंत अचेत **अवस्था ''अ''** मध्ये ना निर्गुण ना निराकार, ना सगुण ना साकार आहे. परंतु **अवस्था ''ब''** ही निर्गुण निराकाराची व **अवस्था ''क''** ही (जी देखील परमात्म्याच्या मूळ परब्रह्म अवस्थेची आहे.) सगुण–साकाराची आहे. ती नर–नारायणाची अशी उच्चतम अवस्था आहे की, ज्या ठिकाणी परमात्मा–अनंततेने सत्य व माया या दोन्हीविषयी सचेत असतो.

**अवस्था – ३**

**परमात्मा –स्त्रष्टा, संवर्धक व संहारक या अवस्थेत**

परमात्मा या अवस्थेत आपले प्रमुख तीन गुण (सिफत) स्त्रष्ट्याचे, संवर्धकाचे व संहारकाचे कार्यान्वित करतो. ही एकात तीनची अवस्था वेदांतातील त्रिमूर्तिशी ब्रह्मा (स्त्रष्टा) विष्णू (संवर्धक) व महेश (संहारक) मिळती–जुळती आहेत ज्याला सुफी परिभाषेत समानार्थी शब्द आहेत, अफ्‌रिदगार, परवरदिगार व फनाकार.

परमात्म्याच्या या तीन गुणांची अभिव्यक्ति तीन प्रमुख देवदुतांचे व्दारे झालेली आहे. ते असे : इसराफिल (जो देवदूत जीवन निर्माण करतो.) मिकाईल (देवदूत – जो जीवनाचे संवर्धन करतो.) आणि इजराईल (देवदूत जो जीवनाचा संहार करतो.)

परमात्म्याच्या ३ तिसऱ्या अवस्थेचे त्रिगुण हे परमात्म्याच्या अत्यंत मूळ अवस्था एक मध्ये अंतर्हित होते, हे त्रिगुण स्वतः एकाचवेळी त्याक्षणी अभिव्यक्त झालेत जेव्हा परमात्म्यात मूळ अनंत लहर उसळली व जेव्हा परमात्म्याने आपल्या अवस्था दुसरीमध्ये स्वतःला ''मी कोण आहे?'' या

जाणून घेण्याच्या अनंत जिज्ञासेची धारणा केली. जेव्हा अनंत लहर उसळली त्या क्षणी परमात्म्याने आपल्या अवस्था २ मधील आपल्या अवस्था ''अ'' मध्ये अनंतपणे अचेत असल्याचे व आपल्या अवस्था ''ब'' मध्ये अनंतपणे सचेत असल्याचे एकाचवेळी अनंतव्दिधा पैलू प्राप्त केलेत.

तरीही स्वतःला जाणून घेण्याची अनंत मूळ प्रेरणा (उर्मी) स्पष्टतः परमात्म्याच्या अवस्था ''अ'' मध्ये अजुनही तशीच टिकून असते जी अजुनही अनंतपणे स्वतःविषयी अचेत असते. स्वतःला जाणून घेण्याच्या अनंत उर्मीने परमात्म्याच्या या अनंततेने अचेत असलेल्या अवस्था 'अ' मध्ये दृढतापूर्वक निवास करीत परमात्म्याच्या सर्व गुणांचे व पैलूंचे प्रकटीकरण शक्य केले – जे (गुण व पैलू) ''काही नाही'' च्या रुपात परमात्म्याची 'सर्व काही' म्हणून असलेली अत्यंत मूळ अवस्था १ मध्ये अनंतत्वात अंतर्हित होते. परंतु जे 'सर्वकाही' मध्ये ''काही नाही'' चे रुपात अंतर्हित आहेत ते सर्व परमात्म्याच्या केवळ २ दुसऱ्या ''परब्रह्म'' अवस्थेत कल्पना करणे शक्य झाले असते.

या कारणास्तव परमात्म्याच्या 'परब्रह्म' अवस्थेत जे सर्व अंतर्हित आहे ते क्रमशः अनंत उर्मीमुळे अभिव्यक्त होते व त्याला गती दिल्या जाते व उत्स्त्फूर्तपणे जे काही ''काही नाही'' चे आहे, ते सर्व प्रकट होण्यास भाग पाडले जाते. अतः प्रकट झालेले हे ''काही नाहीचे'', ''काहीच नसणे'' म्हणजे ही 'सृष्टी' आहे व ही सृष्टी परमात्म्याच्या अनंत अचेत अवस्था 'अ' मध्ये अनंतपणे जाणून घेण्याच्या उर्मीतून (जिज्ञासेतून) उद्‌भवते. यास्तव हे केवळ स्वाभाविक आहे की, परमात्म्याची अनंत अचेत अवस्था ''अ'' ही परमात्म्याच्या तीन अनंत गुणांपैकी म्हणजे स्रष्टा परमात्मा, संवर्धक परमात्मा व प्रलयकारी किंवा संहारक परमात्मा यापैकी फक्त पहिला गुण स्रष्टा (कर्ता) म्हणून प्राप्त करते.

परमात्म्याला कर्त्याचा गुण प्राप्त झाल्यानंतर तो स्पष्टतः स्वतःच्या अवस्था ''३'' मध्ये सृष्टीचा निर्माता (स्रष्टा) बनतो.

नंतर असा अगदी स्वाभाविक निष्कर्ष, निघतो की, परमात्मा जी निर्मिती करतो तेव्हा त्याने आपण उत्पन्न केलेल्या सृष्टीचा स्वतः सहज सांभाळ

केलाच पाहिजे. तेव्हा तो स्पष्टतः सृष्टीचा संवर्धक देखील बनतो, ज्याप्रमाणे त्याची अवस्था ''३'' मध्ये आहे.

आणि आपण जे निर्मिले आहे त्यांचा सांभाळ करण्याच्या कृतीतच परमात्मा एकाच वेळी सृष्टीचे अनिवार्यतः नष्ट करणे किंवा सृष्टीचा संहार प्रस्थापित करतो. सृष्टीचा संहार किंवा प्रलय अपेक्षिला नसेल तर संवर्धनाला अर्थच उरणार नाही. त्‌दनुसार परमात्मा स्पष्टतः आपल्या अवस्था ''३'' मध्ये सृष्टीचा लय करणारा किंवा संहारक देखील होतो.

परमात्म्याची अवस्था तीन ''३'' ही अवस्था आहे की, ज्या अवस्थेत परमात्मा आपल्या सृष्टीचा कर्ता होतो व त्याचवेळी तो धर्ता किंवा पोषकही असतो, व तसेच तो ''हरता'' व संहारकही असतो. एकाच वेळी परमात्मा याप्रमाणे अवस्था ''३'' मध्ये कर्ता, धर्ता व हर्ता बनतो.

परमात्म्यात उसळलेल्या अनंत मूळ लहरीने व परिणामतः स्वतःला जाणून घेण्याच्या अनंत उर्मीने परमात्म्यात कर्त्याचे व धर्त्याचे व हर्त्याचे अनंत त्रिगुण प्रकट केले व त्याचबरोबर अंतर्हित असलेल्या ''काही नाही'' च्या ''काही नसण्याला'' सर्व लवाजम्यासह प्रकट केलेत. हे ''काहीच नसणे'' अक्षरशः शून्य आहे– जरी ते मायेतील भ्रमामुळे (illusion) कधी कधी माया[३५] या अर्थाने सृष्टी म्हणून अस्तित्वात आहे असे दिसते.

मेहेरबाबांनी आम्हाला सांगितले आहे की, शब्दार्थाने सांगितल्यास ''सृष्टी'' नावाची अशी वास्तविक कोणतीच गोष्ट नाही – ज्याला आपण सृष्टी म्हणून समजतो ती 'काही नाही' च्या असंख्य रुपांचे प्रकटीकरण आहे. हे ''काही नाही'' वास्तविक ''काहीच नाही'' परंतु त्याचे अस्तित्व मायेच्या स्वतःच्या आपल्या भ्रमात्मक क्षेत्रात असते, हे नाकारता येणे शक्य नाही. परंतु ते ''सर्वकाही'' च्या म्हणजे परमात्म्याच्या बाहेर नाही. 'सर्व अस्तित्वांमध्ये* या ''काही नाही'' चा समावेश असला तरी ते ''काही नाही'' सर्वव्यापी परमात्म्याला अंतर्भूत करीत नाही व करणेही शक्य नाही किंवा ना त्याचा अर्थ

* अस्तित्व म्हणजे परमात्म्याचे अस्तित्व.

''सर्वव्यापी परमात्मा'' असू शकते. सर्व शक्तीमान केवळ ''सर्वकाही'' आहे, ''काही नाही'' त्यामध्ये अंतर्भूत आहे. सृष्टी स्वतः अभिव्यक्त होण्यापूर्वी ''सर्वकाही'' च्या रुपात सर्वशक्तिमान परमात्म्याचेशिवाय शब्दशः आणि पूर्णतः ''काहीच नव्हती.''

जात थी अल्लाहकी जलवे सब रुपोश थे
एक सौत–ए–सरमदी था नगमे सब खामोश थे,
था फकत मयखाना, साकी था न वॉ मयनोश थे
का–इ–नाते दहर क्या रूह–उल–अमीन बेहोश थे
जिन्दगी जब मुस्कुराई है कजा के सामने । – मुन्सिफ असगर

''केवळ एकमेव अल्लाहचे अस्तित्व होते व सर्व अभिव्यक्ती त्याच्यात अंतर्हित होती.
– एक शाश्वत नाद व्यापून होता व सर्व संगीत स्वर त्यात सुप्त होते.
–तेथे केवळ मधुशाळा होती, तेथे मद्य प्राशण करणारे व चषक वाहक कोणी नव्हते.
– स्थूल विश्वाचा प्रश्नच नव्हता – देवतांचे जग देखील अस्तित्वात नव्हते.
– ज्या क्षणी ''अस्तित्वात ये'' चा दैवी आदेश झाला, जीवन स्मिताने उजळून उसळून वर आले.''

एकमेव सर्वशक्तिमान (परमात्मा) अस्तित्वात होता, परंतु तो केवळ सुप्त रुपाने सचेत होता व त्यामुळे त्याला आपली स्वतःची जाणीव नव्हती व त्याचप्रमाणे ती चेतना त्याच्यामध्ये सुप्त अवस्थेत होती व अशाच प्रकारे सृष्टी देखील त्याच्या मध्ये अंतर्हित होती.

सुप्त आणि प्रकट सृष्टीमधील फरकाची तुलना बीज व वृक्ष यांच्याशी करता येईल. परंतु बीज किंवा वृक्ष सुप्त असो की, प्रकट असो, सृष्टी ही नेहमी 'काहीच नसते' कारण सुप्त ''काही नाही'' हेच ''काही नसण्याचे'' रुपात अभिव्यक्त झाले.

'सर्व काही' म्हणून परमात्म्याच्या अनंतत्वाच्या परब्रह्म अवस्था दुसरी मध्ये, जे सर्व काही ''काही नाही'' म्हणून अंतर्हित आहे, ते परमात्म्याच्या अनंतत्वातील एका अत्यंत सीमित बिंदूतून व्यक्त व प्रकट झाले आहे. प्रस्तुत

बिंदूला – ''सृष्टी बिंदू'' किंवा ''ॐ बिंदू'' असे म्हटले जाते.* या बिंदूतून सृष्टीचा पसारा बाहेर आला. हा सृष्टीबिंदू देखील परमात्म्याच्या अत्यंत मूळ 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत, अवस्था १ मध्ये अंतर्हित होता.

उत्पत्ती करणे, पोषण करणे व संहार करण्याची प्रक्रिया जी निरंतर व नियमितपणे सुरु राहाते त्याचे चित्रण एका द्दष्टांताने करता येईल. आपण कल्पना करु की, मानवीशरीर हे परमात्मा आहे. नंतर डोळे बंद करुन झोपलेल्या मानवाची तुलना २ दुसरी अवस्था म्हणून असलेल्या परमात्म्याच्या 'परब्रह्म' अवस्थेशी करता येईल. डोळे उघडण्याच्या अगदी पहिल्या क्षणाची तुलना परमात्म्याच्या कर्ता (विधाता) या अवस्थेशी करता येईल. त्यानंतरच्या जागृत स्थितीची तुलना परमात्मा 'सवर्धक' म्हणून असलेल्या अवस्थेशी करता येईल आणि परत डोळे बंद करुन निद्रावश होण्याची तुलना परमात्म्याच्या ''संहारक'' या अवस्थेशी करता येईल. अशा प्रकारे परमात्मा कर्ता, धर्ता व हरता या तिनही रुपात एकाच वेळी असतो.

**अवस्था – ४**

**परमात्मा–जीवात्म्याच्या अवस्थेत**

दीद अपनी थी उसे ख्वाहिश
आपको हर तरह बना देखा – नियाज

''त्याने आपल्या स्वतःला पहावयाची इच्छा केली म्हणून त्याने नाम आणि रुपांचे विविध पैलू आपल्या स्वतःवर धारण केले.''

परमात्म्याची अवस्था ''अ'' जी अनंतपणे अचेत अवस्था आहे ती ''ब'' च्या अनंत सचेतन अवस्थेत क्रमशः कशी अवस्थांतरित होते आणि परिपूर्ण अनंत चेतना कशी प्राप्त करते हे समजण्यासाठी मेहेर बाबांनी खालील दृष्टांत दिला.

सृष्टी अस्तित्वात येण्यापूर्वी परमात्म्याच्या अचेतन अवस्था ''अ'' ची कल्पना एका स्पंदनरहित अनंत महासागराशी करा. तेव्हा एका वाऱ्याच्या झूळूकीने या महासागराच्या शांत स्थिर अवस्थेत हलचल पैदा केली व या

* हे पहा फ्रॅन्सीस ब्रेबॅझॉनचे 'स्टे विथ गॉड' ओम्बे क्विन्सलँड ऑस्ट्रेलिया, एडवर्डस अँड शाँ फॉप गरुड बुक्स, १९५९ पृष्ठे ६५६६– संपादक

अमर्याद अनंत महासागराच्या एकरुपतेमधून प्रचंड लाटा, असंख्य जलबिंदू व असंख्य बुडबुडे बाहेर आलेत. महासागरात मंथन पैदा करणाऱ्या वाऱ्याच्या फुंकाराची तुलना परमात्म्याच्या अनंत मूळ जाणून घेण्याच्या जिज्ञासेच्या आवेशाशी करता येईल – जो (आवेश) परमात्म्याच्या अनंत मूळ लहरी सोबतच उत्पन्न झाला व परमात्म्याच्या अवस्था २ चे व्दारा परमात्म्याला स्वतःला जाणून घेण्यासाठी परमात्म्यात उसळला.

अंनंत उर्मिमुळे उत्पन्न झालेल्या महासागराच्या पृष्ठभागावरील हालचालीने, त्या अनंत महासागराच्या प्रत्येक थेंबाला स्वतःला जाणून घेण्याच्या अनंत मूळ उर्मिने भरुन टाकले.

अशाप्रकारे परमात्मा आपल्या अनंतपणे अचेत असलेल्या अवस्था 'अ' मध्ये स्वतःला जाणून घेण्याच्या उर्मिमुळे एकाचवेळी परमात्म्याच्या अंतर्गत असलेल्या प्रत्येक आत्म्याचे प्रशांत संतुलन स्वतःला जाणून घेण्याच्या उर्मिनी ढवळून टाकतो. हे समजणे तेव्हाच शक्य होते जेव्हा परमात्म्याची तुलना अनंत महासागराशी व आत्म्याची तुलना अनंत महासागरातील एका थेंबाशी केली जाते. परंतु हे देखील नीट लक्षात ठेवले पाहिजे की, महासागराचा प्रत्येक थेंब जो पर्यंत महासागराच्या पृष्ठभागावर बनलेल्या बुडबुड्याव्दारां वेगळ्या व्यक्तिमत्वाची धारणा करीत नाही (वारसा घेत नाही) व जोपर्यंत तो महासागरात असतो, तोपर्यंत तो स्वतः महासागरच असतो. अशाप्रकारे आकारास आलेला प्रत्येक बुडबुडा प्रत्येक थेंबावर एक वेगळे व विशिष्ट व्यक्तिमत्व प्रदान करील आणि हे निर्माण केलेले वेगळेपण, जोपर्यंत वेगळेपण निर्माण करणारे बुडबुडे अस्तित्वात आहेत तोपर्यंत अनंत महासागराच्या थेंबाच्या अविभाज्य समानतेत हे वेगळेपण अस्तित्वात राहिल. जसे बुडबुडे फुटतील, तसे हे थेंब, जे स्वतः महासागरातच असतात व आधिपासूनच होते हा अनुभव करतील की, ते अनंत महासागराशी एकरुप होते व आहेत आणि त्यांना अनंत महासागरात आपल्या शाश्वत अनंततेची चेतना, त्यांनी वेगळेपणाचा अनुभव घेतल्यानंतर व अज्ञानाचे बुडबुडे नाहिसे केल्यानंतरच प्राप्त होते – जे बुडबुडे त्यांच्या स्वाभाविक (मूळच्या) अविभाज्यतेपासून त्यांना वरपांगी अनुभव

प्रदान करण्यास कारणीभूत झाले होते.

जोपर्यंत महासागराचे अनंतपणे असंख्य थेंब वरपांगी वेगळेपणाचा अनुभव घेत नाहीत तोपर्यंत ते स्वतः महासागर म्हणून आपल्या स्वतःच्या एकसमान व अविभाज्य, शाश्वत, अनंत अस्तित्वाचा अनुभव घेऊ शकत नाहीत. केवळ वरपांगी वेगळेपणाच्या अनुभवाव्दारेच आत्मे परमात्मा म्हणून त्यांच्या अविभाज्य एकतेचा जाणीवपूर्वक अनुभव घेऊ शकतात.

''परमात्मा देहधारी आत्मा म्हणून'' परमात्म्याच्या चवथ्या अवस्थेचे वर्णन करण्यासाठी परमात्म्याच्या अवस्था 'अ' मधील एका अनंत अचेतन आत्म्याचा आपण विचार करु.

प्रारंभी अवस्था 'अ' मध्ये आत्म्याला चेतना नसते व संस्कारही नसतात.

म्हणून त्यास्थितीत व त्या अवस्थेत आत्म्याला स्थूल आकार, स्थूल देह, सूक्ष्म देह, किंवा मनोदेह नसतात कारण स्थूल, सूक्ष्म व मनःसंस्कारांचे अस्तित्वच केवळ स्थूल, सूक्ष्म व मनोदेहांना अस्तित्व देऊ शकतात. आणि केवळ या देहांच्या अस्तित्वामुळेच स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचे अस्तित्व शक्य होते. म्हणून प्रारंभी परमात्म्याच्या अवस्था 'अ' मध्ये असलेला आत्मा अनंतपणे अचेत व संस्कारविरहित असल्यामुळे त्याला स्थूल, सूक्ष्म व मनोदेहाची चेतना नव्हती व तो आपल्या अनंत ''स्व'' विषयी देखील अचेत होता. आत्म्याला स्वाभाविकपणे तेव्हा स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव नव्हता व परमात्म्याचा देखील अनुभव नव्हता.

आता ही आत्म्याची अनंत संस्कारविरहित अचेतन प्रशांत अवस्था प्रथम आवेशाने प्रतिध्वनित झाली जिला आपण प्रथम लहर (किंवा उर्मी) म्हटले आहे. (स्वतःला जाणून घेण्याची प्रथम उर्मी)

स्वतःला जाणून घेण्याच्या प्रथम लहरीच्या प्रतिध्वनित होण्याबरोबर एकाचवेळी अत्यंत स्थूल प्रथम संस्कार निर्माण झाला ज्याने आत्म्याला वेगळे अस्तित्व दिले व निव्वळ अनंत परमात्म्याचे निरपवादपणे विरोधी अत्यंत सीमित प्रतिरुप म्हणून प्रस्तुत केले.

आत्मा शाश्वतरित्या परमात्म्यात असल्यामुळे व परमात्म्याशी एकरुप

असल्यामुळे त्याला परमात्म्याच्या अनंत अव्यक्त क्षमता देखील असतात, जरी त्या त्याच्या अचेत अवस्थेत सुप्त असतात. अशाप्रकारे आत्मा देखील अनंत शक्ती, ज्ञान आणि आनंदाचा स्वामी असतो.

यामुळे संस्कारविरहित अनंत आत्मा जेव्हा अगदी प्रथम संस्कार प्राप्त करतो तेव्हा हा संस्कार अत्यंत स्थूल संस्कार असल्याशिवाय दुसरे काही असू शकत नाही, कारण आत्मा जो स्वतः अनंत ज्ञानाचा स्वामी आहे, तो आपल्या ''स्व'' चे ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. अनंत ज्ञानाचा स्वामी असण्याच्या दृष्टीने ही संकल्पनाच अनंतपणे अपरिपक्व किंवा स्थूल आहे व ह्या अनंत आत्म्याच्या अनंतपणे अपरिपक्व व स्थूल संकल्पनेने संस्कारविरहित आत्म्याला अत्यंत सीमित प्रथम संस्कार प्रदान केला. त्याच वेळी अत्यंत स्थूल प्रथम संस्कारासह अनंतपणे अचेत असलेल्या आत्म्याने देखील अत्यंत सीमित प्रथम चेतना प्राप्त केली. स्थूल संस्कारांच्या वृद्धिबरोबर चेतना उत्क्रांत झाली व स्थूल योनीच्या उत्क्रांतीने गती प्राप्त केली.

याप्रमाणे चेतनेची उत्क्रांती, स्थूल योनींची उत्क्रांती व स्थूल जगताच्या अनुभवांची उत्क्रांती ह्या सर्व परमात्म्याच्या स्वतःला जाणून घेण्याच्या उर्मिमुळे निर्माण झाल्या आहेत.

प्रथम उर्मिच्या अत्यंत स्थूल प्रथम संस्कारामुळे अनंत चेतन आत्म्याने अगदी प्रथमच अनुभवांचे पैलू प्राप्त केलेत. अनंत आत्म्याचा प्रथम अनुभव हा होता की, त्याला परमात्म्याच्या अनंत, संस्कारविरहित अचेत अवस्था ''अ'' च्या सोबत असलेल्या आपल्या एकरुपतेच्या बाबतीत एकदम विपरित अनुभव आला. (जो निरपवादपणे विपरीत स्वरुपाचा होता.) परस्पर विरोधाच्या या अनुभवाने अनंत आत्म्याच्या शाश्वत अविभाज्य स्थिरतेमध्ये परिवर्तनशीलता घडवून आणली आणि उत्स्फूर्तपणे त्याठिकाणी एक प्रकारचा विस्फोट झाला ज्याने एका भिषण धक्क्याने किंवा उसळीने अनंत आत्म्याच्या अविभाज्य संतुलनाला व अचेतन शांततेला विस्कळीत केले आणि त्या उसळीने किंवा धक्क्याने अनंतपणे अचेतन आत्म्याच्या अनंत अचेतनेला परमात्म्याच्या अविभाज्य अवस्थेपासून वरपांगी वेगळेपणाच्या प्रथम चेतनेने भरुन टाकले.

परंतु आत्मा अनंत असल्यामुळे जी प्रथमचेतना जी त्याच्या वेगळेपणाच्या अत्यंत विपरीत व अत्यंत स्थूल प्रथम संस्काराच्या उसळीने किंवा धक्क्याने प्राप्त केली होती ती स्वाभविकता व अनिवार्यतः अत्यंत सीमित प्रथम चेतना होती.

आत्म्याने प्राप्त केलेली प्रथम चेतना स्पष्टता त्याच्या स्वतःच्या मूळ अनंत ''अ'' अवस्थेच्या निव्वळ परस्परविरोधी अनुभवांच्या प्रमाणात अत्यंत सीमित चेतना होती.

यास्तव, याचा अर्थ असा होतो की, प्रारंभी संस्काररहित अनंत आत्म्यावर जेव्हा प्रथम संस्काराचा ठसा उमटला तेव्हा तो प्रथम संस्कार अगदी अत्यंत सीमित स्थूल संस्कार होता. पहिली चेतना जी त्याने (आत्म्याने) प्राप्त केली ती अत्यंत सीमित होती. स्वाभाविकपणे तत्क्षणी अनंत आत्म्याच्या अचेतनेने अत्यंत स्थूल प्रथम संस्काराच्या अत्यंत सीमित प्रथम चेतनेचा प्रत्यक्षात अनुभव घेतला.

आता जर आत्म्याला संस्काराची चेतना असेल तर आत्म्याने अनिवार्यतः या संस्कारांचा अनुभव घेतलाच पाहिजे आणि संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आत्म्याच्या चेतनेने उचित व अनुरुप माध्यमाव्दारे त्याचा अनुभव घेणे अनिवार्य आहे. जसे संस्कार असतात त्याच प्रमाणे संस्कारांचे अनुभव असतात व त्याचप्रमाणे संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता तसेच उचित माध्यमे असतात. अर्थात संस्कार अनुभवांचे कारण बनतात व संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता उचित माध्यमांचा उपयोग अनिवार्य असतो.

म्हणून ज्याअर्थी अनंत शाश्वत व निराकार आत्म्याने आता अत्यंत स्थूल प्रथम संस्काराची अत्यंत सीमित प्रथम चेतना प्राप्त केली आहे, त्याअर्थी अत्यंत स्पष्टतः व अनिवार्यतः आत्म्याच्या या प्रथम चेतनेने अत्यंत सीमित आणि अत्यंत स्थूल प्रथम माध्यमाचा अत्यंत स्थूल प्रथम संस्काराचा अनुभव घेण्यासाठी उपयोग केलाच पाहिजे.

परमात्म्याने आपल्या ४ चवथ्या अवस्थेत (परमात्मा शरीरधारी आत्मा म्हणून) स्वीकारलेले प्रथम माध्यम हे प्रथम रुप आहे व ते जरी स्थूल असले तरी ते त्याप्रमाणे अकल्पनीयरीतीने अनंतपणे सीमित आहे की, ज्याचा स्थूल

म्हणून विचार करणे देखील शक्य होत नाही. ते इतके अधिक अपरिमितपणे आकाररहित व तत्वरहित, द्रव्यरहित तसेच रुपरहित आहे की, ते स्थूल आहे याची एखाद्याला कल्पना देखील करता यावयाची नाही. तरी हे रुप देखील अगदी प्रथम स्थूलरुप आहे, जे एकाचवेळी जणू तीन काट्यांच्यारुपात (जसा काटेरी चमचा) म्हणजे अगदी प्रथम सात ''गॅस सद्रुश्य'' रुपांपेकी प्रथम तीन रुपात (गॅस सद्रुश्य) बाहेर येते. ह्या प्रथम तीन ''गॅस सद्रुश्य'' रुपांचे वर्णन करण्याचा कधी प्रयत्न केला तर त्याचे वर्णन केवळ घनतेच्या सिध्दांताप्रमाणेच करणे शक्य होऊ शकते. पहिला अनंतपणे नगण्य घनता असलेला, नंतर दुसऱ्या स्थितीत नगण्य घनता असलेला व तिसऱ्या स्थितीत नाममात्र घनतेचे प्रथम चिन्ह असल्याचे प्रतीत होईल. या प्रथम तीन रुपांना उत्क्रांती नाही. दुसरी त्यानंतरची तीन रुपे आपल्या कल्पनेच्या क्षेत्रात येणे शक्य आहे व त्याचे ''अर्ध वायुरुप व अर्धभौतिक (मूर्त)'' (Semi gaseous and semi material) रुपात वर्णन केल्या जाऊ शकते. उत्क्रांतीला चवथ्या ''गॅस सद्रुश्य'' रुपापासून प्रारंभ होतो आणि अंतिमतः एक सातवे 'गॅस सद्रुश्य' रुप आहे, जे सर्वप्रथम सात 'गॅस सद्रुश्य' रुपांच्या शृंखलेतील सातवे 'गॅस सद्रुश्य' जे रुप आहे, ते आहे हायड्रोजन व त्यामध्ये 'इलेक्ट्रॉन'' (विद्युत परमाणू) अंतर्भूत आहे, असे म्हटले जाऊ शकते.

हे चांगल्या प्रकारे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रथम सहा 'गॅस सद्रुश्य' स्थूल रुपे विविध गॅसेस, हायड्रोजन, नायट्रोजन इत्यादी सारखी नाहीत. ते गॅसेस, ज्या बाबत आजच्या युगातील वैज्ञानिक सुपरिचित आहेत त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने विशुध्द (Finer) आहेत. परंतु सूक्ष्मतर नाहीत. (not subtler)*

**अवस्था – ५**

**परमात्मा–उत्क्रांतीच्या अवस्थेतील आत्म्याचे रुपात**

शरीरधारी आत्मा म्हणून परमात्मा सचेत होण्यास प्रारंभ करतो व

* सूक्ष्म जगताच्या कोणत्याही रुपाशी किंवा वस्तूशी याचा कोणत्याही प्रकारे संबंध जोडता कामा नये, कारण ही रुपें केवळ स्थूल जगताची आहेत.

सृष्टीला (काही नसण्याला) ''जाणून'' घेण्यास सुरुवात करतो, जरी या ठिकाणी त्याचे सृष्टीला, 'जाणणे' अपरिमितपणे नगण्य (negligible) असते. तथापि ही अत्यंत सीमित चेतना व हे नगण्यतम ''जाणणे'' असले तरी ते अधिक संस्कार प्राप्त करतात, ज्यामुळे ''थेंबाला'' (स्वतः आत्म्याला) ते मूळ प्रथम  बुडबुड्याशी (रुपाशी) असाहचर्य करण्यास किंवा त्याला सोडण्यास कारणीभूत होतात. बुडबुड्याला सोडणे, प्रथम रुपाला सोडण्यासारखे किंवा त्याचे साहचर्य सोडण्यासारखे आहे.

रुपाला सोडल्यानंतर देखील आत्म्याच्या उत्क्रांत होणाऱ्या चेतनेने संकलित केलेले संस्कार नष्ट होत नाहीत. हे संस्कार उत्क्रांत झालेल्या चेतनेच्या सोबत साहचर्य करुन राहतात व आत्म्याच्या उत्क्रांत होणाऱ्या चेतनेला दुसऱ्या उचित व श्रेष्ठ बुडबुड्याशी (रुपाशी) साहचर्य करण्यासाठी कारणीभूत होतात. याप्रमाणे आत्मा दुसऱ्या रुपाव्दारां सृष्टीला अधिक जाणून घेण्यासाठी किंवा तिचा अनुभव घेण्यासाठी समर्थ होतो. दृष्टीकोन विस्तृत होतो व ''जाणण्याची'' चेतना एकाचवेळी रुपांच्या उत्क्रांतीच्या प्रमाणात वृध्दिंगत होते. स्थूल चेतनेत होणाऱ्या उत्क्रांतीसह किंवा वृध्दिसह संस्कार देखील वृध्दिंगत होतात व त्या संस्कारानुसार जे चेतनेने दुसऱ्या रुपाचा त्याग करायचे वेळी राखून ठेवलेले असतात ते संस्कार आत्म्याला अजून अधिक गुंतागुंतीचे स्थूल रुप धारण करण्यास किंवा साहचर्य करण्यास कारण बनतात.

अशाप्रकारे युगानुयुगे चेतनेच्या उत्क्रांतीची प्रगती होत राहते व ती त्या रुपांच्या उत्क्रांतीसोबत सोबत होत राहते की, जी रुपे संकलित संस्कारांचा अनुभव करण्यासाठी व त्याच बरोबर ते नष्ट करण्यासाठी मदत करतात, ही चेतनेच्या उत्क्रांतीची प्रगती अशीच सुरु राहते जोपर्यंत आत्मा रुपांच्या असंख्य परिवर्तनानंतर, पाषाण, धातू, वनस्पती, कीटके, मासे, पक्षी व प्राण्यांच्या अधिक निश्चित आणि क्रमबध्द येणाऱ्या स्थितीव्दारे मानवरुप धारण करीत नाही.

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, आत्म्याच्या चेतनेचे उत्क्रांतीचक्र उच्चतर व उच्चतर प्रकारच्या रुपांच्या उत्क्रांतीचे सोबतसोबत पुढील निम्नतर

प्रकारच्या असाहचर्य केलेल्या रुपांचे संस्कार अनुभवित व नष्ट करीत पुढे अधिक चेतनेची उत्क्रांती करीत राहते.

याचा परिणाम म्हणून आत्म्यांच्या चेतनेची उत्क्रांती प्रत्यक्षपणे आत्म्यांना स्थूल जगतात असंख्य उच्चतर व उच्चतर स्थूलरुपांच्या जातींशी एकरुपता करण्यासाठी व त्यांचे विविध असंख्य संस्कार संकलित करण्यासाठी प्रवृत्त करते. आत्मे महत्तर व महत्तर चेतनेच्या प्रत्येक उडीसह स्पष्ट प्रमुख रुपांशी साहचर्य करतात व प्रत्येक उडीच्या अनुसार ती रुपें–पाषाण ते धातू, धातू ते वनस्पती, वनस्पती ते कीटक, कीटक ते मत्स्य, मत्स्य ते पक्षी, पक्षी ते प्राणी व शेवटली अंतिम सातवी उडी ही प्राण्यापासून ते मानवीदेहापर्यंत असते.

हे समजणे अत्यंत महत्वाचे आहे की, चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेचा संबंध फक्त बुडबुड्यांच्या किंवा रुपांच्या उत्क्रांतीशी आहे व तो 'थेंबाशी' किंवा आत्म्याशी नाही. अगदी प्रारंभापासून तो चेतनेच्या उत्क्रांतीच्या शेवटपर्यंत, ज्या उत्क्रांतीचा अखेर रुपांच्या उत्क्रांतीच्या पूर्णतेत होतो, तोपर्यत आत्मा अमर्याद महासागराप्रमाणे (परमात्मा) अविभाज्य आणि अनंत असतो.

केवळ रुपांच्या या उत्क्रांतीव्दारा अज्ञानाची चेतना किंवा सृष्टीला 'जाणणे' हे विविध संस्कारांमुळे पायरी पायरीने वाढत जाते आणि केवळ मानवी देहातच व्यक्तिगत झालेला आत्मा अंततः परमात्म्याचा साक्षात्कार करु शकतो. ज्या अर्थी आत्मा अनंत आहे त्याअर्थी आत्म्याची चेतना सुध्दा अनंत झालीच पाहिजे आणि ज्याअर्थी मानवी देहातच केवळ चेतना अनंत होते त्याअर्थी मानवी देह हा रुपांच्या उत्क्रांतीची अंतिम स्थिती होय.

आत्म्याने एकदा मानव देहात पुनर्जन्माच्या प्रक्रियेला प्रारंभ केला की, त्याला परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त होईपर्यंत चवऱ्याऐंशी लक्ष वेळा मानवी रुपांच्या अनुभवातून जावे लागते. मानव योनीत येण्यापूर्वी ज्या मानव–पूर्व योनीतून आत्म्याला जावे लागते त्या अगणित आहेत.

अगदी अचूकपणे सांगावयाचे असेल तर फक्त एकच रुप आहे व ते आहे मानवरुप व ते रुप असे आहे की जे पूर्वीच्या सर्व योनींमध्ये सुप्त अवस्थेत असते. खनिज, वनस्पती व प्राणी योनीत वास्तविक पाहता मानवरुप अंतर्हित अवस्थेत असते आणि हे रुप जोपर्यंत ते सरतेशेवटी मानवी देहात एक मानव

प्राणी म्हणून पूर्णपणे प्रकट होत नाही तोपर्यंत क्रमशः वाढत्या प्रमाणात अभिव्यक्त होत राहते.

मानवयोनीत, मानवदेह जसे पुरुष किंवा स्त्री म्हणून पूर्णतः अभिव्यक्त होण्यापूर्वी, अंतर्हित असलेले मानवरुप आंशिक रुपाने बऱ्याच वेळा आपली स्थिती बदलते. स्फटिकांच्या, खडकांच्या अवस्थेत (जसे ग्रॅनाईट) अंतर्हित असलेले मानवरुप पूर्णतः उलटे (वरची बाजू खाली) असते व वनस्पती अवस्थेत देखील बहुतांश असेच असते. जशी रुपे प्रगत किंवा उत्क्रांत होतात तसा शरीराचा कणा हळूहळू फिरतो व ज्यामुळे तो अधिकाधिक आडवा होतो व जेव्हा आपण उच्चतर पाठीचा कणा असलेल्या प्राण्यांप्रत पोहोचतो व जसजसा पाठीचा कणा लंबस्थितीमध्ये येतो तसतसे आपण अधिकाधिक डोके वर उन्नत होताना पाहतो. पुरुष व स्त्रियांमध्ये आपण मानवी देह पूर्णतः अभिव्यक्त व पूर्णतः लंबस्थितीत (उभा) असलेला पाहतो.

या रुपांच्या हा उत्क्रांतीचा तपशिल अत्यंत गुंतागुंतीचा आहे. उदाहरणार्थ, प्रस्तर, धातू, वनस्पती व प्राणी यांच्या काही विशिष्ट उपजाती आहेत की ज्या मेहेर बाबांनी वर्णन केल्याप्रमाणे उत्क्रांतीत एक खास स्थान ठेवतात. रुपांचे हे मुख्य उपप्रकार बहुतांश ते आहेत की, जे उत्क्रांती मार्गावरील मैलाचे दगड आहेत व जे रुपांच्या सामान्य जातीचा विशिष्ट वर्गाचा आरंभ व शेवट चिन्हांकित करतात. उदाहरणार्थ, मत्स्य योनीच्या अखेरच्या उपजाती नंतर येणारी पक्षी योनीची पहिली उपजात व पक्षी योनीच्या अंतिम उपजाती नंतर येणारी प्राणी–योनीची प्रथम उपजात यांना उत्क्रांतीमध्ये एक खास स्थानमहात्म्य आहे.

मेहेरबाबांनी आम्हाला सांगितले की, हा समग्र विषय त्यांनी त्यांच्या ग्रंथात* तपशिलवार स्पष्ट केला आहे. जो ग्रंथ अजुनही जगाला हस्तांतरीत झालेला नाही.

ज्याप्रमाणे चेतनेची उत्क्रांती व रुपांची उत्क्रांती होत असते

*संदर्भित केलेला ग्रंथ म्हणजे प्रस्तुत प्रकाशन आहे असे समजण्याची चुक करु नये. मेहेरबाबांनी एक अतिरिक्त ग्रंथ लिहिला आहे जो नंतर प्रकाशित होऊ शकेल– संपादक

त्याचप्रमाणे जगतांची सुध्दा उत्क्रांती होत असते.

आत्म्याची उत्क्रांत चेतना, आत्म्याची एकरुपता उत्क्रांत रुपांशी करीत असताना अधिकाधिक संस्कारित होते आणि हे संस्कार खर्च करुन संपविण्यासाठी व ते सातत्याने व्यक्त करण्यासाठी ती स्वतःचे क्षेत्र शोधत राहते व या संस्कारांचा अनुभव ती या स्थूल जगात (पृथ्वीवर) घेते आणि ही पृथ्वी देखील अन्य जगतांच्या बरोबर समग्र वैश्विक सृष्टीच्या प्रगतिशील उत्क्रांतीच्या अनुसार उत्क्रांत होत असते.

आत्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीच्या दरम्यान आत्मा विविध सीमित स्थूल देहांशी जाणीवपूर्वक एकरुपता करीत असतानाच तो आपल्या सीमित सुक्ष्मदेहाशी व सीमित मनोदेहाशी देखील एकाच वेळी अजाणतेपणी असले तरी एकरुपता करीत होता व त्या रुपांनी अगदी थेट प्रथम लहरीपासून उत्क्रांतीच्या संपूर्ण कालखंडात आत्म्याशी दृढ एकजीव व अचेत साहचर्य ठेवले होते.

जी सीमित स्थूलरुपे महत्तर व महत्तर चेतनेची उत्क्रांती करताना संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी व ते खर्च करुन नष्ट करण्यासाठी माध्यम म्हणून क्रियाशील होतात त्यांचे साहचर्य आत्म्याने चेतनेच्या उत्क्रांतीच्या समग्रकालखंडात जेव्हा वारंवार व जाणीवपूर्वक सोडलेले असते तेव्हा देखील आत्मा आपल्या सीमित सूक्ष्मदेहापासून व सीमित मनोदेहापासून जाणीव पूर्वक किंवा अचेतनतया साहचर्य कधीही सोडत नाही.

उलटपक्षी आत्मा जेव्हा कोणत्याही एका सीमित स्थूल माध्यमाशी असलेले आपले एकरुपत्व सोडतो तेव्हा आत्म्याचे आपल्या सूक्ष्म देहाशी अचेत साहचर्य असतेच, ते साहचर्य त्यावेळी कोणत्याही स्थूल माध्यमाविना असलेल्या आत्म्याला सीमित प्राणशक्तीने, पुढे नेणाऱ्या शक्तीने सुरक्षित ठेवते, जी प्रेरक शक्ती आत्म्याच्या चेतनेला अजून दुसऱ्या रुपांशी आपली एकरुपता करण्याच्या दिशेने प्रवृत्त करते. म्हणजे लगेच पुढच्या सीमित स्थूलदेहाच्या लगेच नंतरच्या माध्यमाकडे साहचर्य करण्याकरिता प्रवृत्त करते, शेवटी सोडलेल्या सीमित स्थूल देहाच्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी जे संस्कार आत्म्याच्या सीमित मनोदेहाने (मनाने) राखून ठेवले होते व प्रतिबिंबित केले होत, तो मनोदेह (मन) देखील आत्म्याशी अचेत साहचर्यात असतो.

हे स्वाभाविक आहे की, आत्म्याच्या महत्तर व महत्तर चेतनेच्या उत्क्रांती बरोबरच आत्म्याला अधिक जास्त सीमित प्राणशक्तीने समर्थ करण्याकरिता आत्म्याच्या सीमित सूक्ष्मदेहाची उत्क्रांती देखील होते ज्यामूळे आत्म्याच्या अधिकाधिक स्थूल चेतनेला शेवटल्या निम्नतर सीमित स्थूलदेहाच्या संस्कारांनी उत्क्रांत केलेल्या उच्चतर व उच्चतर सीमित स्थूल देहाशी आपले साहचर्य करण्यासाठी प्रवृत्त करता यावे.

याचप्रमाणे आत्म्याच्या सीमित मनोदेहाची उत्क्रांती आत्म्याच्या महत्तर व महत्तर चेतनेच्या उत्क्रांतीने प्राप्त केलेले व संकलित केलेले वाढते असंख्य व विविध संस्कार सामावून घेण्यासाठी, राखण्यासाठी व प्रतिबिंबित करण्यासाठी, एकाच वेळी घडून येते.

अशाप्रकारे केवळ मानवीदेहातच सूक्ष्मदेह व मनोदेह (कारण देह) परिपूर्ण विकसित होतात. म्हणून आत्मा मानवयोनीच्या बरोबर सचेतपणे आपले साहचर्य करीत असताना असे म्हणता येईल की, मानवयोनीत स्थूलदेह, सूक्ष्मदेह व मनोदेहासोबत मानवदेहात प्राप्त केलेल्या स्थूलाच्या संपूर्ण चेतनेसह परिपूर्ण संपन्न होतो.

यद्दपि, आत्म्याने मानवी देहात जरी पूर्ण चेतना प्राप्त केलेली असली व स्थूल जगताचा अनुभव घेत असला तरी स्थूलसचेत मानवी आत्मा सूक्ष्मदेहाबाबत अचेत असतो व त्यामुळे तो सूक्ष्म जगताचा अनुभव घेऊ शकत नाही. स्थूल सचेत मानवी आत्मा मनोदेहाबद्दल (मन) देखील अचेत असतो व त्यामुळे तो मनोजगताचा अनुभव घेऊ शकत नाही.

**अवस्था – ६**

**परमात्मा–पुनर्जन्माच्या अवस्थेत* मानवी आत्म्यांचे रुपात**

प्रथम उर्मिच्या अत्यंत सीमित प्रथम संस्काराने अचेत आत्म्याच्या अनंत अचेतनेला अत्यंत सीमित प्रथम चेतना दिली. क्रमशः विविध व असंख्य स्थूल माध्यमांव्दारा अनुभविलेल्या विविध व असंख्य संस्कारांनी आत्म्यासाठी सीमित स्थूल जगताची अधिकतर व अधिकतर चेतना प्राप्त केली व सरतेशेवटी

---

*हे देखील पहा– मेहेरबाबा ''पुनर्जन्म आणि कर्म'' डिस्कोर्सेस ः ३ः ५१–९८– संपादक

जेव्हा आत्म्याच्या चेतनेने अगदी प्रथम मानवदेहाशी एकरुपता केली तेव्हा चेतनेची उत्क्रांती पूर्ण झाली म्हणून आता आत्म्याने मानवीदेहात पूर्ण चेतना प्राप्त केल्यावर, त्याला चेतनेच्या उत्क्रांतीसाठी कोणत्याच अधिक व कोणत्याच उच्चतर देहाची गरज नाही. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत क्रमशः प्राप्त केलेली चेतना मानवी देहात सर्व दृष्टीने परिपूर्ण होते.

या अवस्थेत आत्म्याने जरी परिपूर्ण चेतना प्राप्त केलेली असली तरी तो अजुनही ना तो त्याच्या सूक्ष्म व मनोदेहांविषयी सचेत असतो, ना अविभाज्य, शाश्वत व अनंत असलेल्या आपल्या एकमेव असीम ''स्व'' च्या प्रतीसचेत असतो. तो आपल्या केवळ मानवीदेहाशी केलेल्या एकरुपतेबाबत तसेच त्याच्या विविध पैलूंबाबत व स्थूल जगताच्या अनुभवांचे प्रती सचेत असतो.

तदनुसार, या स्थितीत आत्म्याला अगदी प्रथम स्थूल मानवीदेहाची केवळ पूर्ण स्थूल चेतना प्राप्त झाली आहे परंतु तो अजुनही आपल्या सूक्ष्मदेह व मनाविषयी अचेत असतो. जे अगदी अंतिम प्राणीयोनीचे स्थूलरुप चेतनेच्या उत्क्रांतीच्या अगदी शेवटच्या अवस्थेत आत्म्याच्या चेतनेने टाकून दिले होते किंवा त्यागल होते, त्या अगदी शेवटल्या स्थूल प्राणी देहाच्या सर्व संस्कारांचा आत्मा स्थूल जगतात अनुभव घेतो.

अत्यंत शेवटच्या स्थूल प्राणीदेहाचे संपूर्ण संस्कार जेव्हा अत्यंत प्रथम मानवी स्थूलदेहाकडून निरंतर घेतलेल्या अनुभवांव्दारे अनुभविले जातात तेव्हा हे अगदी स्वाभाविक आहे की, हा अत्यंत प्रथम मानवदेह आत्म्याकडून टाकल्या जातो किंवा आत्म्याच्या चेतनेपासून वेगळा होतो. परिपूर्ण सचेत आत्म्याचा हा अनुभव म्हणजे मानव प्राण्याचा मृत्यू असे सर्व जगात मानल्या जाते. यापूर्वी स्पष्ट केल्यानुसार अत्यंत प्रथम मानवदेहापासून आत्म्याची चेतना जरी वेगळी झालेली असली तरी ती तिच्या सूक्ष्म व मनोदेहाच्या अचेत साहचर्यापासून कदापिही वेगळी होत नाही.

आत्म्याची चेतना त्यागलेल्या किंवा टाकून दिलेल्या अत्यंत प्रथम मानवीदेहाच्या संस्कारांना आपल्या सूक्ष्म आणि मनोदेहाव्दारां राखून ठेवते व त्यांचा अनुभव घेते. या संस्कारांना खर्च करण्यासाठी आत्म्याच्या चेतनेने एका

स्थूल देहाशी साहचर्य केलेच पाहिजे आणि म्हणून आधी त्यागलेल्या मानवीदेहाच्या उर्वरित संस्कारांना खर्च करण्यासाठी व त्यांचा अनुभव घेण्यासाठी आत्मा दुसऱ्या मानवी देहाशी साहचर्य करतो. वस्तुतः हे दुसरे मानवीरुप अन्य काही नसून सचेत आत्म्यापासून वेगळे झालेल्या पूर्व शरीराच्या किंवा मानवी देहाच्या राखलेल्या गत संस्कारांचा दृढ पिंड होय. आत्म्याच्या चेतनेचे दुसऱ्या मानवी देहाशी एकरुप होणे याला सर्व जगात मनुष्य प्राण्याचा जन्म म्हणून समजल्या जाते.

थोडक्यात म्हणजे परमात्म्याच्या ६ साहव्या अवस्थेत–पुनर्जन्माच्या मानव अवस्थेतील आत्मा म्हणून आत्म्याने मानवयोनीत चेतना संपूर्ण विकसित केली आहे व त्यामुळे स्थूल देहाच्या अधिक उत्क्रांतीची गरज उरली नाही. आत्म्याला मानवयोनी प्राप्त झाल्याबरोबर स्थूल चेतनेच्या उत्क्रांतीचा अशाप्रकारे शेवट होतो. मानवयोनीत व मानवपूर्व योनीत वाढविलेल्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आत्म्याला मानवयोनीत पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात.

ज्या प्रकारच्या मानवदेहाशी आत्म्याच्या चेतनेला साहचर्य करावे लागते, ते सद्गुण किंवा दुर्गुण, सुख आणि दुःख, इत्यादिंच्या गतसंस्कारांच्या प्रकृतीनुरुप ठरल्या जाते. स्थूल जगताचा अनुभव घेताना, आत्मा आपले साहचर्य स्थूल देहाशी करतो, आत्मा स्वतः शाश्वत असला तरी तो स्थूल देह नश्वर असतो.

उप–मानव अवस्थेत, योनींच्या व चेतनेच्या उत्क्रांतीची प्रक्रिया ऐच्छिक नसली तरी ती टिकाऊ व निरंतर असते व उत्क्रांतीच्या निम्नतर योनीत अवनत होण्याची मुळीच शक्यता नसते. मानवी अवस्था, जी अवस्थारुपाच्या उत्क्रांतीचा अंतिम व चेतनेची संपूर्ण प्राप्ती चिन्हांकित करते. मानवाची आध्यात्मिक प्रगती पुनर्जन्म व साक्षात्कारांच्या प्रक्रियांव्दांरा ऐच्छिक असते व चवथ्या भूमिकेच्या शक्तीच्या निंदात्मक दुरुपयोगामुळे होणाऱ्या अधःपतनाचा एक अपवाद सोडला तर मानव उपमानवी अवस्थेत अधःपतित होण्याच्या कोणत्याही धोक्यापासून निरपवादपणे मुक्त असतो. एकदा परिपूर्ण

चेतना प्राप्त केली म्हणजे ती नेहमीकरिता प्राप्त होते व कधीच नष्ट होत नाही आणि चेतनेची उत्क्रांती केवळ तेव्हाच पूर्ण होते जेव्हा आत्म्याची चेतना मानवदेहाशी आपले साहचर्य करते. म्हणून आत्म्याच्या चेतनेने एकदा मानवदेहाशी साहचर्य केले म्हणजे त्याचा प्रतिगामी पुनर्जन्म (निम्न योनीत) होण्याची शक्यता राहत नाही.

मानवी स्थूलदेहात स्थूलजगताच्या परिपूर्ण चेतनेच्या विकासासह आत्मा एकाचवेळी पूर्ण विकसित सूक्ष्म व मनोदेहाशी साहचर्य करतो परंतु चेतना जोपर्यंत स्थूल जगताशी सीमाबध्द झालेली असते तोपर्यंत आत्म्याची चेतना प्रत्यक्षपणे सूक्ष्म आणि मनोदेहाचा उपयोग करु शकत नाही. परिपूर्ण चेतना जी या स्थितीत फक्त स्थूलाविषयी सचेत असते ती केवळ जेव्हा आपल्या ''स्व'' कडे अंतर्मुख होते व चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया आरंभ होते, तेव्हा कुठे आत्म्याला या देहांची (सूक्ष्म व मन) जाणीव होते व तो ह्या देहांच्या अनुरुप संस्कारांचा अनुभव केवळ सूक्ष्म व मनोजगताच्या अनुरुप क्षेत्रांच्या माध्यमातून करतो. जेव्हा व्यक्तिगत आत्म्याची चेतना भौतिक किंवा स्थूल जीवनाच्या विविध व असंख्य संस्कारांच्या सततच्या अनुभवाने परितृप्त होते आणि केवळ या स्थितीत जेव्हा चेतनेने सुख – दुःखाच्या व्दंव्दांमध्ये हालअपेष्टांची आंदोलने, जन्म–मृत्यूच्या न चुकणाऱ्या शृंखलेव्दारां पुनर्जन्माच्या प्रक्रियेत जणू अनंत युगानुयुगे सहन केले जातात – केवळ तेंव्हाच हे शक्य होते. चेतनेच्या उत्क्रांतीच्या अवस्थेत चेतना उत्क्रांत करण्याच्या दृष्टीने स्थूल योनीचे उच्चतर व उच्चतर प्रकार विकसित करीत संस्कारांची बंधनकारी प्रक्रिया (winding process) क्रियाशील असते. मानवी अवस्थेत परिपूर्ण उत्क्रांत चेतना उपस्थित असते. परंतु संस्कारांची पकड शिथिल होणे प्रारंभ होते व पुनर्जन्माच्या प्रक्रियेत भासमान जन्म–मृत्यूच्या अनंत शृंखलेव्दारां आत्म्याच्या चेतनेने अनुभविलेल्या सततच्या धक्क्यामुळे हे संस्कार विरळ होत जातात.

**अवस्था – ७**

**परमात्मा–आध्यात्मिक उन्नत अवस्थेतील आत्म्याचे रुपात**

स्थूल इंद्रियांसक्त जीवनात स्थूल जगतात दीर्घकाळ संघर्ष

केल्यानंतर आत्म्याची चेतना स्थूल शरीरावर व सभोवतालच्या भौतिक वातावरणावर केन्द्रित होण्याऐवजी आत्म्याच्या ’स्व’ कडे आकृष्ट व्हावयास प्रारंभ करते. स्थूलसचेत मानवी आत्मा असंख्य जन्म आणि मृत्यूनंतर सरतेशेवटी अनिवार्यतः अशा प्रक्रियेकडे प्रारंभ करण्याकरिता आकृष्ट होतो की, ज्यामुळे मनुष्य अंतिमतः मानवीदेहात परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त करण्याकडे अग्रेसर होईल.

म्हणून आत्म्याची चेतना स्थूल इंद्रियांच्या जगतापासून स्वतःच माघारी जाण्याकरिता प्रारंभ करते व आता ती आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून जाण्यासाठी तयार होते. अशाप्रकारे आत्मा आध्यात्मिक दृष्टीने सूक्ष्म व मनोभुवनांव्दारां प्रगत होत आहे, असे म्हटले जाते.

आत्म्याच्या आत्मानुवर्ती उत्क्रमित होणाऱ्या चेतनेचे सूक्ष्म भुवन किंवा सूक्ष्मजगत हे प्रथम तीन भूमिकांचे क्षेत्र आहे. चवथीभूमिका ही सूक्ष्म भुवन व मनोभुवनांच्या मधोमध स्थित आहे व मनोभुवनात पाचवी व सहावी भूमिका समाविष्ट आहेत.

परमात्म्याची ही सातवी अवस्था सूक्ष्म व मनोभुवनांचे व्दारा जाणाऱ्या आध्यात्मिक मार्गावरील साधकांच्या प्रगतीचा अंतर्भाव करते. जितकी अधिकतर प्रगती तितकीच आत्म्याची अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांती असते.

अगदी ज्याप्रमाणे आत्म्याने स्थूलदेहाचे माध्यमातून स्थूलभुवनाची चेतना प्राप्त केली होती व आपले तादत्म्य स्थूलदेहाशी केले होते, त्याप्रमाणे आत्मा सूक्ष्मदेहाव्दारे सूक्ष्म भुवनाविषयी सचेत असतो तेव्हा तो आपले सूक्ष्मदेहाशी एकरुपत्व साधतो व जेव्हा तो मनोदेहाव्दारे मनोभुवनाविषयी सचेत असतो, तेव्हा तो आपली एकरुपता कारणदेहाशी करतो.

ह्या भुवनांच्या माध्यामातून होणारी आत्म्याची आध्यात्मिक प्रगती ही पूर्णतः कल्पनेत असते. आध्यात्मिक प्रवासाची प्रगती त्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांत होणाऱ्या चेतनेच्या अगदी प्रथम भूमिकेपासून तो सहाव्या भूमिकेपर्यंत कल्पनेच्या एका क्षेत्राला बाजुला सारुन त्याच्या जागेवर कल्पनेच्या अधिक चांगल्या व अधिक उच्चतम स्तरावर स्थित करण्यात आहे. सातव्या भूमिकेत आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया पूर्ण होते, कल्पनेचा अंत होतो व

'सत्याचा' साक्षात्कार होतो व सत्य हे त्यानंतर एक कल्पना म्हणून राहत नाही.

जे आध्यात्मिक मार्गावर प्रवेश करतात व सद्गुरुच्या मदतीशिवाय मार्गक्रमण करतात ते बहुधा (मार्गावरील) दृष्यांचे व झगमगटांचे नागमोडी गुंते पाहून हरविले जातात व त्या स्थितीतून त्यांना स्वतःला आपणहून मुक्त होण्याचे अवसर फारच कमी किंवा मुळीच मिळत नाहीत. ते त्या लहान मुलांच्या सारखे असतात जे शाळेत जाताना बाजारातील विलोभनीय दृश्ये व आकर्षणे पाहून विचलीत होतात.

आध्यात्मिक मार्गावरील संमोहन इतके प्रबळ व प्रलोभने इतकी तीव्र असतात की, प्रवासातील सुरुवातीच्या टप्प्यावर देखील पथिकाला आपल्याला परमात्म्याचा साक्षात्कार झाला आहे अशी भ्रामक संवेदना होते व त्या अवस्थेतून तो सद्गुरुने मदत केल्याशिवाय बाहेर पडू शकत नाही. सूक्ष्म भुवनात असलेले पुष्कळ उन्नतावस्थेतील पथिक असा विचार करतात की, त्यांना जन्म–मृत्यूच्या फेऱ्यातून पूर्ण मुक्ती मिळालेली आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. हा संभ्रम चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या साहव्या भूमिकेपर्यंत राहतो परंतु ही भ्रांती तिसऱ्या व चवथ्या भूमिकांच्या मध्ये मात्र अत्यंत प्रबळ असते. चेतनेची चवथी भूमिका यात्रीच्या प्रगतीच्या मार्गावरील अत्यंत धोकादायक स्थिती होय, कारण या अवस्थेत सूक्ष्म भुवनाच्या अनंत प्राणशक्तीच्या संपूर्ण शक्तीवर त्याचा प्रत्यक्ष अधिकार असतो. या शक्तींचा गैरवापर म्हणजे आत्म्याच्या चेतनेचे अधःपतन व विघटन होय. एकदा प्राप्त केलेली चेतना कधीच हरविली जात नाही, हे जरी मूलभूत तथ्य असले तरी या नियमाला एक अपवाद असू शकतो व तो फक्त चवथ्या भूमिकेवर, जेथे आत्म्याने प्राप्त केलेल्या चेतनेचे विघटन होण्याची दाट शक्यता असते. जरी पूर्णतः चेतना कधीच हरविली जात नाही तरी तिचे विघटन पाषाणयोनीच्या चेतनेपर्यंत पाठीमागे जाते. पुन्हा परिपूर्ण चेतना व मानवयोनी प्राप्त करण्याकरिता (आत्म्याला) चेतनेच्या उत्क्रांतीच्या पूर्ण प्रक्रियेची पुनरावृत्ती करावी लागते.

अशाप्रकारे आध्यात्मिक पथावरील यात्रीने एकतर सिध्दींचा

(तजल्लीयतचा) गैर किंवा चुकीचा वापर केल्यामुळे त्याचे चवथ्या भूमिकेवरुन अधःपतन होऊ शकते किंवा त्याच्या चेतनेच्या पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांतीमुळे तो पाचव्या भूमिकेच्या चेतनेप्रत प्रगत होऊ शकतो व मनोभुवनाचा किंवा मनोजगताचा अनुभव प्राप्त करु शकतो. चवथी भूमिका ओलांडणे व पाचव्या भूमिकेत प्रवेश करण्याच अर्थ आहे ''परमात्म्याच्या व्दारापर्यंत'' मजल मारणे.

सहाव्याभूमिकेत यात्री परमात्म्याला समोरासमोर पाहतो. जेव्हा आत्म्याची चेतना आत्म्याचे कारण देहाशी एकरुपता करते तेव्हा हे पाहणे मनश्चक्षूव्दारां असते. चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या सहाव्या भूमिकेत यात्री जरी परमात्म्याला समोरासमोर पाहत असला तरी व्दंव्दाच्या मजबूत पकडीवर त्याने मात केलेली नसते. कारण, द्रष्टा व दृश्य हे पाहण्याच्या प्रक्रियेव्दारां अजून ही (एका पासून दुसरा) भिन्न असतात.

यात्रीने मायेचे क्षेत्र पार करताच तो पूर्णपणे आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या चेतनेच्या सातव्या भूमिकेच्या सत्याचे प्रदेशात प्रविष्ट होतो, जेथे तो संस्कारांच्या सर्व लवलेशापासून निरपवादपणे मुक्त असतो, तसेच तेथे भूमिकांवरील कल्पनेचा अंत होतो. सातव्या भूमिकेची चेतना परिपूर्ण तसेच परिपक्व असते व ती 'संस्कार–रहीत' चेतना असते, जी आत्म्याची त्याच्या ''स्व'' शी एकरुपता साधते, तेव्हा आत्म्याला 'परमात्मा' म्हणून आपल्या शाश्वत आस्तित्वाची सचेत संवेदना व अनुभूती होते. कोणत्याही बुडबुड्याविना असलेला (मायेतील अज्ञानाचे रुप) थेंब (आत्मा) अनंत महासागरात स्वतः महासागर म्हणून (परमात्मा किंवा सर्वोच्च आत्मा) आपल्या स्वतःच्या शाश्वत अस्तित्वाचा अनुभव घेतो.

**अवस्था – ८**

**परमात्मा : दिव्यतेत तल्लीन**

परमात्म्याची ही अवस्था म्हणजे आत्म्यासाठी प्रदीर्घ उत्क्रांतीच्या प्रक्रियेत केलेल्या संघर्षाचा अंत, पुनर्जन्माच्या प्रक्रियेचा अंत व भूमिकांच्या माध्यमातून केलेल्या साक्षात्काराच्या प्रक्रियेचा अंत सुचविते. व्यक्तिगत आत्म्यासाठी यापेक्षा जास्त उच्चतर अवस्था नाही की, ज्याची तो तीव्र आकांक्षा धरु शकेल कारण परमात्म्यात एकरुप होऊन त्याने लक्ष्य प्राप्त केलेले

असते. या अवस्थेतील परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या यात्रीला सुफी जगतात 'मज्झूब' म्हणातात व वेदांती त्याला 'ब्रह्मीभूत' म्हणून संबोधतात. मज्झूबला आपल्या देहाची चेतना नसते व स्थूल, सूक्ष्म व मन या तिनही भुवनांची चेतना नसते. याचा अर्थ या ८ आठव्या अवस्थेत परमात्मा मज्झूब म्हणून आपल्या स्वतःच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीचा–अनंत शक्ती, ज्ञान व आनंदांचा जाणीवपूर्वक अनुभव घेतो परंतु तो आपल्या प्रकृतीच्या या अनंत पैलूंचा उपयोग करीत नाही.

या ८ आठव्या अवस्थेत, परमात्म्याची अचेतन अनंत अवस्था ''अ'' (अचेतन परमात्मा) न केवळ परमात्म्याची अवस्था ''ब'' (चेतन परमात्मा) ची उच्चतम दिव्य चेतना प्राप्त करते परंतु या अवस्थेत परमात्मा आपल्या स्वतःच्या अनंत सचेत अवस्थेच्या सत्यात दिव्यतः निमग्न होतो व अशाप्रकारे परमात्म्याच्या अनंत सचेत अवस्था ''ब'' शी आपल्या शाश्वत एकरुपतेचा अनुभव घेतो.

परमात्म्याची ही आठवी अवस्था सर्वोच्च दिव्य चेतनेची आहे जिला 'अहदियत' (हालात–ए–मुहम्मदी) अथवा विज्ञान (अवस्था) म्हणतात. सर्व परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या व्यक्ती, मज्झूब–ए–कामिल (ब्रह्मीभूत) मज्झूब–सालिक (परमहंस), आझाद–ए–मुतलक (जीवन मुक्त), कुतूब (सद्‌गुरु) आणि रसूल (अवतार) हे सर्व आपले भौतिक शरीर सोडल्यानंतर परमात्म्याच्या परब्रह्म अवस्था ''ब'' मध्ये निघून जातात. महेरे बाबांनी हे स्पष्ट केले आहे की, अशा या सद्‌गुरुच्या अशरीरी अवस्थेला सुफी लोक 'हालात–ए–मुहम्मदी' (मुहम्मदाची अवस्था) असे म्हणतात जी 'मुकाम–ए–मुहम्मदी' पासून (मुहम्मदाच्या पदापासून) भिन्न असते जेव्हा ती शरीरात असते 'हकिकत–ए–मुहम्मदी' ही परमात्म्याची भौतिक शरीरातील दहावी अवस्था होय व 'मुकाम–ए–मुहम्मदी' (मुहम्मदाचे पद) ही विज्ञान भूमिका (विज्ञानाचे पद) असून जी रेखाचित्रात 'क' ने दर्शविली आहे.

**अवस्था – ९**

**परमात्मा – देहात असलेल्या जीवनमुक्ताचे रुपात**

जर परमात्मा – अवस्था ८ आठवी प्रमाणे दिव्यता निमग्न असलेला पूर्ण

मानवी प्राण्याचे साकार मुर्तीच्या रुपात असेल, ज्याला मज्झूब (दिव्यतेत निमग्न) म्हणतात, त्याने आपल्या मन, प्राण व स्थूल पैलूंव्दारां, मन, सूक्ष्म व स्थूल भुवनांची सामान्य चेतना पुन्हा प्राप्त केली व ती राखून ठेवली तर तो 'दिव्य संधीस्थानी' (तुरियावस्थेच्या स्थितीत) परमात्म्याच्या आठव्या व दहाव्या अवस्थेच्या मधील नवव्या अवस्थेचा अनुभव घेतो.

जर आत्म्याने मन, सूक्ष्म व स्थूल देहांची तसेच भुवनांची सामान्य चेतना पुन्हा प्राप्त केली तर तो 'बका–बिल्लाह' च्या अवस्थेचा अनुभव घेण्यासाठी 'फना–फिल्लाह' अवस्था पार करुन 'मज्झूब' अवस्था आठवीच्या बाहेर येतो. परंतु 'बका–बिल्लाह' अवस्थेत प्रस्थापित होण्यापूर्वी, तो सूफींना ज्ञात असलेल्या 'मुकाम–ए–फुरुततच्या' 'फना–मा–अल–बकाच्या' अवस्थेत ज्याला वेदान्ती 'तुरीया' अवस्था म्हणतात त्यामध्ये प्रवेश करु शकतो. ही अवस्था नववी असून ती 'फना–फिल्लाह' व 'बका बिल्लाह' या दोन अवस्थांच्या मध्ये 'दिव्य संगमावर' असते.

या अवस्थेत परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त झालेले मानवी देहात असलेले आत्मे एकतर परमहंस (मज्झूब–सालिक किंवा सालिक मज्झूब) असतात किंवा जीवनमुक्त (आझाद–ए–मुतलक) असतात. ते उभयता अनंत ज्ञान, शक्ती व आनंदाचा उपभोग घेतात व 'मी परमात्मा आहे' याची त्यांना चेतना असते परंतु ते ''मज्झूब–ए–कामिल'' पेक्षा भिन्न असतात तथापि ते त्या अवस्थेत तिन्ही शरीरांविषयी व भूवनांविषयी (मन, सूक्ष्म व स्थूल) सचेत होऊ शकतात व होतातच. जेव्हा मज्झूब अवस्था ही दिव्यतेत लीन होण्याची एक अविरत अवस्था असते तेव्हा 'परमहंस' ही अवस्था अशी असते की, कधी तो 'दिव्यतःनिमग्न' असतो तर कधी तो त्या आत्म्याची सामान्य चेतना पुन्हा प्राप्त करतो जी सुलूकियतच्या सुलूकचा अनुभव घेते. त्याचा सचेत अनुभव कधीकधी ''मी माझ्या स्वतःचा परमात्मा आहे.'' असा असतो तर कधीकधी मी माझ्या स्वतःचा प्राणी आहे असा असतो. जीवनमुक्ताची अवस्था अशा एका व्यक्तीच्या अवस्थेसारखी होते की, जो सामान्यतः सुलूकियतच्या सुलूकचा अनुभव घेतो. (म्हणजेच त्या व्यक्तीसारखा जो 'बका–बिल्लाहच्या' अवस्थेत

कायमचा प्रस्थापित झाला आहे.) परमहंस व जीवनमुक्त हे दोघेही कुतूबपेक्षा भिन्न आहेत, या संदर्भात की, ते अनंतज्ञान, शक्ती व आनंदाचा जरी सतत अनुभव घेत असले तरी त्याचा उपयोग करु शकत नाहीत व कुतूब याचा सतत उपयोग करतो.

परमहंस व जीवनमुक्तापासून जगाला प्रत्यक्ष* आध्यात्मिक लाभ मिळत नाही. तथापि जीवनमुक्त आपल्या जीवनाच्या शेवटच्या काळात एकाला आपल्या सारखे 'परिपूर्ण' करतोच, त्याला जरी तिन्ही भुवनात कोणतेच कार्य नसले तरी तो ''बका–बिल्लाह'' अवस्थेचा आनंद घेतो.

**अवस्था – १०**

**परमात्मा–'सद्गुरुचे' रुपात**

ही मानवी देहातील परमात्म्याची अवस्था पूर्ण पुरुषाप्रमाणे (कुतूब–सद्गुरु) असते. या अवस्थेत 'सद्गुरु' किंवा 'नर–नारायण' दिव्य रुपात अनासक्तपणे व अमर्यादपणे मायेच्या नियमापलिकडे आहे – जो वैश्विक सृष्टीला – अनंतपणे नियमितरुपाने प्रशासित करतो, तरीपण तो स्वतः आपल्या 'मी परमात्मा आहे'' या अवस्थेचा व आपल्या अनंत शक्ती ज्ञान व आनंदाचा जाणीवपूर्वक निरंतर अनुभव घेत असताना काळ, स्थळ व 'कार्यकारण' यांच्या मर्यादांनी स्वतःवर बंधने लादून घेतो. तो न केवळ आपल्या अनंत गुणांचा अनुभव घेतो, तर तो त्याचा उपयोग देखील अन्य आत्म्याच्या मुक्तीकरिता करतो, जे अज्ञानात गुरफटलेले आहेत व ज्यांना अजुनही आपल्या स्वतःच्या शाश्वत सत्याची चेतना नाही.

ही आहे परम–पूर्णतेची अवस्था, या ठिकाणी परमात्मा 'सगुण सकार' (गुण व रुपाने युक्त) आहे.

सुफींच्या मतानुसार 'कुतूब' चा अर्थ आत्मानुवर्ती यात्रेवर सर्वोच्च स्थान असा आहे, तो सृष्टीचा सर्वश्रेष्ठ (पुरुष) (summumbonum) असतो व मानवतेचे अतिसुंदर पुष्प असतो. मज्झूब अवस्थेत ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेतील अनंतआनंदाचा आत्म्याने अनुभव घेतलाहोता परंतु कुतूब किंवा

---

* परंतु जो कोणी त्यांच्या संपर्कात येतो त्याला त्याचा आपोआपच अप्रत्यक्षपणे लाभ मिळतो.
– संपादक

सद्‌गुरु 'मी परमात्मा आहे' या अवस्थेतील अनंत आनंदाचा उपभोग घेतो व ''मी सर्वकाही आहे'' व ''सर्वकाही माझ्यापासून आहे'' या सर्वोच्च दिव्य चेतनेच्या देखील आनंद अनुभवतो.

परमात्म्याची ही १० दहावी अवस्था मानवी देहातील ''हकिकत–ए–मुहम्मदीची'' अवस्था आहे. पूर्ण पुरुष (कुतूब किंवा सद्‌गुरु) व अवतार (रसूल) हे सर्व या अवस्थेत असतात. परमात्मा नर–नारायणाच्या अवस्थेत सद्‌गुरु म्हणून असला काय किंवा 'ईश–पुरुष' अवतार म्हणून असला काय, तो या दहाव्या अवस्थेत असतो, जे रेखाचित्रात 'क' ने दर्शविलेल्या 'मुकाम–ए–मुहम्मदीच्या' किंवा 'विज्ञान भूमिकेच्या' दिव्यपदावर तो सद्‌गुरु किंवा अवतार म्हणून कार्य करतो. परमात्म्याच्या प्रथम अभिव्यक्तीने आपल्या परिपूर्ण चेतनेने हे दिव्यपद भुषविले व हे पद अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाला प्रसृत करण्यासाठी शाश्वतरित्या कार्य करीत राहिल. ज्या त्रिगुणांचा सद्‌गुरु आणि अवतार शाश्वतरित्या न केवळ अनुभवच घेतात तर त्याचा सर्व आत्म्यांच्या मुक्तीसाठी देखील उपयोग करतात जे आत्मे अजुनही अज्ञानाच्या जाळ्यात अडकलेले आहेत व जे परमात्म्याशी एकरुप असल्याच्या आपल्या सनातन अवस्थेची चेतना प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

वेगळ्या पध्दतीने सांगावयाचे म्हणजे मानवीदेहातील परमात्मा आपल्या परिपूर्णतेने केवळ आपल्या दिव्य पदाव्दाराच स्वतःला निरंतर प्रकट करीत राहातो जे 'परमात्म्याच्या दहा अवस्था' या रेखाचित्रात 'क' ने चिन्हांकित केले आहे.

केवळ या दिव्य पदाव्दारां परमात्म्याने 'अवतार' म्हणून झरथुष्ट, राम, कृष्ण, येशू, बुध्द, मुहम्मद व अन्य पुरुषांचे रुपात आपल्या स्वतःला प्रकट केले व प्रत्येक कालचक्रात युगानुयुगे घोषित केले की, तो संरक्षक, ईशप्रेषित–मसिहा, ईश–पूत्र, अवतार, रसूल, बुध्द इत्यादी आहे आणि केवळ याच परमात्म्याच्या दिव्य पदाव्दारां पाच पूर्ण पुरुष किंवा कुतूब किंवा सद्‌गुरु समग्र वैश्विक सृष्टीतील सर्वश्रेष्ठ म्हणून कार्य करतात.

सुफी या दिव्यपदाला प्रेषित मुहम्मदाच्या नावावर 'मुक्काम–ए–मुहम्मदी' असे म्हणतात, ज्याला त्याच्या ''हकिकत–ए–मुहम्मदी'' मध्ये परमात्म्याचा रसूल म्हणतात. याच प्रकारे नझारेथचा येशू, ईशपूत्र हा मुहम्मद,

झरथ्रुष्ट, राम, कृष्ण, बुध्द यांच्या प्रमाणेच अवतार आहे, व ''ख्राईस्ट'' ही ''हकिकत–ए–मुहम्मदी'' प्रमाणे ईसामसिहाची दिव्य अवस्था होय.

जेव्हा आपण परमात्म्याच्या निरनिराळ्या सर्व अवस्था थोडक्यात एकत्र मांडण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा पूर्ण चेतना प्राप्त करण्याकरिता अचेतन परमात्म्याच्या संघर्षपूर्ण परिश्रमात पाच प्रमुख अवस्था स्पष्ट होतात.

**'प्रथम अवस्था'**

(अ) प्रारंभी अनंत, अविभाज्य ''सत्यतेच्या एकतेत'' आत्मा आणि परमात्मा एक असतात.

(ब) प्रारंभाच्या आरंभापूर्वी परमात्मा आणि सर्व आत्मे अचेतन होते व संस्काररहित होते.

(क) प्रारंभी आत्म्याला स्थूल देहाची, सूक्ष्म देहाची किंवा मनोदेहाची चेतना नव्हती व त्यामुळे त्याला स्थूल जगताचा, सूक्ष्म जगताचा किंवा मनोजगताचा अनुभव नव्हता, आत्म्याला आपल्या 'स्व' ची देखील चेतना नव्हती व त्यामुळे त्याला आपल्या परमात्मावस्थेचा अनुभव नव्हता.

''परमात्म्याच्या दहा अवस्था'' या रेखाचित्रात ही अवस्था 'अ' ने दर्शविली आहे.

**दुसरी अवस्था :**

आत्मा चेतना प्राप्त करतो व संस्कारयुक्त असतो या अवस्थेत आत्म्याला एकतर स्थूलदेह किंवा सूक्ष्मदेह किंवा मनोदेहाची चेतना असते व तो एकतर स्थूलजगताचा, सूक्ष्म जगताचा किंवा मनोजगताचा अनुभव घेतो परंतु तो अजुनही आपल्या स्वतःच्या ''स्व'' विषयी मात्र अचेत असतो व त्यामुळे आत्मा अजुनही 'परमात्मा' या अवस्थेचा अनुभव घेत नाही.

ही अवस्था रेखाचित्राप्रमाणे ३, ४, ५, ६ आणि ७ यानुसार दर्शविली आहे.

**तिसरी अवस्था**

आत्मा संस्कारविरहित होतो परंतु सर्वदृष्टीने परिपूर्ण चेतना बाळगून ठेवतो ही परिपूर्ण चेतना आता यानंतर स्थूलदेहाची, सूक्ष्मदेहाची किंवा मनोदेहाची नसल्यामुळे आत्मा यानंतर स्थूल जगताचा, सूक्ष्मजगताचा व मनोजगताचा अनुभव घेत नाही.

ही चेतना जी राखून ठेवल्यागेली ती आत्म्याच्या आपल्या स्वतःच्या अनंत ''स्व'' ची असते व म्हणून आत्मा आता परमात्मावस्थेचा सचेतन अनुभव घेतो व 'मी परमात्मा आहे' या अवस्थेच्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाचा अनुभव घेतो.

ही अवस्था रेखाचित्रात अवस्था ८ आठवी म्हणून दर्शविलेली आहे.

**चवथी अवस्था :**

स्थूल देहाची व मनोदेहाची तथाकथित सामान्य चेतना आत्मा परत प्राप्त करतो व म्हणून पुन्हा एकदा, त्याचवेळेस स्थूलजगत, सूक्ष्मजगत व मनोजगताचा एकाचवेळी अनुभव घेतो. या स्थितीत आत्मा आपल्या स्वतःच्या अनंत ''स्व'' विषयी देखील एकाचवेळी सचेत असतो व आपल्या परमात्मावस्थेच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाचा अनुभव घेतो, परंतु या स्थितीत आत्मा आपल्या ह्या अनंत गुणांचा उपयोग करु शकत नाही, जरी तो या अवस्थेत आपल्या स्थूल, सूक्ष्म व मनोदेहाविषयी सचेत असला व एकाचवेळी तीनही जगतांचा अनुभव घेत असला तरी सुध्दा, ही रेखाचित्रात ९ नववी अवस्था म्हणून दर्शविलेली आहे.

**पाचवी अवस्था :**

आत्मा स्थूलदेह, सूक्ष्मदेह व मनोदेहाविषयी सर्वदृष्टीने परिपूर्ण सचेत असतो व तो एकाचवेळी स्थूल जगत, सूक्ष्मजगत व मनोजगताचा आपल्या अनंत ''स्व'' च्या उच्चतम दिव्य चेतनेसह अनुभव घेतो व आपल्या स्वतःच्या परमात्मावस्थेच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाचा अनुभव देखील घेतो व उपभोग देखील करतो.

''परमात्म्याच्या दहा अवस्था'' या रेखाचित्रात दाखविल्याप्रमाणे ही दहावी (१०) अवस्था* आहे.

* * *

* सत्याच्या शाश्वत कार्यक्षेत्रात, पद, अवस्था, स्थिती (टप्पा) किंवा पैलू व गूढज्ञानाकरिता उपयोजिलेल्या निरनिराळ्या शब्दांचा मेहेरबाबांनी दिलेला सारांश पारिभाषिक शब्दकोष– 'मानवाचा परमात्म–साक्षात्कार' या ग्रंथात पुरवणी नंतर दिलेला आहे. 'मी परमात्मा आहे' चे गूढज्ञान हे पूर्णतेच्या चार प्रकारातील प्रत्येकासाठी सारखे आहे व त्याचा भौतिक मृत्यूने शेवट होत नाही– संपादक

# भाग १०
# उपसंहार

**परमात्म्या विषयी स्पष्टीकरण देणे शक्य नाही**
**परमात्म्या विषयी वाद्‌विवाद करणे शक्य नाही.**
**त्याच्या विषयी सिध्दांत मांडणे शक्य नाही.**
**त्याच्या विषयी चर्चा करणे शक्य नाही.**
**व त्याला समजणे तर शक्यच नाही.**
**केवळ परमात्म्याचे जीवन जगणे शक्य आहे.** [३६ अ, ब, क]

जरी येथे मनुष्याच्या मनाच्या बौध्दिक आंदोलनाला शांत करण्यासाठी परमात्म्याविषयी जे काही सांगितल्या गेले आहे व स्पष्ट केले आहे तरी अजुनही त्यामध्ये पुष्कळ काही शब्दांचा व अधिक स्पष्टीकरणाचा अभाव आहे कारण ''सत्य'' हे आहे की 'अंतिम सत्याचा' अनुभव घेतलाच पाहिजे व परमात्म्याची दिव्यता प्राप्त केलीच पाहिजे आणि जीवनात आचणात आणली पाहिजे.

सृष्टीतील मायेत फसलेल्या व्यक्तिगत प्राण्यांचे अनंत, शाश्वत सत्याला समजणे हे लक्ष्य नाही कारण सत्य कधीही समजू शकणार नाही, त्याचा साक्षात्कार सचेत अनुभवाव्दारां प्राप्त केला पाहिजे.

म्हणून 'अंतिम लक्ष्य' हे आहे– सत्याचा साक्षात्कार करणे व मानव देहात 'मी परमात्मा आहे' ही अवस्था प्राप्त करणे.

* * *

# रेखाचित्र - ८ अ (स्पष्टीकरण)

**सृष्टी, उत्क्रांती,पुनर्जन्म, आत्मानुवर्ती उत्क्रांती व साक्षात्कार-अवतार मेहेर बाबांनी विशद केल्याप्रमाणेः**

हे रेखाचित्र रानो गॅलेने मेहेर बाबांच्या मार्गदर्शना नुसार रेखाटले असून ते गॉड स्पिक्स या ग्रंथाचा एक भाग आहे.

परात्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्मा विशुध्दसत्य, अनंत, मूळ शाश्वताचे म्हणून प्रतिनिधित्व करतो व ज्याला कशाचेच नव्हे तर आपल्या स्वतःचे सुध्दा भान नसते. परमात्मा आहे !

परमात्मा 'परब्रह्म' अवस्थेत परमात्म्याचे प्रतिनिधित्व करतो, तो साररुपाने परात्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्म्याप्रमाणेच असतो फक्त फरक इतकाच की, येथे स्वतःला जाणून घेण्याची उर्मी उसळली व तो अनंत शक्ती, ज्ञान व परमानंदाविषयी सचेत झाला व त्याच वेळी तो मायेविषयी देखील सचेत झाला जी सृष्टी म्हणून प्रकटली. सृष्टीतील असंख्य रुपांच्याव्दारा आपला प्रवास पूर्ण करीत असताना वरपांगी सत्य वाटणाऱ्या मायेचा त्याग करतो.

घड्याळाच्या काट्यांच्या विरुध्द दिशेने वाचल्यास सृष्टी-बिदूपासून निघालेली आत्म्याची पहिली रूपे वायुरूपातील आहेत. जसजशी चेतना उत्क्रांत होत गेली तसतशी चित्रात दाखविल्याप्रमाणे, आत्म्यांनी असंख्य रूपे धारण केली व वाढत्या संस्काराचे अनुभवही घेतले. मानवावस्थेपर्यंत आल्यावर आत्म्याने पूर्ण चेतना प्राप्त केलेली असते व तो जो पर्यंत मोक्षमार्गाचा अनुभव घेण्यास तयारी होत नाही तो पर्यंत तो स्थूल देहात स्थूल जगात असंख्य जन्म घेत राहतो.

संस्कारापासून मुक्त होताना उर्ध्वगामी आत्म्याला, जोपर्यंत तो बंधनापासून मुक्त होत नाही व परमात्म्याशी एकरूप (परमात्म साक्षात्कार) होत नाही तोपर्यंत त्याला क्रमशः सात भूमिकांचे व उच्च भुवनांचे हळूहळू ज्ञात प्राप्त होते.

पहिल्या तीन भूमिका सूक्ष्मजागृती चित्रित करतात, तर चवथी भूमिका प्रचंड प्राणशक्ती व तिच्यामधील आगळी उर्जा दर्शविते. पाचवी मनोभुवनातील भूमिका संत-दर्जाची असून सहावी ही दिव्य-दृष्टीची भूमिका आहे. सातवी भूमिका ही परमात्म्याच्या साक्षात्काराची भूमिका असून त्याचा अर्थ परमात्म्याशी एकरुप होणे असा होतो.

# पुरवणी

## १ : संस्कारयुक्त चेतना *(६७)

**(संपादकांनी केलेल्या विनंतीवरुन मेहेरबाबांनी पुढील अधिक माहिती सांगितली.)**

प्रथम मानव देह प्राप्त केल्याबरोबर चेतना निश्चितपणे परिपूर्ण होते परंतु त्याक्षणी ती आत्मानुवर्ती उत्क्रांतीला प्रारंभ करीत नाही. जेव्हा चेतना आत्मानुवर्ती उत्क्रांतीला प्रारंभ करते, त्याचा अर्थ असा होतो की, मानवप्राण्याने आध्यात्मिक मार्गावर केवळ पहिले पाऊल ठेवण्यास प्रारंभ केला आहे.

सर्वप्रथम मानवीजन्म व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या मार्गावर जाण्याची वेळ या दरम्यानच्या काळात, मानवप्राण्याची संपूर्ण चेतना, जी अजुनही संस्कारयुक्त चेतना असते, तिला अनिवार्यतः अशा प्रक्रियेतून जावे लागते की, जिने (चेतना जी पूर्ण असते) सरतेशेवटी चेतनेवर ताबा ठेवण्याऱ्या संस्कारांना दूर सारलेच पाहिजे.

ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हजारो पुनर्जन्माच्या कालावधीत घट्ट रुतलेले किंवा दाट झालेले संस्कार पुनर्जन्माच्या प्रक्रियेत इतके पूर्णपणे हांदुळले जातात की, चेतनेवर त्यांची असलेली घट्ट पकड शिथिल होते. हे घट्ट रुतलेले (घन किंवा स्थूल) संस्कार असंख्य व विविध व्दंव्दात्मक अनुभवांव्दारां विरळ किंवा अशक्त होतात. परस्परविरोधी अनुभव देणाऱ्या सततच्या पुनर्जन्माव्दारां हे अनुभव आपली अंतिम सीमा गाठतात.

ही गोष्ट देखील लक्षात ठेवली पाहिजे की, हे घट्ट रुतलेले, घन किंवा स्थूल संस्कार जेव्हा कमी घन किंवा अशक्त होतात केवळ तेव्हाच स्थूलमाध्यम अर्थात मानवी देहाने स्थूल संस्कारांव्दारा स्थूल जगताच्या अनुभवांची मर्यादा गाठली जाते. घन किंवा घट्ट रुतलेले संस्कार जेव्हा कमी घन होतात तेव्हा ते दीर्घ काळपर्यंत स्थूल अनुभवांची निर्मिती करीत नाहीत कारण, हे कमी घन

* टीप : या क्रमांकाने या पुस्तकारातील पान क्रमांक संदर्भित केला आहे.

(अशक्त–जीर्ण) संस्कार शुध्द किंवा निर्मळ असतात किंवा ते आधीसारखे अपक्व किंवा स्थूल असत नाहीत. या शुध्द किंवा निर्मल अशा एकत्रित केलेल्या संस्कांराना सूक्ष्म संस्कार असे म्हणतात. हे सूक्ष्म संस्कार सूक्ष्म प्रकारच्या अनुभवांची (म्हणजेच सूक्ष्म–जगताचे संबंधित) निर्मिती करतात आणि सूक्ष्मदेह या सूक्ष्मसंस्कारांचा अनुभव घेतो व त्यांना भोगून नष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

हे सूक्ष्म–संस्कार जेव्हा अधिक कमी घन होतात व ते अधिक जास्त विशुद्ध होतात तेव्हा असा एकत्रित केलेल्या संस्कारांना मनःसंस्कार असे म्हटल्या जाते. हे मनःसंस्कार मनोजगताशी संबंधित अनुभव निर्माण करतात आणि मनोदेह ह्या मनःसंस्कारांचा अनुभव घेतो व त्यांना भोगून नष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

मनोदेहाकडून जेव्हा मनःसंस्कारांचे शेवटचे लवलेश अनुभवांव्दांरा भोगून संपविले जातात तेव्हा आत्म्याच्या पूर्णचेतनेचे (जी चेतना अत्यंत पहिल्या मानवदेहाशी तादात्म्य केलेल्या क्षणापासून तो अगदी अंतिम मानवीदेहापर्यंत, संस्कारांच्या विळख्यात बध्द होती – ते अंतिम मानवरुप मनोचेतन मनुष्याचे असते.) संस्कारांचे ओझे दूर केले जाते. केवळ अशी संस्कारविरहित झालेली पूर्ण चेतना आत्म्याच्या ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेची अंतिम अनुभूती प्राप्त करु शकते.

जेव्हा स्थूल किंवा घट्ट बसलेले संस्कार पुनर्जन्माच्या प्रक्रियेव्दारां विरळ होतात तेव्हा ते सूक्ष्म संस्कार बनतात. हे सूक्ष्म संस्कार स्थूल जगताचा अजून अधिक अनुभव देऊ शकत नाहीत. या अवस्थेत स्थूलचेतन मानवीप्राण्याची चेतना आपोआपच सूक्ष्म जगताच्या अनुभवात रस घेणे सुरु करते. ही स्थिती चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीचा आरंभ झाल्याचे दर्शविते व साधक आध्यात्मिक मार्गावर वाटचाल सुरु करतो. हे अगदी स्पष्ट आहे की, सूक्ष्मसंस्कारांनी सूक्ष्मजगताच्या सूक्ष्मअनुभवांना निर्माण केलेच पाहिजे. हे सूक्ष्मसंस्कार सूक्ष्मदेहाकडून सूक्ष्मजगताच्या अनुभवाव्दारां भोगून संपविले जातात व चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया पुढे चालू राहते.

## २. व्यवहार्य गूढवाद *(८४)

## सत्याप्रत पोहचण्याचा मार्ग व्यक्तिगत आहे.

परमेश्वराच्या साक्षात्काराची ज्यांना तळमळ असते त्या सर्वांना लागू होणारा सर्वसाधारण नियम किंवा पध्दत नाही. प्रत्येक मनुष्याने आपल्या आत्मोधाराचा मार्ग स्वतःच शोधला पाहिजे व त्याने स्वतःची पध्दती निवडलीच पाहिजे–यद्यपि त्याची ही निवड मनोसंस्कारांच्या एकूण परिणामाने बहुतांशी सुनिश्चित केली जाते, जे त्याने अनेक गतजन्मांत प्राप्त केले होते. त्याच्या स्वतःच्या सद्सव्दिवेक बुध्दिने मानलेल्या तत्त्वांचेच त्याने मार्गदर्शन घेतले पाहिजे व जी पध्दती त्याच्या आध्यात्मिक प्रवृत्तीशी, त्याच्या शारीरिक ग्रहणशक्तीशी व त्याच्या बाह्य परिस्थितीशी उत्कृष्ट रीतीने जुळते तिला अनुसरले पाहिजे. सत्य एकच आहे, परंतु त्याप्रत पोहोचणे मात्र मूलतः व्यक्तिगत असते. सुफी सांगतात ''जितके मानवी आत्मे आहेत, तितके जास्त परमेश्वराकडे जाण्याचे मार्ग आहेत.''

(अत–तुरुकू इलाल्लाही कनफूसी बनी आदम)
जमाल–ए–फितरत के लाख परताओ
कूबूल परताओ की लाख शाखें
तरीके–इर्फान मै क्या बताऊँ
यहराह किसकी वह राह किसकी

– अकबर

''निसर्ग सौंदर्याला सहस्त्रावधी पैलू आहेत – ज्यांना स्वीकारण्यासाठी (समजण्यासाठी) सहस्त्रावधी मार्ग व साधने आहेत. कोणती विशिष्ट पध्दती किंवा मनोवृत्ती एखाद्या विशिष्ट व्यक्तीसाठी निश्चित करण्यात आलेली आहे, हे ज्ञानमार्गात कोण ठरवू शकणार ?

**संन्यास**

जेव्हा एखादा यात्री, या ठिकाणी आम्ही यात्रीचा अर्थ साधक किंवा शिष्य असा घेतो त्याला संन्यासाकडे आकृष्ट झाल्यासारखे वाटते, याचा अर्थ असा की, सन्यस्त वृत्ती त्याच्या ठिकाणी आधीच सुप्तावस्थेत होती. उत्क्रांतीच्या असंख्य रुपात, पुनर्जन्माच्या काळात अनुभवलेल्या जन्म–मृत्यूंच्या व्दारातून असंख्य वेळा आत व आतून बाहेर, दुःखाकडून सुखाकडे व

सुखाकडून दुःखाकडे झोके घेणाऱ्या भयंकर लंबकाचा परिणाम म्हणून ही तयारी घडून येते. सर्वसंगपरित्यागाची ही भावना सुप्तावस्थेत असल्यामुळे तिला पृष्ठभागावर येण्यासाठी केवळ एखाद्या उत्तेजक कारणाचीच गरज असते आणि केवळ जेव्हा ती व्यक्त होते तेव्हाच आपण त्या सुप्त भावनेचे सामर्थ्य व प्रकृती पाहू शकतो.

जर ही सुप्त भावना तात्पुरत्या अतिशय दुःखातून निर्माण झालेली केवळ आध्यात्मिक अजीर्णता असेल व तिच्यात अधिक काही तरी जास्त सुखप्राप्तीची सौम्य इच्छा मिसळलेली असेल तर हा दिखाऊ संन्यास क्षणिक व कमजोर स्वरुपाचा म्हणजेच अप्रिय गोष्टीपासून केवळ तात्पुरता सुटकारा ठरेल. तथापि सर्वोच्च स्वरुपात ही सुप्त भावना म्हणजे जगाविषयी असाध्य घृणा आणि उत्कट व ज्वलंत ईश्वरतृष्णा यांच्यातील आक्रमणाचा एक गुप्त करार होय. जेव्हा ही सुप्त भावना पृष्ठभागावर येते तेव्हा ती निम्नतर 'स्व' वर विजय प्राप्तिसाठी व या महान व भयंकर संघर्षाशी असंबध्द असलेल्या सर्व गोष्टी नाकारण्यासाठी संपूर्ण जीवनाला सुसज्ज करण्याचा अढळ अशा दृढनिश्चयाच्या रुपात स्वतःचे दर्शन घडवते. ''नाकारणे'' हा शब्द लक्षात घ्या, त्याचा अर्थ असा आहे की, असा साधक असंबध्द गोष्टी बाजुला फेकतो. आपण संन्यासाला आध्यात्मिक तळमळीच्या फुलाला आलेले फळ म्हणू शकू, जे अनंत जन्म–मृत्यूच्या निरर्थकतेतून निर्माण झालेल्या उद्वेगाच्या परागामुळे फलीभूत झाले. एकदा सन्यासाने स्वतःला अभिव्यक्त केले की, त्याच्याकडे पाहण्याचे अनेक प्रकार आहेत, त्यापैकी सर्वात साधा म्हणजे, त्याचे दोन प्रमुख वर्गात विभाजन करणे– आंतरिक व बाह्य.

बाह्य संन्यासाचा अर्थ आहे, सर्व ऐहिक सुखोपभोगांचा व भौतिक वस्तूंबद्दलच्या शारीरिक आसक्तीचा पूर्णपणे त्याग करणे. हा संन्यास आंतरिक संन्यासाकडे व ईश्वरव्यग्रतेकडे ज्या प्रमाणात नेईल त्या प्रमाणात तो प्रारंभिक अवस्थेत साहाय्यकारी होत असतो. हिन्दुस्थानात सहस्त्रावधी तथाकथित संन्यासी सापडतील परंतु त्यांच्यापैकी अत्याधिक लोकांनी हा बाह्य संन्यास केवळ व्यवसाय म्हणून स्वीकारलेला असतो, जो त्यांना आळशीपणातील अनुत्पादक जीवन उपभोगण्यास लायक बनवतो. तथापि बाह्य संन्यास हा खरा असू शकतो व बहुधा तो तसा असतोही. जेव्हा तो तसा असतो तेव्हा तो

अनिवार्यपणे आंतरिक संन्यासाकडे घेऊन जातो व हाच संन्यास आहे जो महत्वाचा आहे. आंतरिक संन्यास म्हणजे त्याच्या प्रत्यक्ष उगमस्थानीच इच्छावासनांचे दमन की, ज्यामुळे मन, काम, लोभ व क्रोध यांच्या मोहांना बळी पडणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की मनुष्याला अशा प्रकारचे विचार येणे ताबडतोब बंद होतील. हे अशक्य आहे, कारण जोपर्यंत संस्कार ज्यापासून ते निर्माण झाले ते एखाद्याच्या व्यक्तिगत्वाचे अंग बनून राहतात तो पर्यंत असले विचार त्रासदायक ठरण्याचे चालूच राहणार. हा संघर्ष अपरिहार्यपणे कठीण व प्रदीर्घ आहे.

विशेषतः पाश्चिमात्य जगासाठी बाह्य संन्यास उपदेशिण्याजोगा आणि आचरणात आणण्यासारखा नाही. तो आरंभापासूनच आंतरिक व मनापासून असला पाहिजे. एखाद्याने या जगात राहून सर्व नियोजित कर्तव्यकर्मे पार पाडावीत आणि तरी देखील मानसिक दृष्ट्या प्रत्येक गोष्टीबद्दल अनासक्त असल्याची भावना बाळगावी. व्यक्तीने जगात असावे परंतु जगाचे होऊ नये. सुफी म्हणतातः ''दिल बा यार, दस्त विकार'' (हृदय ईश्वराबरोबर, हात कामासाठी)

दिल्लीचे सद्‌गुरु हजरत निझामुद्दीन अवलिया यांना एकदा एका दर्शनार्थीने विचारले की, ''जगात माणसाने कसे जगावे ?'' त्याच क्षणी असे घडले की, काही महिला पाण्याच्या घागरी आपल्या डोक्यावर तोल सांभाळीत घेऊन तेथून जात होत्या आणि चालत असताना हातवारे करुन गप्पाही मारत होत्या. त्यांच्याकडे निर्देश करुन निझामुद्दीन म्हणाले– ''त्या महिलांकडे बघा. त्यांच्याप्रमाणे तुम्ही संसारात जगले पाहिजे.'' या संदिग्ध बोलण्याचे स्पष्टीकरण करण्याची विनंती करण्यात आल्यावर सद्‌गुरु पुढे म्हणाले – ''विहिरीवरुन घागरी आपल्या डोक्यावर तोल सांभाळत परतणाऱ्या ह्या महिला दुसऱ्या कशाचाही विचार न करता केवळ आपापसातील क्षुल्लक गप्पागोष्टीत रंगलेल्या दिसतात, आणि असे असले तरी त्या आपले लक्ष सतत एका अधिक जास्त महत्वाच्या दुसऱ्या कोणत्यातरी गोष्टीकडे केंद्रित करीत असतात, ती म्हणजे आपल्या डोक्यावरील घागरींचा तोल सांभाळणे. याप्रमाणेच काय जे असेल ते तुमचे शरीर, तुमची इंद्रियें किंवा तुमच्या मनाचा केवळ पृष्ठभाग कशातही व्यस्त झालेले असोत, हे लक्षात ठेवा की, तुमचे मन अगदी मुळापासून परमेश्वरावर

सतत केंद्रित असले पाहिजे.

**वैताग आणि वैराग्य**

जर आपण संन्यासाकडे मनाची एक अवस्था म्हणून पाहिले तर आपण समजू शकतो की, ही मनाची अवस्था कशी असेल, एक तर अल्पकालीन असेल किंवा चिरकालीन असेल. पहिली अवस्था वैताग म्हणून तर दुसरी वैराग्य म्हणून ओळखल्या जाते.

वैताग (तात्पुरता संन्यास किंवा परित्याग) हा जगाविषयी व त्यातील व्यवहाराबाबत केवळ तात्पुरता उद्वेग आहे, जो एखादा धक्का, निराशा किंवा नुकसान झाल्यामुळे व सोबतच ईश्वराकरिता असलेल्या संदिग्ध इच्छेचा परिणाम म्हणून किंवा आकस्मिक उसळलेल्या मानसिक वृत्तितून येऊ शकतो. वैतागामध्ये मन जगापासून विन्मुख होते व ईश्वरीय मार्गाचा स्वीकारही करते, परंतु ही प्रवृत्ती टिकाऊ नसते व परिस्थितीत परिवर्तन झाल्याबरोबर किंवा उसळलेली वृत्ती मावळताच मन परत आपल्या पूर्वीच्या व्यवहाराकडे वळते.

तथापि वैराग्य (मागे न घेता येण्याजोगी परित्यागी वृत्ती) मनाची ही एक प्रवृत्ती आहे की जी परमेश्वराच्या अभिलाषेनी इतकी उत्कंठीत होते व ऐहिक बाबींविषयी इतकी तीव्र उदासीन होते की, जी एकदा जागृत झाली की मग तिला माघार माहीत नाही व सर्व प्रलोभनांच्या विरुध्द जाणे व त्यांचा त्याग करणे हे तिच्या सत्यतेचे प्रमाण असते. गौतम बुध्दाचे प्रसिध्द उदाहरण वैराग्याचे स्पष्टीकरण करणारे आहे.

आपण यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, संन्यास हा परमात्म्याशी एकरुप होण्याच्या सुप्त इच्छेची प्रकट अभिव्यक्ती होय की, जिच्यात जगाविषयीच्या उद्वेगाची सुप्त भावना मिसळलेली असते व त्या संबंधात आपण फूल आणि पराग व फळ यांच्या उपमेचा उपयोग केला. जो पर्यंत फलधारणेचा संबंध आहे, फूल आणि पराग हे स्वतःपुरते असहाय्य असतात कारण कोणत्या तरी जसे वारा, मधमाशी किंवा कीटक यांच्या सारख्या बाह्य माध्यमाद्वारेच केवळ हे दोन्ही एकत्र आणले जाऊ शकतात. निसर्गसृष्टीत फलधारणेची क्रिया होणे किंवा न होणे हे अशा कितीतरी अज्ञात सहस्त्रावधी घटकांवर अवलंबून राहू शकते, ज्याचे भाकीत करण्याचा प्रयत्न आधुनिक विज्ञानाने सोडून दिला आहे व ज्याला ते योगायोग असे नाव देते ते या क्षणी तथापि मुद्याला सोडून आहे व

आपण आपल्या उपमेत या फलधारणेचा देणगी म्हणून विचार करु.

वैराग्याच्या विषयावर पुन्हा येत असताना, हे आपण स्मरणात ठेवले पाहिजे की, परमात्म्यांशी एकरुप होण्याची तीव्र इच्छा ही प्रत्येक सजीव प्राण्यात सुप्त असतेच. तथापि ती केवळ चेतनेमध्ये आपला मार्ग पुढे लोटते, जेव्हा आत्मा मेहेर बाबांनी ''डिव्हाईन थिम'' मध्ये जिला ''साक्षात्काराची प्रक्रिया'' असे म्हटले आहे, तिच्या प्रारंभाजवळ पोहोचतो. जगाविषयीचा उद्वेग देखील अशी काही बाब आहे की जी आपल्या सर्वांमध्ये स्वाभाविकपणे विकास पावते व ती अधिकाधिक प्रबळ होत जाते जसजसे आपण ह्या 'साक्षात्कार प्रक्रियेच्या' प्रारंभाच्या निकटतर पोहचू लागतो. जेव्हा फूल, पूर्णपणे उमललेले असते व पराग परिपक्व झालेला असतो तेव्हा वारा किंवा मधमाशी फलधारणेची देणगी देते व त्यामुळे फळाची निर्मिती होते. अगदी याच प्रकारे जेव्हा आंतरिक तयारीचा हा क्षण येतो तेव्हा एक दैवी दैणगी आत्म्यात उतरते की ज्यामुळे परमात्म्याकरिता तीव्र अभिलाषा व जगाविषयी वैताग वा उदासीनता रुजवल्या जाते व अशा प्रकारे वैराग्याचे अमूल्य फळ निर्माण करते. ही दैवी देणगी अंतर्यामी वास करणाऱ्या परमात्म्याच्या आंतरिक कृपेचा स्पर्श असू शकेल किंवा एखाद्या संताच्या वा सद्गुरुच्या संपर्काचा तो परिणाम असू शकेल, परंतु ती सदैव एक देणगीच असते.

वैराग्य जेव्हा प्रथम अभिव्यक्त होते तेव्हा ते बहुतांश काही काळाकरिता निश्चितपणे बाह्यसंन्यास म्हणून स्वतःला प्रकट करेल. परंतु वैराग्य हे स्थायी असल्यामुळे नेहमीच लवकर किंवा उशिरा खऱ्या सर्वसंगपरित्यागाकडे घेऊन जाईल, जो आंतरिक असतो.

साधकाला जेव्हा सत्याबद्दल इतकी तीव्र इच्छा असते तेव्हा तो अध्यात्ममार्गावर प्रवेश करण्यासाठी पात्र होतो. एका गुरुची गोष्ट आहे, ज्याला त्याच्या शिष्याने भंडावून सोडले होते की, त्याला परमात्म – साक्षात्कार केव्हा होईल. एकदा जेव्हा ते एका नदीवर स्नानासाठी गेले तेव्हा गुरुने त्या शिष्याला काही क्षण पाण्याखाली धरुन ठेवले. तो शिष्य जेव्हा अगदी गुदमरण्याच्या बेतात होता तेव्हा गुरुने त्याला बाहेर ओढले व विचारले की, पाण्यात असताना त्याने कोणता विचार केला व सर्वात जास्त कशाची तीव्र इच्छा केली ? साधकाने उत्तर दिले ''हवेची'' गुरुने स्पष्ट केले की, जर शिष्याला परमेश्वरासाठी अगदी

इतकी तीव्र तळमळ असली तर साक्षात्कार चालत येईल. मौलाना रुमी म्हणतात.

''अब कमजू तेश्नगी आवर बेदस्त''

''पाण्यासाठी ओरड कमी कर, परंतु त्यासाठी अधिक तृष्णा निर्माण कर''

मेहेर बाबांचे शब्दात : ''गहन सत्याच्या जाणीवपूर्वक तळमळीतून अध्यात्ममार्गाचा प्रारंभ सुरु होतो. ज्याप्रमाणे पाण्यातून बाहेर काढलेला मासा पाण्यात परत जाण्यासाठी तळमळतो, त्याप्रमाणेच साधक ज्याला अंतिम ध्येयाची चाहूल लागली आहे तो परमात्म्याशी एकरुप होण्याची तीव्र उत्कंठा बाळगतो.

''वास्तविक पाहता मूळस्थानी परत जाण्याची तीव्र इच्छा, प्रत्येक प्राणिमात्रात, तो ज्या क्षणी उगमापासून अज्ञानाच्या पडद्यामुळे वेगळा झाला तेव्हा पासूनच उपस्थित असते, परंतु साधकाचा अध्यात्ममार्गावर प्रवेश होईपर्यंत ती अचेत असते.*

मनाच्या या प्रवृत्तीला सुफी ''तौबा'' असे म्हणतात ज्याचा अर्थ ''पश्चाताप'' व गर्भितार्थ होतो – आत्म्याच्या जीवनाकरिता इंद्रियोपभोगाच्या जीवनाचा त्याग करणे किंवा त्यापासून परावृत्त होणे. ज्याने हे महान पाऊल उचलले तो, जे काही त्याने मागे सोडून दिले आहे, त्याकडे परत मागे वळून पहात नाही.

मेहेर बाबा सांगतात की, मुमुक्षू हजारो असू शकतात व तितक्याच प्रकारच्या आध्यात्मिक अनुभवांचा आनंद ते लुटत असतील, परंतु 'ज्ञानमार्ग' फक्त एकच आहे. तो आंतरिक परंतु यथार्थ मार्ग आहे. तो जरी सामान्य मार्ग नसला तरी या मार्गावर यात्रा करणाऱ्या खऱ्या साधकाच्या अंतःचक्षूंना तो या प्रमाणे स्पष्टपणे दृष्य असतो. परंतु ज्या गूढवाद्यांनी खरोखरच जरी 'अनुभव' घेतलेला आहे, ते सुध्दा या मार्गातील ज्या विभागातून त्यांनी स्वतः वाटचाल केलेली आहे केवळ त्याचेच स्पष्टीकरण करु शकतात. जे तिसऱ्या भूमिकेवरील अतिधोक्याच्या ठिकाणी येऊन पोहोचलेले असतात त्यांना चवथ्या भूमिकेविषयी काहीच माहिती असू शकत नाही किंवा ते कोणालाही आपल्या

*हे देखील पहा, मेहेर बाबा ''दि स्टेजेस ऑफ दि पाथ'' डिस्कोर्सेस २/१८–२६– संपादक

स्वतःच्या पातळीपर्यंत मार्ग दाखवू शकत नाहीत. त्यांचे ज्ञान व अनुभव त्यांच्या स्वतःपुरतेच मर्यादित असतात. जे पाचव्या व सहाव्या भूमिकेंवर असतात केवळ तेच इतरांना आपल्या स्वतःच्या अवस्थेपर्यंत आणू शकतात व ज्याच्यावर त्यांची कृपी होते त्याला आत्यंतिक लाभ होतो.

जगातील व्यक्तिगत आत्मे स्थूल भुवनाच्या मर्यादेत असतात त्यामध्ये सर्व स्थूल सूर्य, चंद्र, जगत व संपूर्ण अवकाश यांचा समावेश होतो. विज्ञानाच्या अत्यंत प्राथमिक नियमासंबंधी तसेच बरोबर किंवा चूक या आचारसंहिते संबंधी अनभिज्ञ असलेला एक रानटी मनुष्य व एक महान दार्शनिक किंवा वैज्ञानिक हे दोघेही स्थूल जगताच्या मर्यादेच्या अंतर्गत असतात. दार्शनिक सूक्ष्म भुवनाच्या सिध्दांताशी अगदी सुपरिचित असेल व वैज्ञानिकाला आधुनिक पदार्थविज्ञान शास्त्रात परमोच्च आघाडीचा अधिकार असेल, परंतु सूक्ष्माच्या दृष्टीने ते व रानटी व्यक्ती स्थूल भुवनाच्या अंतर्गत येतात. जोपर्यंत सूक्ष्म भुवनाचा अनुभव घेतला जात नाही तो पर्यंत जे स्थूल भुवनाच्या अंतर्गत येतात त्या सर्वांसाठी ज्ञानमार्ग हा बौध्दिक शब्दच्छल करण्याचा विषय राहतो, कारण 'सूक्ष्म' म्हणजे केवळ स्थूलाचे अतिसूक्ष्म रुप असे आम्ही समजत नाही. शब्दांच्या सामांन्यार्थाने अतिसूक्ष्म पदार्थांना जसे, इथर, अणू, कम्पन, प्रकाश व अवकाश यांना ''सूक्ष्म'' म्हणणे बरोबर होईल, परंतु ते जरी अत्यंत सूक्ष्मरुपात असले तरी ते निर्विवादपणे स्थूल आहेत.

आध्यात्मिक दृष्टीने सांगायचे तर सूक्ष्म म्हणजे स्थूलापेक्षा काही तरी पूर्णपणे भिन्न मग भौतिक वस्तू कितीही सूक्ष्म असोत. स्थूल भुवन जरी सूक्ष्म, भुवनापासून निर्माण झालेले असले व ते त्यावर अवलंबून असले तरी सूक्ष्म भुवन हे स्थूल भुवनापासून पूर्णपणे स्वतंत्र आहे. आपण खाण्याची क्रिया उदाहरण म्हणून घेऊ शकतो. स्थूल क्रिया ही विचारांची निर्मिती असून ती विचारावर निर्भर असते परंतु विचार हा स्थूल क्रियेपासून स्वतंत्र असतो.

**विस्मृती**

सत्याप्रत जाण्याचे व सत्याच्या साक्षात्काराचे समग्र तत्वज्ञान ज्या प्रश्नावर अवलंबून असते त्याला ''विस्मृती'' असे आपणाला म्हणता येईल. या ठिकाणी उपयोजिलेल्या ''विस्मृती'' या शब्दाचे साहचर्य पत्र पोष्टाचे पेटीत टाकावयास विसरणे किंवा मानसिक स्थिती जी केवळ मंद व शुन्यवत असते,

असा जो सामान्यपणे अर्थ स्वीकारला जाते त्याच्याशी मुळीच जोडता कामा नये.  विस्मृती या विशेष अर्थाने ही मनाची एक प्रवृत्ती आहे की, जी आध्यात्मिक अनुभवात क्रमशः विकसित होते. बाह्य संन्यास म्हणजे विस्मृती नव्हे, कारण तो बहुतांशी शारीरिक व काही प्रमाणात मानसिक असतो, परंतु आंतरिक संन्यास जेव्हा पूर्णपणे मानसिक होतो तेव्हा त्याला निश्चितपणे विस्मृतीची गुणवत्ता व प्रतिष्ठा प्राप्त होते. अशाप्रकारे एखादा संसाराचा त्याग करेल परंतु त्याला विसरणे इतके सोपे नाही.

विस्मृती या विशेष अर्थाने, आध्यात्मिक किंवा अन्यप्रकारच्या सर्व सौख्यामागे लपलेले गुपित अशाप्रकारे स्पष्ट करते ज्याचा मानव प्राणी अनुभव करतात. या विस्मृतीसाठी सुफी शब्द आहे ''बेखुदी'' व याचा ''बेहोशी'' (अचेतना) या शब्दाशी मुळीच संबंध जोडता कामा नये जरी तो बहुधा अशा अर्थाने घेतला जातो.

विस्मृती आणि बेहोशितील फरक महत्वाचा आहे व बेहोशीच्या काही थोड्या प्रकारच्या उदाहरणावरुन हा फरक स्पष्ट होण्यास मदत होईल. सर्वप्रथम आपण ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, विस्मृती ही मनाची भौतिक जगताविषयी काही प्रमाणात किंवा संपूर्ण अनासक्ती आहे आणि बेहोशी ही मनाची भौतिक जगताचे बाबतीत काही प्रमाणात किंवा संपूर्ण बधिरता आहे. पहिली आध्यात्मिक परमानंदाला विविध अंशात निर्माण करते तर दुसरी सुखदुःखाच्या समाप्तीच्या विविध अंशांना उत्पन्न करते.

आता आपण बेहोशीची एक किंवा दोन उदाहरणे पाहुया. प्रकृती पूर्णपणे सुदृढ असतांना माणूस हृदयासारख्या जीवनदायी अंगाच्या कार्याकडे लक्ष देत नाही. याचा अर्थ असा की, व्यक्ती विसरते की, मानवी देहात जीवन व स्वास्थ राखण्यासाठी या अंगाची अविरतपणे व परिपूर्णतेने स्पंदने होत असतात. तथापि जर हृदयाच्या लयीत व्यत्यय आला तर त्वरित अस्वस्थता वाटते व जर हृदयविकाराचा झटका आला तर त्वरित छातीच्या मध्यभागी वेदना होतात. या दोन्हीही बाबतीत माणसाला स्मरण होते की, त्याला हृदय आहे. अस्वास्थ्याची किंवा पीडेची संवेदना जरी हृदयापासून निर्माण झालेली असली तरी त्या संवेदनेची जाणीव केवळ मनाच्या कार्यशीलतेमुळे होते. मन हृदयाकडे जितके जास्त आकर्षित केले असेल तितकी जास्त अस्वास्थ्याची व पीडेची

जाणीव होते. ज्यावेळेस वेदना परमोच्च बिंदूवर पोहचते तेव्हा बेशुध्दीचा आणखी जास्त उद्‌भव होऊ शकतो – चेतनेच्या धाग्यात रुकावट होते व त्यामुळे व्यक्ती दुःख विसरण्यास सक्षम होते. परंतु ही बेशुध्दीची अवस्था होय व आध्यात्मिक अर्थाने विस्मृती नव्हे. शल्यचिकित्सक मेंदूच्या समोरील भागावर शस्त्रक्रिया (a prefrontal leucotomy) करुन काही मज्ञातन्तू विषयक नाड्यांचे मार्ग विस्थापित करु शकतात ज्या नाड्या कर्क रोगासारख्या काही असाध्य रोगात होणाऱ्या असह्य वेदनांकडे मन केंद्रित करण्याचे काम करतात. या शल्यक्रियेनंतर देखील वेदना अजून तशाच असतात परंतु रुग्ण आपले मन त्याकडे केन्द्रित करणे थांबवितो व त्यामुळे त्याची चिंता करणे बंद करतो. ही परत अर्धवट बेशुध्दी असते जी पूर्णतः भौतिक साधनांचेव्दारे आणविली जाते व जी आध्यात्मिक अर्थाने खरी विस्मृती नसते. निद्रा ही अचेतनेची अवस्था आहे की, जी जीवनातील झीज व हानीपासून तात्पुरता आराम देते, परंतु आध्यात्मिक अर्थाने निद्रा ही खरी विस्मृती नव्हे.

म्हणून सुखाचे व दुःखाचे समग्र तत्वज्ञान काही या प्रकारच्या किंवा त्या प्रकारच्या विस्मृतीच्या आणि काही या प्रकारच्या किंवा त्या प्रकारच्या स्मृतीच्या प्रश्नावर केंद्रित असते. स्मृती ही विशिष्ट कल्पना, व्यक्ती, वस्तू किंवा स्थल यांचेशी असलेली मनाची आसक्ती होय आणि विस्मृती या उलट असते. एकदा हे समजले की, स्मृती हे दुःखाचे कारण बनते तर निष्कर्ष असा निघतो की, कसल्यातरी प्रकारची विस्मृतीच यावर एकमेव इलाज आहे आणि ही विस्मृती एकतर सकारात्मक असेल किंवा नकारात्मक असेल. सकारात्मक विस्मृती ती असते की जिच्यामध्ये मनाला बाह्य प्रोत्साहनाचे भान तर असतेच, परंतु मन त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे नाकारते. नकारात्मक विस्मृती ही एकतर केवळ अचेतना असते–जसे गाढनिद्रेत मन स्तब्ध असते किंवा मनाची गतिवृध्दी ज्याप्रमाणे वेडेपणात असते, जिची व्याक्या, दुःखाची स्मृती टाळण्याचा मार्ग, अशी केली जाते. मादक पदार्थांचा किंवा मादक औषधी द्रव्यांचा (Drug) उपयोग करुन निद्रा किंवा वेडेपण कृत्रिमपणे विविध अंशामध्ये (अल्पप्रमाणात) निर्माण केले जाऊ शकते, परंतु हा देखील स्मृतीवर मात करण्याचा नकारात्मक मार्ग आहे.

सकारात्मक विस्मृतीच यावर मग इलाज आहे आणि तिचा सतत

अभ्यास माणसाच्या मनाचे अशा प्रकारे सन्तुलन विकसीत करते की जे औदार्य, क्षमाशीलता, सहनशीलता, निःस्वार्थीपणा आणि दुसऱ्यांची सेवा अशा प्रकारच्या उदात्त गुणांनी अभिव्यक्ती करण्यास त्याला सक्षम करते. जी व्यक्ती या सकारात्मक विस्मृतीनी संपन्न नसेल ती त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचे मापनयंत्र (Barometer) बनते. प्रशंसा किंवा अवास्तव स्तुतीच्या अत्यल्प कुजबुजण्याने आणि निंदा टीकेच्या अत्यंत पुसट सूचकतेने त्याचे संतुलन भंग पावते, त्याचे मन भावनेच्या अत्यंत हलक्या हवेच्या झुळकीने नाजूक लव्हाळ्याप्रमाणे एका बुजाकडून दुसरीकडे डुलते. असा मनुष्य निरंतर स्वतःशीच युध्द (संघर्ष) करीत असतो व त्याला शांती माहीत नसते.

या सकारात्मक विस्मृतीला कृतीत उतरविण्यासाठी न केवळ प्रतिकूल परिस्थितीत नकारात्मक प्रतिक्रिया आवश्यक असते, परंतु अनुकूल व सुखद परिस्थितीत देखील नकारात्मक, प्रतिक्रिया आवश्यक असते. या दोहोपैकी दुसरी जास्त कठीण असते व तिचे महत्व जरी तितकेच असले तरी तिचा उल्लेख बहुधा कमी वेळा केला जातो.

सकारात्मक विस्मृती सुखाच्या जरी प्रत्यक्ष मुळाशी उपस्थित असली तरी कोणत्याही उपायाने तिला प्राप्त करणे सोपे नाही. तथापि मनुष्याने ही मनाची अवस्था एकवेळ प्राप्त केली की, तो सुखदुःखाच्या पलीकडे जातो, तो स्वतःचाच स्वामी होतो. ही विस्मृती आध्यात्मिक जीवनाकरिता पूर्णपणे, परिणामकारक होण्यासाठी स्थायी झालीच पाहिजे आणि अशाप्रकारचे स्थायित्व अनेक जन्मात केलेल्या केवळ सततच्या सरावाव्दारा प्राप्त होते. गतजन्मात विस्मृतीसाठी केलेल्या परिश्रमांचे फलस्वरुपात काही लोकांना नंतरच्या जीवनात विस्मृतीचे स्वयंस्फूर्त व अल्पकालीन चकाकणे दृष्टीस पडते आणि असेच लोक असतात जे जगाला सर्वोत्कृष्ट काव्य, कलाकृती व तत्वज्ञान देतात व ते विज्ञान शास्त्रात महानतम शोध लावतात.

यथार्थ विस्मृतीच्या अशा क्षणात सभोवतालच्या सर्व भौतिक परिस्थितीबद्दल मानसिक अनासक्ती असते व अशा स्थितीतच कवी आपल्या प्रतिभेला उंच भराऱ्या मारण्यास मुक्त सोडतो. एखादा कलाकार जेव्हा एखाद्या आदर्शाला साकार करतांना स्वतःला आणि आजूबाजूच्या असंबंधित बाबींना पूर्णपणे विसरतो तेव्हा तो एखाद्या उत्कृष्ट कलाकृतीची निर्मिती करतो. सर्वोत्तम

तत्वज्ञान तेव्हाच व्यक्त होते जेव्हा माणूस जीवनातील समस्यांचे निरीक्षण केवळ स्वतःच्या वैयक्तिक परिस्थितीच्या चढ–उताराचे संदर्भात करीत नाही आणि ह्या अशाच मनाच्या विशिष्ट अवस्थेत काही महत्तम विज्ञानविषयक शोध लावले गेले आहेत. विस्मृतीचे अशाप्रकारे यथार्थ स्वयंस्फूर्त प्रकटीकरण खरोखर फार दुर्मिळ असते व असे जरी म्हटले जाते की, कवी, कलाकार व तत्वज्ञ घडविले जात नाहीत तर ते उपजताच असतात तरी ह्या यथार्थ विस्मृतीच्या क्षणिक अवस्था म्हणजे अनेक गतजन्मात घेतलेल्या परिश्रमांची फलनिष्पत्ती होय.

जीवन सुसह्य करण्याच्या प्रयत्नात काही लोक दुर्बल स्वरुपाचा उदासीनवाद विकसीत करतात– ''काही का होईना, कोण पर्वा करतो'' – अशाप्रकारचा दृष्टीकोन व दुसरे काही अविवेकाने भोगविलासात स्वतःला झोकून देतात. पहिली पराजयाची उदासीन स्वीकृती आहे आणि दुसरी सुखाच्या मिठीत पराभव विसरण्याचा प्रयत्न होय. या दोन्हीमध्ये खरी विस्मृती नसते. परंतु माणूस जेव्हा खरी विस्मृती प्राप्त करतो तेव्हा तो आध्यात्मिक साम्राज्यात प्रवेश करतो आणि 'अंतिम लक्ष्यावर' पोहोचत नाही तो पर्यंत विस्मृतीच्या विविध अवस्थांच्या अनुभवातून (passess through) जातो. मेहेरबाबा आपल्याला सांगतात ''जगताविषयीची विस्मृती मनुष्याला पथिक (रहरेव, साधक) बनविते, दुसऱ्या जगताविषयीची विस्मृती माणसाला संत बनविते, स्वतःची विस्मृती म्हणजे साक्षात्कार आणि विस्मृतीची विस्मृती म्हणजे पूर्णावस्था होय.''

## ३. पहिली भूमिका *(८५)

हाफीज स्पष्टपणे पहिली भूमिका संदर्भीत करतात तेव्हा ते म्हणतात.

कस नादानीस्त के मन्जिलगॅह मक्सूद कुजास्त
इन कदर हास्त के बंग–ए–जरासी मीआयाद

''दैवी प्रियतमाचे खरे निवासस्थान कोठे आहे, हे माहीत नाही, इतके मात्र स्पष्ट आहे की, मी घंटानाद ऐकतो (प्रवास करणाऱ्या काफिल्यांचा)''

नाद आणि भूमिका या विषयावर मेहेर बाबा सांगतात*

''तथापि हे माहीत करुन घ्या की, नाद हा सातही भूमिकांवर सर्वत्र अस्तित्वात आहे, फरक फक्त त्याच्या संवेदनांच्या, अत्यानंदाच्या व परमानंदाच्या अभिव्यक्तीत आहे.

''कल्पनेची कितीही भरारी मारली तरी उच्चतर भूमिकांवरील नाद, दृष्य किंवा गंध यांची तुलना भौतिक भूमिकेवर ज्यांची आपल्याला सवय झालेली आहे, त्यांच्याशी करता येणे शक्य नाही. आपली ऐकण्याची, पाहण्याची व वास घेण्याची भौतिक इंद्रिये उच्चतर भूमिकांचा अनुभव व आनंद घेण्याकरिता निरुपयोगी आहेत. त्या ठिकाणी वेगळाच नेत्र आहे की जो पाहतो, वेगळेच श्रवणेंद्रिय आहे की जे ऐकते व वेगळेच घ्राणेंद्रिय आहे की जे वास घेते. तुम्हाला हे आधीच माहीत आहे की, मनुष्याला आंतर इंद्रिये असतात जी बाह्य इंद्रियांची समस्वरुपे (counterparts) असतात व मनुष्य पहिल्या इंद्रियांनी उच्चतर भूमिकांचे अनुभव घेतो.

उच्चतर भूमिकांचे नाद भौतिक जगतातील नादाचे समान असतात व ज्या मध्ये केवळ कंपनाच्या तीव्रतेत व पुनरावृत्तीच्या वेगात काही तरी वेगळेपणा असतो असे समजण्याची चूक करु नका, हे खात्रीपूर्वक माहीत करुन घ्या की, पहिल्या तीन भूमिकांमध्ये ज्याला 'नाद' म्हटले जाते, तो प्रत्यक्षात असतो. या नादाचे रुप, सौंदर्य, संगीत आणि परमानंद वर्णन कराण्याच्या पलिकडचे आहेत. प्रथम भूमिकेच्या नादाचे किंवा स्वर्गीय संगीताचे वेगळे वैशिष्ट्य आहे, ज्याला हाफीज 'बंग–ए–जरासी' (घंटा निनाद) शी संदर्भ जोडतात.

''वर उल्लेखिल्यानुसार नाद जरी सर्व सातही भूमिकात असला तरी दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकेत जो सुगंध असतो तो विलक्षण असतो जेव्हा दृष्टी हे पाचव्या व सहाव्या भूमिकांचे वैशिष्ट्य असते.

''सातवी भूमिका अव्दितीय आहे. या ठिकाणी नाद, दृष्टी व सुगंध खऱ्या अर्थाने (in essence) दिव्य आहेत व त्यांची तुलना त्यांच्याशी केली जाऊ शकत नाही, जे कनिष्ट भूमिकांमधून निघतात. या भूमिकेत व्यक्ती श्रवण करीत नाही, वास घेत नाही व पाहत नाही परंतु ती व्यक्ती एकाच वेळी नाद, गंध व दृष्टी बनते व त्याला त्यांची दिव्यस्वरुपात चेतना असते.''

## ४. दुसरी भूमिका *(८५)

हाफीज स्पष्टपणे दुसऱ्या भूमिकेचा संदर्भ देतात तेव्हा ते म्हणतात,

सिगुयामत के बेमैखाने दूश मस्त ओ खराब

* ''क्वश्चन्स बाबा आन्सर्स'' – मेहेब बाबा जर्नल, खंड १ क्र. ३ (जानेवारी १९३९) पृष्ठे ८३–८४

सुरुश–ए आलम–ए घैबाम सीह मुजदिहा दादस्त ?

''त्या मदिरालयातील कालची रात्र मी तुम्हाला कशी प्रकट करु की, जेव्हा मी धुंद व थरथरत होतो व अद्दष्य जगातील देवदूतांनी माझ्यासाठी महान शुभसंदेश आणले होते ?''

## ५– तिसरी भूमिका *(८६)

हाफीज खालील शब्दात तिसऱ्या भूमिकेच्या संदर्भात सांगतात.

चेह राह मीजानांद अन मुतरेब–ए– मुकान शेनास
केह दर मियान–ए गजल कुल–ए आशिना अवार्द

''(आध्यात्मिक) अवस्थांचे व स्थितींचे ज्ञान असलेला हा संगीतज्ञ आपल्या कार्यक्रमाच्या मध्येच दैवी प्रियतमाच्या शब्दात नवीन शब्द घुसडून देऊन, ऐकणाऱ्यासाठी (प्रेमींसाठी) केवढा क्षोभ आणि केवढी व्यथा निर्माण करीत आहे !''

## ६– तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधील टप्पा *(८७)

तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधला प्रवास हा एकदम कठीण व धोक्याचा आहे कारण या दोन भूमिकांच्या मध्ये एक संमोहनाचे (मुकाम–ए–हैरत) ठिकाण आहे. बहुतांश साधक जरी सरळ तिसऱ्यावरुन चवथ्या भूमिकेत पार होत असले तरी साधक जर या ठिकाणी एकदा का थांबला तर या संमोहित करणाऱ्या अवस्थेतून पार होणे अत्यंत कठीण असते. साधक जर या अवस्थेतून त्वरित बाहेर पडला नाही व पुढील चवथ्या भूमिकेकडे त्याने वाटचाल सुरु केली नाही तर त्याची प्रगती अनिश्चित काळाकरिता रोखली जाईल. एकदा का साधक अशाप्रकारे संमोहित झाला की, मग अशा स्थितीत तो कित्येक दिवस, महिने किंवा वर्षे राहतो. तो ना तो पुढील प्रगती करु शकत, ना तो मागे हटू शकत. त्याला ना स्थूल चेतना असते ना सूक्ष्म चेतना. तो बेशुध्द आहे असेही म्हणता येत नाही कारण त्याला संमोहनाची संपूर्ण चेतना असते आणि याच संमोहनाच्या जाणिवेमुळे तो हे मृत्यूचे जीवन जगत असतो.

आत्यंतिक तीव्रतेने संमोहित झालेल्या या साधकाची शारीरिक अवस्था काही कमी विचित्र नसते, कारण जर तो स्वतः एका विशिष्टस्थितीत आसनस्थ झाला तर त्या स्थितीत तो महिनानुमहिने वा वषानुवर्षे तसाच राहतो. त्याचप्रमाणे जर तो उभा असतांना संमोहित झाला तर तो त्या मोहितावस्थेचा

शेवट होत नाही तो पर्यंत तसेच उभे राहणे सुरु ठेवतो. थोडक्यात म्हणजे, प्रथम ज्या अवस्थेत तो मोहित झाला असेल त्याच अवस्थेत तो स्थिर राहतो आणि जरी तो निर्जीव पुतळ्यासारखा दिसत असला तरी वस्तुतः तो जगातील सामान्य माणसापेक्षा अधिक सजीव असतो.

सुफी जगताला हे चांगल्या प्रकारे माहीत आहे की, पिरान कल्यार येथे राहणारा अली अहमद साबीर, जो कालांतराने सद्‌गुरु झाला, तो एकदा एका विशिष्ट वृक्षाचे जवळ वषानुवर्षे कसा उभा होता. या कालावधीत साबीरचे मन या मुकाम–ए–हैरतच्या संमोहनावस्थेत निमग्न होते आणि त्या अवस्थेतून त्याला एका सद्‌गुरुने मुक्त केले. केवळ नैसर्गिक मृत्यू किंवा हयात असलेल्या एखाद्या सद्‌गुरुचे दैवी साहाय्य अशा प्रकारे मती कुंठित झालेल्या साधकाला खीळ बसलेल्या आध्यात्मिक अवस्थेतून बाहेर पडावयास सहाय्यक होऊ शकते. सद्‌गुरु अशा साधकाला मदत करुन एकतर त्याला तिसऱ्या भूमिकेवर परत आणेल किंवा त्याला धक्का देऊन पुढे ढकलेल.

हाफीज निःसंदेहपणे साधकाच्या या अवस्थेचा विचार करतात जेव्हा ते म्हणतात.

मस्ताम कुन अन् चनान केह् नादानाम जे बेखुदी
दर अरसीह खियाल के आमद कुदाम राफ्ट.

''माझी अशी मती कुंठित व धुद कर की या विस्मृतीच्या अवस्थेमुळे माझ्या मनात काय आले व त्यामधून काय बाहेर पडले याचा मला विसर पडावा.''

मेहेर बाबा हे स्पष्ट करतात की, जेव्हा साधक तिसऱ्या भूमिकेतून चवथ्या भूमिकेत शिरत असतो तेव्हा तो ''मुकाम–ए–हैरत'' (संमोहन अवस्था) मध्ये प्रविष्ट होण्याचा धोका पत्करत असतो. ते म्हणतात मार्गावर इतर ठिकाणी सुध्दा संमोहनावस्था आहेत. परंतु तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधील (अवस्था) सर्वात जास्त महत्वाची आहे. ही हैरत (संमोहन) अतिप्रभावी किंवा सौम्य असू शकते. साधक संमोहित होण्याच्या क्षणी जर अडथळा आणणारा किंवा (मन) विचलित करणारा घटक उपस्थित नसेल तर हैरत गंभीर किंवा बलिष्ट असते. जर त्या क्षणी विचलित करणारा घटक उपस्थित असेल तर हैरत सौम्य असते. जर साधक तिसऱ्या आणि चवथ्या भूमिकांच्या मधल्यास्थितीत

अत्यंत प्रभावी किंवा सौम्य हैरतचा अनुभव घेत असेल आणि नंतर उच्चतर भूमिकेवर आकस्मित घडलेल्या गोष्टीमुळे पुढे ढकलला गेला, तर तो अनिवार्यपणे पाचव्या व सहाव्या भूमिकांच्या मधल्या स्थितीत पुन्हा याच अत्यंत प्रभावी किंवा सौम्य हैरत मध्ये पोहोचतो. तथापि अशी उदाहरणे अत्यंत विराळा आहेत. कल्यारचे अलि अहमद साबीर आणि मुंबईचे बाबा अब्दुर रहमान हे दोघेही तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधल्या अति बलिष्ट हैरत पासून तो पाचव्या व सहाव्या भूमिकांमधल्या अति बलिष्ट हैरतमध्ये फेकले गेले होते पहिले सद्गुरुच्या कृपाप्रसादाने तर दुसरे ईश्वरी देणगीव्दारा आकस्तिम घडलेल्या घटनेच्यारुपात.

जे साधक अत्यंत प्रभावी हैरत मध्ये असतात अशांचे मध्येच फक्त शरीर स्थितीची पूर्ण स्थिरता दिसून येते. जी मृत्यूपर्यंत टिकून राहते किंवा सद्गुरुचा संपर्क होईपर्यंत टिकून राहते. एक मस्त (ईश्वरोन्मत) जो मेहेर बाबांजवळ पुष्कळ वर्षापासून आहे व १९३६ मध्ये त्याला जेव्हा राहुरी येथे मेहेर बाबांकडे आणले होते तेव्हा तो तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधील ह्या 'मुकाम–ए–हैरत' मध्ये होता, परंतु त्याची हैरत कमकुवत होती आणि जरी तो कित्येक तास अखंडपणे एकाच स्थितीत उभा राहत असे तरी ही स्थिती तो कायम स्वरुपात राखू शकत नव्हता. अली अहमद साबीरची संमोहनावस्था मात्र अत्यंत प्रभावी होती व तो सद्गुरुकडून संमोहनाची अंतिम समाप्ती होईपर्यंत एकाच शरीरस्थितीत राहिला.

ही संमोहनावस्था व धक्का, मद्य किंवा औषधाने आलेली अर्धवट बेशुध्दी – हे विशेष लक्षण असलेला मनोरुग्ण, या दोन्ही अवस्था सारख्याच दिसत असल्या तरी यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारे साम्य आहे असे मुळीच समजू नये. या दोन्हीही संमोहनाच्या अवस्था आहेत, परंतु त्यांच्यात दोन ध्रुवाइतके अंतर आहे.

## ७ – मनोभुवनाचा साधक *(९१)

मेहेर बाबा म्हणतात, जर मनोभुवनातील साधक भारतात असला व त्याने अमेरिका पाहण्याची मनात कल्पना केली व त्याच वेळेस तशी त्याने इच्छा केली तर जशी त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे तो मनाने किंवा शरीराने तेथे उपस्थित राहील. एखादा विचारेल की, विचारा इतका जलद प्रवास तो कसा

काय करु शकतो ? याचे उत्तर असे आहे की, मन सर्वत्र आहे व म्हणून मनोभुवनाच्या साधकाला प्रवास करावा लागत नाही. स्थूल किंवा सूक्ष्म इंद्रियांचा उपयोग न करता त्याला वाटेल तेथे तो कुठेही असू शकतो. त्याने केवळ जाणून घेण्याची इच्छा केल्यास, सहाव्या भूमिकेपर्यंतच्या स्थूल, सूक्ष्म व मनोभुवनाविषयी त्याला काहीही व प्रत्येक गोष्ट माहीत होऊ शकते. याही पेक्षा अजून जास्त महत्वाची गोष्ट ही की, कमी प्रगत असलेल्या आत्म्यांना व सामान्य मानवी प्राण्यांना सुध्दा तो आपल्या स्वतःच्या प्रगतीच्या स्तरापर्यंत आणण्यासाठी मदत करु शकतो. त्याला जर एखाद्याला प्रत्यक्षपणे मदत करावयाची इच्छा असेल, तर पाचव्या भूमिकेवरील साधक, मुमुक्षूचा ''हात धरुन'' त्याला पथावर अग्रेसर करु शकतो. तो जेव्हा असे करतो तेव्हा स्वतः मुमुक्षू देखील आंतरिक दृष्ट्या मनोभूमिकेतील गुरुच्या (वली म्हणून जे सुफींना ज्ञात आहेत) निरंतर उपस्थितीचा ज्ञानेंद्रियांचे योगे बोध घेतो आणि त्याला स्वतःला असे देखील वाटते की, आपण मार्गावर प्रत्यक्षपणे गुरुकडून पूर्णत्वाकडे अग्रेसर केले जात आहोत. हाफीज पुढील काव्यपंक्तीत, एका व्यक्तीची ज्याला याप्रकारे मार्गावर, अग्रेसर केल्या जात आहे त्याच्या विशिष्ट संवेदनेची स्पष्ट कल्पना करतात.

तू दस्तगू शौ ऐ खिज्र–ए पै खुजास्ती केह मन
पियादे मिरावाम ओ हमराहां सवारानन्द ।

''हे सन्माननीय गुरुदेव, इतर सहचर जे या मार्गावर स्वार होऊन जात आहेत, त्यांच्या तुलनेत मी (असहाय स्थितीत) या मार्गावर पायी जात आहे, त्यामुळे माझा हात धरुन मार्ग–दर्शन करा.''

सामान्यपणे वली (महापुरुष) मुमुक्षूच्या डोळ्यात टक लावून पाहून त्याला मदत करतो, ज्यामुळे खऱ्या अंतःचक्षूचे आंतर आवरण फाडून फेकले जाते. या दृष्टीव्दारां केलेल्या  (दृष्टिपाताला) वलीच्या आध्यात्मिक प्रभावाला सुफी 'तवज्जोह' असे म्हणतात. 'तवज्जोह' ही संज्ञा सद्‌गुरुंच्या संदर्भात लागू होत नाही. त्यांच्या संदर्भात 'मर्जी' हा शब्द उचित आहे, कारण शारीरिक संपर्काशिवाय देखील ते ही मदत देऊ शकतात, जो संपर्क भूमिकेवरील गुरुंच्या संदर्भात आवश्यक असतो.

मेहेर बाबा हे समजावून सांगतात की, पाचव्या भूमिकेवरील साधक

कधी कधी दैवी उपस्थितीची इच्छा करतो आणि कधी तो ऐहिक कर्तव्ये पार पाडतो. वस्तुतः जो पर्यंत पाचव्या भूमिकेवरील दैवी उपस्थितीतचा संबंध आहे, परमेश्वर तेथे सदैव उपस्थित असतो, परंतु साधक जेव्हा आपले लक्ष ऐहिक कर्तव्याकडे वळवितो तेव्हा तो या उपस्थितीची नेहमी इच्छा धरेलच असे नाही. सहाव्या भूमिकेवर साधक शंभर टक्के परमेश्वराची उपस्थिती असावी, अशी निरंतर इच्छा करतो. हाफीज स्पष्टपणे आपल्या पाचव्या भूमिकेचा अनुभव वर्णन करतात तेव्हा ते म्हणतातः

हुजुरी गर हामी ख्वालू
अझू घायेब मशू हाफीज ।

''हे हाफीज, जर तुला दैवी उपस्थितीची अभिलाषा असेल तर तू स्वतःला अनुपस्थित ठेवू नकोस.''

## ८ – सहावी भूमिका *(९४)

ज्या साधकाला या भूमिकेवर पोहोचण्यास यश प्राप्त होते, तो पीर किंवा सत्पुरुष असे म्हणवून घेण्यास अधिकारी होतो. या शब्दांचा इंग्रजीत समर्पक अनुवाद नाही. ''संत'' हा शब्द कदाचित चालू शकेल, परंतु तो अत्यंत स्वैरपणे वापरण्याचा जो अडथळा आहे, त्यामुळे तो अडचणीत येतो.

हाफीजला या सहाव्या भूमिकेचे खालील शब्दात स्मरण होते.

मा दर पियाले आक्स–ए रुख–ए यार दिदेह्इम
ए बिखबर जे लज्जत–ए शूर्ब–ए मुदाम–ए मा

''आम्ही प्रियतमाचे मुखकमल (आपल्या मनाच्या किंवा अंतःकरणाच्या) प्याल्यात प्रतिबिंबित झालेले पाहिले. हे अज्ञानी पुरुषा तुला त्या परमानंदाची कल्पना नाही, जो आम्ही त्यापासून ग्रहण करतो.

## ९. सहाव्या भूमिकेचे गूढज्ञान *(९५)

सहाव्या भूमिकेतील गूढज्ञाना संबंधी मेहेरे बाबा आपल्याला सांगतातः

''केवळ परमेश्वरच अस्तित्वात आहे व जर अज्ञानामुळे दुसरे काही अस्तित्वात असेल तर त्याची सत्यता भ्रामक आहे. अशा वेळी त्याचे अस्तित्व परमात्म्याची छाया म्हणून असते, ज्याचा अर्थ असा की, परमात्मा ज्ञान व अज्ञान या दोन्ही अवस्थेत असतो. सुफी गूढज्ञानाच्या भाषेत लिहिलेले एकाच अनुभवाचे पुढील चार दृष्टीकोन आहेत, जे सहाव्या भूमिकेतील आत्म्यांच्या

ज्ञानाचे विविध पैलू होत – जेव्हा ते परमेश्वराच्या समोरासमोर असतात, परंतु अजुनही ते व्दैताच्या क्षेत्रातच असतात. ह्या सर्व पैलूंचा अनुभव एकत्र व एकाचवेळी घेतला जातो.

१ : **हमे अस्त**: याचा अर्थ आहे – ''सर्व काही तोच आहे'' व जो या ज्ञानाचा अनुभव घेतो त्याच्याकरिता केवळ परमात्म्याचेच अस्तित्व आहे.

२: **हमे अज अस्त** : याचा अर्थ आहे ''सर्व काही त्याचे पासून आहे'' – आणि जो या ज्ञानाचा अनुभव घेतो, त्याच्या करिता जेव्हा अज्ञानाचा प्रभाव असतो तेव्हा समस्त विश्व–प्रपंच, विविधता व अनेकत्व भ्रम (माया) म्हणून अस्तित्वात असतात.

३ : **हमे बा अस्त** : याचा अर्थ आहे – ''सर्वकाही त्याच्या बरोबर आहे'' आणि जो या ज्ञानाचा अनुभव घेतो, त्याच्याकरिता परमेश्वर निर्गुण व सगुण दोन्हीही आहे. जेव्हा ज्ञानाचा प्रभाव असतो तेव्हा त्याचे गुणधर्म अमर्याद असतात व जेव्हा अज्ञानाचा प्रभाव असतो तेव्हा मर्यादित असतात. शरीर, मन व तिन्ही जगत अस्तित्वात नसतात, परंतु ते जर अस्तित्वात असल्यासारखे वाटत असले तर ते छायेप्रमाणे असतात.

४ : **हमे दर अस्त** : याचा अर्थ आहे – ''सर्वकाही त्याच्यात आहे'' – आणि जो या ज्ञानाचा अनुभव घेतो, त्याच्या दृष्टीने अज्ञानाला देखील आपली स्वतःची वास्तविकता नसते. त्याचे अस्तित्व जेव्हा अभिव्यक्त होते तेव्हा ते परमेश्वराच्या अचेत व अनंत ज्ञानापासून प्रकट होते आणि म्हणून अज्ञानामुळे जे काही व्दैतात अस्तित्वात असते ते परमेश्वरापासूनच बाहेर आलेले असते, जेथे ते चिरस्थायी स्वरुपात अस्तित्वात होतेच.

## १० – सातवी भूमिका *(९६)

हे समजून घेतले पाहिजे की, सातव्या भूमिकेत विलीन होण्याच्या क्षणी, स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरांशी व विश्वाशी असलेले सर्व संबंध अनिवार्यपणे एकदम तोडले जातात. जे संबंध व्यक्तिला त्याच्या तीन देहाशी व विश्वाशी बांधून ठेवतात, असे दीर्घकालीन जीवदायी संबंध एकदम तोडण्यासारखे समांतर उदाहरण सामान्य स्थूल जीवनात मिळत नाही. शारीरिक मृत्यू याचे तुलनेत एक क्षुल्लक गोष्ट आहे, ती गोष्ट तेवढेच महत्व ठेवते जितके एखाद्या धाग्याच्या तुकड्याला तोडून टाकण्यात आहे. सामांन्यपणे

मृत्यूचे क्षणी सूक्ष्म शरीर व प्राणशक्ती स्थूल देहापासून पूर्णतः वेगळी केली जातात. परंतु मन मात्र मृत्यूनंतर पहिले चार दिवस स्थूल शरिराशी संबंध ठेवून असते व त्यानंतर सात दिवस पर्यंत मन हा संबंध अल्प प्रमाणात टिकवून ठेवते. अंतिम नाशात (फना) तथापि शरीर व मन वेगळे केले जात नाहीत तर ते मनाचे प्रत्यक्षात पूर्णपणे नष्ट होणेच असते व सर्व ''नक्श–ए–अमल'' (संस्कारांचा) यथार्थ विनाश असतो.

## ११ – विविध प्रकारचे चमत्कार *(११२)

मेहेर बाबांनी आम्हाला चमत्कारांमधील फरकाचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

१) उध्दारकर्ता – अवतार

२) पूर्णपुरुष – सद्‌गुरु

३) पीर आणि वली (म्हणजे ६ व्या व ५ व्या भूमिकेवरील)

४) निम्नतर भूमिकांवर असणारे ( म्हणजे १ ल्या, २, ऱ्या, ३ ऱ्या व ४ थ्या भूमिकांवरील)

या चार प्रकारच्या संदर्भात मेहेरबाबा आम्हाला सांगतात

**१) अवताराचे चमत्कार**

अवताराचे चमत्कार विश्वात्मक स्वरुपाचे असतात व विश्वव्यापी कार्याच्या दृष्टीने आवश्यक असले तरच ते केले जातात. अवताराचा जेव्हा एखादा चमत्कार करण्याचा हेतू असतो तेव्हा तो त्यावेळेपुरता ६ व्या, ५ व्या किंवा ४ थ्या भूमिकेवर ज्याप्रमाणे परिस्थिती असेल त्याप्रमाणे स्वतःला स्थिर करतो. परंतु जेव्हा चमत्कार अत्यंत प्रभावी व्हावेत अशी अपेक्षा असेल तेव्हा तो स्वतः चवथ्या भूमिकेवर त्यावेळेपुरता स्थिर होतो.

२) सद्‌गुरुचे चमत्कार फार मोठ्या प्रमाणात असतात परंतु ते विश्वव्यापी नसतात. अवताराच्या चमत्काराप्रमाणे ते पूर्णतः इतरांच्या आध्यात्मिक जागृतीसाठी केले जातात. अवताराप्रमाणे सद्‌गुरु देखील जेव्हा एखादा चमत्कार करण्याचा हेतू ठेवतो तेवहा त्यावेळेपुरता तो स्वतःला ६ व्या, ५ व्या किंवा ४ थ्या भूमिकेवर स्थिर करतो व फारच भीषण चमत्कारासाठी तो त्यावेळेपुरता चवथ्या भूमिकेवर स्थिर होतो. सातव्या भूमिकेतील मज्झूब–ए–कामिल (ब्रह्मीभूत) कधीच चमत्कार करीत नाही याचे साधे–सरळ कारण हे

आहे की अशा आत्म्याकरिता मन, सूक्ष्म व स्थूल ही तिन्ही भूवने अस्तित्वात नसतात.

३) पीर किंवा वलीचे चमत्कार हे फार मर्यादित प्रमाणात असतात वस्तुतः ते प्रत्यक्षपणे चमत्कारच करीत नाहीत. तथापि जे चमत्कार त्यांनी केले असे समजल्या जाऊ शकते ते त्यांचा मानसिक प्रभाव इतरांच्या विचार व भावनांवर पडल्यामुळे घडून येतात व त्यांना आध्यात्मिक व भौतिक लाभाची प्राप्ती होते. ते चवथ्या भूमिकेवर, जी महान आध्यात्मिक शक्तीची सर्वशक्तीमान भूमिका आहे, त्यावर खाली येत नाहीत.

४) पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकांचे साधक (यात्री) आपल्या भूमिकेवरुन शक्तीचा उपयोग किंवा प्रदर्शन करु शकतात– जसे इतरांच्या मनातील विचार सांगणे, अवकाशातून वस्तू निर्माण करणे, पुस्तके न पाहताच त्यामधील शब्दांचे व परिच्छेदांचे वाचन करणे, रेल्वे गाड्या थांबविणे, तासन्तास स्वतःला जीवंत पुरवून घेणे, हवेत तरंगणे इत्यादी, इत्यादी. ह्या वास्तविक शक्ती असून त्या यात्रींनी निरनिराळ्या भूमिकांवर प्राप्त केलेल्या असतात व त्यामुळे त्यांना केवळ हातचलाखीची जादुगीरी म्हणता येणार नाही. सद्‌गुरु आणि अवतार पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या या निम्नतर भूमिकामधील यात्रींची शक्ती वापरण्याची क्षमता काढून घेऊ शकतात व चवथ्या भूमिकेची एखाद्याची सर्वशक्तीमान शक्ती देखील ते काढून घेऊ शकतात. अशा या निम्नतर भूमिकांवरील साधकाच्या शक्तीच्या अपहरणास सूफी लोक 'सल्ब–ए–विलायत' असे म्हणतात.

चवथ्या भूमिकेवर सर्वशक्तीमान शक्तीचे* भांडार असते व जर यात्रीने त्याचा गैरवापर केला तर त्याचा संपूर्ण विनाश होतो. परंतु अशा चमत्कारांचा जगावर विपरित परिणाम होत नाही कारण या युगातील आध्यात्मिक प्रशासन मंडळाचा प्रमुख असलेला ''कुतूब–ए–ईर्शाद' अशा कृत्यांना निष्क्रिय करण्याची काळजी घेतो.

मेहेर बाबा अधिक स्पष्ट करुन सांगतात की, पहिल्या तीन भूमिकांवरील यात्रीकडून या शक्तीचे अविवेकाने प्रदर्शन झाले तर त्यापासून गंभीर धोके संभवतात परंतु जो चवथ्या भूमिकेच्या शक्तीचा गैरवापर करतो तो अनिवार्यतः उत्क्रांतीच्या निम्नतर स्तरावर – पाषाण अवस्थेत अधःपतित

होतो.

कबीरांनी हे धोके सूचित केले आहेत जेव्हा ते म्हणतात –

साहेब का घर दूर है जैसे लंब खजूर
चढे सो चाखे प्रेम–रस गिरे सो चकनाचूर ।

''ज्याप्रमाणे खुजाराचे झाड उंच असते त्याप्रमाणे प्रभूचे घर दूर आहे, जर यात्री उंच पोहोचला तर तो प्रेमाची मदिरा चाखतो, जर तो खाली कोसळला तर तो आपली मान तोडून बसतो.''

**चमत्कारांचे जाणीवपूर्वक व नेणीवपूर्वक घडणे**

अवतार व सद्‌गुरु यांनी केलेल्या चमत्कारांच्या मागे एक दैवी हेतू असतो व ते ऐच्छिक अथवा अनैच्छिक स्वरुपाचे असू शकतात, अवतार किंवा सद्‌गुरु यांचे ऐच्छिक चमत्कार ते आहेत की, जे ते जाणून बुजून त्यांच्या मर्जीप्रमाणे इच्छाशक्तीच्या बळावर घडवून आणतात व अनैच्छिक चमत्कार ते असता की, जे अवतार किंवा सद्‌गुरु यांच्या मर्जीशिवाय स्वतंत्रपणे घडून येतात व ते चमत्कार त्यांच्या सभोवती असणाऱ्या निरंतर सक्रिय प्रभावामुळे घडून येतात. या अनैच्छिक प्रकारच्या चमत्कारात घडून येणाऱ्या घटनांसंबंधी अवतार किंवा सद्‌गुरु जरी त्या चमत्काराचा मूळ स्त्रोत व मूळ कारण असले तरी ते अनभिज्ञ असतात. या पूर्ण विभूतींचे ऐच्छिक किंवा अनैच्छिक कोणतेही चमत्कार असले तरी सुध्दा ते सदैव जगाच्या आध्यात्मिक जागृतीकरिता निर्देशित केलेले असतात.

**अवतार आणि सद्‌गुरु हे चमत्कार का करतात ?**

संसारात अतिलिप्त असलेले लोक आध्यात्मिक दृष्ट्या जडमतीचे असतात व त्यांना स्वतःला वाचविण्यासाठी कधी कधी चमत्कारांची गरज असते, तसेच अन्य अतिअजाण लोकांना या भौतिकतेच्या संवेदनाशून्यतेच्या परिणामापासून वाचविण्यासाठी देखील चमत्कारांची गरज असते. खालील दृष्टांत याचा अर्थ स्पष्ट करतो.

असे समजा की एका लहान बालकाने एका चिमणीला इतक्या निष्काळजीपणे हातात धरले आहे की तो अगदी तिचा गळा दाबून मारण्याच्या बेतात आहे. अशा वेळेस चिमणीला वाचविण्यासाठी प्रस्तुत मुलाच्या हातून

---

*चवथ्या भूमिकेवरील आत्म्याला महायोगी असे म्हणतात.

चिमणीला हिसकावून घेण्याचा प्रयत्न करणे अयोग्य ठरेल, कारण शक्यता ही आहे की मूल चिमणीवरील आपली पकड अधिक घट्ट करुन तिला मारुन टाकील. परंतु मुलाला जर एखादे नाणे दिले तर तो बहुतांश निश्चितपणे चिमणीवरील आपली पकड सैल करील व तिला सोडून देईल. अशाप्रकारे पक्षाला मारण्यापासून मुलाला परावृत्त केल्या जाईल की, जे कृत्य तो निव्वळ अज्ञानातून करणार होता. सद्‌गुरुंचे चमत्कार अशाप्रकारच्या गोष्टी घडवितात, आध्यात्मिक मुल्यांच्या निव्वळ अज्ञानामुळे स्वतःचे किंवा इतरांचे नुकसान करण्यापासून ते लोकांना रोखतात.

जर सुवर्णाला चमत्कारांचा प्रतिनिधी म्हटले तर निम्नतर भूमिकांचा योगी संसारी लोकांच्या डोळ्यासमोर हे सोने लटकत ठेवून त्यांना दिपवितो ज्यामुळे ते योग्याच्या चमत्कारिक शक्तीबाबत विस्मयचकीत होतात. जर अशा योग्याला लोक शरण गेलेत तर शेवटी त्यांचा भ्रमनिरास झाल्यावर त्यांना एका क्रूर अनुभूतीचा सामना करावा लागेल. परंतु जेव्हा अवतार किंवा सद्‌गुरु संसारी लोकांच्या डोळ्यासमोर हे सोने लटकत ठेवतात तेव्हा तो एका मायेच्या प्रकाराचा प्रयोग करुन दुसऱ्या जास्त बंधनकारी मायेच्या रुपांकडून त्यांना आढून दूर करतो व आध्यात्मिक मार्गावर अशाप्रकारे त्यांना आकृष्ट करतो, जो र्माग त्यांना त्यांच्या यथार्थ लक्ष्याकडे अर्थात आत्म–साक्षात्काराकडे घेऊन जातो.

आपण एक दुसरे उदाहरण घेऊ व कल्पना करु की, एकरंगी दृष्टी असलेला एक मनुष्य आहे व त्याला सारे जग उदाहरणार्थ, निळे दिसते. त्याचे डोळे अशाप्रकारे निळ्या चष्म्याप्रमाणे कार्यान्वित होतात व तो जेव्हा त्यामधून पाहतो तेव्हा त्याला जणू सर्व निळे दिसते. आध्यात्मिक दृष्टीने पाहता जग ही माया आहे व त्यामुळे कोणताही रंग नाही. जग  हे रंगविहिन आहे. चमत्कारिक शक्तीचे प्रदर्शन करणारा योगी मनुष्याचा हा निळा चष्मा बदलून त्या ठिकाणी हिरवा किंवा लाल रंगाचा चष्मा ठेवतो, जेणेकरुन त्याला सर्व काही हिरवे किंवा लाल दिसते. त्याच्या अजाण डोळ्यांना, जग निळ्या रंगाचे पाहण्याचा सराव झालेला असतो व त्याला हे एकदम हिरव्यात किंवा लाल रंगात झालेले परिवर्तन अतिशय विस्मयकारक होते व योग्याला या वरपांगी चमत्काचे महान श्रेय देते.

सद्‌गुरु हे जाणत असतात की वास्तविक रंग हा ना निळा, ना हिरवा,

ना लाल आहे, परंतु संसारातील प्रत्येक गोष्ट रंगविहिन म्हणजे शुन्य, हा संसाराचा खरा रंग पाहण्यासाठी सक्षम करतात. योगी किंवा निम्न अवस्थेतील गुरु जे परिपूर्ण नाहीत ते निव्वळ एका मायेच्या ठिकाणी दुसरी माया ठेवतात. परंतु सद्‌गुरु सर्व मायेचे आवरण कायमचे नष्ट करतात व सृष्टी ही काल्पनिक असून केवळ परमेश्वरच काय तो सत्य आहे, हे सत्य प्रकट करतात. सद्‌गुरुचे हे कार्य संथगतीचे व कष्टदायक प्रक्रिया असते व त्यामध्ये योग्याच्या रंगीबेरंगी विलोभनीय व फसव्या पध्दतीचा अभाव असतो व याच कारणामुळे सद्‌गुरुचे कार्य अगाध असते.

त्या शक्तींचा स्वामी कोण असतो,

की, ज्याचेव्दारां चमत्कार घडतात ?

सद्‌गुरुच्या चमत्कारिक शक्ती दिसावयास चवथ्या भूमिकेवरील योग्याच्या शक्ती प्रमाणेच दिसतात परंतु तेथे एक हा महत्वाचा फरक आहे की, सद्‌गुरुच्या शक्ती स्वतः त्याच्या असतात, कारण तो स्वतःच शक्ती असतो. त्याला फक्त एखाद्या वस्तूची इच्छाच करावयाची असते व ते घडून येते. ''होऊन जा व ते झाले'' (कुन फया कुन) हे कथन सुफींच्या मतानुसार शक्तीच्या दिव्य प्रकटीकरणाचा उल्लेख करते.

योग्यांच्या शक्ती तथापि त्यांच्या स्वतःच्या नसतात व चमत्कार करण्याकरिता त्यांना बाह्य साधनांवर अवलंबून रहावे लागते. सद्‌गुरुंच्या आपल्या स्वतःच्या शक्ती निरंतर उचंबळून येत असतात, व योगी आणि निम्नतर भूमिकांचे साधक किंवा यात्री ह्या प्रवाहित होणाऱ्या शक्ती उधार घेऊन त्यांचा चमत्कार करण्याकडे उपयोग करतात. सुफींच्या श्रद्धेप्रमाणे हे अगदी अनुरुप आहे की, वली हे प्रेषित मुहम्मदाचे साक्षिदार आहेत व त्यांचे सर्व चमत्कार मधाने भरलेल्या मशकापासून टपकणाऱ्या मधाच्या थेंबाप्रमाणे, मुहम्मदापासून प्राप्त होतात. रुढीप्रिय मुसलमानांनी मान्य केलेला हा विश्वास सीमित क्षेत्राचा आहे कारण याचा संबंध केवळ प्रेषित मुहम्मदाच्या व्यक्तिमत्वाशी जोडल्या जातो. तथापि त्याची व्यापक उपयुक्तता या सुफी विश्वासामुळे तत्काळ प्रकट होते की आरंभापासून केवळ एकच रसूल असून जो वेळोवेळी निरनिराळ्या देशात वेगवेगळ्या नावांनी प्रकट होतो.

मेहेर बाबांनी या मुद्यावर अधिक प्रकाश टाकून स्पष्ट केले आहे.

''फना–फिल्लाह'' मध्ये (मज्झूब अवस्थेत) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असे कोणतेच चमत्कार नाहीत. दिव्य–संगमावर (तुरिया अवस्था किंवा मुकाम–ए–फुरुतत) जीवनमुक्ताला (आझाद–ए–मुतलक) कोणतेच कार्य नसते व तो कोणताच चमत्कार करीत नाही. परंतु जीवनमुक्ताव्दारां, त्याला भान नसताना चमत्कार घडण्याची संभावना नेहमीच असते. निम्नतर भूमिकांचे प्रतिनिधी (Agents) किंवा यात्री जीवनमुक्ताच्या शक्ती पुष्कळदा वारंवार उसनवार घेतात व चमत्कार करण्याकरिता त्याचा उपयोग करतात परंतु असा उपयोग केल्यामुळे जीवनमुक्ताच्या शक्ती कोणत्याच प्रकारे कमी होत नाहीत.

**रसूल किंवा अवतार व सद्‌गुरुंचे चमत्कार**

जेव्हा परमात्मा मनुष्य बनतो तेव्हा तो रसूल किंवा अवतार होतो व मनुष्य जेव्हा परमेश्वर होतो तेव्हा तो मज्झूब होतो आणि जर त्याला मानवतेप्रत कर्तव्ये (Duty) पार पाडावयाची असतील तर तो दुसरा व तिसरा दिव्यप्रवास पार करतो व तो सद्‌गुरु बनतो. अवतार आणि सद्‌गुरु हे दोघेही आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण असतात कारण दोघेही परमात्म्याशी एकरुप झालेले असतात. त्या दोघांनाही जरी मानवतेप्रत कर्तव्य (Duty) करावे लागते तरी अवताराचे कार्य मात्र एक विशेष प्रकारचे असते.

सुफी म्हणतात, अवतार व सद्‌गुरु यांचा परमात्म्याशी जो ''नाते संबंध'' (कुर्बत) असतो त्यामध्ये फरक असतो व सुफी त्या संबंधाला अनुक्रमे 'कुर्ब–ए–फराईज' (अनैच्छिक, आवश्यक समीपता) व 'कुर्ब–ए–नवाफील' (ऐच्छिक निकटता) असे म्हणतात. अशा प्रकारे 'कुर्ब–ए–फराईज' अवताराच्या व 'कुर्ब–ए–नवाफील' सद्‌गुरुंच्या संबंधात आहेत.

सुफींच्या मतानुसार अवताराने (रसूल) केलेल्या चमत्कारात परमात्मा हा कर्ता असतो व मनुष्य साधन असते, सद्‌गुरुचे संदर्भात मात्र हे या उलट असते, मनुष्य कर्ता असतो व परमेश्वर साधन असते. प्रेषित मुहम्मदाचा एक प्रसिध्द प्रसंग आहे की, बद्रच्या लढाईत त्याने ओंजळभर धूळ शत्रूवर फेकताच त्याची दाणादाण झाली. हे अवताराच्या चमत्काराचे उदाहरण आहे. तथापि जरी मुहम्मदाने धूळ फेकली असे दिसत असले तरी वस्तुतः परमेश्वराने मुहम्मद म्हणून धूळ फेकली व मनुष्याचे रुपात हा मुहम्मद होता की ज्याने शत्रुला पळविले म्हणून अशा प्रकारचा चमत्कार 'कुर्ब–ए–फराईज' चे एक उदाहरण

आहे.

सद्गुरुंनी केलेले चमत्कार, तथापि 'कुर्ब–ए–नवाफिलची' उदाहरणे होत. ज्यामध्ये एका मेलेल्याला पुन्हा जीवंत करण्याचा शम्स–ए–तब्रिज चा चमत्कार, हे एक उत्तम उदाहरण आहे. शम्सने जेव्हा ''कुम बी इजनिल्लाह'' (परमेश्वराचे नावावर उठ) हे शब्द उच्चारले तेव्हा राजपूत्र जीवंत झाला नाही, परंतु जेव्हा तो म्हणाला ''कुम–बी इजनी'' (माझ्या नावावर उठ) राजपूत्र तत्काळ जीवंत झाला. या ठिकाणी शम्स–ए–तब्रिजने मनुष्य म्हणून आदेश दिला व परमात्म्याने शम्स–ए–तब्रिजच्या रुपात स्वतःच्या गुणविशेषांनी स्वतःला विभूषित केले – या उदाहरणात जीवनाच्या गुणविशेषांनी विभूषित केले व अशाप्रकारे राजपूत्राला पुन्हा जीवंत केले. ''कुर्ब–ए–नवाफील'' मध्ये मनुष्य हा कर्ता असतो व परमात्मा साधन असते.

पौर्वात्य वा पाश्चिमात्यांचा चमत्काराकडे पाहण्याच्या मनोवृत्तीमध्ये जो फरक आहे त्यावर आपण क्षणभर चर्चा करु. पौर्वात्यांचा सद्गुरु व उन्नत आत्म्यांशी असलेल्या  सुपरिचयाचा प्रदीर्घ इतिहास आहे व ही गोष्ट त्यांनी मान्य केली आहे की परमात्मा अनंत असल्यामुळे त्याला सीमित मनाने समजणे अशक्य आहे. पौर्वात्याला हे माहीत आहे की, मानवी बुध्दि–जिची व्यापकता सीमित आहे– ती पारलौकिक (अभौतिक) समस्या सोडविण्याच्या दृष्टीने एका विशिष्ट टप्प्यापर्यंतच फक्त उपयुक्त आहे. दार्शनिक डॉ. इकबाल यांनी काव्यात सांगितले :

अक्ल गो आस्तां से दूर नहीं
उसकी तकदीर मे हुजूर नही ।

''बुध्दी जरी प्रियतमाच्या उंबरठ्यापासून फार दूर नसली तरी दैवी उपस्थितीचा आनंद घेणे तिच्या नशिबी नाही.''

अशा प्रकारे पौर्वात्य जगताला हे माहीत आहे की, बुध्दी ज्या ठिकाणी आपले प्रयत्न त्या गोष्टीला समजण्याचे थांबविते, जी अनुभवातीत पारलौकिक आहे, तेथे प्रेमाची कडी अवश्य जोडल्या गेली पाहिजे. पश्चिमी जगतात बुध्दिच्या प्रयासाने फार मोठा ज्ञान संचय उभारतात व जे बुध्दिच्या कक्षेत येत नाही (जे बुध्दिने समजत नाही) त्या गोष्टी एकतर अमान्य केल्या जातात किंवा त्यांचा उपहास केल्या जातो. पश्चिमी जगताच्या प्रवृत्तीची ही फलनिष्पत्ती

प्रचलित अमेरिकी वाक्संप्रदायात ''रहस्यवादी'' या शब्दांचा अत्यंत दुरुपयोग म्हणून आपण उद्घृत करु शकतो. मध्ययुगीन युरोपच्या उत्कट धार्मिक उत्साहाची जागा बहुतेक संस्कृती व विज्ञानाच्या अति-उत्साहानी घेतली आहे.

तथापि विज्ञानाचे सिध्दांत काही मर्यादेपर्यंत बदलू शकणारे असतात व खरा वैज्ञानिक वास्तविकता तशी पाहतो जशी ती दिसते. परंतु मेहेर बाबांनी वारंवार घोषित केले आहे की, विज्ञानाची महान प्रगती झाली असली तरी भौतिक पदार्थांच्या वास्तविकतेपासून अजुनही बरीच दूर आहे व आध्यात्मिक तत्वांच्या बाह्यपरिघापासून तर ती फारच दूर आहे. हृदयाने मनाशी सहयोग केलाच पाहिजे. असे होऊ शकते की, योग्याचे काही पूर्णपणे शारीरिक कौशल्यपूर्ण प्रयोग, ज्यांना असंख्य लोक चमत्कार समजतात, ते वैद्यकीय विज्ञान स्पष्ट करुन सांगू शकते. परंतु खरे चमत्कार व विशेषतः सद्गुरुंचे चमत्कार मात्र वैज्ञानिक स्पष्टीकरणात बसत नाहीत. अवतार सद्गुरु व संत यांनी केलेल्या चमत्कारांपैकी अनेक चमत्कार सर्व धर्मातील व सर्व देशातील आध्यात्मिक आख्यायिकात व प्राचिन ग्रंथात (classics) नोंदल्या गेले आहेत व सतत क्रियाशील असलेले आध्यात्मिक शासन-मंडळ या चमत्कारात दररोज भर टाकत आहे. घटना तेथे दिलेल्या आहेत, येशू ख्रिस्त व अन्य सद्गुरुंनी मृतांना जीवंत केलेले आहे व रोग बरे केले आहेत. जरी एखाद्याने एखादा चमत्कार घडतांना आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिला व जरी त्याला खात्री झाली की, तो चमत्कारच होता व त्यामध्ये हातचलाखी किंवा जादुगीरी नव्हती तरी सुध्दा त्याबाबत तर्कसंमत स्पष्टीकरण देणे कदापि शक्य होणार नाही, कारण चमत्कार हे बौध्दिक स्पष्टीकरणाच्या पुष्कळ पलिकडे आहेत. ते एक रहस्यच आहे, ज्याप्रमाणे जीवन एक स्वतःच अथांग (रहस्य) आहे.

तथापि, कदाचित, उणीव जी आहे ती काही पूर्णतः निराधार नाही कारण सद्गुरुच्या कार्यपध्दतीची सर्वसाधारण जगताला त्याचे अंतरंग समजण्याची क्वचितच कुवत असते व खरे पाहिले असता, बहुतांश कार्ये अगदी घनिष्ठ सहयोगी व जे दिक्षा घेण्यास पात्र आहेत अशांच्या हृदयात संग्रह करुन ठेवलेले असतात व औत्सुक्यापासून सुरक्षितपणे लपलेली असतात. सुप्रसिध्द सुफी अब्दुल हसन खरकानी यांच्या शब्दात ''सद्गुरुच्या अंतरंगात जे काही लपलेले आहे त्याचे काही थेंब जरी त्यांच्या ओठावर आले तर स्वर्गातील व

पृथ्वीवरील सर्व प्राणी भयभीत होतील.''

चमत्कारांचे व्यापक आकर्षण व आध्यात्मिक गुरुंनी या संबंधी प्रतिपादन केले असले तरी पाश्चिमात्याप्रमाणे पौर्वात्म देखील या संदर्भात अत्यंत सतर्क आहेत. काहीही असले तरी प्रशंसा करताना असे म्हणता येईल की पौर्वात्य दीर्घ अनुभवातून ही गोष्ट शिकले की आध्यात्मिक शासन–मंडळाच्या कार्याला अमान्य करता येत नाही, भलेही मग चमत्कृतीवर विश्वास ठेवण्यास किंवा त्या स्वीकारण्यास लागणारा मार्ग दिसत नसला तरी. प्राचीन सुफीपैकी एकाने उद्घोषित केले आहे– ''चमत्कार परमात्म्याकडे जाणाऱ्या मार्गातील सहस्त्रावधी पायऱ्यांपैकी एक पायरी आहे.'' आणि या युगाचे अवतार मेहेर बाबा प्रतिपादन करतात की, सद्‌गुरुचा सर्वात महान चमत्कार ते करु शकतात तो हा आहे की, ते दुसऱ्या व्यक्तिला आपल्यासारखे आध्यात्मिकदृष्ट्या पूर्ण करु शकतात.

## १२. गूढ शक्तींचे प्रकार *(११२)

आध्यात्मिकता (Spirituality) व अध्यात्म या दोन भिन्न बाबी आहेत. आध्यात्मिकतेला कोणत्याही रुपातील कोणत्याही प्रकारच्या शक्तीशी काही घेणे–देणे नाही. आध्यात्मिकता हा परमात्म्याप्रती जाण्याचा प्रेम–मार्ग आहे व सद्‌गुरुप्रती जाण्याचा आज्ञापालनाचा व शरणागतीचा मार्ग आहे.

जसजसा व्यक्ती या मार्गावर पुढे जातो तसतसा त्याला चेतनेच्या भूमिकांवर गूढ शक्ती प्राप्त होत जातात. जे पहिल्या ते चवथ्या भूमिकेत असतात त्यांना कधी कधी ह्या गूढ शक्तींचे प्रदर्शन करण्याचा मोह होतो.

गूढ शक्ती तीन प्रकारच्या आहेत.

१) चवथ्या भूमिकेतील दिव्य शक्ती

२) चेतनेच्या प्रथम तीन भूमिकेतील अलौकिक शक्ती, ह्यांना गूढ शक्ती म्हटल्या जाते

३) अन्य गूढ शक्ती

१) चवथ्या भूमिकेतील दिव्य शक्ती ह्या परमात्म्याच्या सर्वशक्तीमान गूढ शक्ती होत. त्या सर्व शक्तींचे उगमस्थान आहेत मग त्या रहस्यमयी शक्ती असोत किंवा इतर गूढ शक्ती असोत.

दिव्य शक्तीच्या तुलनेत रहस्यमयी व इतर गूढ शक्ती अपरिमितपणे

क्षुल्लक आहेत.

दिव्य शक्ती नेहमीकरिता तशाच असतात कारण परमात्मा एकमेव तोच आहे. गूढ शक्ती मग त्या भूमिकांच्या असोत किंवा नसोत, भिन्न प्रकारच्या असतात व त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये फरक असतो.

अवतार व सद्‌गुरु यांनी दिव्यशक्तीच्या अभिव्यक्तीव्दारां केलेल्या चमत्कारांना 'मोजेझट' असे म्हणतात. सद्‌गुरुकडून मर्यादित प्रमाणात व अवताराकडून विश्वव्यापी प्रमाणात हे चमत्कार सर्वांच्या हितासाठी केलेले असतात. तथापि हे चमत्कार अवताराच्या किंवा सद्‌गुरुच्या अगदी निकटच्या सान्निध्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीसाठी देखील केले जाऊ शकतात.

पाचव्या किंवा सहाव्या भूमिकेतील व्यक्तींनी दिव्यशक्तीचेव्दारां केलेल्या परोक्ष चमत्कारांना 'करामात' असे म्हटले जाते. पहिल्या भूमिकेपासून तो तिसऱ्या भूमिकेत असलेल्या साधकांनी केलेल्या रहस्यमयी शक्तीच्या प्रदर्शनाला वस्तुतः चमत्कार म्हणता येणे शक्य नाही. असे प्रदर्शन केवळ शक्ती–प्रदर्शन असून भूमिकावरील मार्ग आक्रमित असताना मिळालेल्या त्या शक्ती होत. अशा शक्ती–प्रदर्शनाला 'शोबदा' असे म्हणतात.

चवथ्या भूमिकेवरील एखादी व्यक्ती जेव्हा दिव्य–शक्तीचा सदुपयोग करुन चमत्कार करते तेव्हा अशा चमत्काराला ''करामात–ए–मोजेझा'' असे म्हटले जाऊ शकते. जेव्हा ती व्यक्ती त्या शक्तीचा दुरुपयोग करते म्हणजे चवथ्या भूमिकेतील दिव्य–शक्तीचा गैरवापर करते तेव्हा तिला ''मोजेझा–ए–शोबदा'' असे नाव दिल्या जाते.

चवथ्या भूमिकेला मनोभुवनाचा उंबरठा समजल्या जाते आणि त्यामुळे चवथ्या भूमिकेवर दिव्य शक्तीचा दुरुपयोग केल्याचा परिणाम त्याच्या पाषाण अवस्थेपर्यंत होणाऱ्या अधःपतनात होतो व त्याची चेतना विघटित होते.

२) प्रथम तीन भूमिकातील गूढ शक्तींना, रहस्यमयी शक्ती असे म्हणतात व जरी या भूमिकांवरील साधकांना त्यांचे प्रदर्शन करण्याचा मोह होत असला तरी त्यांचा दुरुपयोग होऊ शकत नाही. ह्या रहस्यमयी शक्ती भिन्न प्रकारच्या असून त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये वेगवेगळेपणा असतो जसे : इतरांच्या मनात काय चालले आहे ते ओळखणे, पुस्तक न पाहता त्यातील शब्द किंवा परिच्छेद म्हणून दाखविणे, तासन् तास स्वतःला जीवंत पुरवून घेणे, इत्यादि.

भूमिकांवरील शक्ती उत्पन्न केल्या जात नाहीत. ह्या शक्ती भूमिकांवरील व्यक्तींना त्यांच्या स्वतःच्या मर्यादित परिस्थितीत सदैव उपलब्ध असतात व त्यामुळे त्यांचे प्रदर्शन करण्याकरिता केन्द्रिकृत प्रयासाची गरज नसते. मनात असलेल्या व इतर गोष्टी सांगणारे जे लोक प्रदर्शन करुन मंचावर कार्यक्रम सादर करतात त्यांच्याशी या गूढशक्ती प्रदर्शनाशी गल्लत करु नये.

जी व्यक्ती चेतनेच्या तिसऱ्या भूमिकेत असते ती मृत मानवपूर्व प्राण्याला जीवंत करु शकते. परंतु मृत मानवाला कदापिही जीवंत करु शकत नाही. तो चवथ्या भूमिकेतील दिव्य शक्तींच्या  जवळ असतो व तिच्या प्रभावामुळे तो असे करु शकतो.

परंतु  चौथ्या भूमिकेतील व्यक्ती चौथ्या भूमिकेतील दिव्य शक्तींचा वापर करुन मानव प्राण्यांसह सर्व मृतांना जीवंत करु शकते.

तिसऱ्या भूमिकेतील व्यक्ती आपल्या स्वेच्छेप्रमाणे आपल्या भौतिक देहात बदल करु शकतो व जो असे करतो त्याला अब्दल म्हणतात. ही कृती देखील रहस्यमयी शक्तींचा एक खेळ आहे, परंतु शक्तींचा गैरवापर नव्हे.

तथापि या कृतीला तांत्रिकांचे मानवी स्वरुपाचे अभौतिकी-करण (dematerialization)किंवा भौतिकीकरण समजता कामा नये.

(३) इतर गूढ शक्तींचा आध्यात्मिकतेशी किंवा भूमिकांवरील रहस्यमय शक्तींशी काहीही संबंध नाही. ह्या गूढ शक्ती दोन प्रकारच्या आहेत.

(अ) श्रेष्ठ दर्जाच्या गूढशक्ती

(ब) कनिष्ठ दर्जाच्या गूढशक्ती

ज्याच्याजवळ ह्या गूढशक्ती आहेत. त्याचा तो चांगला किंवा वाईट उपयोग करु शकतो. गूढ शक्तींचा चांगला वापर व्यक्तिला भूमिकांच्या मार्गावर येण्याकरिता मदत करतो व त्याला महायोगी देखील करु शकतो. ह्या गूढ शक्तींचा गैरवापर मनुष्याला नंतरच्या मानव जन्मात तीव्रतेने दुःख भोगण्यास लावतो. श्रेष्ठ दर्जाच्या गूढ शक्तींचा चांगला उपयोग मनुष्याला चार पुनर्जन्मानंतर चेतनेच्या पाचव्या भूमिकेवर स्थापित करतो.

(अ) श्रेष्ठ दर्जाच्या गूढ शक्ती तांत्रिक अभ्यासाने जसे चिल्ला नशीनी किंवा विशिष्ट मंत्राचा जप करुन इत्यादीव्दारे प्राप्त करता येतात.

ज्याच्याजवळ ह्या शक्ती असतात तो तथाकथित चमत्कार जसे हलके

होणे, हवेत उडणे किंवा तरंगणे, द्दष्य होणे किंवा अद्दष्य होणे, इत्यादी करु शकतो.

(ब) कनिष्ठ दर्जाच्या गूढ शक्तींसाठी तांत्रिक किंवा कोणत्याही विशेष अभ्यासाची गरज नाही. त्या गतजन्माच्या संस्काराव्दारा प्राप्त झालेल्या असतात. उदाहरणार्थ : जर एखाद्याने गतकाळात पुष्कळ वेळा सत्कर्मे केली असली तरी त्याला त्याच्या नंतरच्या जन्मात कनिष्ठ दर्जाच्या गूढ शक्ती, कोणत्याही प्रकारच्या कठोर साधना न करता प्राप्त होऊ शकतात. त्याचे संस्कार त्याला कनिष्ठ दर्जाच्या गूढ शक्तींची नैसर्गिक देणगी देतात जसे : दूरदर्शिता , दूरश्रवणीयता, रोग बरे करणे, मिठाई किंवा पैसा जणू शून्यातून निर्माण करणे इत्यादि.

सर्व अशा प्रकारच्या क्षमता निम्नतर किंवा कनिष्ठ प्रकारच्या गूढ शक्तींचे भाग होत.

जर एखाद्या मनुष्याने कनिष्ठ प्रकारच्या गूढ शक्तींचा सदुपयोग केला तर त्याला नंतरच्या जन्मात कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अभ्यासाशिवाय श्रेष्ठ दर्जाच्या गूढशक्ती प्राप्त होतात. याचप्रमाणे जर एखादा आपल्या संमोहन शक्तींचा चांगला उपयोग करीत असेल तर त्याला पुढील जन्मात श्रेष्ठ प्रतीच्या गूढ शक्ती प्राप्त होतात.

## १३- ध्यान *(११३)

**दिव्य प्रक्रियेच्या अभ्यासावर आधारीत नवशिक्यांसाठी मेहेर बाबांनी दिलेली योजना**

एखाद्या कल्पनेवर किंवा वस्तूवर बळजबरीने मनाची एकाग्रता करण्याच्या यांत्रिक प्रक्रियेला ध्यान असे बहुधा चुकीने समजले जाते.म्हणून स्वाभाविकपणे बहुतांश लोकांना एखाद्या विशिष्ट दिशेने किंवा एखाद्या विशिष्ट वस्तूवर मनाची एकाग्रता करण्यांकरिता केलेल्या प्रयत्नात फार अडचणी जाणवतात. मनाला पूर्णपणे यांत्रिकरित्या हाताळणे न केवळ तापदायक आहे तर ते अंतिमतः अगदी निश्चितपणे असफल ठरते.

सर्वप्रथम सिध्दांत साधकाने लक्षात ठेवला पाहिजे तो हा की, मनाला त्याच्या प्रकृतीनुसारच नियंत्रित केल्या जाऊ शकते व ध्यानावस्थेकडे निर्देशित केल्या जाऊ शकते व ते या इच्छा-शक्तीच्या कोणत्याही कला-कौशल्याच्या

प्रयोगाव्दारां होत नाही.

पुष्कळ लोक जे विधिवत ध्यान करीत नाहीत ते नेहमी काहीतरी व्यावहारिक समस्येबाबत किंवा सैध्दांतिक विषयासंबंधीच्या पध्दतशीर व स्पष्ट चिंतनात सखोल व तीव्रतेने निमग्न असलेले आढळतात. एका अर्थाने त्यांची मानसिक प्रक्रिया ध्यानासारखी असते, ज्या अर्थी असंगत बाबी वगळून एखाद्या विशिष्ट विषयवस्तूवर त्यांचे मन तीव्र चिंतनात तल्लीन असते. अशा मानसिक प्रक्रियेत ध्यान सोपे व सहज असण्याचे कारण असे की, ज्या विषयात मनाला रुची आहे व जो विषय उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात समजतो त्यावर मन स्थिर होत जाते. परंतु सामान्य विचारप्रवाहांची आध्यात्मिक शोकांतिका ही आहे की, त्यांना त्या गोष्टीकडे निर्देशित केल्या जात नाही ज्यांचे यथार्थाने महत्व आहे. म्हणून ध्यानाच्या विषयवस्तूची निवड नेहमी फार काळजीपूर्वक केली पाहिजे व ती आध्यात्मिक दृष्टया महत्वाची असली पाहिजे. ध्यानात यश संपादन करण्याचे दृष्टीने आपण न केवळ मन दिव्य विषयात किंवा सत्यात रुची घ्यावयास लागेल असा प्रयत्न केला पाहिजे, परंतु आपण तो विषय व ते सत्य समजण्याचा व त्यांचे मर्म जाणण्याच्या प्रयत्नाला देखील सुरुवात केली पाहिजे. समजून केलेले ध्यान ही मनाची स्वाभाविक प्रक्रिया आहे जी यांत्रिक ध्यानाची कंटाळवाणी कठोरता व नियमितपणा टाळते. म्हणून ती न केवळ सहज व प्रेरक होते परंतु सोपी व यशस्वी सुध्दा होते.

ज्या अर्थी समजून केलेले ध्यान हे एका खास विषयावर चिंतन केल्यामुळे होते, यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ध्यान करायची सर्वात चांगली पध्दत ही असेल की आपण एका योग्य विषयाचे संक्षिप्त व स्पष्ट विशदीकरण करावे. यासाठी पुढील विभागात दिलेल्या मानचित्रांसह ईश्वरी विषय (Divine Theme)पेक्षा अधिक चांगले काहीच राहू शकणार नाही.

ज्या ध्यानाच्या प्रक्रियेची मेहेरबाबा शिफारस करतात त्याच्या तीन पायऱ्या आहेत.

१) पहिल्या अवस्थेमध्ये साधक दिव्य प्रक्रियेचे दररोज वाचन करुन अध्ययन करील व तसेच रेखा चित्रांचे देखील अध्ययन करील व तसे करीत असतानाच त्याचे चिंतन करील.

२) दुसऱ्या अवस्थेमध्ये जेव्हा साधकाला संपूर्ण विषय आत्मसात् झालेला

असतो तेव्हा वास्तविक वाचनाची गरज राहत नाही. परंतु स्पष्टीकरणाच्या विषय वस्तूचे मानसिक समालोचन केले पाहिजे व आवश्यकता वाटल्यास रेखाचित्रांची मदत घेतली पाहिजे.

३.तिसरी अवस्था जी दुसऱ्या अवस्थेतून स्वाभाविकरितीने विकसित होईल, त्यामुळे मनाला शब्दांचे किंवा विचारांचे वेगळे किंवा सतत पुनरावलोकन तसेच वस्तुस्थितीचा उल्लेख करणे देखील अगदीच अनावश्यक राहील व विषयवस्तूचे विषयांतर करणारे चिंतन समाप्त होईल. ध्यानाच्या या अवस्थेत मन कोणत्याच विचार प्रवाहात मग्न राहणार नाही परंतु स्पष्टीकरणात व्यक्त झालेल्या अत्युच्च सत्यांचा मनाला अगदी स्पष्ट समज प्राप्त होईल.

## १४. मेहेर बाबा प्रणीत *(११३) दिव्य प्रक्रिया - विषय

उत्क्रांती, पुनर्जन्म व साक्षात्काराकडे जाणारा मार्ग (रेखाचित्रांचा परिचय)

उत्क्रांती, पुनर्जन्म व साक्षात्काराच्या प्रक्रियेतून पार पडल्यानंतरच आत्मा परिपूर्ण होतो.* परिपूर्ण चेतना प्राप्त करण्यासाठी आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियेत आत्म्याला अधिकाधिक संस्कार प्राप्त होतात व मानव देह प्राप्त होईपर्यंत आत्म्याला परिपूर्ण चेतना प्राप्त होते व त्याच बरोबर सर्व प्रकारचे स्थूल संस्कार देखील प्राप्त होतात.

पुनर्जन्माच्या प्रक्रियेत हा आत्मा आपली परिपूर्ण चेतना कायम ठेवतो व आपल्या स्वतःतच विविध संस्कारांची अदलाबदल करतो (म्हणजे त्यांचा आळीपाळीने अनुभव घेतो ) आणि साक्षात्काराच्या प्रक्रियेत हा आत्मा आपली परिपूर्ण चेतना कायम ठेवतो परंतु जोपर्यंत संस्कार पूर्णपणे नाहिशे होत नाहीत व केवळ चेतना शिल्लक राहत नाही तोपर्यंत त्याचे संस्कार उत्तरोत्तर क्षीण होत जातात. संस्कार-क्षीण होत असतांना, स्थूल संस्कार सूक्ष्म,संस्कार होतात व सूक्ष्म संस्कार मनःसंस्कार बनतात व सरतेशेवटी ते सर्व नाहिसे होतात.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानव योनीपर्यंत संस्काराच्या गुंडाळण्याची प्रक्रिया अधिकाधिक मजबूत होत जाते. मानवी योनीत पुनर्जन्माच्या प्रक्रियेत गुंडाळण्याची प्रक्रिया आपली पूरी पकड कायम ठेवते. परंतु साक्षात्काराच्या प्रक्रियेत ते संस्कार स्वतःलाच हळूहळू उकलवित जातात व परमात्म -

* टीप- रेखाचित्र ९ पहा. A आत्मा Z आत्मा होतो.

अवस्थेपर्यंत पूर्णपणे उकलले जातात.

एकमेव परमेश्वर अर्थात परमात्मा सत्य आहे. परमेश्वराशिवाय कशालाच अस्तित्व नाही. निरनिराळे आत्मे परमात्म्यात आहेत व ते त्याच्याशी एकरुप आहेत. आत्म्याला 'स्व' चेतना मिळविण्याची क्षमता प्राप्त करण्याकरिता उत्क्रांतीची, पुनर्जन्माची व साक्षात्काराची ,या सर्व प्रक्रिया आवश्यक आहेत. गुंडाळण्याच्या प्रक्रियेत चेतनेच्या उत्क्रांतीसाठी संस्कार साधनीभूत होतात जरी ते संस्कारीक बंधने देतात, व उकलण्याच्या प्रक्रियेत संस्कारीक आसक्ती नष्ट केल्या जातात परंतु प्राप्त केलेली चेतना पूर्णपणे कायम ठेवली जाते.

संस्कार गुंडाळण्याच्या प्रक्रियेत आत्मा खाली उतरण्याच्या सात अवस्थेमधून पार पडतो आणि उकलण्याच्या प्रक्रियेत आत्मा वर चढण्याच्या सात अवस्थेमधून जातो, परंतु उतार आणि चढाव हे दोन्ही प्रपंच मायावी (भ्रमात्मक ) असतात. आत्मा सर्वत्र आहे व अविभाज्यपणे अनंत आहे व तो अचल असून, चढ–उतार करीत नाही

सर्व राष्ट्रीयत्वाच्या जातींच्या व पंथाच्या स्त्री–पुरुषांचे आत्मे खऱ्या अर्थाने एकच आहेत आणि त्यांचे चांगले व वाईट खडाष्टक करण्याचे व मदत करण्याचे, युध्द करण्याचे व शांततेने जगण्याचे सर्व अनुभव मायेची व भ्रमाची अंगे होत, कारण हे सर्व अनुभव शरीर व मनाव्दारां–जे स्वतः मुळातच शुन्य आहेत, घेतले जातात.

रुपांचे व व्दैताचे जगत अस्तित्वात येण्यापूर्वी परमेश्वराशिवाय काहीच नव्हते याचा अर्थ असा की, तेथे शक्ती ज्ञान व परमानन्दाच्या अविभाज्य व अमर्याद महासागराशिवाय काहीच नव्हते. परंतु ह्या महासागराला स्वतःबद्दल चेतना नव्हती. तुम्ही आपल्या स्वतःमध्ये या महासागराची, तो पूर्णतःप्रशांत तसेच स्थिर अशा महासागराच्या रुपात कल्पना करा, ज्याला आपल्या शक्ती,ज्ञान व आनंदाची जाणीव नाही व तो महासागर असल्याची जाणीव देखील नाही. कोट्यावधी थेंब जे महासागरात आहेत.त्याना कसलीच चेतना नाही, ते थेंब असल्याचे किंवा ते महासागरात असल्याचे किंवा ते महासागराचे एक अंश असल्याचे ज्ञान नाही.ही स्थिती सत्याच्या (परमात्म्याच्या) मूळ अवस्थेचे प्रतिनिधित्व करते.

सत्याची ही मूळ निश्चल अवस्था स्वतःला जाणून घेण्याच्या ऊर्मिमुळे

विचलित होते ही उर्मी महासागरात सदैव अंतर्हित होती. व जेव्हा ती स्वतः व्यक्त होण्यासाठी प्रारंभ करते तेव्हा ती थेंबाना व्यक्तिमत्त्व प्रदान करते.जेव्हा ही उर्मी प्रशांत जलाशयाला विचलित करते तेव्हा त्या ठिकाणी या थेंबाच्या सभोवती त्वरीत असंख्य बुडबुडे किंवा स्वरुपे उफाळून येतात आणि हेच ते बुडबुडे असतात की जे थेंबांना व्यक्तिमत्व प्रदान करतात. बुडबुडे वास्तविक अविभाज्य महासागराला विलग करीत नाहीत आणि करुही शकत नाहीत, ते थेंबाला महासागरापासून वेगळे करु शकत नाहीत ते ह्या थेंबांना केवळ विभक्तपणाची किंवा मर्यादित व्यक्तिमत्वाची संवेदना प्रदान करतात.

आपण आता विभिन्न अवस्थेतून जाणाऱ्या एका थेंबाच्या रुपात असलेल्या आत्म्याच्या ( जीवात्म्याच्या) जीवनाचा अभ्यास करु. बुडबुडा निर्माण झाल्यामुळे थेंबरुप आत्मा जो पूर्णतः अचेत होता तो आता स्वतंत्र व्यक्तिमत्वाने (किंवा वेगळेपणाच्या भावनेने ) संपन्न होतो तसेच त्याला अत्यंत अल्प चेतना प्राप्त होते. ही चेतना जी थेंबरुपी आत्म्यात उसळली ती ना त्याची स्वतःची होती ना महासागराची होती, परंतु ती होती बुडबुड्याची किंवा रुपाची, जे रुप स्वतःच शून्य असते. हा अपूर्ण बुडबुडा या अवस्थेत पाषाण रुपाचे प्रतिनिधित्व करतो. काही काळानंतर हा बुडबुडा किंवा हे रुप विस्फोटित होते व त्याच्या जागेवर दुसरा बुडबुडा किंवा रुप निर्माण होते. आता जेव्हा बुडबुडा फुटतो तेव्हा दोन गोष्टी घडतात (१) चेतनेची वृध्दी होते व २) आधिच्या बुडबुड्याच्या जीवनकाळात संकलित झालेले संस्कार दृढमूळ होतात व त्यांना पीळ (twist) बसतो. थेंबरुप आत्म्याच्या चेतनेची आता किंचित वृध्दी होते परंतु थेंबरुप आत्मा अजुनही केवळ या नवीन बुडबुड्याच्या किंवा रुपाच्या संदर्भात सचेत असतो व स्वतः विषयी किंवा महासागराविषयी सचेत नसतो. हा नवीन बुडबुडा आता धातूयोनीचे प्रतिनिधित्व करतो. ह्या नवीन बुडबुड्याचा किंवा रुपाचा देखील यथावकाश विस्फोट होतो व त्याचवेळी तेथे चेतनेची अधिक वृध्दी होते व संस्कार दृढमूल होतात. किंवा संस्कारांना नवीन पीळ बसतो. व ज्यामुले दुसऱ्या नवीन प्रकारच्या बुडबुड्याचा किंवा रुपाचा उद्‌भव होतो.

ही प्रक्रिया उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून निरंतर चालू राहते जी पाषाण धातू, वनस्पती, कीटके, मासे, पक्षी आणि प्राणी या अवस्थांना समाविष्ट करते. प्रत्येक वेळी आधिचा बुडबुडा किंवा रुपाचा विस्फोट झाला की, ती घटना

चेतनेच्या अधिक वृध्दीचे कारण बनते व आधीच संकलित झालेल्या संस्कारांना एक अधिक संस्कारांचा पीळ बसतो व अशाप्रकारे ही प्रक्रिया मानवरुपी बुडबुडा किंवा रुपापर्यंत पोहोचते, ज्या रुपात निरंतर वाढणारी चेतना परिपूर्ण व समग्र होते. संस्कार गुंडाळण्याच्या या प्रक्रियेत या संस्काराला नियमित बसलेल्या पीळांचा समावेश होतो, व हेच संस्कारांना बसलेले पीळ थेंबरुप आत्म्याने प्राप्त केलेली चेतना जरी ती मानव देहात परिपूर्ण विकसित झालेली असली तरी ती यथार्थ स्व कडे निर्देशित किंवा स्थिर न करता ती बुडबुड्याकडे किंवा रुपाकडे निर्देशित व स्थिर करतात.

मानवरुप प्राप्त केल्यानंतर दुसरी प्रक्रिया प्रारंभ होते व ही प्रक्रिया असते पुनर्जन्माची. या ठिकाणी संस्कार गुंडाळण्याची प्रक्रिया समाप्त होते. थेंबरुपात असलेला आत्मा असंख्य मानव देह एकामागून एक घेतो व हे मानवदेह तंतोतंत ८४ लक्ष असतात. ही मानवरुपे कधी पुरुषाची तर कधी स्त्रीची असतात. आणि ही रुपे राष्ट्रीयत्व स्वरुपे वर्ण व पंथ बदलत राहतात. थेंबरुप आत्मा मानवी पुनर्जन्माव्दारा कधी भिकाऱ्याचा तर कधी राजाचा अनुभव घेतो व अशाप्रकारे आपल्या चांगल्या किंवा वाईटस संस्कारानुसार सुखाचा किंवा दुःखाचा परस्पर विरोधी अनुभव गोळा करतो. पुनर्जन्मात (म्हणजे आपल्या एकानंतर एक अशा अनेक मानव देहात ) थेंबरुपी आत्मा आपली पूर्ण चेतना राखून ठेवतो परंतु साक्षात्काराची प्रक्रिया प्रारंभ होई पर्यंत, परस्पर विरोधी संस्कारांचा आळीपाळीन अनुभव घेणे सुरुच ठेवतो. आणि साक्षात्काराच्या या प्रक्रियेत संस्कारांची उकल होते.

पुनर्जन्माच्या कालावधित संस्कार खर्च होत राहतात, परंतु हा संस्कारांचा खर्च व त्यांची उकल जी साक्षात्कार प्रक्रियेच्या कालावधित होते, त्यापेक्षा अगदीच वेगळी असते. संस्कार खर्च करण्याच्या क्रियेमध्येच नवीन संस्कार निर्माण होतात – जे आत्म्याकरिता बंधन निर्माण करतात. परंतु संस्कारांची उकल  मात्र (स्वतः) नवीन संस्कार निर्माण करीत नाही व या प्रक्रियेचा उद्देश, त्या संस्कारांची पकड नष्ट करण्याचा असतो, ज्यामध्ये थेंबरुप आत्मा अडकलेला असतो.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवी योनीपर्यंत संस्कारांचे गुंडाळणे अधिक दृढ होत जाते. मानव रुपाच्या पूर्नजन्माच्या प्रक्रियेमध्ये गुंडाळण्याची क्रिया एक

मर्यादित करणारा घटक म्हणून कार्य करते, परंतु प्रत्येक मानवी बुडबुडा किंवा शरीराचे अदलाबदलीचे बरोबर, घट्ट गाठी, ज्या गुंडाळण्याच्या प्रक्रियेच्या कालावधित पडल्या होत्या त्या गाठी साक्षात्कार प्रक्रियेत उकलण्यासाठी तयार होण्यापूर्वी चौऱ्यांशी लक्ष पुनर्जन्माच्या झटक्यामुळे* शिथिल होतात.

आता साक्षात्काराची तिसरी प्रक्रिया प्रारंभ होते जी वर जाण्याची प्रक्रिया आहे. या अवस्थेत थेंबरुपी आत्म्याचे संस्कार हळूहळू उकलणे सुरु होते. उकलण्याच्या या प्रक्रियेच्या दरम्यान संस्कार उत्तरोत्तर क्षीण होत जातात व त्याचबरोबर थेंबरुपी आत्म्याची चेतना आपल्या स्वकडे अधिकाधिक निर्देशित केली जाते. अशाप्रकारे थेंबरुप आत्मा जोपर्यंत संपूर्ण संस्कार नष्ट होत नाहीत व तो स्वतः महासागर असल्याच्या चेतनेने युक्त होणायास योग्य बनत नाही, तो पर्यंत सूक्ष्म व मनोभूमिकांतून पार होणे सुरु ठेवतो.

परमात्म्याच्या अनंत महासागरात तुम्ही एक थेंब किंवा आत्मा आहात. तुम्ही सामान्य स्थितीत एक आत्मा आहात व तुम्ही आपल्या चेतनेचा उपयोग बुडबुडा किंवा रुप पाहण्यासाठी किंवा अनुभविण्यासाठी करता. बुडबुड्याच्या स्थूल थराव्दारां तुम्ही त्या विशाल स्थूल बुडबुड्याच्या एका भागाचा अनुभव घेता, जी पृथ्वी आहे. तुम्ही परमात्म्यात शाश्वतरित्या निवास करीत आहात व अविभाज्यपणे परमात्म्याशी एक आहात. परंतु तुम्ही त्याचा अनुभव घेत नाही. प्रगत अवस्थेत तिसऱ्या भूमिकेपर्यंत तुम्ही सूक्ष्म बुडबुडा किंवा रुपाव्दारां (ज्याला सूक्ष्म देह म्हणतात) विशाल सूक्ष्म बुडबुडा (ज्याला सूक्ष्म जगत म्हणतात) ते पाहण्यासाठी व अनुभविण्यासाठी तुमच्या चेतनेचा उपयोग करता, परंतु तुम्ही परमात्म्याला,ज्यात तुम्ही वास करता, त्याला पहात व अनुभवित

* पुष्कळ वाचकांना ह्या गोष्टीतील फरक कळला नाही की, मेहेरबाबांनी जीवन चक्राचे वर्णन लौकिक रीतीने केलेले आहे. जसे उत्क्रांती, पुनर्जन्म, आत्मानुवर्ती उत्क्रांती व साक्षात्कारांची प्रक्रिया.

या ग्रंथातील वरील विधान, यातीलच पान १८८ परिच्छेद १ च्या विधानाशी विसंगत वाटेल या भीतीने आम्ही एरच. बी. जेसावाला यांना स्पष्टीकरणार्थ विचारले.त्यांनी उत्तर दिलेः एखादी व्यक्ती चेतनेच्या भूमिकांवर आली असेल तर पुनर्जन्माची प्रक्रिया आपल्या अंतिम ठिकाणावर आली आहे असे म्हणता येईल. प्रियतम परमेश्वराकडे जाणाऱ्या अध्यात्म मार्गावर त्याला पाहण्याची व त्याच्याशी एकरुप होण्याची अधीरता तीव्र होते. इतके पुनर्जन्म चेतनेवर भार टाकलेल्या संस्कारामुळे जे आवश्यक होतात, ते पुनर्जन्म ८४ लक्ष झटक्यांच्या तुलनेत अगदीच शून्यवत् वाटतात.– संपादक

नाही,  कारण तुमची चेतना आता परमात्म्याकडे निर्देशित झालेली नसते. अजून जास्त प्रगत अवस्थेमध्ये,चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत तुम्ही मनोबुडबुडा किंवा रुपाचे (ज्याला मनोदेह म्हणतात) व्दारां विशाल मनोबुडबुडा ( ज्याला मनोजगत म्हणतात) पाहण्यासाठी व अनुभविण्यासाठी तुम्ही तुमच्या चेतनेचा उपयोग करता. परंतु आताही तुम्ही परमात्म्याचा अनुभव करीत नाही. परंतु परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यानंतरच्या अवस्थेत तुम्ही तुमच्या चेतनेचा परमात्म्याला पाहण्यासाठी व अनुभविण्यासाठी निरंतर उपयोग करता, व तेव्हा या अवस्थेत सर्व रुपं काहीच नसून केवळ बुडबुडे असल्याचे ज्ञान होते.

तेव्हा आता कल्पना करा की, तुम्ही एक आत्मा–थेंब अहात जो स्थूल शरीरानंतर पाच थरांच्या पाठीमागे परमात्म्यात स्थित आहे. तुम्ही आत्मा–थेंब , आता स्थूल शरीराकडे व त्याव्दारां स्थूल जगताकडे पाहत आहात. जेव्हा तुम्ही दुसऱ्या थराकडे पाहता व त्याव्दारां पाहिले असता तुम्हाला पहिला थर काहीच नसून एक केवळ थर असल्याचे दिसेल व अशा प्रकारे प्रत्येक थराचे पाठीमागे हे सर्व थर  आपल्या छायेप्रमाणे आच्छादनाचे रुपात प्रतीत होतील व अगदी शेवटी जेव्हा तुम्ही (म्हणजेच आत्मा–थेंब) परमात्म्याकडे पाहाल व त्याच्यात विलीन व्हाल तेव्हा तुम्हाला अनुभव येईल की, केवळ तुम्हीच सत्य आहात व सर्व जे काही तुम्ही आता पावेतो पाहत व अनुभवित होता ते काहीच नसून केवळ तुमचीच स्वतःची छाया होती.

**(रेखाचित्र ९ व १० चे स्पष्टीकरण)**

**रेखाचित्र ९ :** नवव्या रेखाचित्रातील मोठे अर्ध वर्तुळ 'परमात्मा' म्हणून दर्शविते, ज्यामध्ये विश्वातील सर्वगोष्टींचा समावेश आहे. एका व्यक्तिगत आत्म्याचे जीवन उत्क्रांती, पुनर्जन्म व आत्मसाक्षात्काराची प्रक्रिया अशा तीन प्रमुख पायऱ्यांनी दर्शविले आहे.

''S'' व्यक्तिगत आत्म्याचे प्रतिक आहे. मानव–देह प्राप्त होईपर्यंत आत्मा पुढील अस्तित्व प्रकारांच्या प्रत्येकी सात योनियांमधून जातो, जसे पाषाण, धातू, वनस्पती, कीटक, मत्स्य, पक्षी व प्राणी सातव्या अवस्थेत म्हणजेच नवीन प्रकारच्या अस्तित्वात प्रविष्ट होण्यापूर्वी तुम्हाला एका पीळाचे किंवा गाठीचे चित्रमय निर्देशन दिसेल – जो पीळ किवा गाठ प्राप्त केलेल्या

संस्कारांच्या संकलनाचे प्रतिक आहे. व्यक्तिगत आत्मा ''S'' च्या सभोवती असलेले बाह्य लाल वर्तुळ उत्क्रांती प्रक्रियेच्या कालावधीत संकलीत केलेले संस्कार निर्देशित करते व ''S'' ची निळी बाहुली चेतना निर्देशित करते जी चेतना एकाच वेळी विकसित होत जाते. ''A'' हा आत्मा उत्क्रांती, पुनर्जन्म साक्षात्काराच्या प्रक्रियेतून गेल्यानंतर ''Z'' आत्मा होतो. केवळ परमात्म– अवस्थेतच चेतना संस्कारापासून पूर्णपणे मुक्त होते.

स्थूलजगत, सूक्ष्मजगत व मनोजगत (म्हणजेच अन्न भूमी, प्राण भूमी व मनोभूमी) उजव्या बाजुला प्रत्येक मोठ्या वर्तुळाने निर्देशित केले आहेत. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवपूर्व अवस्थांमध्ये ज्याअर्थी स्थूल जगताची चेतना परिपूर्ण विकसित नसते, त्यामुळे रेषा ज्या पाषाण, धातू, वनस्पती, कीटक, मत्स्य, पक्षी व प्राण्यांच्या आत्म्याशी त्यांच्या क्रमाने पाषाण,धातू, वनस्पती, कीटक,मत्स्य, पक्षी व प्राण्यांच्या योनींमधून जोडल्या आहेत, त्यामुळे त्या रेषा स्थूल जगताला केवळ अंशतः स्पर्श करताना दाखविल्या आहेत. दरम्यान जेव्हा मानव देहात चेतना परिपूर्ण विकसीत झालेली असते त्यामुळे ती ( अनुरुप रेषांव्दारां) अशाप्रकारे प्रदर्शित केल्या गेली आहे की ती संपूर्ण स्थूल जगताला त्याच्या विभिन्न पैलूसह समजण्यास पात्र झालेली आहे.

पुनर्जन्माच्या प्रक्रियेत, आत्मा पुरुषाचा किंवा स्त्रीचा देह घेऊ शकतो व तो कोणत्याही राष्ट्रीयत्वाचा, पंथाचा किंवा धर्माचा असू शकतो. आत्मज्ञानाच्या दृष्टीकोनातून पाहिले असता, मानव देह प्राप्त होईपर्यंतची प्रक्रिया प्रत्यक्षात उतरताक्रम दर्शविते, जरी ती रेखा चित्रात चढत्या क्रमाची असल्यासारखी दिसते व आत्मसाक्षात्काराची प्रक्रिया प्रत्यक्षात चढता क्रम प्रदर्शित करते, जेव्हा हा क्रम रेखाचित्रात उतरता दिसतो, या दोन्ही प्रक्रिया अनुक्रमे संस्कार गुंडाळण्याच्या गाठीच्या रेषेनी पाषाण अवस्थेपासून स्थूल जगापर्यंत व संस्कार उकलण्याच्या गाठीच्या रेषेनी जी रेषा स्थूल जगतापासून परमात्म अवस्थेपर्यंत खाली येते– दाखविल्या आहेत. संस्कारांच्या गुंडाळण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सामान्य पुनर्जन्माची प्रक्रिया सुरु होते व ती तो पर्यंत सुरु राहते जो पर्यंत संस्कारांची उकल प्रारंभ होत नाही.

साक्षात्काराच्या प्रक्रियेत पहिल्या भूमिकेपासून तो तिसऱ्या भूमिकेपर्यंत प्रगत आत्मे केवळ सूक्ष्म जगताविषयी त्यांच्या सूक्ष्म देहांव्दारां

सचेत असतात. स्थूल जाणीव असलेल्या सामान्य आत्म्याविषयी त्यांना चेतना असते व सूक्ष्म जगतात ते त्यांच्यावर कार्य करु शकतात, परंतु हे सर्व कार्य ते त्यांच्या सूक्ष्म देहाव्दारां सूक्ष जगतात करतात व त्यांच्या स्थूल शरीराचा स्थूल जगताशी संबंध नसतो. याच प्रकारे चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत असलेल्या प्रगत आत्म्यांना स्थूलसचेत व सूक्ष्म सचेत अत्म्याविषयी जाणीव असते परंतु ते मनोजगतात मनोदेहाव्दारां त्यांच्यावर कार्य करतात, परंतु स्थूल शरीराव्दारां स्थूल जगताशी त्यांचा कसलाही संबंध नसतो, तसेच सूक्ष्म देहव्दारां सूक्ष्मजगताशी देखील त्याचा संबंध नसतो. त्यामुले रेखा चित्रात दिलेल्या रेषा सूक्ष्मसचेत आत्म्यांना केवळ सूक्ष्म जगताशी जोडतात आणि त्याचप्रकारे अनुरुप रेषा मनःचेतन आत्म्यांना केवळ मनोजगताशी जोडतात.

परमात्म–अवस्थेत सर्व संस्कारांची उकल होते व चेतना केवळ परमात्म्याकडे वळते, ही आहे मज्झूब–ए कामिलची अवस्था, ज्यांचा संबंध ना स्थूल ना स्थूल ना सूक्ष्म ना मनोजगताशी असतो. परंतु अगदीच थोडे असे असतात की जे परमेश्वरी अवस्थेचा आनंद घेत असताना सुध्दा खालच्या पातळीवर उतरुन समग्र सृष्टीची चेतना पुन्हा प्राप्त करतात हे सद्‌गुरुंचे (पूर्ण पुरुषाचे) आत्मे होत. सद्‌गुरुंचा आत्मा सात केन्द्रिय रंगीत लहान वर्तुळांनी* दर्शविला आहे. पुढील मुद्दे ( जे जोडणाऱ्या रेषांनी दाखविल्या गेले आहेत) काळजीपूर्वक लक्षात घेतले पाहिजेत. १) सद्‌गुरुचा आत्मा परब्रम्ह परमात्म–अवस्थेशी जोडला आहे जी विज्ञान भूमिका किंवा सद्‌गुरुचे विश्रामस्थान आहे. २) जे परमात्म–अवस्थेशी जोडलेले आहे. ३) ते न केवळ तिनही जगताशी जोडलेले आहे तर ते सर्व आत्म्याशी जोडलेले आहेत, ते मग मनोसचेत, सूक्ष्मसचेत किंवा पुनर्जन्म घेणारे मानवी प्राणी (जे स्थूल सचेत असतात)असोत–किंवा उत्क्रांतीच्या अवस्थेतील मानवपूर्व योनीतील आत्मे असोत.

**रेखाचित्र : १०**

रेखाचित्र दहामध्ये मानव योनीपर्यंत उत्क्रांतीच्या प्रकियेचे व परमात्म्य–प्राप्त अवस्थेपर्यंत आत्म्याच्या साक्षात्कार प्रक्रियेचे विवरण दिलेले आहे. सर्वात आतील लहान वर्तुळ जे S ने संदर्भित केले आहे, ते व्यक्तिगत

* त्यांचे महत्व समजण्यासाठी रेखाचित्र दहावे पहा.

आत्म्याचे प्रतिक आहे. त्यानंतर आत्म्याच्या सभोवती मानवी अवस्थेपर्यंत वाढत्या संख्येने वर्तुळे दाखविलेली आहेत व आत्मा नंतर या वर्तुळांना कायम ठेवताना दाखविले आहे.

आत्म्याच्या नंतरच दुसरे वर्तुळ चेतना दर्शविते, जी चेतना मानवी योनीपर्यंत वृध्दींगत होत जाते परंतु त्यानंतर ती स्थिर रहाते. उत्क्रांतीमध्ये वनस्पती अत्यंत अविकसित सहजप्रवृत्ती (instict) प्राप्त करते, परंतु सूक्ष्म शरीर* प्राप्त करीत नाही, ज्याचा उद्‌भव अत्यंत अविकसित स्वरुपात असलेल्या कीटक व सरपटणाऱ्या प्राण्यात होतो. मानव देहात पूर्णपणे विकसित होत नाही तोपर्यंत हा सूक्ष्मदेह विकसित होत राहतो. सूक्ष्मदेहाच्या विकासाबरोबरच एकाचवेळे उपजत बुध्दिचाही विकास होत राहतो. अंशतः विकसित अवस्थेत बुध्दी (intellect) अगदी पहिल्या प्रथम प्राणी अवस्थेत दृश्यमान होते, परंतु मनोदेह मात्र केवळ अंतिम अवस्थेत अर्थात मानवरुपात प्रकट होतो.

मानव योनीत अगदी आतील प्रथम वर्तुळ व्यक्तिगत आत्म्याचे प्रतिक आहे. दुसरे बाह्य वर्तुळ पूर्ण चेतनेचे प्रतिक आहे व त्यानंतरची बाह्य वर्तुळे ज्या क्रमाने ती रेखाटली आहेत त्याप्रमाणे अनुक्रमे : १) व्यक्तिमत्वाचे आसन २) संस्कार किंवा अव्यक्त इच्छा–वासना ३) बुध्दी ४) मनोदेहातील संवेदना – इच्छावासना ५) सूक्ष्मदेह ज्यामध्ये अंशतः अव्यक्त इच्छा असतात. ६) स्थूलदेह ( ज्यामध्ये इच्छा पूर्ण व्यक्त झालेल्या असतात) यांची प्रतिके आहेत.

आत्म्याच्या सर्वात आतील वर्तुळाच्या सभोवतालची सर्व वर्तुळे, चेतनेच्या वर्तुळाचा अपवाद सोडल्यास चेतनेचे थर आहेत. या थरांपैकी बाह्य वर्तुळ व त्यालाच जोडलेले दुसरे वर्तुळ अनुक्रमे स्थूल व सूक्ष्मदेहांचे प्रतिनिधित्व करतात. त्याचवेळी चेतनेच्या सभोवतालचे इतर चार थर एका मनोदेहाच्या चार कार्याची प्रतिके आहेत. मनोदेहाच्या या चार कार्यापैकी दोन (म्हणजेच अनुभूत इच्छा व बुध्दी ) मनाचे अंतर्गत येतात, व इतर दोन

---

* तथापि गॅसरुपात, किंवा पाषाण किंवा धातू किंवा वनस्पती रूपात आत्मा स्वतःदेखील जरी अचेतनेने स्वतःचे एकरुपत्व त्याच्या अत्यंत सीमित सूक्ष्मरुपांशी व अत्यंत सीमित मनोरुपाशी करतो. ( मुळ पाठाचे पान पहा –संपादक)

(म्हणजेच संस्कार किंवा अव्यक्त इच्छा व व्यक्तिमत्वाची भावना) अहंकाराच्या अंतर्गत येतात. अशाप्रकारे मानव अवस्थेत आत्म्याला त्याच्या चेतनेसह तीन शरीरे आहेत परंतु थर सहा आहेत (स्थूल थरासह ज्याला स्थूल शरीर म्हणतात.)

जेव्हा (पुनर्जन्मानंतर ) मानवी आत्मा साक्षात्काराच्या प्रक्रियेवर प्रारंभ करतो तेव्हा, बुध्दिच्या ठिकाणी अंतःप्रेरणा स्थानापन्न होते, जी पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंत अभिव्यक्त होते व चौथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत अंतःप्रेरणा (inspiration) दिव्यद्दष्टीत (illumination) परिवर्तित होते. रंगीत लहान वलये किंवा ज्याचा एकच केन्द्रबिंदू आहे अशी वर्तुळे (Concentric Circles) त्याच्या अधिकारात असलेल्या सर्व वाहनासह परमात्म्य साक्षात्कारित व्यक्तीच्या आत्म्याची प्रतिके आहेत. या रेखाचित्राच्या संदर्भात पुढील मुद्दे काळजीपुर्वक लक्षात घेतली पाहिजेत.

१) तीन बाह्य वलये अनुक्रमे स्थूल, सूक्ष व मनोदेहाचे प्रतिनिधित्व करतात. आपण ही सर्व शरीरे सामान्य मानवी प्राण्यात देखील पाहतो. २) परमात्म – साक्षात्कारित व्यक्तीत एका आध्यात्मिक शरीराचा उदय होतो, ज्याला विश्वात्मक शरीर किंवा महाकारण शरीर असे म्हणतात. जे विश्वात्मक मनाचे अधिष्ठान असते. ज्याप्रमाणे पेल्यात पाणी भरलेले असते त्याचप्रमाणे विश्वात्मक मन हे विश्वात्मक शरीरात भरलेले असते, असे आपण म्हणू शकतो. म्हणून जरी विश्वात्मक शरीर व विश्वात्मक मन हे दोन वेगळ्या वर्तुळांनी दाखविलेले असले तरी ते एकमेकापासून अविभाज्य आहेत. (सद्‌गुरुचे विश्वात्मक मन –जे त्यांच्या विश्वात्मक शरीराव्दारां कार्य करते ते सृष्टीतील सर्व व्यक्तिगत आत्म्यांच्या मनोशरीरांच्या प्रत्यक्ष संपर्कात असते व ते ह्या मनोदेहांव्दारा मनोजगतात, सूक्ष्म जगतात व स्थूल जगतात कोणताही बदल घडवून आणू शकते. सद्‌गुरुला जरी साधारण मानवाप्रमाणे मनोदेह असला तरी तो केवळ आपल्या विश्वात्मक मनाव्दारां सदैव कार्य करतो.) ३) सद्‌गुरुच्या आत्म्यात मानवी अवस्थेतील सीमित अहं, अमर्याद (सात्विक) अहंकारात परिवर्तीत होतो, त्याचा अर्थ असा की, विभक्तपणाच्या व संकुचित व्यक्तिमत्वाच्या भावनेची जागा अमर्याद, अविभाज्य व सर्वसमावेशक

अस्तित्वाच्या अनुभूतीव्दारां घेतली जाते. ४) सद्‌गुरुची आत्मा अनंत चेतनेने संपन्न केल्या जाते. संस्कारांच्या बंधनामुळे,मानवी अवस्थेतील परिपूर्ण चेतना आत्म्याची अनंतता प्रकट किंवा अभिव्यक्त करीत नाही परंतु परमात्म्य - साक्षात्कार व्यक्तीत ही पूर्ण चेतना कोणत्याच संस्कारांनी बांधलेली नसल्यामुळे ती आत्म्याच्या अनंततेला प्रकट किंवा अभिव्यक्त करते.

## १५. मेहेरबाबांनी वर्णिलेली पाच भुवने *(११६)

मेहेर बाबा सांगतात की, पाच भुवने आहेत . १) स्थूल २) सूक्ष्म ३) मन : ४) संमिश्र (संयुक्त) व ५) यथार्थ (सत्य) यापैकी पहिले चार सापेक्ष (तत्संबंधी ) अस्तित्वाशी संबंधित आहेत व पाचवे केवळ एकमेव यथार्थ अस्तित्वाचे बनलेले आहे.

असा विषय जेव्हा सामान्य मनुष्याच्या अनुभवा पलिकडे असतो तेव्हा विस्तृत विवरणाचा प्रश्न सर्वात जास्त महत्वाचा होतो. एका दृष्टीने अधिक तपशील व्यक्तीत जास्त गोंधळ निर्माण करतो व कमी तपशीलाने विषयाचे स्पष्टीकरण कमी होते. ज्याचा उपयोग निरनिराळ्या संदर्भात निरनिराळ्या दृष्टीकोनातून करावयाचा असतो, अशा विविध प्रकारच्या शब्दांना व अभिव्यक्तींना जन्म दिला जातो. वास्तविक अनुभवाच्या अभावामुळे एकाच वस्तूची वर्णने बहुधा परस्पर-विरोधी वाटतात.परंतु सापेक्ष अनुभवांचे संदर्भात किंवा अंतिम सत्याचे साक्षात्काराचे दृष्टीने तीच परस्पर -विरोधी वर्णने त्याच एकमेव सत्याविषयी पोषक स्पष्टीकरणे म्हणून सिध्द होतात. पाच भुवनांच्या पाठीमागे लपलेली ही तत्थ्ये किंवा तत्थ्यांची तत्थ्ये ह्या गोष्टीला सिध्द करतील.

प्रथम स्थूल भुवन ते जरी आपल्या अस्तित्वाकरिता पूर्णपणे सूक्ष्मावर निर्भर असले तरी ते सूक्ष्मापासून पुष्कळ बाबतीत स्पष्टतः भिन्न आहे. स्थूल भुवनात असंख्य जगतांचा , सुर्यांचा,चंद्रांचा, ताऱ्यांचा व वस्तुतः अत्यंत अविकसीत वस्तूपासून तो अत्युत्कृष्ट वस्तूपर्यंत सर्व भौतिक गोष्टींचा अंतर्भाव होतो. स्थूल भुवनातील काही जगतात केवळ खनिजे व वनस्पती अस्तित्वात आहेत. दुसऱ्या काही जगतात असंख्य शरीरधारी प्राणी देखील आहेत व काही जगतात मानव प्राणी सुध्दा आहेत. स्थूल भुवनात सर्वात महत्वाचे ठिकाण आहे आपले जग (पृथ्वी) या ठिकाणी अन्य सर्व प्राणीयांच्यामध्ये ज्यांना स्थूलाची

अधिक किंवा कमी प्रमाणात चेतना आहे, असा मनुष्य आपल्या परिपूर्ण चेतनेसह सर्व स्थूल जगतातील* इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु मनुष्य या ठिकाणी जोपर्यंत सूक्ष्माविषयी जागृत होत नाही तो पर्यंत त्याची पूर्ण चेतना स्थूलात व्यग्र राहते, जरी तो आध्यात्मिक विषयांचे –जसा तो विषय येथे चर्चिला आहे – वाचन व चिंतन करीत असला तरी.

दुसरे सूक्ष्म भुवन हे प्राणशक्तीचे भुवन आहे व ते जरी सात विभागात विभागले गेले असले तरी ते स्वतःच एक जगत आहे. त्याचे अस्तित्व मनोभुवनावर अवलंबून आहे परंतु स्थूल भुवनापासून त्याचे अस्तित्व पूर्णपणे स्वतंत्र आहे. काळ आणि अवकाशाच्या भाषेत, स्थूल भुवनाचे क्षेत्र असंख्य सूर्यांनी बनलेले अनेक विश्वे व या आपल्या पृथ्वीसह अनेक जगतांना व ग्रहांना समाविष्ट करुन असलेला हा अनंत अंतराळ,–सूक्ष्म भुवनाच्या तुलनेत केवळ एका कणाचे समान आहे.

आत्म–साक्षात्काराचा मार्ग, ज्याला सुफी 'राह–ए–तरिकत' व वेदान्ती आध्यात्मिक मार्ग म्हणतात ज्यात सात भूमिका (मुकाम किंवा स्थान ) आहेत – हा स्थूलाचे प्रथम भुवन व पाचवे यथार्थ भुवन जोडणारा एकमेव पूल आहे. या अध्यात्म मार्गावर पहिल्या तीन भूमिका सूक्ष्मात आहेत– जे दुसरे भुवन आहे.

सूक्ष्म भूवन आपली प्राणशक्ती आपले देवदूत व यापेक्षाही अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे मनुष्याच्या आंशिक व संपूर्ण चेतनेव्दारां (अर्थात स्थूलाचे

---

*याचा अर्थ असा की सर्व स्थूल भुवनातील सर्व मानवी प्राण्यात या पृथ्वीवरील मानव आध्यात्मिक दृष्ट्या श्रेष्ट आहे. मेहेर बाबा आपल्याला सांगतात की, जेथे मानवी प्राण्याची वस्ती आहे अशा स्थूल भुवनातील तीन जगतात आपलेच जग ( पृथ्वी ) एक असे आहे की जेथे मनुष्य आध्यात्मिकदृष्ट्या सर्वश्रेष्ठ आहे. बाबा जास्त स्पष्ट करुन सांगतात की, या पृथ्वीवरील मनुष्याच्या व्यक्तित्वात बुध्दी व अंतःकरण सम–प्रमाणात असते (म्हणजे शेकडा पन्नास बुध्दी व शेकडा पन्नास अंतःकरण) इतर दोन जगातील मनुष्य अनुक्रमे शंभर टक्के बुध्दी व शेकडा पंचाहत्तर बुध्दी व पंचविस टक्के अंतःकरण असे धारण करतो. मनुष्य पुनर्जन्माच्या प्रक्रियेत तीन जगतापैकी कोणत्याही एका जगतावर जन्माला येतो, परंतु आपले दैवी लक्ष म्हणजे परमात्म्य –साक्षात्कार प्राप्त करण्याकरिता त्याला याच पृथ्वीवर शेवटी मानवदेह स्वीकारुन जन्म घ्यावा लागतो. स्थूल भुवनात पृथ्वी ही अध्यात्ममार्गावरील शेवटची व सर्वोच्च पायरी आहे. दोन अन्य जगते वास्तव्याच्या दृष्टीने पृथ्वीच्या अत्यंत जवळ आहेत. ज्यावर जीवन आहे असे एकूण १८००० जगते आहेत परंतु हे दोन जगते व पृथ्वी मनुष्याच्या राहणीमानाच्या दृष्टीने एकमेकांच्या फार निकट आहेत.

अंतर्गत, स्थूलापासून अंशतः किंवा पूर्णपणे मुक्त मानवी चेतना) स्थूल भुवनात प्रविष्ट होऊन ते पार करीत असतांना, सूर्य, तारे,ग्रह व वस्तुतः स्थूल जगताचे अंतर्गत असलेली सर्व जगातील प्रत्येक वस्तू व प्रत्येक जीवासहित स्थूलाच्या अनंत अंतराळाला ( सूक्ष्म भुवन) पार करुन जाते.

सूक्ष्म, द्दष्ये, नाद, संवेदना व शक्तीच्या अमर्याद विविधतेला व तीव्रतेला स्थूल भूवनात फक्त प्राणशक्ती वगळल्यास समांतर असे काहीच नाही जी प्राणशक्ती स्थूलाच्या स्थूल मर्यादांनी सीमित झालेली असते व मानवी चेतना स्थूल मर्यादांनी वेढलेली असते.

तिसरे मनोभुवन हे भुवनांचे भुवन आहे. हे सूक्ष्म व स्थूल भुवनांपासून निरपवादपणे स्वतंत्र आहे व त्याचा भार स्वतंत्रपणे सरळ दिव्यतेव्दारां वाहिल्या जातो. मनोभुवन स्वतः व्यक्तिगत, सामुदायिक तसेच विश्वात्मक मनाचे केवळ निवासस्थान आहे. मन आपल्या स्वतःच्या भुवनाला जितके व्यापून असते तितकेच ते स्थूल व सूक्ष्म भुवनांना व्यापून टाकते.

या मनोभुवनात बुध्दी, अंतप्रज्ञा, अंतर्द्दष्टी व दिव्यदृष्टी यांच्या संदर्भातील सर्वांचा समावेश होतो.अध्यात्ममार्गावरील पाचवी व सहावी ह्या उच्च तर भूमिका देखील यात समाविष्ट आहेत. चवथी भूमिका, हे सूक्ष्म भुवनातील तिसरी भूमिका व मनोभुवनातील पाचवी भूमिका यांना जोडणारे केवळ एक संधी–स्थळ आहे.

कसेही असले तरी मनोभुवन हे यथार्थ (सत्य) भुवनास स्पर्श करीत नाही व करुही शकत नाही कारण यथार्थ भुवनास त्याचे स्वतःचे सत्य वगळल्यास त्यास इतर काहीही स्पर्श करु शकत नाही, ज्याला परमात्म्याची शाश्वत **मी परमात्मा आहे** या अवस्थेत स्वतःची चेतना असते.

चवथे जे संमिश्र भुवन आहे ज्याचा सर्वात जास्त उल्लेख होतो परंतु ते कमीतकमी समजते. हे एकविस उपभुवनांचे बनले आहे व त्यामुळे ते दोन्हीही आहे, म्हणजे एक पूर्ण भुवन आहे व स्वतः ते आपल्यामध्ये भुवनही नाही.

एकविस जोडणाऱ्या कड्या मुख्य भूवनांच्या मधिल उपभुवनांनी बनलेल्या आहेत. स्थूल भूवन व सूक्ष्म भूवनाचे मधील सात उपभुवने, सूक्ष भुवन व मनोभुवन यामधील सात उपभुवने मनोभुवन व यथार्थ भुवन  यामधील सात उपभुवने

संमिश्र भुवनाची एक विशिष्ट रचना व स्थिती पुढील दिलेल्या दोन पैकी एका तक्त्यावरुन अधिक सहज समजू शकेल.

तक्ता क्र. १    १) स्थूल

(४) संमिश्र
- ७ (सात निम्न उपभुवने)
- २) सूक्ष्म
- ७ (सात मध्यम उपभुवने)
- ३) मन :
- ७ (सात उच्चतर उपभुवने)

(५) यथार्थ

तक्ता –२    १) स्थूल भुवन (पहिले भुवन)

४) संमिश्र भुवनाची (चवथे भुवन)
सात निम्नतर उपभुवने

२) सूक्ष्म भुवन (दुसरे भुवन)

४) संमिश्र भुवनाची (चवथे भुवन)
सात मध्य उपभुवने

३) मनोभुवन ( तिसरे भुवन)

४) संमिश्र भुवनाची (चवथे भुवन)
सात उच्चतर उपभुवने

५) यथार्थ भुवन ( पाचवे भुवन)

सात निम्नतर उपभवने आध्यात्मिक दृष्टीने स्थूल भुवनापेक्षा श्रेष्ठ आहेत व ते स्थूलाला निश्चितच स्पर्श करतात, परंतु सात उच्चतर उपभुवने ही मनोभुवनापेक्षा ना आध्यात्मिकदृष्ट्या श्रेष्ठ आहेत ना ती यथार्थ (सत्य) भुवनास कधीही स्पर्श करु शकत, हे पुढे दिलेल्या तपशीलावरुन स्पष्ट होईल.

एका बाजूने सर्वात महत्वाचा अध्यात्म–मार्ग जो मनुष्य व परमात्म्यामधील एक व एकमेव पूल आहे व तो या दोन सूक्ष्म व मनोभुवनातून जातो व दुसऱ्या बाजूने ह्या दोन भुवनांमध्ये व त्याचप्रमाणे सात निम्मनतर व सात उच्चतर उपभुवनांच्या मध्ये असंख्य वस्तू व जीव आहेत व यापैकी प्रत्येक वस्तू व प्रत्येक जीव प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे या मार्गाशी मार्मिकपणे जोडलेला आहे.

सात निम्न उपभुवनापासून तो सात मध्य उपभुवनापर्यंत, सूक्ष्म

भुवनासहित, इतर वस्तूंच्या बरोबर जीवात्म्यांची (स्थूलदेह विरहित ) व अशरीरी आत्म्यांची (देवदूतांची) निवासस्थाने आहेत. सात मध्यापासून तो सात उच्चतर उपभुवनापर्यंत, मनोभुवनासहित इतर वस्तूंच्या बरोबर प्रमुख देवदूतांचे निवासस्थान आहे.

चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या शरीर त्यागलेल्या जीवात्म्यांना आनंदाच्या अवस्थेचा (सामान्यपणे ज्याला स्वर्ग म्हणतात) किंवा दुःखाच्या अवस्थेचा (सामान्यपणे ज्याला नरक म्हणतात)[३७] अनुभव घेण्यापूर्वी व अनुभव घेतल्यानंतर प्रतिक्षेच्या अवस्थेत (State of waiting)* काही काळ रहावे लागते.

परमात्म्याच्या इच्छाशक्तीला कार्यरुप देण्याकरिता देवदूत स्वयंचलित यंत्राप्रमाणे काम करतात व ते असे काहीच करीत नाहीत की ज्याची परमेश्वर इच्छा करीत नाही किंवा जे करण्याची प्रेरणा देत नाही. ह्या इच्छा सर्वव्यापक असून परमात्म्याच्या शक्ती व कार्याच्या केवळ अभिव्यक्ती असतात. थोडक्यात म्हणजे देवदूत हे पवित्र आत्मे असतात व ते भौतिक शरीराच्या गुणदोषांनी दूषित झालेले नसतात. या अर्थाने ते मानवापेक्षा श्रेष्ठ असतात, ज्याची मानवाची चेतना स्थूलाच्या पलिकडे विस्तारित झालेली नसते ( याचा अर्थ, जो मानव अजून पथावर नाही) भलेही हे विरोधाभासात्मक प्रतीत होते की, देवदूतापेक्षा कनिष्ठ असलेला मानव भौतिक शरीरामुळे दूषित होण्यात यशस्वी झाला असला तरी स्वतःमधील अंतर्हित शक्तीच्या संभाव्य क्षमतेमुळे प्रत्यक्षात श्रेष्ठ आहे. आपली अपूर्णता, मर्यादा व अवगुणांचा अनुभव करणाऱ्या मनुष्यात आपली यथार्थ शक्ती व विशुध्दता प्राप्त करण्याची पूरी क्षमता विद्यमान असते, जेव्हा हे गुण प्रमुख देवदूतांच्या देखील क्षमतेच्या आवाक्याबाहेर असतात. प्रमुख देवदूत हे मर्यादीत जीवनाची अमर्याद प्रमाणात उत्पत्ती करणे, संरक्षण करणे व संहार करण्यासंबंधी परमात्म्याच्या प्रमुख दिव्य गुणांना अभिव्यक्त करणे व अमर्याद ज्ञानाला मर्यादित प्रमाणात संचारित करण्याकरिता माध्यम बनतात. प्रमुख देवदूत असे आत्मे आहेत की जे सदैव सुखोपभोग घेतात व कधीही दुःख भोगत नाहीत.

---

* मृत्यूनंतर प्रत्येक व्यक्ती या प्रतिक्षेच्या अवस्थेत (ॲस्ट्रल जग) प्रथम जातो. नंतर स्वर्ग किंवा नरकाचा अनुभव घेऊन याच अवस्थेत परत येतो व नंतर त्याचा पुनर्जन्म होतो – अनुवादक.

प्रधान देवदूताचे निवासस्थान, चवथ्या भुवनाची उप–उत्कृष्ट मनोभुवने आहेत ज्याची या ठिकाणी चर्चा केलेली आहे ते संमिश्र भूवन तिसऱ्या भूवनानंतर आहे जे मनोभुवन असून ते पाचव्या यथार्थ भुवनाच्या अत्यंत जवळ आहे. हे सत्य आहे परंतु समग्र सत्य नव्हे कारण हे देवतांचे निवासस्थान अत्यंत निकट असूनही ते यथार्थ भुवनाला स्पर्श करु शकत नाही. प्रमुख देवदूत उच्चतम उपउत्कृष्ट मनोभुवनापासून (Sub-supramental) परमात्म्याला कधीच पाहू शकत नाहीत, परंतु तिसऱ्य मनोभुवनातील सहाव्या भूमिकेत असलेल्या मानव परमात्म्याला समोरासमोर सर्वत्र व सर्व वस्तू पाहू शकतो. शेवटच्या उप उत्कृष्ट मनोभुवनांचे अगदी अंतिम स्थान ज्याला सुफी **सदरत उल मुन्तहा** (अंतिम सीमा) म्हणतात, ज्या पलिकडे प्रमुख देवदूत गॅब्रिमल देखील जाऊ शकत नाही असा मुस्लिमांचा सामान्यपणे रास्त विश्वास आहे.

४) मनुष्याने वास्तविक समग्र चार भुवनांच्या यथार्थपणे अस्तित्वरहीत सापेक्ष अस्तित्वाच्या (Non-existent relative existences) अंतिम सात कड्यांना नेहमीच पार केले आहे कारण केवळ मनुष्यच पार करु शकतो व या सात मधील अंतिम कडीवरुन उडी मारुन तो स्वतःच्या खऱ्या भुवनात म्हणजे पाचव्या भुवनात प्रवेश करेल. थोडक्यात म्हणजे देवदूतांना जर त्या परम सत्याला प्राप्त करावयाचे असेल, जे मनुष्याला प्राप्त आहे, तर त्यांना अनिवार्यपणे आपले पद सोडून मनुष्य बनावे लागेल. जेव्हा मनुष्य हा मनुष्य म्हणून रहात नाही तेव्हा तो मी परमात्मा आहे या अवस्थेत प्रवेश करतो तेव्हा त्याला अनुभव येतो की, देवदूत व प्रमुख देवदूत वस्तुतः एका किंवा दुसऱ्या अर्थाने त्याचे स्वतःचेचे गुणधर्म आहेत.

अंततः चौथ्या अर्थात संमिश्र भुवनांच्या उच्चतर सात भुवनांचा विनाश, हे ते द्रष्य आहे की, ज्याला कयामत किंवा महाप्रलय म्हणतात. व जेव्हा ही घटना घडते तेव्हा सृष्टीचे समग्र अस्तित्वरहीत अस्तित्व आपल्या सर्व भुवनांसह व उपभुवनांसह एका व्यक्त वृक्षाप्रमाणे अव्यक्त अस्तित्वात नसणाऱ्या अप्रकट बीजरुपात पुन्हा विलीन होते व पुन्हा एकदा शाश्वताच्या लगेच दुसऱ्या क्षणी एका नवीन प्रकारे पुन्हा होण्याकरिता परत जाते.

चवथे संमिश्र भुवन सामान्यपणे पहिल्या तीन भुवनात पुढीलप्रमाणे अंतर्भूत केले जाते.

१) स्थूल भुवन +चौथ्याचा अर्थात संमिश्र भुवनाचा काही भाग ज्याला सुफी आलम–ए नासूत व वेदान्ती अन्नभुवन म्हणतात.
२) सूक्ष्म भूवन +चवथ्याचा अर्थात संमिश्र भुवनाचा काही भाग ज्याला सुफी आलम–ए मलकूत व वेदांती प्राणभुवन म्हणतात.
३) मनोभुवन +चौथ्याचा अर्थात संमिश्र भुवनाचा काही भाग ज्याला सुफी आलम ए जब्रुत व वेदांती मनोभुवन म्हणताता.

वेदांती या तीन भुवनांना (चवथे धरुन) सामुहिकरित्या त्रिभुवन ( तीन लोक) असे नाव देतात व सुफी त्यांना दो आलम (दोन लोक) म्हणतात ज्याचा अर्थ होतो एका बाजूने स्थूल व दुसऱ्या बाजूने सूक्ष्म व मनोभुवन संमिश्र भुवन धरुन आहे.

पाचवे अर्थात यथार्थ भुवन हे अध्यात्म मार्गाची सातवी भूमिका देखील आहे. सातवी भूमिका ही परम चेतनेची भूमिका आहे याचा सरळ सोप्या भाषेत अर्थ होतो की व्दैताच्या भावनेची किंचित मात्र छटा किंवा चिन्ह जे सापेक्ष अस्तित्वाच्या चारही भूवनात कमी अधिक मात्रात अन्तर्हित असते, त्यापासून पूर्णपणे मुक्त झालेली परिपूर्ण मानव चेतना असे म्हणणे चूक होणार नाही, पाचवे भुवन किंवा सातवी भूमिका ही ना भुवन आहे ना भूमिका आहे, परंतु परमात्म्याच्या स्वयं आत्म–तत्वांची यथार्थता आहे ज्याला मानवता, अल्लाह परमात्मा, ऑल माय टी गॉड, यझदान इत्यादी नावाने संबोधते. एकाच परमेश्वराच्या निरनिराळ्या अवस्थांनुसार आहे पासून तो मी परमात्मा आहे पर्यंत व मी परमात्मा आहे पासून तो मी सर्वकाही आहे पर्यंत यथार्थ भुवनाच्या निरनिराळ्या अवस्थांसाठी किंवा पैलूंसाठी विभिन्न शब्द प्रयोग आहेत, जसे सुफींचे आलम–ए –हाहूत व आलम–ए – लाहूत किंवा विज्ञान भुमिका व विज्ञान .

## १६. दृढ विश्वास व ज्ञानाचे प्रकार *(११९)

सुफी मतानुसार आध्यात्मिक जीवन हे चार पायऱ्यांचे बनले आहे व पृथ्वीवरील मानवाचे जीवन आपल्या सर्व पैलूंसहित, परमात्म साक्षात्कारांकडे घेऊन जाणाऱ्या ,निरंतर उघडत जाणाऱ्या ज्ञान व प्रकाशाच्या क्षेत्राच्या दिशेने, जाणीवपूर्वक किंवा नेणीवपूर्वक होणारी केवळ एक तयारी आहे. ह्या चार अवस्था आहेत शरीयत (धर्मशास्त्र) तरीकत (अध्यात्ममार्ग) हकीकत

(परमात्म्य –साक्षात्कार किंवा ऐक्य ) व मारेफत– ए– हकीकत )(गूढ ज्ञान किंवा सत्यानुभूती )

इमाम मुहम्मद गजाली यांना या चार पायऱ्यांची तुलना अक्रोड या फळाशी केली आहे– ज्याला चार घटक आहेत, बाह्य टरफल,आतील टरफल मगज व त्यामधील तेल, तुलना अधिक स्पष्ट करावयाची असल्यास आपण असे म्हणू शकतो की, शरीयत हे बाह्य टरफल, तरीकत हे आतील टरफल , हकीकत हे मगज व मारेफत–ए–हकीकत हे तेल आहे.

या चार पायऱ्यांवरून साधक जसजसा पुढे जातो तसतशी त्याची सत्यावरील विश्वासाच्या आस्थेची मात्रा सतत वाढत जाते. सुफींच्या मतानुसार ह्या टिकाऊ श्रध्दा (विश्वास) पुढीलप्रमाणे आहेत.

१) इल्म–उल–यकीन

(२–अ) यकीन–उल– यकीन

(२–ब) ऐन–उल्–यकीन

३)हक्क –उल–यकीन

४) उर्फ – उल – यकीन

१) इल्म–उल –यकीन किंवा बौध्दिक विश्वास हा प्रस्तरांप्रमाणे असलेल्या द्दढ आस्थेतून उत्पन्न होतो.

२ अ= यकीन–उल– यकीन किंवा परमेश्वराच्या जाणीवेव्दारां प्रत्यक्ष ज्ञानावर आधारीत विश्वास आंतरिक संवेदना, मार्गावरील द्दष्ये किंवा आध्यात्मिक अनुभव या व्दारा प्राप्त होतो. हा पहिल्या भूमिकेपासून तो पाचव्या भूमिकेपर्यंत असणाऱ्या आत्म्याचा विश्वास असतो.

(२–ब) ऐन–उल–यकीन किंवा दृष्टीव्दारां विशास (म्हणजे प्रत्यक्ष दर्शनाने मिळालेली श्रध्दा) हा विश्वास आहे जो परमात्म्याला प्रत्यक्षपणे सर्वत्र व सतत पाहण्याच्या अनुभवामुळे प्राप्त होतो. याला अंतरदृष्टी म्हणतात.

३) हक्क–उल – यकीन किंवा साक्षात्कारावर आधारलेला विश्वास (म्हणजेच प्रत्यक्ष अनुभवाव्दारा मिळालेला विश्वास) हा विश्वास आत्म्याला आध्यात्मिक प्रवासाच्या सातव्या भूमिकेवर प्राप्त होतो, याला हकीकत असे म्हणतात. या ठिकाणी आत्मा स्वतःची स्वतःमधूनच अनुभूती घेतो. ही अवस्था ऐक्याची आहे (परमात्म्याशी एकरुप होण्याची)

(४) उर्फ–उल–यकीन किंवा ज्ञाननिष्ठ विश्वास, हा विश्वास

मनुष्यातील दिव्यत्वाच्या पूर्णतेशी संबंधित आहे ज्यामुळे मनुष्य परमात्म्याचे जीवन जगत असताना त्याला आत्मा व ब्रह्माडांची सर्व रहस्ये माहीत असतात. येथे जी कार्यशक्ती काम करते ती आहे विश्वात्मक मन ( सार्वभौमिक मन किंवा अक्ल–ए–कुल) जे सर्व दिव्य विवेकाचे अधिष्ठान आहे.

विश्वासांच्या ह्या प्रकारांना अजून अधिक स्पष्ट करावयाचे झाल्यास आपण अशी कल्पना करु की एका मनुष्याला कोण्या एका भांड्यात दुध असल्याचे समजले. या माहितीवर बुध्दी आणि अंतःप्रज्ञेव्दारां दृढ विश्वास ठेवणे याला इल्म–उल–यकीन व यकीन–उल–यकीन असे म्हणतात. जर तो बुध्दी आणि अंतःप्रज्ञेव्दारां मिळालेल्या ज्ञानावर संतुष्ट होत नसेल व प्रत्यक्षात भांड्याजवळ जाण्याचा त्रास घेऊन आपल्या डोळ्यांनी दुध पाहण्याचे कष्ट घेत असेल व अशाप्रकारे विश्वास प्राप्त करीत असेल व ही वास्तविकता त्याने बुध्दीने व अंतप्रज्ञेने घेतलेल्या ज्ञानाशी जुळत असेल तर तो ज्या दृढ विश्वासाचा अनुभव घेतो त्याला ऐन–उल –यकीन असे म्हणतात. दुध पिणे व सर्वदृष्टया प्रत्यक्षात दुधाशी एकरुप होणे, त्याला हक्क–उल–यकीन चा अनुभव देते व स्वतः आपल्या अंतरंगात या सर्वांचे ज्ञान घेणे  जे दूध अभिव्यक्त करते व ज्याचे प्रतिनिधित्व करते जसे साखर पाणी,चरबी, जीवनसत्वे इत्यादी व या सर्व गोष्टींना तसेच दुधापासून मिळणाऱ्या विविध लाभांना विस्तारपूर्वक लोकांना सांगण्यास समर्थ होणे हाच ज्ञान–जन्य विश्वास किंवा गूढज्ञान म्हणजे उर्फ–उल–यकीन आहे जी मारेफत–ए– हकीकत ची स्थिती आहे.

**ज्ञानाचे पाच प्रकार–**

सुफीमतानुसार मनुष्य प्राण्यांचे चित्त प्रभावित करणारे ज्ञानाचे प्रकार पाच आहेत. पहिला प्रकार म्हणजे भौतिक ज्ञानाचा जे ज्ञान भौतिक सुख प्राप्ती पर्यंतच सीमित राहते. दुसरा प्रकार आहे शरीयत च्या ज्ञानाचा ज्याचा उपयोग अधिकांश ते लोक करतात ज्यांना आपल्या प्रतिस्पर्ध्यांना तर्काच्या व वादविवादाच्या शाब्दिक लढाईत पराभूत करावयाचे असते व याकरिताच त्यांनी ते ज्ञान प्राप्त केलेले असते. हे ज्ञान कर्मकांडी धर्मोपदेशकांचे आहे.

ज्ञानाचा तिसरा प्रकार आध्यात्मिक मार्गाच्या ज्ञानाचा आहे व हे ज्ञान अशांच्या जवळ आहे की ज्यांनी आंतरिक अनुशासन गंभिररितीने अंगिकारले व लौकिक धर्मोपदेशकांच्या समाजाचा त्याग केला. या ज्ञानात अहंकार अजूनही

कायम असतो व चांगल्या वाईटाची जाणीव अजूनही आत्म्याला चिकटून राहते. दार्शनिकांचे व विचारवंताचे ज्ञान दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांच्या मध्ये सीमा–रेषेवर स्थित असते.

ज्ञानाचा चवथा प्रकार हा परमात्मा अर्थात ‘स्व’ च्या– आत्म्याच्या (हकीकत) ज्ञानाचा प्रकार आहे. ज्याला हे ज्ञान प्राप्त होते त्याला खोट्या अहंकाराची छटा देखील नसते व व्दैतभावाच्या सर्व लक्षणांचा लोप होतो.

ज्ञानाचा पाचवा प्रकार हा यथार्थ आध्यात्मिक गूढ ज्ञानाचा आहे– हकीकतच्या मारेफतचा, जे मेहेरबान स्पष्ट करुन सांगतात की, हे ज्ञान परमात्म्याचे पूर्ण ज्ञान आहे तसेच ते या ब्रह्माडांचे देखील परिपूर्ण ज्ञान आहे. हेच पूर्णतेचे ज्ञान आहे जे रसूल (अवतार) व कुतूब (सद्‌गुरु) यांना प्राप्त झालेले असते.

जोपर्यंत आत्मा ज्ञानाच्या या सर्व अवस्था  पार करीत नाही तोपर्यँत तसव्वुफची (ज्ञानाची) सर्वोच्च अवस्था जी सुलूक (सामान्य चेतनेवर परत येणे) आहे ती कधीही प्राप्त करु शकत नाही. ज्ञानाच्या या अवस्थेत येऊन पोहोचल्यावर मनुष्य पूर्ण सुफी (सद्‌गुरु) म्हणवून घेण्याचा अधिकारी बनतो. तथापि अशी काही उदाहरणे मिळतात की, व्यक्ती मधल्या स्थितितून न जाता सरळ ज्ञानाच्या चवथ्या स्थितीत पोहोचतो परंतु अशी उदाहरणे अगदी अपवाद म्हणूनच आहेत व सद्‌गुरु जेव्हा अशा एखाद्याला अग्रेसर करतात तेव्हाच ती घडून येतात.

मेहेरबाबा सर्व अध्यात्मिक दृष्टया प्रगत आत्म्यांना पाच मूलभूत भागात विभाजित करतात  १) परमात्म्यात विलीन (परिपूर्ण आत्मा) २) परमात्म्याच्या नशेत उन्मत ३) परमात्म्यात लीन झालेले ४) परमेश्वराशी हितगुज करणारे व ५) परमात्म्याच्या (प्रेमात) उन्मत्त झालेले आत्मे. वाचकांनी डॉ. विल्डियम डॉन्किनकृत ‘दि वेफअरर्स ’ या पुस्तकाचा पहिला पाठ पान २१ ते ३७ वाचावा. या पुस्तकात बाबांनी हा विषय कसा हाताळला आहे याचे वर्णन आहे.

## १७.परमात्मा अनंत व सर्वकाही आहे *(१२७)

परमात्मा अनंत आहे व सर्वकाही आहे सर्व आत्मे परमात्म्यात आहेत काही आत्मे स्थूल जगताचा अनुभव घेतात. काही आत्मे सूक्ष्म जगताचा व काही

मनोजगताचा अनुभव घेतात व काही आत्मे परमात्म्याचा अनुभव घेतात.

ज्या अर्थी सर्व आत्मे परमात्म्यात आहेत त्या अर्थी त्यांना देखील परमात्म्यात हे विविध अनुभव प्राप्त होतात. जे अनुभव घेतात ( अनुभव करणारे) व प्रत्यक्ष हे अनुभव सर्व परमात्म्याचे अंतर्गत असतात. जरी अनुभव घेणारे व अनुभव परामात्म्यात आहेत तरी ते परमात्म्याचे नसून ते 'काही नाही' चे असतात.

परमात्मा 'सर्व काही' आहे व ' काही नाही' हे' सर्व काही' च्या अंतर्गत आहे.

म्हणून जे आत्मे केवळ शरीर प्राण व मनाबद्दल सचेत आहेत ते आपल्या 'स्व'बद्दल (खरे स्वरुप) सचेत नाहीत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे असे आत्मे 'काही नाही'चे बाबतीत सचेत असतात व 'सर्व काही' बाबत सचेत नसतात. असे आत्मे स्थूल सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव घेतात परंतु परमात्म्याचा अनुभव घेत नाहीत. याचा अर्थ असा की ते 'काही नाही' चा अनुभव घेतात व 'सर्व काही'च्या अनुभव घेत नाहीत. म्हणून असे म्हणता येईल की आत्मे जे परमात्म्यात आहेत त्यांना स्वतःबद्दल (आपल्या खऱ्या स्वरुपाबद्दल) चेतना नसते व ते परमात्म्याचा अनुभव करीत नाहीत परंतु त्याना 'काही नाही' ची चेतना असते व ते 'काही नाही'चे असून ते मायेचा (काही नाही) चा अनुभव घेतात.

हे आत्मे आपण स्वतः 'काही नाही' शी इतके यथार्थतेने एकरुप होतात की ते प्रत्यक्षात 'काही नाही' च बनतात. प्रत्येक जीव 'काही नाही' चे मूर्तिमान रुप आहे.

सर्व जीव व सर्व वस्तू 'काही नाही' ची मूर्तिमान रुपे आहेत जे 'सर्व काही' मध्ये आहेतच.

## १८ : पाच आध्यात्मिक तथ्ये *(१५९)

१) सामान्य मानव प्राणी : मनुष्य, मनुष्य म्हणून आपल्या स्वतःला प्रत्येकात व प्रत्येक वस्तूत पाहतो.

२) सहाव्या भूमिकतील पीर– मनुष्य, मनुष्य म्हणून परमेश्वराला प्रत्येकात व प्रत्येक वस्तूत पाहतो.

३) सातव्या भूमिकेतील मज्झूब – परमात्मा, परमात्मा म्हणून आपल्या स्वतःला प्रत्येकात व प्रत्येक वस्तूत पाहतो.

४) कुतूब – परमात्मा, मनुष्य म्हणून आपल्या स्वतःला एकाच वेळी प्रत्येकात व प्रत्येक वस्तूत पाहतो.

५) अवतार – परमात्मा, परमात्मा व मनुष्य म्हणून आपल्या स्वतःला एकाच वेळी प्रत्येकात व प्रत्येक वस्तूत पाहतो. – मेहेर बाबा

## १९ : खरा जन्म व खरा मृत्यू *(१६३)

खरा एकच जन्म आहे व खरा एकच मृत्यू आहे. तुमचा एकदाच जन्म होतो व खऱ्या अर्थाने केवळ एकदाच मृत्यू पावता.

खरा जन्म म्हणजे काय ?

हा जन्म आहे थेंबाचा, सत्याच्या महासागरात एका थेंबाचा जन्म म्हणजे काय ? याचा अर्थ आहे – हे व्यक्तिमत्वाचे अवतरण आहे, ज्याचा जन्म अगदी पहिल्या अत्यंत सीमित चेतनेच्या अगदी अंधुक स्फुरणाचेव्दारां अविभाज्य असलेल्या स्थितीतून झाला, ज्याने असीमतेच्या अंतर्गत सीमिततेच्या लक्षणाला अस्तित्व प्रदान केले.

खऱ्या मृत्यूचा अर्थ काय ?

याचा अर्थ चेतना, जी सर्व बंधनापासून मुक्त होते. सर्व बंधनापासून मुक्ती म्हणजे खरा मृत्यू. हा खऱ्या अर्थाने सर्व बंधनाचा मृत्यू होय. ही आहे मुक्ती. खरा जन्म व खरा मृत्यू यामध्ये तथाकथित जन्मांची व मृत्यूंची अशी कोणतीच यथार्थता नाही.

जन्म व मृत्यू म्हणून ओळखऱ्या जाणाऱ्या या दोन अवस्थांच्या मध्ये खरोखर जे घडते ते म्हणजे चेतना सर्व बंधनापासून मुक्त होत नाही तोपर्यंत चेतनेची बंधने हळूहळू जीर्ण होत जातात. सरतेशेवटी सर्व बंधनापासून पूर्णपणे मुक्त झालेली चेतना शाश्वतरित्या अमर्याद सत्यतेचा अनुभव घेते. खऱ्या अर्थाने मरणे हे खऱ्या अर्थाने जगण्याचे समान आहे. म्हणून मी ठामपणे सांगतो की, परमात्म्यासाठी मरा म्हणजे तुम्ही परमात्मा म्हणून जगाल.

तुम्ही प्रथम मूल असता. त्यानंतर तुम्ही वृध्द होता व शरीराचा त्याग करता परंतु तुम्ही कधीच मृत्यू पावत नाही व तुमचा कधीच जन्म झाला नव्हता. पौर्वात्य देशात वेदांती पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात व जोपर्यंत व्यक्तीला परमात्म–स्थिती प्राप्त होत नाही तोपर्यंत जन्म–मृत्यू होत राहतात. मुसलमान फक्त एक जन्म व एकच मृत्यू मानतात. इसाई व पारसी देखील यावर विश्वास

ठेवतात. सर्वच बरोबर आहेत. परंतु येशू, बुध्द, मुहम्मद, झरथ्रुष्ट यांनी देखील तेच ध्वनित केले आहे, ज्याला मी खरा जन्म व खरा मृत्यू म्हणतो. मी म्हणतो तुम्ही एकदाच जन्माला येता व एकदाच मृत्यू पावता.

सर्व तथाकथित जन्म व मृत्यू केवळ निद्रा व जागृत होणे आहे. निद्रा व मृत्यूमध्ये फरक हा आहे की, निद्रेनंतर तुम्ही जागे होता तेव्हा तुम्हाला तुम्ही त्याच शरीरात असल्याचे आढळते, परंतु मृत्यूनंतर तुम्ही एका भिन्न शरीरात जागे होता. तुम्ही कधीही मृत्यू पावत नाही. केवळ भाग्यशाली लोक मरतात व परमात्म्याशी एकरुप होतात.

## २० : फना व फना-फिल्लाह *(१८३)

फना ही अचेत चेतनेची अवस्था आहे. फना-फिल्लाहमध्ये आत्मा सर्व गोष्टींबद्दल अचेत असतो, फक्त त्याला आपण स्वतः परमात्मा असल्याची चेतना असते.

आत्म्याला आपली मानवी अवस्था त्यागण्यापूर्वी व निर्विकल्पाची दिव्य अवस्था प्राप्त करण्यापूर्वी 'निर्वाण' च्या शुन्य अवस्थेचा अनुभव घ्यावा लागतो.

निर्वाण ही अनंत पोकळी आहे. या अवस्थेत आत्मा खऱ्या 'काही नाही' च्या अवस्थेबाबत परिपूर्ण सचेत असतो. जर या निर्वाणच्या अवस्थेत मानवदेह त्यागला गेला तर ती व्यक्ती परमात्म्याच्या अनंत आनंदाच्या अवस्थेत प्रविष्ट होते.

काहींच्या बाबतीत निर्वाणनंतर लगेच अनिवार्यतः 'निर्विकल्प' किंवा 'फना-फिल्लाह' ही अवस्था प्राप्त होते, ज्या अवस्थेत आत्म्याला यथार्थ 'सर्वकाही' च्या प्रती परिपूर्ण चेतना असते. निर्वाण व निर्विकल्प ह्या अवस्था इतक्या घनिष्ठरूपाने जोडलेल्या आहेत की त्या प्रत्येक अवस्थेला दिव्य लक्ष्य म्हणता येईल.

मिथ्या 'काही नाही' = मिथ्या 'सर्वकाही'

यथार्थ 'काही नाही' = ना 'सर्वकाही' ना 'काहीनाही'

यथार्थ 'सर्वकाही' = अनंत परमात्मा

मिथ्या 'काही नाही' मिथ्या 'सर्व काही' कडे घेऊन जाते. आणि यथार्थ 'काहीनाही' यथार्थ 'सर्वकाही' कडे घेऊन जाते. मिथ्या 'काही नाही' हे मिथ्या 'सर्वकाहीशी' जोडलेले आहे. व यथार्थ 'काहीनाही' हे यथार्थ

'सर्वकाही' शी जोडलेले आहे. अगदी शेवटी मिथ्या 'काहीनाहीचा' शेवट मिथ्या 'सर्वकाहीत' होतो व यथार्थ 'काहीनाहीचा' शेवट यथार्थ 'सर्वकाहीत' होतो. व्दैताचे राज्यात मिथ्या 'काहीनाही' मिथ्या 'सर्वकाही' आहे. ऐक्यात यथार्थ 'काहीनाही' आणि यथार्थ 'सर्वकाही' एक आहेत.

मेहेर बाबांनी पुढील मुद्दे देखील प्रस्तुत केले आहेत.

१) यथार्थ लक्ष्य मानवदेहात परमात्म्याचा साक्षात्कार करणे आहे. परंतु जे परमात्म्याचा साक्षात्कार होण्यापुर्वीच आपला देह सोडतात (म्हणजे निर्विकल्प अवस्था प्राप्त करण्यापूर्वीच जे निर्वाण अवस्थेतच आपले शरीर त्यागतात.) ते पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्त होतात – त्यांना मुक्ती मिळते. ते फक्त अनंत आनंदाचाच अनुभव घेतात.

२) जी व्यक्ती निर्विकल्प अवस्था प्राप्त करते तिचे व्यक्तित्व मानवदेह त्यागल्या नंतरही अनंत व अमर्याद म्हणून राहते व ती व्यक्ती 'मी परमात्मा आहे' या अवस्थेचा सतत अनुभव घेते. परंतु जिला मुक्ती मिळते ती व्यक्ती 'मी परमानंद आहे'' (मी अनंत आनंद आहे) चा अनुभव घेते व हा अनुभव एकाचवेळी त्याच्या अमर्याद व्यक्तिमत्वच्या 'मी अनंत शक्ती, ज्ञान व आनंद आहे' या अनुभवाला मर्यादा घालते.

३) मानवदेहात मनुष्य जेव्हा परमात्म–साक्षात्कार प्राप्त करतो तेव्हा परमात्म्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीचा अनंत ज्ञान हा गुण सर्वात महत्वाचा असतो. अनंत आनंद हा मनुष्याच्या अनुभवाचा महत्वपूर्ण पैलू असतो जेव्हा तो आपले शरीर निर्वाण या अवस्थेत सोडतो व मुक्ती हे लक्ष्य समजून मुक्तीला प्राप्त होतो.

४) मज्झूब–ए–कामिल एकाचवेळी अनंत ज्ञान शक्ती व आनंदाचा अनुभव घेतो व जेव्हा तो सामान्य चेतनेप्रत खाली उतरतो म्हणजे जेव्हात्याला व्दैताची देखील चेतना असते व तो मज्झूब–ए–कामिलच्या अवस्थेत मुळीच नसतो, तेव्हा तो न केवळ अनंत ज्ञान, शक्ती व आनंदाचा अनुभव घेतो तर मानव देहात असे पर्यंत त्याचा उपयोग देखील करतो.

## २१ : फना व बका बद्दल सुफी धारणा *(१८६)

फना व बकाबाबत सुफींना जे समजले त्यांचा हा संक्षिप्त अभ्यास आहे.

प्रत्येक भूमिकेला आपल्या स्वतःच्या 'फना' व 'बका' आहेत. ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, भूमिकांच्या फना अवस्था ही सातव्या भूमिकेची फना नव्हे व भूमिकांच्या बका ही कुतूब अवस्थेतील बका नव्हे, जी अवस्था परिपूर्ण अवस्था असते.

सुफी गूढ ज्ञानातील काही तुलनात्मक प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत, यावरुन हे स्पष्ट होईल की, त्यांचे स्पष्टीकरण प्रामुख्याने सातव्या भूमिकेच्या संदर्भात आहे व त्यांनी केलेला शब्दप्रयोग काही अधिक गूढ अर्थ दर्शविते.

फनाचा शब्दशः अर्थ  आहे पुसून टाकणे किंवा संपूर्ण नाश करणे.

बकाचा शब्दशः अर्थ आहे चिरस्थायित्व व ही अशी अवस्था आहे की, जी सदैव टिकून राहते.

फनाचा अर्थ आहे परमात्म्याकडे जाणाऱ्या प्रवासाचा अन्त.

बकाचा अर्थ आहे परमात्म्याचे अंतर्गत यात्रा करण्यास प्रारंभ. फनाचा गुणधर्माच्या संदर्भात विचार करता कामा नये, ते पाण्यात साखर विरघळविण्यासारखे नाही. हुज्विरीच्या मतानुसार यामुळे सारतत्वाचा लोप होतो हा अर्थ ध्वनित होत नाही.

बका ते तत्व दर्शविते की जे न ते प्रथम कधी अस्तित्वहीन होते व जे परमात्म–तत्वाप्रमाणे न पुढे कधी अस्तित्वहीन होईल. फना म्हणजे 'घेर' च्या भावनेचा लोप (दुसरा म्हणजे व्दंव्दाचा)

बका हे परमात्म्याचे ज्ञान आहे जे 'घेर' चा लोप झाल्यावनंतर प्राप्त होते.

मुहम्मद शबिस्तरी यांच्या 'गुलशन–ए–राज' या पुस्तकात फनाचा अर्थ दिला आहे की, स्वेच्छा व अहंकार यांच्या  मनोविकाराचा मृत्यू ज्यामुळे शाश्वत जीवनाविषयी (बका) आध्यात्मिक जागृती होते. याचा अर्थ,  मिथ्या अहंकाराची (खुदी) विस्मृती देखील होते, ज्यामुळे आतापर्यंत मनुष्याला त्याच्या सत्या (परमात्मा) पासून लपविले जात होते. जर साधकाने याचा असा अर्थ लावला की, फनाचा अर्थ आत्म्याचेच पुसल्या जाणे आहे तर हा समज चुकीचा आहे. सर्वोच्च अवस्था म्हणजे पुसल्याजाण्यापासून सुध्दा पुसल्या जाणे.

फना दोन प्रकारची असते, बाह्य व आंतरिक.

बाह्य फनाः म्हणजे सामान्य कर्माची फना आहे व दिव्य कर्मांचा गौरव या फन्याला प्राप्त होणारा साधक दिव्य कर्मात इतका निमग्न होतो की त्याला परमात्म्याची इच्छा व परमात्म्याची मर्जी सोडून ना त्याला स्वतःची शुध्द असते ना अन्य कोणत्याही वस्तूची. काही पुण्यवान साधक जे या मुकामावर पोहोचलेले असता ते आपल्या शारीरिक गरजांविषयी इतके उदासीन असतात की परमात्म्याला त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी कोणाला तरी नियुक्त करावे लागते.

आंतरिक फनाः ही 'जात' (सत्यता) म्हणजे निजरुपाच्या गुणांची फना आहे. परमात्म्याच्या गुणांच्या प्रकटीकरणाचे अवधित 'हाल'- चा अनुभव घेणारा साधक कधी आपल्या गुणांच्या फना मध्ये निमग्न राहतो तर कधी परमात्म्याच्या प्रभावात (असर) व परमात्म्याच्या तेजोवलयात (तजल्ली) निमग्न राहतो.

बाह्या फना त्या लोकांच्यामध्ये दिसून येतो. ज्यांना हृदयाचे स्वामी म्हणता येईल व जे हाल (अनुभव) चे सोबती असतात.

आंतरिक फना त्या उत्कृष्ट साधकांची विशेषता आहे जे हालच्या प्रभावावर उठलेले आहेत व ज्यांनी हृदयाचा पर्दा विच्छेदिला आहे व ते हृदयांचे स्वामी असलेल्यांच्या समाजाला सोडून, हृदय बदलणाऱ्यांच्या (परमात्मा) समाजात दाखल झाले आहेत.

बका जो बाह्य-फनाचे संबंधात आहे तो येणे प्रमाणेः इच्छा व मर्जीच्या फना नंतर परमात्मा सेवकाला इच्छा व मर्जीचा स्वामी बनवितो व पथदर्शनाचे पूर्ण नियंत्रण त्याचे अधिकारात देतो.

बका जी आंतरिक फनाशी संबंधित आहे, आत्मा ना सृष्टीच्या पडद्याच्या रुपात परमात्मा बनतो ना सृष्टी परमात्म्याचा पडदा बनते. फनामध्ये परमात्मा सृष्टीचे आवरण आहे व जे फनाच्या अवस्थेला पोहचले नाहीत त्याच्याकरिता सृष्टी परमात्म्याचे आवरण बनून राहते.

## २२ : चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती *(१९१)

मेहेर बाबा पुढे सांगतातः ''पूर्ण चेतना प्रथम मानव देह प्राप्त होताच परिपूर्ण होते, ती चेतना उत्तरोत्तर अंतर्मुख होत जाते व एकानंतर एक भूमिका

पार करीत जाते. ही चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती (जी चेतना पूर्वीच पूर्ण झालेली आहे) अगदी पहिल्यांदा सुरु होते, जेव्हा घट्ट स्थूल संस्कार विरळ होतात. अशाप्रकारे चेतना पहिल्या भूमिकेचा अनुभव घेते. जसजसे संस्कार अधिक विरळ होत जातात तसतशी चेतना अधिक अंतर्मुख होत जाते. (आत्मानुवर्ती उत्क्रांत होत जाते.) व दुसऱ्या भूमिकेचा अनुभव घेते व अशाप्रकारे अधिक अंतर्मुखी होत जाते व सातव्या भूमिकेत पोहोचेपर्यंत हे सुरु राहते.

''चेतनेचे माघारी येणे'' याचा अर्थ असा की, प्रथम चेतना जी पूर्ण होती ती स्थूल संस्कारांवर केन्द्रित झालेली होती. परंतु आपल्या सत्य स्वरुपावर केन्द्रित होण्यापासून फार दूर होती. नंतर आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेत परस्पर विरोधी विविध अनुभवांच्याव्दारा, संस्कार जसजसे विरळ होत जातात, चेतना देखील त्याचबरोबर हळूहळू आपल्या सत्य-स्वरुपाकडे केन्द्रित होते जाते. सातव्या भूमिकेत चेतना आता संस्काराच्छादित चेतना राहत नाही व स्वाभाविकपणे याचा परिणाम असा होतो की ती हळूहळू आपल्या सत्यस्वरुपात केन्द्रित होते. याचा अर्थ असा की, चेतना आपल्या सत्यस्वरुपाशी एकरुप होते. कारण संपूर्ण संस्कार नष्ट झालेले असतात.''

## २३: पाच बीजगणीती व्याख्या *(१९३)

१) **परमात्मा** = अनंत अस्तित्व +अनंत ज्ञान+अनंत आनंद - अचेतना
सत+चित+आनंद-अचेतना = सच्चिदानंद उणे अचेतना

२) **पूर्ण पुरुष** = कुतूब = सद्‌गुरु
= अनंत अस्तित्व +अनंत ज्ञान+अनंत आनंद+चेतना
= एकाचवेळी अनंत असल्याची चेतना व सीमित असल्याची चेतना.

३) **अवतार** =पूर्ण पुरुष =इन्सान-ए-कमिल=पुरातन पुरुष=बुध्द
= साहेब-ए-जमॉ=रसूल=अवतार=विद्यमान ख्राईस्ट
=अनंत अस्तित्व+अनंत ज्ञान+अनंत आनंद+चेतना
=एकाचवेळी अनंत असल्याची व सीमित असल्याची चेतना

४) **मानव किंवा जीवात्मा किंवा इन्सान**
= शरीर +प्राणशक्ती +मन+चेतना+आत्मा

५) **मज्झूब-ए-कामिल** =दिव्य ''अहम्''

= दिव्य चेतना – सीमित चेतना

## २४ : चार प्रकारची मुक्ती – मोक्ष *(१९५)

विविध प्रकारच्या पूर्णतेचे वर्णन करण्यासाठी काही सुपरिचित शब्द येथे दिलेले आहेत. जेणेकरुन साधकाला ''परमात्म–साक्षात्कार'' या विषयाच्या चौकटीत त्यांना उपयोजिता यावे. ह्या पूर्णतेच्या प्रकारांचे वर्णन करताना महत्वाचा शब्द 'मुक्ती' ज्याचा अर्थ होतो मोक्ष, चार प्रकारच्या मोक्षांचे वर्णन करण्यासाठी वापरला आहे.

खाली दिलेल्या तक्त्यात आत्म्याच्या सर्व चार प्रकारच्या 'मुक्ती' ह्यां सातव्या भूमिकेशी संबंधीत आहेत.

१) सामान्य मुक्ती (मोक्ष)
२) विदेह मुक्ती
३) जीवन मुक्ती
४) परम मुक्ती

**१) सामान्य मुक्ती (मोक्ष) :** साधारण मुक्ती (नजात) ही मृत्यूनंतर, परमात्म्याची भीती बाळगणाऱ्या, सत्यावर प्रेम करणाऱ्या असाधारण पवित्र आत्म्यांना आपले शरीर त्यागल्यानंतर साधारणतः तीन ते पाच दिवसांनी प्राप्त होते. ही मुक्ती ज्याअर्थी शरीर रहित अवस्थेत प्राप्त होते त्यामुळे व्यक्तिगत आत्मा केवळ 'आनंदाचा' उपभोग घेतो व जरी शक्ती व ज्ञान तेथे विद्यमान असले तरी असा मुक्तात्मा त्यांचा अनुभव घेऊ शकत नाही. असा मोक्ष–प्राप्त आत्मा केवळ मीलनापासून मिळणाऱ्या परमानंदाप्रत सचेत असतो व त्याच्याकरिता सृष्टीला अस्तित्व राहत नाही व त्यामुळे जन्म–मृत्यूच्या सततच्या फेऱ्यांचा अंत होतो.

निर्विकल्प समाधी ही साधारण मुक्ती किंवा मोक्ष अवस्था आहे असे मुळीच समजू नये. आत्मा जर 'मुक्ती अवस्थेप्रत' पोहोचावयाचा असेल तर केवळ भौतिक शरीराच्या मृत्यूनंतरच असे घडते. असा आत्मा परमात्म्याप्रत पोहोचतो परंतु हे केवळ मृत्यू नंतरच घडते. याप्रमाणे साधारणपणे मुक्ती व दुसऱ्याबाजूने निर्विकल्प समाधी यात अत्यंत महत्वाचा फरक आहे. कारण निर्विकल्प समाधीचा अनुभव आत्मा शरीरात असताना घेतो व याप्रकारे आत्मा विदेह मुक्त होतो.

**२) विदेह मुक्ती :** काही परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त झालेल्या आत्म्यांना 'विदेह मुक्त' म्हटले जाते, जे साक्षात्कारानंतर तीन ते चार दिवस पर्यंत आपले शरीर राखून ठेवतात. त्यांची चेतना त्यांच्या स्वतःच्या सत्य स्वरुपात (परमात्मा) पूर्णपणे विलीन झालेली असते व त्यामुळे त्यांना आपल्या शरीरांची किंवा सृष्टीची चेतना नसते. परमात्मा म्हणजे आपल्या सत्य स्वरुपाच्या अनंत आनंद, शक्ती व ज्ञानाचा ते सतत अनुभव घेत असतात, परंतु ते सृष्टीत त्याचा जाणीवपूर्वक उपयोग करु शकत नाहीत किंवा ते मुक्ती प्राप्त करण्याकरिता दुसऱ्याला मदत करु शकत नाहीत. असे असले तरी, काही दिवसाकरिता म्हणजे जितके दिवस ते राहतात, त्यांची पृथ्वीवरील उपस्थिती, परमात्म्याच्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाच्या किरणांचे प्रसारण केन्द्र बनते, व जे त्यांच्या संपर्कात येतात, त्यांची सेवा करतात व प्रेमाने पूजा करतात त्यांना आत्यंतिक लाभ होतो. इतर आत्मे आपल्या प्रारब्धानुसार वषानुवर्षे आपले शरीर राखून ठेवतात. (प्रारब्धाच्या गतिक्षमते प्रमाणे) विदेह मुक्त म्हणजे 'ब्रह्मीभूत' किंवा सूफींच्या भाषेत 'मज्झूब-ए-कामिल' व तो परमात्म्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीचा, सत-चित-आनंदाचा आपोआपच अनुभव घेत असतो.

**३) जीवनमुक्ती :** जीवन मुक्ती (आझाद-ए-मुतलक) तुरीया अवस्थेत ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेतील चेतना ठेवून, पूर्ण ज्ञान, पूर्ण शक्ती व पूर्ण आनंदाचा उपभोग घेतो, त्याला स्थूल, सूक्ष्म व मनोभुनाची देखील चेतना असते, परंतु त्याच्याकडे कोणतेच कार्य नसल्यामुळे तो इतरांच्यासाठी आनंद, ज्ञान व शक्तीचा उपयोग करीत नाही.

**४) परम मुक्ती :** परम मुक्त ज्याला पूर्ण पुरुष कुतूब किंवा सद्गुरु इत्यादी नावाने जाणतात, हा परमात्म-साक्षात्कारानंतर परत सामान्य चेतनेवर येतो व एकाचवेळी ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेविषयी व तीन सापेक्ष अस्तित्वाविषयी त्यांच्या संबंधित भुवनांविषयी सचेत असतो. तो ना केवळ पूर्ण शक्ती, पूर्ण ज्ञान व पूर्ण आनंद यांचा उपभोग घेतो परंतु विश्वात्मक मन व विश्वात्मक देहाव्दारां अस्तित्वाच्या सर्व भूमिकांवर त्यांचा उपयोग देखील करतो.

असे परम-मुक्त पुरुष, आपल्या दोन्ही व्यक्त व अव्यक्त पैलूत स्वतः परमात्मा असल्याबाबत सचेत असतात. त्यांना ते स्वतः अपरिवर्तनीय सारतत्व

(जात) व अनंत विविध अभिव्यक्तीत (सिफत) असल्याचे ज्ञान असते ते स्वतः आपल्याला सृष्टीच्या वेगळे असे परमात्मा म्हणून रक्षणकर्ता, धारणकर्ता व संहारकर्ता म्हणून अनुभव घेतात. तसेच परमात्मा म्हणून सृष्टीच्या मर्यादा स्वीकारल्याचा व पार केल्याचा ते स्वतः अनुभव घेतात. याचा अर्थ असा की, असा परम–मुक्त, रेखा–चित्रात परमात्म्याच्या दहा अवस्था ज्या दाखविल्या आहेत त्या प्रत्येक अवस्थेविषयी सचेत असतो.

परम–मुक्त परमात्म्याच्या सत्–चित्–आनंद या त्रिगुणात्मक प्रकृतीच्या निरंकुश शांतीचा व पूर्णतेचा सतत अनुभव घेतो व त्याचा वापर देखील करतो. तो सृष्टीच्या दिव्य लीलेचा पूर्णपणे आनंद घेतो व त्याचा भार देखील वाहतो. तो सर्वात असलेला परमात्मा आहे याची त्याला जाणीव असते व त्यामुळे तो प्रत्येकाला आध्यात्मिकदृष्ट्या मदत करण्यात समर्थ असतो व दुसऱ्या आत्म्यांना मुक्त व्यक्तिच्या चार प्रकारापैकी कोणतीही एक प्रकारची मुक्ती प्रदान करु शकतो.

तो निःसंदेह मानवजातीचा खास करुन व सृष्टीचा सामान्यपणे मदतगार असतो.

## २५ : चार प्रकारच्या मुक्तीचा सारांश *(१९५)

मुक्तींच्या ह्या चार प्रकारांचा सारांश मेहेर बाबांनी खालील प्रमाणे दिलेला आहे.

| **मुक्तीचा प्रकार** | **चेतना** | **व्दैतातील कर्तव्ये** |
|---|---|---|
| सामान्य मुक्ती | केवळ परमानंद, ''मी परमात्मा आहे'' ची किंवा द्वैताची चेतना नाही. | नाही |
| विदेह मुक्ती | ''मी परमात्मा आहे'' (सत्–चित्–आनंद किंवा ज्ञान, शक्ती व आनंद) व्दैताची चेतना नसते. | नाही |
| जीवन मुक्ती | ''मी परमात्मा आहे'' (सत्–चित्–आनंद) व्दैताच्या चेतनेसह | नाही |
| परम मुक्ती | एकाच वेळी ''मी परमात्मा आहे'' (सत्–चित्–आनंद) ची चेतना असते व व्दैतात तसेच दिव्यतेत सक्रीय कार्यशिलता) | आहे |

(शेवटी दिलेला चार्ट पहावा– संपा.)

## २६, पूर्णतेची लक्षणे : *(१९९)

एका अनुयायाने, सद्गुरु ओळखण्याची अचुक पध्दती कोणती ? असा विनंतीवजा प्रश्न विचारला असता मेहेरबाबांनी स्पष्टीकरण दिले. सहाव्या भूमिकेपर्यंत आध्यात्मिक उपलब्धीच्या निरनिराळ्या अवस्था समाधानकारकरित्या ओळखणे साधारण माणसाला शक्य होणार नाही. हे आत्मे आध्यात्मिक प्रगतीपथावर आहेत एवढे साधारण मनुष्य समजू शकेल. परंतु त्यांच्या प्रगतीची अवस्था मात्र जाणू शकणार नाही. परंतु जर एखादा सत्त्याच्या शोधात निघालेला प्रामाणिक व धीरगंभीर साधक, आध्यात्मिक दृष्ट्या पूर्ण असलेल्या व्यक्तीच्या संपर्कात आला तर त्याला त्या व्यक्तीत काही बाह्य लक्षणे असे दिसून येतील की, जे अचुकपणे त्याच्या आंतरिक आध्यात्मिक पूर्णतेची पुष्टी करतील.

ह्या सर्व लक्षणांच्यामध्ये सर्वात महत्वाचे तीन लक्षणे आहेत. प्रथम म्हणजे केवळ परमात्म्यासी एकरुपता म्हणजे पूर्णता नव्हे, परंतु सर्वगोष्टींशी एकरुप असल्यास निरंतर व अखंड अनुभव म्हणजे पूर्णता होय. सद्गुरु आपल्या आत्म्याला सर्वात असलेल्या आत्म्याच्या रुपात सतत व अखंड असल्याचे पाहतो व अनुभव घेतो हा आंतरिक अनुभव बाह्य दृष्टीने सहज प्रेमाचे रुपात आपल्या स्वतःला प्रकट करतो व ते प्रेम अशा व्यक्तीला सर्व सृष्टीकरिता वाटते किंवा ते तो प्रकट करतो. त्याच्या करिता कोणतीच गोष्ट मोहक किंवा किळसवाणी नसते. चांगेल आणि वाईट, संत व पापी, सौंदर्य व कुरुपता, बुध्दिमत्ता व मुर्खपणा आरोग्य व आजार – सर्व त्याच्या आपल्या अभिव्यक्तीच्या पध्दती आहेत. जेव्हा देहधारी पूर्णता कोणत्याही जीवंत प्राण्यावर प्रेम करते, त्याला गोंजारते व खाऊ घालते तेव्हा तिला संवेदना होते व ती अनुभवते की ती स्वतःवर प्रेम करीत होती, गोंजारत होती व भरवित होती. या अवस्थेत 'अन्यपणाचा' मागमूसही शिल्लक राहत नाही.

दुसरे लक्षण आहे आनंदाच्या वातावरणाचे जो आनंद 'पूर्णता' आपल्या जवळच्या परिसरात प्रसारीत करते व हे वातावरण असे असते की त्याच्या शोधात निघालेला पथिक याचा अनुभव घेतल्याशिवाय राहू शकत नाही. सद्गुरु न केवळ अनंत आनंदाचा अनुभव घेतो तर विश्वव्यापी दुःखाचाही अनुभव घेतो.

तथापि दुःखाची तीव्रता परमानंदाच्या अत्यंत प्रबळ अनुभूतीव्दारां विफल किंवा मंद केल्या जाते. यामुळे 'पूर्णता' सर्व प्रकारच्या दुःखात व छळल्या जाण्यात बाह्यता आनंदाने परिपूर्ण अशी शांत दिसते.

'पूर्णतेचे' तिसरे लक्षण आहे, तिची क्षमता जी मानवतेच्या कोणत्याही स्तराशी जुळवून घेते. ती राजसिंहासनावर जितकी अविचलीत व स्थिर राहू शकते, तितकीच ती गटारात शांत व उदासीन राहू शकते. ती अत्यंत स्वाभाविकपणे गरीबा बरोबर मितव्ययी, श्रीमंतासोबत ऐश्वर्यमान, राजाबरोबर राजशाही, विव्दाना बरोबर विव्दान, अशिक्षित व अज्ञानी यांचे सोबत साधी व भोळी राहू शकते. ज्याप्रमाणे विव्दान शिक्षक नवशिक्या व पदवीधर विद्यार्थ्यांना इंग्रजी वेगवेगळ्या पध्दतीने शिकवितो त्याचप्रमाणे सद्गुरु देखील ज्यांचे आध्यात्मिकदृष्ट्या उत्थान करावयाचे असते त्यांच्या स्तरासी जुळवून घेतो.

घौस अली शाह कलंदर यांनी एकदा आध्यात्मिक पूर्णतेवर (फकीरी) प्रवचन देताना म्हटले होते, ''अनुयायाला पूर्णता प्रदान करणे ही बाब क्षणार्धाची आहे.'' मनुष्याला सीमिततेतून अनंतात नेण्याकरिता त्याच्या कानात सांगितलेला एक शब्द पुरेसा आहे. व असे परिवर्तन प्रार्थनेवर किंवा उपवासांवर निर्भर नाही.''

मौलाना रुमी यांनी म्हटले आहे :

दाद–ए–ऊरा काबिलियत–ए–शर्त नेस्त
बल्कि शर्त–ए–काबिलियत दाद–ए–ऊस्त

''दैवी कृपा ही योग्यतेवर निर्भर नसून वास्तविक पाहता योग्यता दैवी कृपेव निर्भर असते.''

हे ऐकून एका अनुयायाने विचारले ''महाराज, परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त करणे जर इतके सुलभ आहे तर अनुयायांना अनिवार्यतः इतक्या कसोट्या व इतकी तपश्चर्या प्रदीर्घ काळपर्यंत पार करण्याची गरज का भासावी ?'' उत्तरादाखल घौस अली शहा यांनी पुढील गौष्ट सांगितली.

एका व्यक्तीने अनेक वर्षांच्या धुळीने गंजलेली दोन भांडी स्वच्छ करावयाचे ठरविले. त्यापैकी एक भांडे त्याने एका व्यावसायिकाला स्वच्छ करावयास दिले, ज्याने ते चाळीस दिवसात स्वच्छ करुन देण्याचे कबूल केले.

दुसरे भांडे त्यांने एका मनुष्याला दिले ज्याने एक दिवसात स्वच्छ करुन देण्याचे कबूल केले. व्यावसायिक शास्त्रशुध्द रीतीने भांडे स्वच्छ करावयाच्या कामाला लागला. त्याने चाळीस दिवस निरनिराळ्या बऱ्याच प्रक्रिया करुन भांडे न केवळ चकाचक केले परंतु ते उपयोगपात्र केले.

दुसऱ्या मनुष्याने, ज्याने ते काम एक दिवसात पूर्ण करावयाचे कबूल केले होते. भयंकर परिणामकारक प्रक्रियेचा उपयोग केला व ती प्रक्रिया होती मोठ्या भट्टीत भांडे जाळण्याची. या पध्दतीने भांडे लवकर व पूर्ण स्वच्छ झाले परंतु ते ठिसूळ व निरुपयोगी झाले म्हणून असे दिसेल की, दोन्हीही भांडी स्वच्छ झाली असली तर केवळ प्रदीर्घ प्रक्रियेतून पार झालेले भांडेच उपयोगी होते.

सद्‌गुरु पुढे म्हणाले की, याच कारणामुळे सद्‌गुरु साधकाला क्वचितच तत्काळ परमात्म–साक्षात्कार देतो, परंतु साधकाला हळूहळू आपल्या लक्ष्याकडे अग्रेसर करतो. जेणेकरुन तो परमात्म्याच्या कार्याकरिता एक मजबूत व उपयोगी भांडे बनू शकेल.

याच संदर्भात मेहेर बाबांनी एकदा आपल्या अनुयायांना सांगितले होते, ''परमात्म–साक्षात्कार कोणालाही एका क्षणात देता येतो, परंतु तो केवळ त्याच्या स्वतःकरिता (उपयोगी) असतो, व दुसऱ्याला त्याचा काही फायदा होत नाही. तीव्र साधना, स्वसुखनिरपेक्षता व कष्ट–भोग या कालवधीतून एखाद्या शिष्याला सद्‌गुरुच्या आज्ञेने जावे लागते तेव्हा त्या शिष्यात शक्ती उत्पन्न होते व त्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यावर इतरांच्या* आध्यात्मिक जागृतीसाठी त्याचा उपयोग करण्याचा अधिकार देते.

## २७. हाल व मुकाम : *(२००)

सुफी गूढ–ज्ञानाच्या दृष्टीने या ठिकाणी हाल (अनुभव) व मुकाम (स्थिती) यांचा सारांश दिलेला आहे. काही सुफींचा असा समज आहे की, हाल व मुकाम मध्ये लक्षणीय फरक नाही, त्यांचे म्हणणे आहे की, प्रत्येक मुकाम प्रारंभी हाल असतो व शेवटी तो मुकामात विकसित होतो ही गोष्ट सूक्ष्म व मनोभूमिकेतील सर्व भूमिकांना लागू होते. तथापि बरेच सुफी मुकामापासून

*टीप– हे देखील पहा : मेहेरबाबा ''परफेक्शन'' डिस्कोर्सेस १:११५–१२०, व्दैताच्या क्षेत्रासंबंधातील आध्यात्मिक पूर्णता व सापेक्ष पूर्णता यातील फरक समजून घेण्याचे दृष्टीने.)

हालला भिन्न मानतात.

बसऱ्याचे अब्दुल्ला हारिस मुहासिबी यांचे मतानुसार हाल ही परमात्म्याची देणगी आहे, ती इतकी क्षणभंगूर असते की जशी विजेची चमक व अभ्यासाने (मुजाहिदा) ती स्थायी बनते.

मुकाम पश्चातापाची फलनिष्पत्ती आहे व हालच्या सतत प्रभावी राहण्यामुळे स्थायी बनते.

'अवारीफुल – मारिफ' या पुस्तकाच्या लेखकाने खालीलप्रमाणे विशद केले आहे. 'हाल' ही एक लपलेली घटना चित्रित करते जी उच्च जगतावरुन साधकाच्या हृदयावर उतरते व ही अनुभूती तोपर्यंत येणे व जाणे चालू ठेवते जोपर्यंत दिव्य आकर्षण अगदी खालच्या स्तरापासून सर्वात वरच्या स्तरापर्यंत नेत नाही. 'मुकाम' हे मार्गावरील स्थानक आहे ज्या ठिकाणी साधक येऊन पोहोचतो व ते त्याच्या प्रवासातील मुकामाचे ठिकाण राहते, जोपर्यंत तो पुढे प्रगत होत नाही. 'हाल' हे साधकाच्या नियंत्रणात रहात नाही तर साधकावरच त्याचे नियंत्रण राहते.

'मुकाम' यात्रिच्या हातात असतो.

'हाल' ही देणगी (माओहिब) आहे.

'मुकाम' ही उपलब्धी (कस्ब) आहे.

'हाल' ही मुकामशी संबंध असल्याशिवाय कधीही असू शकत नाही.

'मुकाम' हा हालशी संबंध असल्याशिवाय कधीही असू शकत नाही.

शेख मुहम्मद इब्राहीम, जे गजूर–ए–इलाही या नावाने देखील प्रसिध्द आहेत, ते 'इर्शादात्' या पुस्तकात म्हणतात.

जेव्हा हाल सुरु असतो तेव्हा तो मुकाम होतो. जो कोणी हालचा एकवेळ अनुभव घेतो तो नवशिक्या असतो व जो त्यात सतत राहतो तो त्यात प्रविण बनतो.

मेहेरबाबा स्पष्ट करतात : शब्दांच्या सामान्यार्थाने हाल अध्यात्म मार्गावरील पहिल्या भूमिकेपासून तो सहाव्या भूमिकेपर्यंतच्या सापेक्ष अस्तित्वाचा आंतरिक अनुभव आहे. (ज्यामध्ये नियंत्रित व अनियंत्रित आनंदातिरेकाचा समावेश होतो.) विशेष अर्थाने हाल ही दिव्य परमानंदाची अवस्था आहे व ती सदैव आपल्या संबंधित मुकामाच्या अनुसार विभिन्न अंशात

अनुभव केल्या जाते. वेदान्तामध्ये हालला भाव व मुकामाला स्थान म्हटले आहे.

एका विशिष्ट भूमिकेत विशिष्ट हालच्या अवस्थेत साधकाचे थांबने याचे नाव मुकाम आहे.

हाल व मुकाम हे सहाव्या भूमिकेपर्यंत व या भूमिकेवर एकत्र जातात व असतात. हाल मुकामावर सदैव वर्चस्व गाजवितो. हाल व मुकाम सातव्या भूमिकेवर अस्तित्वात नसतात.

जेथे हाल आहे तेथे व्दैत आहे. जेव्हा एखादा आत्मा सातव्या भूमिकेवरुन सामान्य चेतनेप्रत खाली येतो व कर्तव्य पार पाडण्यासाठी कोणत्याही विशिष्ट भूमिकेवर स्वतःला प्रस्थापित करतो तेव्हा ती भूमिका त्याचा मुकाम होते. अर्थात कुतूब (सद्‌गुरु) करिता हाल नावाचे असे काही नाही, त्यांच्याकरिता फक्त मुकाम असते. सामान्य माणसे ज्यांची प्रकृती भावनाप्रधान असते ते संगीत ऐकताना सामान्य हालचा उपभोग घेतात, परंतु हा एक मिथ्या हाल आहे ज्याची तुलना मार्गावरील यात्रिच्या आध्यात्मिक हालशी करता येणार नाही.

## २८. अवताराचे आगमन : *(२०८)

हे विचारल्यानंतर की, अवतार हा परमात्म–साक्षात्कार प्राप्त झालेला अगदी प्रथम व्यक्तिगत आत्मा आहे किंवा नाही ? मेहेर बाबांनी निम्नांकित उत्तर दिले :

''सर्व प्रथम परमात्मा होता ज्याला अनंत चेतना प्राप्त झाली (परमात्मा अवस्था २–ब स्पष्टीकरण पहा.) या सर्वांचा अर्थ असा की परमात्म्याने सर्वप्रथम स्वतःला जाणले त्याचबरोब परमात्मा त्याच्या अवस्था २–अ मध्ये अनंतपणे अचेत असतो. (परमात्मा अवस्था २–अ मधील स्पष्टीकरण पहा) परमात्म्याच्या इतर अवस्था व सर्व दिव्य स्तर परमात्म्याच्या अवस्था २–अ ची निर्मिती आहेत, ज्या अनंत चेतना प्राप्त करण्याकरिता शाश्वततः उत्सूक असतात.

'' या सर्वाचा परिणाम आपल्याला असा दिसतो की मनुष्य परमात्मा बनतो.

''सद्‌गुरु नर–नारायण (म्हणजे मनुष्य परमात्मा बनला) आहे, व

त्याला उत्क्रांती व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून जावे लागते, या उलट अवतार हा परमात्म–पुरुष असतो, म्हणजेच उत्क्रांती व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून न जाता परमात्मा सरळ मनुष्य बनतो.

''पाच सद्गुरु (कुतूब, पूर्ण पुरुष) पृथ्वीवर अवताराचे (रसूल, ख्राईस्ट, बुध्द) अवतरण घडवून आणतात, म्हणून पृथ्वीवर प्रथम अवताराचे अवतरण घडवून आणण्याकरिता प्रथम त्या पाच सद्गुरुंच्या उपस्थितीशिवाय शक्य नव्हते. यास्तव अगदी प्रारंभी पाच सद्गुरु परमात्म–साक्षात्कारित झाले व त्यानंतर प्रथम अवताराचे आगमन शक्य झाले.

''आदमच्या काळापासून आतापर्यंत सव्विस अवतार झालेत किंवा एक लक्ष चोविस हजार ईश–प्रेषित झालेत, जसे कधी कधी हक्काने सांगितल्या जाते, किंवा येशू ख्रिस्त हा केवळ शेवटचा व एकमेव मसिहा किंवा मुहम्मद हा शेवटचा प्रेषित होता – या सर्व गोष्टीला काही अर्थ व महत्व राहत नाही, जेव्हा आपण शाश्वततेच्या व सत्यतेच्या विषयावर विचार करतो. आतापर्यंत दहा किंवा सव्विस किंवा दहा लक्ष अवतार झालेत यावर वादविवाद करणे ही अगदीच क्षुल्लक गोष्ट आहे. सत्य हे आहे की अवतार हा सदैव एक व तोच असतो व पाच सद्गुरु पृथ्वीवर त्याचे अवतरण घडवून आणतात. युगानुयुगे हेच चालत आले आहे व लक्षावधी कालचक्र आतापर्यंत होऊन गेलेले आहेत व शाश्वताला किंचितही धक्का न लावता, अशीच कालचक्रे व्यतीत होत राहतील.

## २९. सातव्या भूमिकेचे गूढज्ञान : *(२०९)

मेहेर बाबा, मज्झूब, आझाद–ए–मुतलक, कुतूब व रसूल यांचे संबंधित सातव्या भूमिकेचे ''मी परमात्मा आहे''* या अवस्थेतील गूढज्ञानाचे वर्णन खालीप्रमाणे करतात.

१) मज्झूब (ब्रह्मीभूतः)

अनल हक – याचा अर्थ ''मी परमात्मा आहे'' (निरंतर)

२) आझाद–ए– मुतलक (जीवनमुक्त)

अनल हक सह 'हमे बा मन अस्त' याचा अर्थ आहे 'सर्वकाही माझ्या

* देहत्याग (भौतिक मृत्यू) केल्यानंतर त्या सर्वांचा ''मी परमात्मा आहे'' हा ज्ञानानुभव सतत चालू राहतो.

बरोबर आहे.'

३) कुतूब (सद्‌गुरु)

अनल हक व यासोबत एकाचवेळी 'हमे मन अम' याचा अर्थ आहे ''सर्व काही मी आहे, '' 'हमे दर मन अस्त' याचा अर्थ आहे ''सर्व काही माझ्यात आहे''.

हमे अज मन अस्त' याचा अर्थ आहे ''सर्वकाही माझ्यापासून आहे.''

४) साहेब-ए-जमॉ (अवतार)*

अनल हक- एकाच वेळी या सोबत 'मन हमे  अम' याचा अर्था आहे ''मी सर्व काही आहे'' 'मन दर हमे अम' याचा अर्थ आहे ''मी सर्वात आहे'' 'हमे अज मन अस्त' याचा अर्थ आहे. ''सर्व काही माझ्यापासून आहे.'' 'हमे दर मन अस्त' याचा अर्थ आहे ''सर्वकाही माझ्यात आहे.''

## ३०. अवतार व सद्‌गुरु : *(२०९)

मेहेर बाबांना जे स्पष्ट करुन सांगावयाचे आहे ते खालील प्रमाणे :

''जेव्हा सद्‌गुरुची प्रकृती चांगली आहे किंवा ते आजारी आहेत असे म्हटले जाते तेव्हा हे सर्व एका सामान्य मनुष्याव्दारां म्हटल्या गेले व त्याला तसे दिसले व त्याला तसे वाटलेले असते. सद्‌गुरुच्या दृष्टीने आंतरिक सत्य हे आहे की, ना चांगले स्वास्थ ना आजारपण ना इतर काही त्यांच्या अस्तित्वाला (अनंततेला) किंचितही स्पर्श करु शकते कारण मायावी म्हणून मायेची त्यांना पूर्ण चेतना (पूर्ण जाणीव) असते व अशाप्रकारे स्वास्थ्य व आजार ह्या दोन्ही बाबी मायावी (म्हणजे शुन्याची निर्मिती असल्याची) त्यांना पूर्ण जाणीव असते.

'काहीनाही' चा त्यांच्यावर कसा काय परिणाम होऊ शकेल ? 'काही नाही' च्या संस्कारावर उत्क्रांती, पुनर्जन्म व आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियाव्दारां सदगुरुने मात केलेली असते व त्याला पूर्ण जाणीव असते की तो 'सर्वकाही' (ज्यामध्ये 'काहीनाही' चा समावेश असतो.) आहे. जरी सद्‌गुरु सृष्टी-नियमांच्या अंतर्गत असतो तरी तो नियम त्याला स्पर्श देखील करु शकत

* कुतूबचे आध्यात्मिक गूढज्ञान व साहेब-ए-जमाँ (अवतार) चे गूढ ज्ञान यामधील सूक्ष्मफरक दर्शवित असताना मेहेरबाबांनी जास्त स्पष्ट केले. कुतूबचे गूढ ज्ञान आहे. '' मी परमात्मा आहे व परमात्मा सर्वकाही आहे'' परंतु साहेब-ए-जमाँचे गूढज्ञान आहे- ''मी परमात्मा आहे व मी सर्वकाही आहे'' - संपादक

नाही.

''सद्‌गुरुचा अर्थ असा की, मनुष्य परमात्मा झाला. म्हणून मनुष्य जेव्हा परमात्मा बनतो तेव्हा तो मनुष्य म्हणून रहात नाही व त्याला जर मनुष्य म्हणून राहावयाचे असेल तर त्याला मानवाच्या सर्व स्वाभाविक प्रवृत्तीचे प्रदर्शन करीत असताना त्याला मनुष्याप्रमाणे कार्य करावे लागेल, व्यवहार करावा लागेल व तेस दिसावे लागेल.

सद्‌गुरु – पूर्ण पुरुष असल्यामुळे, सद्‌गुरु सर्व स्तरावर व सर्व भूमिकांत व सर्व परिस्थितीत तसेच सर्व प्रकारे आपली भूमिका इतक्या उत्कृष्टरित्या वठवितो (किंवा उत्कृष्ट अभिनय करतो व साकार करतो) की, सामान्य मानव प्राण्यांना असे दिसेत की तो स्थूल जगातील मनुष्यातील एक मनुष्य आहे. सूक्ष्म भूमिकेतील लोकांना तो जणू सूक्ष्मभूमिकेतील मनुष्य आहे. व मनोभूमिकेतील लोकांना तो त्यांच्यापैकी एक असल्यासारखे दिसते.

''सद्‌गुरु एकाच वेळी निम्नतम व उच्चतम या दोन्ही स्तरावर असतो. एका बाजुने तो अनंतात (सत्यात) प्रस्तापित होतो व दुसऱ्या बाजुने तो मायेचा स्वामी असतो. अशाप्रकारे सद्‌गुरुचा अधिकार दोन्ही बाजूच्या चरम सीमेवर असतो व दोन्ही चरम सीमेवर सामंजस्य तेव्हाच प्रस्थापित होऊ शकते व कायम राहू शकते जेव्हा सर्व मधल्या स्थितीत व अवस्थेत सद्‌गुरु सर्व भूमिकात व सर्व स्तरावर एकाच वेळी अभिनय करतो.

''अवताराच्या बाबतीत मात्र गोष्ट भिन्न असते. सर्व भिन्नता या तथ्यात अंतर्हित आहे की सद्‌गुरु म्हणजे मनुष्य परमात्मा बनतो परंतु अवतार म्हणजे परमात्मा मानव बनतो. 'अवतार' या शब्दाचा परिपूर्ण अर्थ समजणे अत्यंत कठीण आहे. मानवजाती करिता हे जाहिर करणे सोपे आणि सरळ आहे की अवतार हा परमात्मा आहे आणि याचा अर्थ असा की परमात्मा मानव बनला. परंतु अवतार या शब्दाने जो अर्थ निघतो व जे व्यक्त होते ते 'अवताराचे' संपूर्ण स्पष्टीकरण नाही.

''असे म्हणणे अधिक समर्पक होईल की, अवतार परमात्मा आहे व तो परमात्मा सर्व मानवजातीसाठी मानव बनतो व त्याबरोबर परमात्मा सृष्टीतील सर्व चिमण्यांसाठी चिमणी, सृष्टीतील सर्व मुंग्यासाठी मुंगी, सृष्टीतील सर्व

डुकरांसाठी डुकर, सृष्टीतील सर्व धूळीसाठी धूळीचा कण, सृष्टीतील सर्व हवेसाठी हवेचा कण, इत्यादी तसेच सृष्टीतील सर्वांसाठी व प्रत्येकासाठी तो तसे बनतो.

''जेव्हा पाच सद्गुरु परमात्म्याच्या दिव्यत्वाला मायेत उपस्थित करतात तेव्हा त्या दिव्यत्वाचा प्रभाव मायेला व्यापून टाकतो व ते दिव्यत्व स्थूल, सूक्ष्म व मन अशा असंख्य विविध रुपात स्वतःला अभिव्यक्त करते. परिणामतः अवतार काळात परमात्मा मानव म्हणून मानवजातीमध्ये मिसळतो व मुंग्यांच्या जगात मुंगी म्हणून मिसळतो, इत्यादी परंतु जगातील सामान्य मनुष्य याचा अनुभव घेऊ शकत नाही म्हणून तो केवळ एवढेच म्हणतो की, परमात्मा मानव झाला हे समजून आपल्या मानवी जगात समाधानी राहतो.

''मनुष्याची समज काहीही असली तरी, हे तथ्य राहते की, अवतार (स्वतः) बनतो व सद्गुरु अभिनय (acts) करतो.

''व्यक्तींच्या कर्मांना आपल्यावर घेण्याशी अवताराच्या आजारपणाचा काही संबंध नसतो. जेव्हा अवतार हा परमात्मा आहे, जो सर्व दृष्टीने मानव बनला आहे, तेव्हा असे काही कारण नाही की, त्याने मानवप्राण्याचे सर्व स्वाभाविक प्रवृत्तीचे संदर्भात ग्रहणशील का असू नये. काहीही असले तरी परमात्मा मानव झाला आहे व तो अक्षरशः मनुष्य आहे. अवतार जरी प्रत्यक्षात आजारी झाला, जसा एखादा मनुष्य आजारी पडतो, हे विसरता कामा नये की अवताराला त्याचवेळेस त्याच्या अनंत शक्ती, ज्ञान व परमानंदाचे पाठबळ देखील असते.

''अवतार व्यक्तींची कर्मे आपल्यावर कदापि घेत नाही, परंतु त्याचे दिव्यत्व व्यापक रुपाने कार्य करते.

## ३१. कर्म व अकर्म : *(२१०)

१) परमात्म्याच्या परात्पर परब्रह्म अवस्थेत अचेत अकर्म असते.

२) परमात्म–साक्षात्काराच्या अवस्थेत सचेत अकर्म असते. ही पूर्णतेची अवस्था असते परंतु सद्गुरुची नाही.

३) अवस्था १ व २ च्या मधल्या अवस्थेत सचेत कर्म असते.

कर्म संस्कारांची वृध्दी करते. संस्कार उलट अधिक कर्मांना जन्म

देते व बंधन निर्माण करते. या अवस्थेत बंधन असते.

४) सातव्या भूमिकेतील मज्झूब अवस्थेत अचेत कर्म असते.

५) सद्गुरुंच्या अवस्थेत सचेत क्रियाशील अकर्म असते.

सद्गुरु संस्कारापासून मुक्त असतात. त्यांना संस्कार नसतात. त्यामुळे त्यांना स्वतःच्या आपल्या कर्मांना काही स्थान असू शकत नाही. त्यांचे जीवन अकर्माचे असते परंतु प्रचलित सभोवतालच्या परिस्थितीमुळे ते क्रियाशील बनविले जाते. त्यावेळेस जे काही वातावरण प्रचलित असेल, त्या सभोवतालच्या परिस्थितीने सद्गुरुंच्या कृती प्रेरित होतात.

**उदाहरणे :**

१) परमात्म्याच्या परात्पर परब्रह्म अवस्थेची तुलना एका पाळण्यातील गाढ निद्रेत असलेल्या बालकाशी करात येईल हे अचेत अकर्माचे उदाहरण आहे.

२) परमात्म साक्षात्कारित व्यक्तीच्या अवस्थेची तुलना (सद्गुरुची नव्हे) पूर्ण जागृती परंतु अजुनही पाळण्यात असलेल्या बालकाशी करता येईल. हे सचेत अकर्माचे उदाहरण आहे.

३) १ व २ च्या मधील अवस्थेची तुलना पाळण्याबाहेर असलेल्या जागृत बालकाशी करता येईल. हे सचेत कर्माचे उदाहरण आहे.

४) सातव्या भूमिकेतील मज्झूबच्या अवस्थेची तुलना झोपेत चालणाऱ्या मनुष्याशी करता येईल. झोपेत चालणारा झोपेत आजुबाजूला फिरतो किंवा कामही करतो परंतु या निद्रेच्या अवस्थेत त्याने काय केले याचे त्याला भान नसते. अगदी याचप्रमाणे सातव्या भूमिकेतील मज्झूब कृती करतो परंतु त्याचे त्याला भान नसते. त्याचे हे अचेत कर्म आहे. तो खातो, पितो बोलतो इत्यादी. परंतु हे सर्व त्याचे अचेत कर्म असते.

५) सद्गुरुची अवस्था एका पाळण्यात असलेल्या परंतु ज्या पाळण्याला मानवजात सतत झोका देत आहे, अशा एका पूर्ण जागृत बालकाशी करता येईल. हे सचेत क्रियाशील अकर्म आहे. पाळण्यात असताना जे आहे ते अकर्म आहे व इतरांनी पाळण्याला झोका देणे हे क्रियाशील अकर्म आहे.

## ३२. मेहेर बाबांनी सांगितलेले दिव्य शासक मंडळ*(२१०)

मेहेर बाबा सांगतात, ''प्रत्येक कालचक्रात* (युगात) ज्याची कालमर्यादा ७०० ते १४०० वर्षे असते, ६५ पासून १२५ वर्षेपर्यंत एक असे अकरा काळ असतात. प्रत्येक युगाच्या प्रारंभापासून तो अखेर पर्यंत एकूण ५५ सद्‌गुरु असतात याचा अर्थ असा की, प्रत्येक काळात* केवळ पाच सद्‌गुरु असतात प्रत्येक युगाच्या ११ व्या कालात शेवटी अवतार (साहेब–ए–जमॉ) देखील उपस्थित असतो. ५५ सद्‌गुरु अवताराशिवाय प्रत्येक युगात ५६ मज्झूब–ए–कामिल सुध्दा उपस्थित असतात. हे मज्झूब जे 'फना–फिल्लाह' अवस्थेचा अनुभव घेतात ते सृष्टीच्या दैवी लिलेच्या संचालनातील भान नसलेले निष्क्रिय भागिदार असतात.

| | पूर्ण पुरुष (सद्‌गुरु) | पूर्ण पुरुष (मज्झूब–ए–कामिल) |
|---|---|---|
| १ ला काळ | ५ | ७ (या पैकी ४ साक्षात्कारानंतर त्वरित देह सोडतात.) |
| २ रा काळ | ५ | ३ |
| ३ रा काळ | ५ | ७ (यापैकी ४ साक्षात्कारानंतर त्वरित देह सोडतात.) |
| ४ था काळ | ५ | ३ |
| ५ वा काळ | ५ | ७ (यापैकी ४ साक्षात्कारनंतर त्वरित देह सोडतात.) |
| ६ वा काळ | ५ | ३ |
| ७ वा काळ | ५ | ७ (यापैकी ४ साक्षात्कारनंतर त्वरित देह सोडतात.) |
| ८ वा काळ | ५ | ३ |
| ९ वा काळ | ५ | ७ (यापैकी ४ साक्षात्कारनंतर त्वरित देह सोडतात.) |
| १० वा काळ | ५ | ३ |
| ११ वा काळ | ५ | ६ (यापैकी साक्षात्कारनंतर ३ त्वरित देह सोडतात.) |
| अवतार | १ | |
| | ५६ | ५६ |

* वेदांताता कालचक्राला 'युग' म्हणतात व एज (age) ला 'काल' म्हणतात, सुफी कालचक्राला 'दौर' किंवा 'जमाँ' म्हणतात व एजला 'वक्त' म्हणतात.

या तक्त्याचा अभ्यास करताना हे स्मरणात ठेवले पाहिजे की :

१) एक युग (कालचक्र) साधारणतः ७०० ते १४०० वर्षांचे असते व ते ११ काळांचे बनलेले असते. प्रत्येक काळ सुमारे ६५ ते १२५ वर्षांचा असतो व त्याचा कालावधी युगाच्या कालावधी प्रमाणे भौतिक, आध्यात्मिक व वैश्विक परिस्थितीवर निर्भर असतो.

२) प्रत्येक काळात शासक मंडळात ७००० आध्यात्मिक आत्मे (एक तर प्रगतीपथावरील किंवा पूर्ण) असतात. प्रगत आत्मे पहिल्यापासून तो सहाव्या भूमिकेवर किंवा भूमिकांच्या मध्ये असतात व पूर्ण पुरुष एकतर सद्‌गुरु किंवा मज्झूब असतात. पहिल्यापासून दहा पर्यंत प्रत्येक काळात पाच सद्‌गुरु (कुतूब) असतात व यापैकी एक 'कुतूब–ए–इर्शाद' असतो.

३) एका युगाच्या अकराव्या व शेवटच्या काळात अवतार (साहेब–ए–जमॉ किंवा मसीहा) आपल्या मसीहाचे (ख्राईस्टचे पद) कार्यालयाचा (मुकाम–ए–मुहम्मदी) कार्यभार स्वतः (देहात असताना) आपल्या हातात घेतो, त्याचवेळेस कुतूब–ए–इर्शाद आपल्या पदावर कार्यकरणे बंद करतो. अशाप्रकारे पाच सद्‌गुरुंची संख्या प्रत्येक काळात कायम राहते.

४) प्रत्येक येणाऱ्या काळात पूर्ण मज्झूबची संख्या आळीपाळीने बदलत जाते, जी पहिल्या काळात सात तर दुसऱ्या काळात तीन व तिसऱ्या काळात सात याप्रमाणे पुढे बदलत जाते. तथापि अकराव्या काळात मज्झूब–ए–कामिल सहा असतात.

त्या काळात जेथे तीन पेक्षा जास्त मज्झूब आहेत, म्हणजेच १ ल्या, ३ ऱ्या, ५ व्या, ७ व्या ९ व्या व ११ व्या काळात प्रत्येकी सात पैकी चार अतिरिक्तजण साक्षात्कारित (मज्झूब–ए–कमिल) होताच तत्काळ आपले शरीर सोडतात. याचा अर्थ असा की, पहिल्यात, तिसऱ्यात, पाचव्यात सातव्यात व नवव्या काळात सात मज्झूब पैकी चार साक्षात्कारानंतर लगेच मृत्यू पावतात. अकराव्या अंतिम काळात जे सहा पूर्ण मज्झूब असतात त्यापैकी तीन साक्षात्कारित झाल्याबरोबर लगेच आपले शरीर सोडतात.

याचा परिणाम असा होतो की, कोणत्याही दिलेल्या काळात केवळ तीन मज्झूब शरीरात असतात. अशाप्रकारे आध्यात्मिक शासक मंडळाच्या

प्रशासनाच्या दृष्टीने प्रत्येक काळात खरे पाहता केवळ तीनच मज्झूब असतात.

मेहेर बाबा एका विशिष्ट काळासाठी प्रत्येक भूमिकेत व सात भूमिकांच्यामध्ये कार्यकारी शासक मंडळाच्या ७००० सदस्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करतात.

पहिल्या भूमिकेत व पहिल्या व दुसरीच्या मध्ये, २ री व ३ री च्या मध्ये, ३ ऱ्या व चवथीच्या मध्ये, चवथ्या व ५ वीच्या मध्ये, ५ वी व सहाविच्या मध्ये सहावी व सातवीच्या मध्ये एकूण ५६००

| | |
|---|---|
| २ ऱ्या भूमिकेत | ६६६ |
| ३ ऱ्या भूमिकेत | ५५८ |
| ४ थ्या भूमिकेत | ५६ |
| ५ व्या भूमिकेत | ५६ |
| ६ व्या भूमिकेत | ५६ |
| ७ व्या भूमिकेत (मज्झूब शरीरात) | ३ |
| पूर्ण पुरुष (सद्‌गुरु) | ५ |
| | ७००० |

प्रत्येक युगाच्या अकराव्या काळातील अवतार, यामुळे संख्या येते ७००१

पृथ्वीवर सदासर्वकाळ नेहमीच ५६ परमात्म साक्षात्कारी आत्मे किंवा मानव देहात असलेले शिवात्मे असतात व या ५६ पैकी केवळ आठ आत्म्यांना सार्वजनिक मान्यता प्राप्त झालेली असते जे ७००० सदस्यांच्या आध्यात्मिक प्रशासक मंडळाचे क्रियाशिल सदस्य म्हणून कार्य करतात, जे सदस्य चेतनेच्या विविध भूमिकांवर त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीप्रमाणे किंवा पूर्णतेप्रमाणे त्यांच्यावर सोपविलेली आध्यात्मिक कार्ये करतात.

उरलेले परमात्म–साक्षात्कारी ४८ आत्मे हे ७००० सदस्यांच्या कार्यकारी दिव्य मंडळाच्या प्रशासनात समाविष्ट नाहीत. ते अलिप्त राहतात व लोकांना त्यांच्या दिव्यत्वाची जाणीव नसते, जरी ते सर्व ४८ आत्मे इतर आठांप्रमाणे ''मी परमात्मा आहे'' या दिव्यावस्थेचा तोच अनुभव व तोच आनंद घेत असतात. हे ४८ आत्मे जणू प्रतिक्षा यादीवर कोणत्याही एक किंवा अधिक कार्यकारी सदस्यांच्या देहत्यागातून निर्माण झालेल्या आध्यात्मिक पेचप्रसंगी

मदत करण्यास हजर असतात.

७००० सदस्यांच्या कार्यकारी दिव्य शासक मंडळामधील आठ परमात्म साक्षात्कारी आत्मे त्या मंडळाचे प्रमुख असतात व त्यापैकी पाच सद्‌गुरु असतात ज्यांना व्यापक सार्वजनिक मान्यता प्राप्त झालेली असते व त्यांना समग्र मानवजातीच्या लाभासाठी आध्यात्मिक सेवा प्रदान करण्याचे कार्य करावे लागते. उर्वरित तीन मज्झूब असतात व ज्यांना परमात्म अवस्था प्राप्त झालेली असली व ते शरीरात असले तरी मानवजातीप्रती कोणतेही आध्यात्मिक कार्य त्यांच्याकडे नसते. असे असले तरी जे त्यांच्या संपर्कात येतात त्यांच्याकरिता ते आध्यात्मिक लाभाचा स्रोत होतात.

तेव्हा असे म्हटले जाऊ शकते की, ज्याअर्थी पाच सद्‌गुरु संपूर्ण मानवजातीची आध्यात्मिक सेवा करतात, व फारच थोडे जे तीन मज्झूबच्या संपर्कात येतात व त्यांची सेवा करताता ते त्यांच्यापासून आध्यात्मिक लाभ प्राप्त करता, जेव्हा ४८ साक्षात्कारीत आत्मे मान–प्रतिष्ठा व कार्यापासून अलिप्त असतात तोपर्यंत की, आठ परमात्म–प्राप्त आत्म्यापैकी एक किंवा अधिकांनी शरीर सोडल्यामुळे कार्यकारी मडळात जागा होत नाही.

## ३३. अवतार म्हणून परमात्म्याचे अवतरण *(२१२)

सृष्टीची उत्पत्ती परमात्म्यापासून झाली. परमात्म्याची उत्पत्ती सृष्टीपासून झाली नाही. माया सत्यातून निर्माण झाली. सत्य मायेतून निर्माण झाले नाही. केवळ परमात्मा सत्य आहे. विश्व स्वतःच माया आहे.

अवतार व सद्‌गुरुच्या रुपात मायेच्या अंतर्गत जगलेले परमात्म्याचे जीवन मायावी असत नाही, परंतु सर्व सजीव व निर्जीव प्राणी म्हणून सृष्टीच्या अंतर्गत जगलेले परमात्म्याचे जीवन सत्य व मिथ्या दोन्ही असते. माया, मायावी जीवन व मायेतील परमात्म्याचे जीवन एक नाही व एक होऊ शकत नाही. मायेला काही जीवन नाही व जीवन असणेही शक्य नाही. माया ही माया आहे व ती स्वतः एक शून्य आहे. मायावी जीवनाचा अर्थ आहे, मायेत, मायेच्या सोबत व मायेने घेरलेले जीवन व जरी हे जीवन आहे (जसे आत्मा सृष्टीत अनुभवतो.) तरी ते जीवन मायावी असते. परंतु परमात्म्याने मायेत जगलेले जीवन मायावी नसते कारण मायेतील जीवन जगूनही परमात्म्याला आपल्या सत्यतेची चेतना

असते.

परमात्मा पूर्णतः स्वतंत्र आहे व विश्व पूर्णतः परमात्म्यावर निर्भर आहे. असे असले तरी सद्गुरु जेव्हा अवतार म्हणून परमात्म्याचे अवतरण सृष्टीत घडवून आणतात तेव्हा ते सत्याला व मायेला परस्परावलंबी करतात म्हणजे त्यांना एकमेकावर अवलंबून ठेवतात. अशाप्रकारे जे लोक मायेत डूंबलेले असतात ते त्या परमात्म्याच्या अनंत कृपेला व अनिर्बंध प्रेमाला शाश्वतरित्या आपल्याकडे आकृष्ट करीत राहतात.

परमात्मा व सृष्टी यांच्यामध्ये अनंत कृपा व अनिर्बंध प्रेम हे एक महत्वाची कडी म्हणून कार्य करतात ज्याचा उपयोग ते लोक शाश्वतरित्या करुन घेतात जे परमात्मा झालेले असतात (सद्गुरु, पूर्णपुरुष किंवा कुतूब) व परमात्मा जो मानव बनलेला असतो (अवतार, ख्राईस्ट किंवा रसूल) व यामुळे सृष्टी परमात्म्याची शाश्वत सवंगडी बनते. या प्रमुख कडीचेव्दारां अवताराने न केवळ आपल्या दिव्य लिलेत जीवन प्रस्थापित केले परंतु मायेच्या अंतर्गत विधान (law) देखील स्थापित केले. हे विधान परमात्म पुरुषाने किंवा अवताराने प्रस्थापित केल्यामुळे ते विधानरहित अनंततेचे विधान आहे, ते शाश्वतरित्या सत्य आहे व त्याचवेळेस ते मायावी (भ्रामक) पण आहे. हे तेच विधान आहे जे सृष्टीचे संचालन करते. जे सृष्टीचे उत्थान व पतन प्रशासित करते. सृष्टीची रचना आणि विनाश याच विधानाने संचालित होत असतात.

कालचक्राच्या कालावधित परमात्म्याची स्वतंत्र निरंकुशता अवतारव्दारां या विधानावर परमात्म्याच्या मर्जीच्या रुपात कार्यान्वित होते व याचा अर्थ असा की, अवतार कोणतीही व प्रत्येक गोष्ट जी करण्याची इच्छा करतो ती परमात्म्याने निर्धारित केलेली असते.

## ३४. तौहीद किवा परमात्म्याशी एकरुप अवस्था : *(२१९)

'तौहिद' किंवा परमात्म्याशी ऐक्य असलेल्या अवस्थेला समाविष्ट करणारा सिध्दांत वादातीत आहे. तो सर्व ज्ञान असलेल्या धर्माचा मूलभूत पाया आहे व सुफीवाद व वेदांतात आध्यात्मिक साधनेचे अंतिम लक्ष्य आहे. तौहीदला सिध्दांतरुपात स्वीकारणे हा जनसमूहाचा विशेषाधिकार आहे, परंतु त्यांच्या आंतरिक भागात जाणे ही काही निवडक लोकांची विशेषता आहे. हा सरळ व

कठीण दोन्हीही आहे. वरवर पाहता तौहीद इतका सोपा आहे की त्याची व्यासपीठावर व धर्ममंचावर व्यापक प्रमाणात चर्चा केली जाते. परंतु त्याला प्राप्त करणे इतके कठीण आहे की, त्याच्याकरिता केलेल्या अतिप्रयासातून केवळ बेहोषी व गोंधळाशिवाय काहीच हातात येत नाही.

परमात्म्याशी ऐक्य आपल्या अलौकिक पैलूत सुफीवादाचे 'तौहीद–ए–तन्जीही' (परिपूर्ण ऐक्य) व वेदांतातील अव्दैत आहे. तौहीदची समस्या, पुराणताली कथेतील हत्तीचे परीक्षण करणाऱ्या अनेक आंधळ्याच्या दृष्टांताप्रमाणे विविध पैलू प्रस्तुत करते. प्राण्याच्या विविध अवयवांना स्पर्श करुन प्रत्येकाने त्या प्राण्याविषयी आपापले वेगळे मत बनविलेले असते. विषयसंदर्भातील प्रत्येकाचा दृष्टीकोण अगदी बरोबर व वादातीत असला तरीही सर्व मिळून हत्ती अगदीच वेगळा असून तो आंधळ्याला न समजण्यासारखा आहे. तौहीद व त्याच्या काही पैलूंचे संदर्भात प्रमुख सुफींना जे विशेष आकर्षित* करतात ते पुढील प्रमाणे आहे.

---

* सुफींच्या शब्दात जी वरपांगी विसंगती दिसते ती सत्याचा अनुभव अभिव्यक्त करण्याच्या तसेच निरनिराळ्या संदर्भात विभिन्न परिस्थितीत व विभिन्न दृष्टीकोणातून तो सत्यानुभव वर्णन करण्याच्या केवळ मर्यादित साधनामुळे आहे. – जे (सत्याचा अनुभव व साक्षात्कार) एका अनुभवात किंवा समग्र साक्षात्कारात नेहमी बरोबर असतात. मेहेर बाबा म्हणतात– ''ही शाब्दिक भिन्नता सत्यानुभूती व सत्याच्या साक्षात्काराचे खंडन करीत नसून उलटपक्षी ती पुष्टी करते जे सत्य या वरपांगी विसंगतीच्या मागे विद्यमान असते. या संदर्भात आधीच दिलेली स्पष्टीकरणे मागील पानात जी आली आहेत, ती नेहमी लक्षात ठेवली पाहिजे, जसे–

पान २६०– सत्याप्रत पोहोचणे व्यक्तिगत आहे, म्हणून तपशिलांचे बाबतीत ते एखाद्याच्या आध्यात्मिक प्रवृत्तीवर, शारीरिक ग्रहणशक्तीवर व बाह्य परिस्थितीवर निर्भर असते.

पान २६५– हजारो साधक विविध अनुभवांचा आनंद घेत असतील परंतु गूढ ज्ञानमार्ग मात्र एकच आहे.

पान २७७– अनुभवाच्या अनुभवांचे विविध पैलू असले तरी सर्व पैलूंचा अनुभव एकत्र व एकाच वेळी घेतल्या जातो.

पान ३०१– एका दृष्टीने एखाद्याला जास्त विस्तृत वर्णन गोंधळात टाकते व कमी वर्णन विषयाचे स्पष्टीकरणे संदिग्ध करते. यामुळे विविध प्रकारचे शब्द व स्पष्टीकरणे विविध संदर्भात विविध दृष्टीकोणातून उपयोजिण्यासाठी निर्माण होतात. प्रत्यक्ष अनुभूतीच्या अभावामुळे एकाच वस्तूचे वर्णन नेहमी विसंगत वाटते. परंतु सापेक्ष अनुभवांच्या दृष्टीने किंवा अंतिम सत्याच्या साक्षात्काराच्या दृष्टीने हेच परस्पर विरोधी वर्णन त्याच एकमेव सत्याविषयी खरोखर पूरक अभिव्यक्ती म्हणन सिध्द होते.

''तौहिद हे असे सत्य आहे की, ज्यामध्ये संस्कार (नुकूश) नष्ट होतात व ज्ञान प्रकट होते व परमात्मा इतका निष्कलंक व निर्मळ राहतो की जसा तो आधी होता.'' – बगदादचा जुनायद

''तौहीद हे परमात्म्याचे ज्ञान आहे व हे ज्ञान आध्यात्मिक गूढ ज्ञानवंताला मूळ (कादीम) व मुळापासून उत्पन्न झालेले (हदस) जीव यामधील भेद दाखविण्यास सक्षम करते. तोहीदच्या अनुभवापलिकडे असलेल्या अवस्थेतच तौहीदची अस्वीकृती समाविष्ट आहे. – बगदादचा जुनायद

''प्रियतमाच्या गुणात प्रेमीचे विलीन होणे म्हणजे तौहीद

– जहागीर समनानी

तौहीदचे दोन पैलू आहेत : पहिला त्याची अवस्था आहे व दुसरा त्याचे वर्णन. तौहीदचा वर्णनात्मक पैलू प्रेषितांच्या धार्मिक प्रसार कार्याशी संबंधित आहे व त्याच अवस्थेत अनंत व अनिर्बंध महासागर समाविष्ट आहे. वर्णनात्मक पैलू वाणी, दृष्टी, श्रवण व बोध यांच्या माध्यमावर निर्भर असते व हे सर्व वेगवेगळ्या समर्थनाची मागणी करतात. बाह्य प्रमाणांच्या आधारावर याची पुष्टी करणे म्हणजे व्दैत सूचवणे आहे, व तौहीद व्दैताच्या सर्व लक्षणापासून मुक्त आहे. मनुष्याचा विश्वास व्दैताच्या गर्दीच्या मार्गावरुन जाते व या अवस्थेचा पूर्णतः त्याग करणे शक्य नाही.

वर्णनात्मक तौहीद दीपकासारखा आहे तेव्हा तौहीद आपल्या स्वतःमध्ये स्वतःच सूर्य आहे. जेहा सूर्य प्रकटतो तेव्हा दीपकाचा प्रकाश शून्यात विलिन होते. वर्णनात्मक तौहीद परिवर्तनीय आहे परंतु तौहीद ची अवस्था अपरिवर्तनीय व शाश्वत आहे. जिव्हेने उच्चारलेले शब्द हृदयाकडून स्वीकारले जात नाहीत. जेव्हा अध्यात्ममार्गावरील एखादी व्यक्ती हृदयाच्या स्थानावर विराजमान होते तेव्हा जिव्हा निष्क्रिय व मौन होते. यानंतर हृदय देखील आत्म्याच्या (जान) आधीन होते व या अवस्थेत साधक त्याच्याशी बोलतो हे बोलणे, सारतत्वाच्या संदर्भात नसते तर ते त्याच्या गुणधर्माचे संदर्भात असते. गुणधर्म बदलत असतात परंतु सारतत्व (ऐन) बदलत नाही. सूर्य पाण्याला गरम करतो ज्यामुळे पाण्याचा गुणधर्म बदलतो परंतु पाणी तसेच असते म्हणून तौहीदच्या समर्थनाचा स्वतः प्रयत्नच तौहीदच्या मूळ निष्कलंक निर्मलतेला कलंकीत करतो. (अरबत–उत–तौहीद, फसादून फित–तौहीद)

तौहीद अव्दैतवादी (मवाहिद) करिता परम ऐक्याच्या (जमाल–ए–अहदियत) सौंदर्यावर पडदा टाकते. तौहीद या कारणावरुन संशयास्पद आहे कारण तुम्ही आपल्या स्वतःपासूनच त्याची कामना करता.

''तो जो तौहीदच्या संबंधात लिहितो तो मुलहीद (तर्कवादी) आहे, जो त्याच्याकडे अंगुली–निर्देश करतो तो व्दैतवादी. जो त्याच्याविषयी काही निष्कर्ष काढतो तो मुर्तिपूजक आहे, जो त्याच्या विषयी चर्चा करतो तो बेजबाबदार आहे, जो त्या विषयी मौन आहे तो अज्ञानी, जो असे समजतो की त्याने ते प्राप्त केले आहे तो आत्मवंचित आहे, जो त्याच्या निकट असल्याची कल्पना करतो तो दूर असतो, जो बुध्दिने त्याचे मूल्यमापन करतो व त्याविषयी आपले मत निर्धारित करतो तो त्यावर आपला विश्वास ठेवतो – जो वरपांगी असतो व जो शोध न घेताच प्राप्त करतो तो तर भटकलेला आहे.'' – अबू बक्र शिब्ली

तौहीद विषयी जर अखंडतेच्या (तन्जीह) संदर्भात सांगितले तर ते त्याला मर्यादा घालणे आहे व त्याला मर्यादित (तश्बीह) या संदर्भात सांगितले तर त्याला नियंत्रित व सीमित करणे होय. दोन चरम सीमांना–टोकांना समान करणे तथापि हेच पूर्ण व जे अगदी वांछनिय आहे.– महयुद्दीन इब्न अरबी

तौहीद वस्तुतः तौहीदची विस्मृती आहे. जे भौतिक जगात सामान्य चेतनेप्रत उतरतात त्यांना तेथे काही कार्य करण्याकरिता असतेच म्हणून तौहीदची तुलना एका सावकाराशी करता येईल ज्याचे देणे जीवनात कदापिही पर्याप्त किंवा पूर्णपणे फेडले  जात नाही. –कुदुन्तुल कुब्रा

तौहीद ही परमात्म्याची एकत्वाची अवस्था आहे म्हणून कोणत्याच भाषेत वर्णन करता येत नाही. जसे त्या श्रेष्ठ अवस्थेत असे कोणीच असत नाही की, ज्याला संबोधित करता येईल.

सुफींनी तौहीदला मानवाच्या विभिन्न आध्यात्मिक उन्नतीच्या अवस्थेप्रमाणे व त्यातील अभिप्रेत अर्थानुसार पाच प्रमुख प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१) तौहीद–ए–अक्वाली– परमात्म्याचे शाब्दिक ऐक्य

२) तौहीद–ए–अफाअली– परमात्म्याचे क्रियाशील ऐक्य

३) तौहीद–ए–अहवाली– परमात्म्याचे भावनात्मक ऐक्य

४) तौहीद–ए–सिफती– परमात्म्याचे  गुणात्मक ऐक्य

५) तौहीद–ए–जाती– परमात्म्याचे  साररुपाने ऐक्य

१) तौहीद–ए–अक्वाली, हे मानवजातीच्या अधिकांश लोकांशी संबंध ठेवते जे कोणत्याही एका प्रेषितावर (अवतार) व त्याच्या संदेशावर श्रध्दा ठेवतात. या अवस्थेत परमात्म्याची केवळ शाब्दिक स्वीकृती किंवा परमात्म्याच्या अव्दैतावर विश्वास तसेच विधात्याव्दारां कर्तव्याच्या पालनासंबंधीचे गुण आगामी आध्यात्मिक जीवनाची तयारी म्हणून पुरेशे समजले जातात. यालाच तौहीद–ए–शरियत देखील म्हणतात.

२) तौहीद–ए–अफाअली चा संबंध अध्यात्म मार्गावर जे प्रविष्ट झालेले आहेत त्यांच्याशी आहे. सूक्ष्म भूवनात (आलम–ए–मलकूत) प्रविष्ट झालेल्या साधकाव्दारां परमात्म्याच्या ऐक्याची अभिव्यक्ती वास्तविक पवित्र आत्मे, देवदूतांच्या जीवनाशी मिळती–जुळती आहे. या अवस्थेत आध्यात्मिक श्रद्धा जी अंतर्यामी उत्पन्न झालेली आहे, ती ही की, प्रत्येक चांगल्या किंवा वाईट गोष्टीच्या पाठीमागे परमात्म्याची प्रेरक शक्ती असते.

३) तौहीद–ए–अहवालीचा प्रकाश मनोभुनातील पाचव्या भूमिकेतील प्रगत आत्म्यावर पडतो. या अवस्थेत आत्मा आपल्या स्वतःला दिव्यतेच्या प्रत्यक्ष प्रसारणाने सुसज्जित झालेला पाहतो व सूक्ष्म व स्थूल भुवनातील अन्य आत्म्यांना जाणीवपूर्वक किंवा नेणीवपूर्वक प्रचंड सहायता करतो.

४) तौहीद–ए–सिफती – ही त्याच मनोभुवनातील सहाव्या भूमिकेची आहे. आत्म्याला अजुनही चिकटून असलेली स्थूल भूमिकेची भौतिकता व सूक्ष्मभमिकांची सूक्ष्मता, ज्याप्रमाणे सूर्यासमोर ताऱ्यांचा प्रकाश दिशेनासा होतो त्याप्रमाणे पूर्णता दूर सारली जाते व नष्ट केल्या जाते. ३ व४ या दोन्ही प्रकारच्या तौहीद त्या एकाच मनोभूवनाच्या (आलम–ए–जब्रुत) आहेत व सर्व तिन्हींना सामुहिकरित्या तौहीद–ए–तरीकत म्हणतात.

५) तौहीद – ए – जाती– हा हकिकतच्या पाचव्या यथार्थ भुवनातील परमात्म–साक्षात्कार आहे, ज्यामध्ये 'मारेफत–ए–हकिकत' च्या विभिन्न अवस्था व पैलू समाविष्ट आहेत जसे 'लाहूत' च्या अवस्थेत 'हालात–ए–मुहम्मदी' व यथार्थ भुवनाच्या 'हाहूत' च्या अवस्थेत 'हकिकत– ए–मुहम्मदी.'

सुफिंचे या मुद्यावर एकमत आहे की, साक्षात्कारात किंवा 'तौहीद–ए–जातीत' अतर्निहित असलेल्या विविध पैलूत अत्यंत उत्कृष्ट पैलू आहे मनुष्य व

परमात्मा यांच्यामध्ये ’उबूदियत’ च्या (सेवक भाव) फरकाला महत्व देणे. या आध्यात्मिक तथ्याचा ख्रिश्चन संप्रदायाने चुकीचा अर्थ लावला आहे व त्याचा दुरुपयोग केला, मनुष्य हा मनुष्य आहे व परमात्मा हा परमात्मा आहे व मनुष्य कदापिही परमात्मा होऊ शकत नाही व परमात्मा कधी मनुष्याच्या (निम्न) स्तरावर उतरु शकत नाही. तथापि या परिस्थितीत सत्य हे आहे की, तौहीद–ए–जाती च्या प्राप्तीनंतर ’उबूदियतवर’ (सेवकभाव) जोर देणे सालिकचा तिसरा प्रवास ध्वनित करते ज्याला ’सैर–ए–मा–अल्लाह’ परमात्म्यासह सामान्य चेतनेवर उतरणे, असे म्हणतात.

तौहीदच्या विविध स्थिती व पैलू ज्यांची वर चर्चा केलेली आहे त्या तक्त्याचे रुपात खाली दिल्या आहेत.

| स्थिती | पैलू | भुवन |
|---|---|---|
| तौहीद–ए–जाती | १. आशीक–ओ माशूक (प्रेमी व प्रियतम एकात) २.आशीक (प्रेमी) व माशूक (प्रियतम दोन्ही एकत्र) | १. आलम–ए–लहूत<br>२. आलम–ए–हाहूत (पाचवे भुवन) |
| तौहीद–ए–सिफती | आशिक (प्रेमी) | आलम–ए–जब्रूत |
| तौहीद–ए–अहवाली | अरिफ (ज्ञानी) | (तिसरे भुवन) |
| तौहीद–ए–अफाअली | वासिफ (प्रशंसक) | आलम–ए–मालकूत (दूसरे भूवन) |
| तौहीद–ए–अक्काली | वाकीफ (स्थूल सचेत) | आलम–ए–नासूत (पहिले भुवन) |

**वुजूदिय्याह व शूहूदिय्याह**

विभिन्न प्रकारच्या अव्दैत वाद्यांमध्ये (अहल–ए–तौहीद) अत्यंत महत्वपूर्ण व विवादास्पद दोन विचार प्रवाह आहेत ज्यांना 'वुजूदिय्याह' व 'शूहूदिय्याह' असे म्हणतात.

मुहयुद्दीन इब्न अरबी हा 'वुजूदिय्याह' या विचार धारेचा एक महान प्रतिपादक आहे जो 'वहदत–उल–उजूद' चे (आत्म्याच्या अस्तित्वाची एकता) समर्थन करतो, जो वेदांतात अव्दैतवाद आहे ज्याचे समर्थन महान भाष्यकार शंकराचार्यांनी केले आहे. गजूर–ए–इलाही यांच्या मते इब्न अरबी यांचे भाष्य असे आहे की, अस्तित्व (वुजूद) एकापेक्षा अधिक नाही व अगदी तेच आहे जे स्वतःचे द्वारा स्वतःलाच प्रकट असते, पाण्यासारखे जे स्वतःला बर्फाच्या रुपात सीमित स्वरुपात व्यक्त करते. फनाच्या अवस्थेत जेव्हा सीमितता (रुप) लुप्त होते व परमतत्व राहते व ते हू हू (तो तो) बनते.

शेख शहाबुद्दीन सुऱ्हावर्दी 'शुहूदिय्याह' या विचार धारेच्या प्रमुख प्रवर्तका पैकी एक आहेत. ते आपल्या तत्वज्ञानाची लक्षणे, 'वहादत–अल–शुहूद'(स्पष्टवाद) जो विशिष्ट व्दैत म्हणून वेदांतात मानल्या जातो, त्याचे प्रतिपादन करताना सांगतात की, फनामध्ये बन्दा (सीमित प्राणी)कानहूहू (परमात्म्या सारखे) बनतो व हू हू (तो तो) बनत नाही. अगदी ज्याप्रमाणे अग्नीत पडलेले लोखंड अग्नी प्रमाणे बनते परंतु स्वतः अग्नी होत नाही– लोखंडाची यथार्थता अग्निच्या यथार्थतेपासून अगदीच भिन्न असते, 'शुहूदिय्याह' चे समर्थक दोन भिन्न अस्तित्वांची (जात) व दृष्टिसमोरील दोन स्पष्ट वस्तूंची व्याख्या करताना सांगतात, लोखंड व अग्नी यामध्ये लोखंड तात्पुरते अग्नी बनते परंतु नंतर लोखंड हे लोखंडच राहते व अग्नी अग्नी असतो

मिर्झा जान जनान म्हणतात की, परमात्म्याच्या अप्रकट पैलू व प्रकट पैलूत जे नाते आहे ते सागराच्या लाटा व बुडबुड्यांचे जसे महासागराशी नाते असते त्या प्रमाणे आहे. हे अनेकत्व कोणत्याच प्रकारे सत्याच्या एकतेमध्ये बाधा आणीत नाही किंवा त्याला प्रभावित करीत नाही. हा 'वहादत–उल–वुलूद'(ऐक्यवाद) आहे. याउलट दुसरी स्थिती जी परमात्मा व सृष्टीचे नाते सुनिश्चित करते ती आहे मूळ व त्याची छाया किंवा सूर्य व त्याची किरणे म्हणजे

’वहादत–उल–शुहूद’(ऐक्याभासवाद)

मुहियुद्दीन इब्न अरबी यांचे ’वहादत–उल–वुजूद’ अहादियतच्या (सचीत ऐक्य) उंचीशी संबंध ठेवते व या अवस्थेची अनुभूती आहे – ’हमे अस्त’–सर्वकाही तोच आहे.

शेख शहाबुद्दीन सुऱ्हावर्दी जे मुजदीद नावाने देखील ओळखले जातात, यांचे ’वहादत–उल–शुहूद’ सत्यतेच्या (हकीकत) त्याच उंचीवरुन आलेले आहे परंतु गूढ ज्ञान जे व्यक्त करते ते आहे– ’हमे अज अस्त’(सर्वकाही त्याचेपासून आहे)

हे दोन सिध्दांत व परिणामस्वरुप मतभेद त्यानंतर वर्तमान ’दौर–ए–कलन्दरी’(प्रभुत्वाचे कालचक्र) च्या प्रारंभी निर्माण झाले व यामुळे अरबी प्रेषितांच्या जीवनकाळात याचा काही प्रश्न नव्हता.

वजुदिया लोकांचा सिध्दांत अनुभव तसेच तर्कावर आधारित आहे, जेव्हा शहूदिया लोकांचा सिध्दांत अनुभव व कुराणाच्या सामान्य पैलूवर आधारीत आहे.

इब्न अरबी अनुभवातीतता व अंतर्निहितता जे व्दंव्दाचे द्योतक आहेत ते अमान्य करतो. तो ठासून सांगतो की परमात्मा एकच आहे व तोच केवळ एकमेव अस्तित्वात आहे. बाकी सर्वकाही जे अस्तित्वात असल्यासारखे दिसते ते त्याचेच प्रकटीकरण किंवा ’तजल्लियत’ असते. म्हणून परमात्मा सिफत (गुण) चा समानर्थी शब्द आहे व सर्व दैवी नावे या नावाशी समानार्थी आहेत जे नाव आहे ’अल्लाह’’वुजूदियाह’ विचार धारेच्या संताचे लक्ष अस्तित्वाच्या एकतेवर आहे (वहिद–उल–उजूद)–परमात्म्याची अहादियतच्या स्थितीपासून निर्माण झालेली प्रथम तजल्ली (अभिव्यक्ती) आहे. म्हणून नंतरचे पतन जसे मन, स्थूल व सूक्ष्म भूवने– छायेसारखे आहेत–(झिल) जे काहीच नाही व अशाप्रकारे जातवर (दैवी सारतत्वावर)एका पडछायेचे काम करते. छायेचे (झिलचे) अस्तितव परमात्म्यामुळे आहे व ते त्यावरच निर्भर आहे जे अनंत आहे व शाश्वत आहे. अशाप्रकारे छाया देखील या अर्थाने आहे या दृष्टिने की वुजूदिया लोक प्रत्येक गोष्टीला परमात्म्याच्या रुपात पाहतात मग छायेला (मनो, सूक्ष्म व स्थूल जगतांना) देखील आपले स्वतंत्र अस्तित्व नाही.

या आधीच सांगितल्याापप्रमाणे शहूदिया लोक दोन 'जात' (अस्तित्व) वर विश्वास ठेवतात. एक सत्यतेच्या 'जात' वर व दुसरे असत्यतेच्या 'जात' वर, एक परमात्म्याच्या 'जात' वर व दुसरा बन्दा (मनुष्य)च्या 'जात' वर. बन्दाची जात शून्य (आदम) व हे आदम (शून्य) सापेक्ष (इजाफी) आहे व ते सत्य (हकिकत ) नाही. जर 'काही नाही' ला (आदम) सार सत्य समजावयाचे असेल तर तेथे दोन 'जात' राहतील व जो विश्वास पुन्हा व्दैताला जन्म देतो. 'आदम –ए– इजाफी' हे केवळ सापेक्षरुपाने 'आदम' (काही नाही) असे ते केवळ शून्य आहे. शून्याला अनेक शून्य जोडल्याने अंकाच्या मूल्यात फरक पडत नाही. अतः 'आदम' परमात्म्याच्या ज्ञानात एक प्रतिकात्मक आहे. ज्या अर्थी पूर्णता 'जातशी' संबंध ठेवते त्याअर्थी परमात्मा स्वतः पूर्णता आहे . अपूर्णतेचा संबंध आदमशी येतो म्हणून 'वाईट' ही आदमची (अस्तित्वरहित ,अस्तित्वाची) अभिव्यक्ती आहे. केवळ 'मुजाद्दीद' मतवाल्यांनी 'वहदत–उल–शुहूद 'सिध्दांताला परत पुष्टी व बळकटी दिली जो सिध्दांत मूलतः अल–इन्सान – उल– कामिलचे लेखक अब्दुल करीम अल जिल्लींनी प्रस्थापित केला जातो.

तथापि आध्यात्मिक सत्य हे आहे की, 'वुजूदिया' दर्शनशास्त्र उच्चतर प्रकारचे आहे व ते सुविधा किंवा कसल्या मधल्या मार्गाचा स्वीकार करीत नाही. मेहेर बाबांचा ज्ञानमार्ग सत्याच्या या दोन्ही प्रणालींना लागू होते. व याला समजण्याकरिता, जसे की हे ''परमात्म्याच्या दहा अवस्था''मध्ये दिल्यानुसार, सुफी जगताचे 'खमसा–वजूदत' (पाच अस्तित्व) म्हणून ज्ञात असलेल्या क्रमबध्द अवस्थांच्या मार्गाने 'तनज्जुलत' परमतत्वाचे अधःपतनाचे चित्रण करणाऱ्या सुफी पध्दतीचा काही परिचय साधकाकरिता सहाय्यक ठरेल.

समस्त पूर्ण सुफींच्या आध्यात्मिक गूढ ज्ञानाचा आशय हा की, परात्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्मा अज्ञेय व व्याख्यातीत आहे. परमात्म्याची ही अवस्था (वरा–उल–वरा) जी परात्पर परब्रह्म आहे. ती समजण्यासाठी विचार व कल्पनेचे पंख शिथिल पडतात. 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत 'परम परमात्मा' (वुजूद–ए–मुतलक) आहे.

सुफींनी परमात्म्याच्या या अलौकिक अवस्थेचे वर्णन अनेक रीतीने

केलेले आहे जसे :
गैब–उल–गैब –(लुप्त झालेल्यामध्ये लुप्त)
मजहूल–उन–बात (अज्ञेय व व्याख्यातीत) ती ही अवस्था आहे की जेथे ‘जात‘ ला स्वतःचे ज्ञान नाही जिचे सर्व लक्षणे लुप्त झालेली आहेत )
अल–अमा– (दाट धुके) याचा आशय होतो, परमात्म्याच्या परात्पर आंतरिक पैलूचे संबंधात परमात्म्याची सुप्त अवस्था व त्याचे ‘अहदियत’ (सचेत एकता) च्या बाह्य पैलूत ज्यामध्ये ’जात‘ ला आपल्या श्रेष्ठ एकतेचे भान असते.

मेहेर बाबांनी स्पष्ट करुन सांगितले : जरी परमात्मा परब्रह्म अवस्थेतून (सचेत अव्दैत) परात्पर परब्रह्म अवस्थेत परत येणे शक्य नसले तरी त्याला हे ज्ञान असते की, तो अनंत अस्तित्व अनंत ज्ञान व अनंत आनंद होता व आहे. व त्यामुळे त्याला याचे ज्ञान असते की त्याची प्रारंभिची अवस्था ही परात्पर परब्रह्म अवस्था होती : (जात –अल–बहत)

तथापि साधकांना विषय समजण्याजोगा करण्याच्या दृष्टीने सूफींनी सृष्टीच्या रहस्याला पाच विभिन्न प्रकारांच्या ओघाने येणाऱ्या किंवा प्रकटीकरणाच्या परिभाषेत प्रस्तुत केले आहे.

’खमसा वुजूदत‘ किंवा पाच प्रकारचे अस्तित्व

(१) वहीद –उल– वुजूद ( ऐक्यविषयक अस्तित्व) हे सत्य भुवनाच्या ‘आलम–ए–लहूत‘ मधील हे प्रथम प्रकटीकरण किंवा ‘तजल्ली–ए–अव्वल‘आहे व त्यात ‘अहादियतचा’(सचेत एकतेचा) समावेश आहे.

२) अरिफ–उल–वुजूद ( ज्ञानमय अस्तित्व) ही ती अवस्था आहे की, जो हकीकत–ए–मुहम्मदीशी (मुहम्मदाची सत्यता) किंवा ‘नूर –ए– मुहम्मदीशी (मुहम्मदचा प्रकाश ) सत्य भुवनातील ‘हहूतच्या‘ स्थितीशी साहचर्यित आहे व ही ’वहदियतची‘ स्थिती आहे जी वहदियतबाबत सचेत आहे. (सचेत एकता–अनेकतेमध्ये एकता) ही दुसरी अभिव्यक्ती (तजल्ली–ए–दोयम) आहे.

३) मुमतान–उल– वुजूद (नेती–नकारात्मक अस्तित्व) ही अभिव्यक्तीची तिसरी स्थिती आहे. (तजल्ली–ए– सेहोम )हे आलम–ए जबरुत (मनोभुवन ) आहे, ज्या ठिकाणी वहदियतची (अनेकतेत एकता) स्थिती आरंभ होते.

४) मुमकिन–उल – उजुद ( संभाव्य अस्तित्व) ज्यात अन्य गोष्टीशिवाय देवदूतांचे व प्रेतात्म्यांचे जग समाविष्ट आहे.व जे ‘आलम–ए–

मलकूत'(सूक्ष्म भुवन) म्हणून ओळखले जाते व जे प्राणशक्तीचे भुवन आहे. हे 'तज ल्ली –ए– चहारुम' च्या अभिव्यक्तीची चौथी अवस्था आहे.

(५) वजीब–उल–वुजूद (आवश्यक अस्तित्व) स्थूल अस्तित्वाशी संबंधित प्रत्येक वस्तूचा समावेश यात आहे. सुफींना 'अलम–ए– नासूत'म्हणून (स्थूल भुवन) अभिव्यक्तीचा पाचवा पैलू 'तजल्ली–ए– पंजीम' म्हणून ज्ञात आहे.

ह्या स्थिती परमात्म्याच्या परब्रह्म अवस्थेपासून आरंभ करुन पाच अवरोहणांना प्रदर्शित करतात, ज्याला 'तजल्लीयत–ए–खमसा' (पाच अभिव्यक्ती) किंवा 'खमसा वुजूदत (पाच अस्तित्वे) म्हणून ओळखिली जातात.

आता आपण त्यापैकी प्रत्येकाचे चढत्या मालिकेत वजीब–उल–वुजूद (आवश्यक अस्तित्व) पासून प्रारंभ करुन त्याचा ''वहिद–उल–वुजूद''(ऐक्यविषयक अस्तित्व) मध्ये शेवट करुन विवेचन करु.

शरियत (नियम) क्षेत्रात धर्माचार्याकरिता 'वजीब–उल–वुजूद' (आवश्यक अस्तित्व) याचा अर्थ आहे की, परमात्मा एकमेव आहे ज्याचेपासून जीवनाच्या सर्व अस्तित्वाच्या श्रेणींची उत्पत्ती होते. उलटपक्षी सुफी 'सर्व काही' हा शब्दप्रयोग स्थूल व भौतिक हे ध्वनित करण्याकरिता करतात. या ठिकानी 'वुजूद' म्हणजे शरीर, कारण असे म्हणता येणार नाही की पाषाण,वनस्पती, प्राणी व मानव रुपातील उत्क्रमित आत्म्याची उत्क्रांती पंचतत्वांनी बनलेल्या स्थूल माध्यमाशिवाय होते. 'वजीब–उल–वुजूद ' या स्थितीतील हे स्थूल अस्तित्व परमात्म्याने प्रदान केलेले एक फार मोठे वरदान आहे, कारण त्याशिवाय पूर्णता, संतपण व नेतृत्व या अवस्थांच्या प्राप्तीचा विचार अकल्पनीय आहे.

स्थूल देह हे एक अद्‌भूत व अव्दितीय यंत्र रचना आहे की, ज्यात सर्व इतर चार सापेक्ष व यथार्थ अस्तित्वे, सूक्ष्म, कारण व उपमहाकारण व स्वतः परमात्मा अंतर्हित आहेत. अतः सुफी मानव देहाला 'आलम–ए– सगीर (पिंड ब्रह्मांड ) असे म्हणतात व जे 'आलम–ए–कबीर चा (ब्रह्मांड) संक्षेप संग्रह असून ज्यात पाचही अस्तित्वे समाविष्ट आहेत व ज्याचे रहस्य सद्‌गुरुच्या किंवा अवताराच्या विश्वात्मक मनाच्या मदतीशिवाय कोणीच उलगडू शकणार नाही.

वजीब–उल–वुजूद ( आवश्यक अस्तित्व किंवा स्थूल भुवन) आपले अस्तित्व 'मुमकिन –उल– वुजूद'(सूक्ष्म भुवन) पासून प्राप्त करते किंवा ते त्याचे प्रतिबिंब आहे. या ठिकाणी परमात्मा व सृष्टीमधील नाते स्वामी व गुलामाचे आहे. या अवस्थेतील उत्क्रांत होणारी चेतना किंवा मन यांना 'नफ्स –ए– अम्मारा ' (निम्न श्रेणीचा आत्मा) असे म्हणतात व त्याची स्वाभाविक प्रवृत्ती जे जे काही स्थूल असेल ते उपभोगण्याची असते. येथे परमात्मा व मनुष्य यांच्या मधील संबंधाची कल्पना 'तौहीद–ए–अकवाली' (परमात्म्याचे शाब्दिक ऐक्य ) जे परमात्म्याचे अस्तित्व मौखिकरित्या स्वीकृत करते. 'मुमकिन –उल–वुजूद' (संभाव्य अस्तित्व किंवा सूक्ष्म भुवन ) आपले अस्तित्व 'मुमतान–उल–वुजूद' (मनोभुवन) पासून प्राप्त करते. या ठिकाणी परमात्म्याचे त्याच्या अभिव्यक्त गुणांशी नाते अशा स्वरुपाचे असते की जसे पिता व लहान मुलांत असते.येथे परमात्मा आपल्या चिंतामुक्त, शिक्षा किंवा पुरस्कार यांचा विचार न बाळगणाऱ्या ज्ञान प्राप्तीची किंवा आध्यात्मिक उपलब्धीची अभिलाषा न बाळगणाऱ्या मुलांच्या प्रती कृपाळू, दयाळू व जागरुक असतो. व अशा आत्म्यांना साामान्यपणे देवदूत म्हणतात. या भुवनाच्या चेतनेला (आलम–ए– मलकूत) 'नफ्स–ए–लवाम्मा' (तिरस्कृत 'स्व') असे नाव दिले आहे व या ठिकाणी परमात्म्याच्या बोधाला (Cognition) 'तौहिद–ए–अफाली '(कर्माची एकता) म्हटले आहे.
याचा अर्थ असा की, या जगातील आत्मे त्यांच्या नियुक्त परमात्म्याच्या स्मरण कार्यात अनन्य रुपाने व्यग्र असतात.

मुमतान–उल–वुजूद ( नकारात्मक अस्तित्व किंवा मनोभुवन ) या मध्ये मार्गावील पाचवी व सहावी या भूमिका अंतर्भूत आहेत, जो मार्ग या ठिकाणी 'वहिदीयत' (अनेकात एकता) पर्यंत येऊन पोहोचतो. वहिदीयत पाचव्यापासून सुरु होते व सहाव्या भूमिकेत ते चरमसीमेव पोहोचते व त्यात सूक्ष्म व स्थूल भूमिका समाविष्ट असलेल्या सृष्टीचा सर्व तपशील स्पष्ट असतो. हे 'आलम–ए–जब्रुत' आहे व जे आपले अस्तित्व 'आरिफ–उल–वुजूद'(हकिकत–ए– मुहम्मदीची स्थिती) पासून प्राप्त करते किंवा ते त्याचे प्रतिबिंब असते त्याला म्हणतात 'मुमतान–उल–वुजूद' किंवा नकारात्मक अस्तित्व, हे केवळ या साठी की मुमतानचा अर्थ होतो जे अस्तित्वात नाही व

वुजूदचा अर्थ होतो अस्तित्वाचे रुप किंवा शरीर अशाप्रकारे मुमतान–उल–वुजूद हा शब्द ध्वनित करतो की, त्यात रुपाचे अस्तित्व नाही. ही स्थिती 'बी' सारखी आहे – ज्या बीजात वृक्षाच्या मूळ व फांद्यांची क्षमता असते व ती जेव्हा पूर्ण उत्क्रमित व प्रकट होते. तेव्हा सूक्ष्म व स्थूल भूमिकांचे प्रतिनिधित्व करते. सुफी लोक याला 'लामकान' म्हणतात, ज्यामध्ये स्थळ व अवकाशाच्या कल्पना एका बिंदूत केन्द्रित होतात.

मनोभुवनाच्या चेतनेला सुफी 'नफ्स–ए–मृतमयिन्ना' असे म्हणतात, याचा अर्थ पाचव्या भूमिकेतील आनंदित किंवा संतुष्ट आत्मा व 'नफ्स–ए–मुलाहिमा ' ज्याचा अर्थ होतो सहाव्या भूमिकेतील उत्प्रेरित आत्मा येथे परमात्मा आणि सृष्टीचे नाते, प्रियतम व प्रेमीचे असते व या अवस्थेतील परमात्म्याच्या कल्पनेला सुफी तौहिद–ए– अहवाली(भावनेचे ऐक्य) असे म्हणतात. ही ती स्थिती आहे की जिला हकिकत–ए–इन्सानी (मनुष्याची सत्यता) म्हणून ओळखतात – ज्या ठिकाणी मानव परमात्म्याच्या समोरासमोर येतो परंतु त्याचा अहं अजुनही सुटलेला नसतो व तो अजुनही व्दैताच्या क्षेत्रातच असतो.

वहिद–वुल–वुजूद ( ऐक्यविषयक अस्तित्व ) ही यथार्थ भुवनाच्या 'आलम –ए– लहूत ' च्या अवस्थेतील ती स्थिती आहे की ज्यात परमात्मा प्रथम त्याच्या अहादियत (सचेत एकता) बाबत सचेत झाला व 'आरिफ–उल–वुजूद' त्याच यथार्थ भुवनाच्या 'आलम–ए–हहूत' स्थितीतील ती वहादियत –ए–वहिदियत (अनेकतत्वामध्ये एकतेची सचेत एकता) अवस्था आहे, जिला 'हकिकत –ए–मुहम्मदी' असे देखील म्हणतात.

'वरा –उल– वरा' या अवस्थेत सुफींच्या मतानुसार परमात्मा एक गुप्तधन होते, व त्याला जाणून घ्यायची इच्छा होती. या गुप्तधनाला स्वतःला जाणण्याची इच्छा झाल्याबरोबर त्याला स्वतःला तो प्रकाश (नूर) किंवा 'नूर–ए– मुहम्मदी 'असल्याचे ज्ञान झाले, ज्यामध्ये समग्र सृष्टीचे व प्रकट जगताचे सुप्त व अंतर्हित अस्तित्व आहे व याच संदर्भात प्रेषित मुहम्मदाने म्हटले आहे. ''परमात्म्याने प्रथम माझा प्रकाश निर्माण केला व माझ्या प्रकाशातून विश्व निर्माण झाले. ''परमात्म्याच्या ज्ञानात हा एक 'जमाल' चा (सौंदर्याचा पैलू आहे, जो 'तौहिद –ए–जाती (सारतत्वाचे ऐक्य) मध्ये समाविष्ट आहे. येथे परमात्मा व सृष्टीमधील

अस्तित्वात असणारे नाते असे आहे की जे प्रेमी व प्रियतमात अस्तित्वात असते. येथे प्रेमी आहे परमात्मा व प्रियतम आहे मुहम्मद. या अवस्थेत परमात्म्याला स्वतःची व सृष्टीची या दोन्हींची परिपूर्ण जाणीव असते.

वहीद–उल– वुजूद (अस्तित्वाचे ऐक्य) परमात्म्याची ही परात्पर परब्रह्म अवस्थेतील प्रथम मर्यादा आहे व ही 'लहूत ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाचव्या भुवनाच्या स्थितीपैकी एक स्थिती आहे. ही सचेत अखंडतेची स्थिती आहे, जी जेव्हा 'आरिफ–उल–वुजूद ' (अस्तित्वाची जाणीव असलेला ब्रह्मज्ञानी ) व्दारा उपायोजिली जाते तेव्हा त्याला फना व बका हे दोन्हीही अनुभव प्रदान करते. ही स्थिती अध्यात्मपथाच्या इतर सर्व स्थितीप्रमाणे मन–बुध्दिच्या पलिकडे आहे व तिला शब्दात बांधता येत नाही व त्यामध्ये 'तज्ञली–ए– जमाली' ( सौंदर्याविष्कार) व तजल्ली –ए– जलाली (तेजाची अभिव्यक्ती ) यांचा अंतर्भाव होतो. तजल्ली–ए–जलाली ही ती स्थिती आहे की जी आत्म्याला 'फना' चा (पूर्ण विनाश) अनुभव बहाल करते, व 'तजल्ली–ए–जमाली' ही स्थिती त्याला परत एकदा सामान्य चेतना प्रदान करते जी स्थिती सुफींना 'बका' (स्थायित्व) म्हणून ज्ञात आहे. 'तजल्ली –ए–जलाली ह्या स्थितीला आशकियत असे देखील म्हणतात, जेथे परमात्मा हा प्रियतम व मनुष्य प्रेमी असतो व 'तजल्ली–ए– जमाली 'ही माशुकियत आहे म्हणजे ज्यामध्ये परमात्मा हा प्रेमी आहे व मनुष्य हा प्रियतम आहे. ही नंतरची स्थिती उच्चतम आध्यात्मिक अभिव्यक्ती आहे जिला 'फक्र'किंवा 'फकिरी' म्हणतात.

अशाप्रकारे पाचव्या यथार्थ भुवनाच्या 'आलम–ए–लाहूत' व 'आलम –ए–हाहूत' मध्ये 'आशिक–ओ–माशूक'(प्रेमी व प्रियतम एकत्र) तसेच आशिक (प्रेमी)व माशूक (प्रियतम) एकाच वेळी आपापल्या पैलूत पुर्णतेच्या अवस्था आहेत. ' आलम –ए– जब्रुत'(मनोभुवन) मध्ये आशिक (प्रेमी) व आरिफ (गूढ ज्ञानी) संबंधी अवस्था आहेत. 'मालकूत' (सूक्ष्म भुवन) ही अवस्था गुणांच्या गणणकारांची आहे व 'नासूत' मध्ये (स्थूल जगत) वाकिफची (स्थूल सचेत आत्मा)अवस्था आहे. आरोहणाच्या चढत्याक्रमात ह्या स्थितीचे

---

* हे देखील पहा : मेहेरबाबा, 'माया'डिस्कोर्सेस,३:१३७–१५९ संपादक

वर्णन करताना जेव्हा 'वाकिफ' सचेत आत्मा अधिक जास्त चेतना प्राप्त करतो तेव्हा तो वासिफ (गुणांचा प्रशंसक) अवस्थेत प्रवेश करतो. व 'वासिफ' पासून तो आत्मा'इरफान' (गूढ ज्ञान) स्थितीप्रत येऊन पोहोचतो व इरफानपासून परमात्म्याच्या रहस्यक्षेत्रात (मारिफ) पोहोचतो.'मारिफ'या अवस्थेपासून त्याला परमात्म्याच्या दर्शनाचा लाभ मिळतो. ज्यामुळे त्याला प्रेमीचा दर्जा प्राप्त होतो व जेव्हा सरतेशेवटी तो 'प्रेम'बनतो तेव्हा त्याला असे आढळून येते की तो स्वतःच सर्व काहिचा कर्ता–धर्ता होता. या 'हुयात' च्या अवस्थेत परमात्म्याच्या 'मी परमात्मा आहे' या स्थितीत सर्व काही विलीन होते.

## ३५ माया *(२३१)

मनुष्याला जी शक्ती आध्यात्मिक दृष्टया आंधळा, बहिरा, इत्यादी ठेवते, ती त्याचे स्वतःचे अज्ञान आहे, जे विश्वव्यापी अज्ञानाच्या मूलतत्वाव्दारां प्रशासीत केल्या जाते, त्याला सामान्यतः '**माया**' म्हणतात.

मायेला समजणे म्हणजे विश्वाला समजणे. सर्व मिथ्यामूल्य व मिथ्या श्रध्दा ह्या मायेच्या मगरमिठीमुळे आहेत. बुद्धी विशेषकरुन मायेच्या हातचे खेळणे बनते, कारण बुध्दीला त्या चेतनेला प्राप्त करण्याची क्षमता नाही की जी चेतना परमात्म्याला सत्य म्हणून ओळखेल. सत्य हे तेव्हाच जाणले जाऊ शकेल जेव्हा व्यक्ती विश्वव्यापी भ्रमाला पार करेल, जो भ्रम मायेमुळे सत्य वाटतो.

माया अज्ञानाचा सिध्दांत, केवळ तेव्हाच पार केली जाऊ शकते जेव्हा मुमुक्षूला हे समजते की माया ही परमात्म्याची छाया आहे व आपल्या स्वतःमध्ये ती काहीच नाही. मायेचे कोडे आपल्या स्वतःला केवळ आत्मसाक्षात्कारा नंतर प्रकाशित करते.

## ३६.मेहेर बाबा सांगतात *(२५६)

### (अ)आध्यात्मिक विरोधाभास :

'जो पर्यंत अज्ञान नष्ट केले जात नाही व ज्ञान प्राप्त केले जात नाही (असे ज्ञान की ज्यामुळे दिव्य जीवनाचा अनुभव प्राप्त होतो व ते जीवन जगले जाते ) तो पर्यंत प्रत्येक अध्यात्मिक गोष्ट विरोधाभासी प्रतीत होते – परमात्मा, ज्याला आपण पाहत नाही त्याला आपण सत्य आहे असे म्हणतो व संसार जो आपण पाहतो तो मिथ्या आहे असे आपण म्हणतो. अनुभवाच्या दृष्टीने जे

आपल्यासाठी अस्तित्वात आहे त्याला वास्तविक काहीच अस्तित्व नाही व जे अपल्याकरिता अस्तित्वात दिसत नाही ते खरोखर अस्तित्वात असते.

आपण स्वतःला प्राप्त करण्यासाठी स्वतःला हरविले पाहिजे, अशाप्रकारे नुकसान हे स्वतःच फायदा आहे. परमात्म्यात जिवंत राहण्यासाठी आपल्या स्वतःप्रती मृत्यू पावले पाहिजे, अतः मृत्यूचा अर्थ आहे जीवन परमात्म्याव्दारा स्वीकृत होण्याकरिता आपल्या अंतर्यामी पूर्णपणे रिक्त व्हावे लागेल, अशाप्रकारे पूर्ण रिक्तता म्हणजे पूर्ण संपूर्णता परमात्म्याच्या अनंततेत विलीन होण्यासाठी आपण शून्यवत होऊन आपल्याला 'काही नाही'होण्याचे व्दारा आपल्या स्वतःपासून मुक्त व्हावे लागेल, अतः 'काही नाही' चा अर्थ आहे 'सर्व काही'

**ब) अस्तित्व 'सर्व काही' आहे व जीवन छाया आहे.**

'अस्तित्व ' हे शाश्वत आहे याउलट जीवन नश्वर आहे.

''तुलनात्मक द्दष्टीने अस्तित्व असे आहे जसे मनुष्याला शरीर व जीवन म्हणजे शरीराला झाकणारे कपडे. तेच शरीर ऋतू,काळ व परिस्थितीनुसार कपडे बदलते. जसे एकमेव शाश्वत अस्तित्व जीवनाच्या असंख्य व विविध स्थितीत सदैव विद्यमान असते.

''विविध घड्या व रंगाच्या जीवन वस्त्राने ओळखण्यापलिकडे आच्छादले गेले असले तरी अस्तित्व अपरिवर्तनीय आहे.मन, प्राणशक्ती व स्थूल देह या पडद्याने झाकलेला जीवनाचा हा पोषाख अपरिवर्तनीय, अखंड व शाश्वत अशा अस्तित्वाला झाकून टाकतो व आवृत करुन ते अस्तित्व क्षणभंगूर , विविध रुपी व निरंतर परिवर्तनशील असल्याचे भासवितो.

'' अस्तित्व हे सर्व व्यापी आहे व ते सर्व वस्तूंच्या मुळाशी असलेले सारतत्व आहे मग ते सजीव किंवा निर्जीव , सत्य किंवा असत्य, विविध उपजातीत किंवा एकाच जातीत सामुहिक असो की व्यक्तिगत , मूर्त असो किंवा अमूर्त असो.

अस्तित्वाच्या शाश्वतात 'वेळ' असे काही नाही. तेथे ना भूत ना भविष्य केवळ चिरंतन वर्तमान असतो. शाश्वतात कधीच काही घडले नाही व

---

* या ठिकाणी अस्तित्व म्हणजे आत्म्याचे अस्तित्व- अनु

कधीच काही घडणार नाही, सर्व जे काही घडत आहे ते अन्तहीन वर्तमानात (NOW) घडत आहे.

''अस्तित्व  हे परमात्मा आहे, तर जीवन ही माया आहे''

'' अस्तित्व हे सत्य आहे, तर जीवन ही कल्पना आहे.''

''अस्तित्व चिरंतन आहे, तर जीवन क्षणभंगूर आहे.''

''अस्तित्व अपरिवर्तनीय आहे तर जीवन सतत परिवर्तनीय आहे.''

'' अस्तित्व मुक्त आहे तर जीवन एक बंधन आहे.''

''अस्तित्व अविभाज्य आहे तर जीवन विभाज्य आहे ''

'' अस्तित्व अगोचर आहे तर जीवन फसवे आहे ''

''अस्तित्व स्वतंत्र आहे तर जीवन, मन, प्राणशक्ती व स्थूल रुपांवर अवलंबीत आहे.

''अस्तित्व आहे, तर जीवन हे असल्याचा भास आहे ''

'' अस्तित्व हे म्हणून जीवन नाही.

''जन्म व मृत्यू जीवनाचा आरंभ किंवा अंत चिन्हांकित करीत नाही, तर जीवनाच्या असंख्य स्थिती किंवा अवस्था ज्या तथाकथित जन्म मृत्यूंना निर्माण करतात, त्या उत्क्रांती व पुनर्जन्माच्या नियमाव्दारा नियंत्रित होतात. जीवन केवळ एकदाच सीमित चेतनेच्या प्रथम अंधूक किरणांच्या आगमनाने अस्तित्वात येते व ते अनंत अस्तिवाची अमर्याद चेतना प्राप्त केल्यावर केवळ एकदाच मृत्यूला बळी पडते.

''अस्तित्व हे सर्वज्ञ, सर्व शक्तिमान, सर्वव्यापी परमात्मा आहे व यामुळे ते कार्यकारण भावाच्या पलिकडे आहे तसेच ते स्थळ व काळ व सर्व कर्मांच्या पलिकडे आहे.

''अस्तित्व सर्व स्पर्शी आहे म्हणजे सर्व वस्तू व सर्व छाया यांना ते व्यापून आहे. अस्तित्वाला काहीच कधीही स्पर्श करु शकत नाही. स्वयं त्याचे असणे देखील अस्तित्वाला स्पर्श करु शकत नाही.

''अस्तित्वाचा साक्षात्कार करण्यासाठी जीवनाचा त्याग केलाच पाहिजे. हेच जीवन आहे जे असीम 'स्व' वर सीमितता बहाल करते.मर्यादित 'स्व' चे जीवन संस्कार निर्माण करणाऱ्या मनाचे व्दारां स्थीर राहते, अभिव्यक्ती व्दारां या संस्काराना संचित व नष्ट करण्याची प्रेरणा देणाऱ्या प्राणशक्तिव्दारा

स्थीर राहते, तसेच कर्माच्या माध्यमातून हे संस्कार खर्च करणे, पुन्हा पुष्ट करणे व अंती समाप्त करण्याकरिता माध्यमाचे रुपात काम करणाऱ्या स्थूल रुपांच्या व शरीरांच्या व्दारा या जीवनाचे संवर्धन होते.

जीवन घनिष्ठतेने कर्माशी जोडलेले आहे. कर्माव्दारा जीवन आचरणात आणले जाते. जीवनाचे मूल्यमापन कर्माव्दारा होते. जीवनाचा निर्वाह कर्मावर निर्भर आहे. सचेत जीवन हे कर्म आहे – विरोधी प्रकृतीची कर्मे, स्वीकारात्मक व नकारात्मक कर्मे , रचनात्मक व विनाशक कर्मे.

''म्हणून अंतिम मृत्यूला जीवन बळी पडू देणे म्हणजे सर्व कर्माचा शेवट होऊ देणे. जेव्हा कर्माचा पूर्णत : अंत होतो तेव्हा जीवत्माचे जीवन उत्स्फूर्तपणे स्वतःचे अमर्याद 'स्व'चे (परमात्म्याचे) अस्तित्व म्हणून अनुभव घेते. अस्तित्वाची पूर्ण जाणीव झाल्यानंतर चेतनेची उत्क्रांती व आत्मानुवर्ती उत्क्रांती पूर्ण होते, माया नष्ट होते व पुनर्जन्माचे विधान त्यानंतर बंधनकारक राहत नाही.
''कर्म करण्यापासून केवळ परावृत्त होण्याने कर्माचा अखेर होत नाही. त्याचा अर्थ हाच होईल की कर्मातून दुसऱ्या एका कर्माला क्रियशील करणे अकर्माला क्रियाशील करणे होय.

''कर्मापासून पळवाट म्हणजे कर्म निर्मुलन करण्याचा इलाज नाही. या उलट जिवात्म्याला स्वतःची सुटका करुन घेण्याच्या क्रियेत अधिक निमग्न होण्यासाठी वाव मिळेल व यामुळे अधिक कर्माची निर्मिती होईल. चांगले व वाईट दोन्ही कर्म जीवनाच्या गुंता झालेल्या धाग्यातील गाठीप्रमाणे आहेत. कर्माच्या गाठी उकलण्याचा जो जो दीर्घ प्रयत्न करण्यात येतो तो तो गाठी अधिक पक्क्या होतात व मनुष्य जास्त गुंत्यात अडकतो.

'' केवळ कर्मच कर्मांना निष्क्रिय करु शकते, जसे विषच विषाच्या प्रभावाला नष्ट करु शकते.खोलवर रुतलेल्या काट्याला दुसऱ्या काट्याचा उपयोग करुन काढता येईल किंवा एखाद्या काट्याप्रमाणे असलेल्या सूईचा उपयोग कुशलतेने व सावधगिरीने करता येईल. याचप्रमाणे कर्माचे दुसऱ्या कर्माव्दारां पूर्णतः निर्मुलन होते, जेव्हा ते स्वतःला सोडून दुसऱ्या कृतीशील कर्त्याकडून केले जाते.

''कर्मयोग, ज्ञानयोग, व राजयोग व भक्तियोग अध्यात्म मार्गावर,

साधकाकरिता शाश्वत अस्तित्वासंबंधी लक्ष्याकडे अग्रेसर करण्यासाठी मार्गदर्शकाच्या खांब्याप्रमाणे काम करतात. परंतु कर्मांनी परिपोषित झालेल्या बंधनाची साधकाच्या जीवनावर पकड इतकी घट्ट असते की, या प्रेरक खांब्याची मदत असूनही तो योग्य मार्गाने जाण्यास सफल होत नाही. जोपर्यंत जीवात्मा कर्मांनी बांधलेला असतो तोपर्यंत साधक किंवा सत्याचे मार्गावरील यात्री देखील आत्मवंचनेमुळे निश्चितपणे पदभ्रष्ट होतो.

''साधू, मुमुक्षू, ऋषी व संत, मुनी व जोगी,तपस्वी व संन्यासी, योगी, सुफी व तालिब या सर्वांनी त्यांच्या जीवनकाळात, युगानुयुगे खूप कष्टांचा अनुभव घेऊन कर्माच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी व शाश्वत अस्तित्वाचा साक्षात्कार करण्यासाठी जीवनावर मात करुन संघर्ष  केलेला आहे.

''ते आपल्या प्रयत्नात अयशस्वी होतात कारण जितके जास्त ते आपल्या स्वतःशी संघर्ष करतात तितके जास्त ते जीवनाच्या मगरमिठीत सापडतात

संयम व तपस्यांमुळे तीव्र झालेल्या कर्मांव्दारा, एकांतवास व तीर्थयात्रांव्दारा, ध्यान व समाधीव्दारां,मनःपूर्वक श्लोकांचे पठण व मौन  चिंतनांचेव्दारा प्रखर क्रियाशीलता व निष्क्रियताव्दारा मौन व वाचाळतेव्दारा, जप व तपांचेव्दारा व सर्व प्रकारच्या योगांच्या व चिल्लाच्याव्दारां तितके जास्त ते जीवनात अडकतात.

जीवनाच्या मगरमिठीतून मुक्ती व कर्माच्या चक्रव्यूहातून सुटका सर्वांच्याकरिता शक्य केलेली आहे परंतु फारच थोड्यांनी ते प्राप्त केले आहे, जे पूर्ण पुरुषाला सद्गुरुला किंवा कुतूबला शरण जातात व त्याच्या कृपेची व मार्गदर्शनाकरिता याचना करतात. पूर्ण पुरुषाचा अनिवार्य सल्ला त्यांच्याप्रती आत्मसमर्पण करण्याचा असतो. जे थोडे आपले सर्व–मन, शरीर, व सर्व मालमत्ता पूर्ण पुरुषाला निश्चितपणे समर्पित करतात हेतू हा की, त्यांच्या संपूर्ण समर्पणासह जाणीवपूर्वक त्यांचा 'स्व' देखील समर्पित व्हावा तरीही त्यांचे स्वतःचे अस्तित्व कर्मे करण्यासाठी जाणीवपूर्वक शिल्लक असते, जी कर्मे आता केवळ सद्गुरुच्या आदेशाप्रमाणे क्रियाशील होतात.

मिथ्या 'स्व' च्या समर्पणानंतर जी कर्मे केली जातात ती त्याची स्वतःची रहात नाहीत. म्हणून अशा कर्मात जीवनाचे पोषण करणाऱ्या व त्यांना

आधार देणाऱ्या बाकी सर्व कर्मांचे निर्मुलन करण्याची क्षमता असते. जीवन त्यानंतर हळूहळू निर्जीव बनते व अंतिमतः सद्‌गुरुच्या कृपेने अंतिम मृत्यूला बळी पडते. जीवन, ज्याने सतत परिश्रमी साधकाला 'शाश्वत अस्तित्वाच्या 'अनुभूतीपासून आतापर्यंत वंचित ठेवले होते ते आता यापुढे स्वतःला आत्मवंचित करु शकत नाही.

'' मी गतकाळात ठामपणे सांगितले आहे व आताही सांगतो व युगयुगानंतर मी सतत वारंवार सांगत राहीन की, तुम्ही आपल्या जीवनरुपी वस्त्राचा त्याग करा व अस्तित्वाचा (आत्म्याचा) साक्षात्कार अनुभवा, जो शाश्वतरुपाने तुमचाच आहे.

'''अपरिवर्तनीय, अविभाज्य, सर्वव्यापी अस्तित्वाच्या साक्षात्काराच्या अनुभूतीसाठी पूर्णतः मला शरण येणे, हा सर्वात साधा उपाय आहे इतकी पूर्णतः की तुम्हाला तुमच्याशरणागतीचीही जाणीव नसावी व जाणीव असावी ती केवल माझ्या आज्ञापालनाची व मी ती आज्ञा जेव्हा कधी देईन त्याप्रमाणे केवळ कृती करण्याची.

''जर तुम्हाला शाश्वतरित्या जीवंत राहावयाचे असेल तर तुम्ही तुमच्या फसव्या 'स्व' च्या मृत्यूची माझ्यात पूर्ण समर्पणाच्या हस्ते अभिलाषा करा हा योग सर्व योगांच्या सारतत्वांचा योग आहे.

**(क) चार यात्रा**

''परमात्मा अनंत आहे व त्याची छाया देखील अनंत आहे. परमात्म्याची छाया अनंत अवकाश आहे व त्यामध्ये अनंत स्थूल भुवने व लक्षावधी विश्वे आहेत. ज्यापैकी काही मनुष्याला ज्ञात आहेत व काही ज्ञात नाहीत, अनंत अस्तित्वातून म्हणजे परमात्म्यातून ही सृष्टी सीमित बिंदूतून बाहेर आली.

''या लक्षावधी विश्वात ग्रहांसह अनेक प्रणाली आहेत. काही गॅसेसच्या अवस्थेत, काही घनीभूत अवस्थेत, काही पाषाण व धातूच्या अवस्थेत व काही ग्रहांवर तर वनस्पती सुध्दा आहेत व काही अवस्थेत जीवनाचे विकसित रुप जसे कीटक, काहीवर मासे तर काहीवर पक्षी व काहीवर प्राणीदेखील आहेत व अगदी कमी ग्रहांर तर मानवप्राणी देखील आहेत.

''अशा प्रकारे या अगणित विश्वात असे काही ग्रह आहेत की ज्याठिकाणी उत्क्रांतीच्या सातही योनी उपलब्ध आहेत व चेतनेची व रुपांची उत्क्रांती पूर्ण झालेली आहे.

''परंतु केवळ पृथ्वी या एकाच ग्रहावर मानवप्राणी पुनर्जन्म घेऊन आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर आत्मानुवर्ती उत्क्रांतीला प्रारभ करतात.

''लक्षावधी विश्वांचा अनंत स्थूल भुवनांचे पृथ्वी हे केन्द्र आहे, कारण हा तो बिंदू आहे की जेथे सर्व मानव – सचेत–आत्म्यांना आत्मानुवर्ती उत्क्रांती प्रारंभ करण्याकरिता यावेच लागते.

''या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या मार्गावर सात स्थानके आहेत व सातव्या स्थानकावर पोहोचल्यावर परमात्म्याप्रत जाण्याची प्रथम यात्रा पूर्ण होते.

''सर्व मानवी आत्म्यांचे लक्ष्य जरी या यात्रेची समाप्ती करणे हे असले तरी एका विशिष्ट कालावधित फारच थोडे या यात्रेला प्रारंभ करतात. या यात्रेच्या अंतिम ठीकाणी येऊन पोहोचणे म्हणजे अनंत चेतनेच्या महासागरात व्यक्तित्वाला डुंबविणे आहे व या यात्रेच्या पूर्तीचा अर्थ आत्म्याचे पूर्ण चेतनेसहीत 'मी परमात्मा आहे' या अवस्थेत निमग्न होणे व परमात्मा म्हणून अनंत शक्ती, ज्ञान व परमानंदाचा अनुभव घेणे आहे.

''पहिला प्रवास पूर्ण करणाऱ्या पैकी फारच थोडे द्वितीय यात्रेत प्रविष्ट होतात. या यात्रेत स्थानके नाहीत ही तत्क्षणी घडून येणारी यात्रा आहे. अनंत चेतनेचा प्रवास ''मी परमात्मा आहे' या निमग्न अवस्थेपासून तो परमात्म्यात परमात्मा म्हणून प्रस्थापित होण्याची यात्रा. या अवस्थेत व्यक्तित्व परत प्राप्त केले जाते परंतु ते व्यक्तित्व आता अनंत असते व या अनंतेत स्थूल चेतना अंतर्भूत असते व अशाप्रकारे ती व्यक्ती मानव व परमात्मा म्हणून अत्यंत सीमिततेच्यामध्ये अनंत ज्ञान, शक्ती व आनंदाचा अनुभव घेते याचा अर्थ, अनंत आत्म्याला सीमिततेत राहून आपल्या अनंततेची जीणीव असते.

ज्यांनी दुसरी अवस्था पूर्ण केलेली आहे तेच केवळ तिसरी यात्रा सुरु करतात व ज्यांना अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाच्या उपयोजनेचे ओझे वाहण्याचे भाग्य प्राप्त झाले आहे, ते अशाप्रकारे एकाच वेळी नर व नारायण या दोन्ही रुपात

परमात्म–जीवन व्यतीत करतात.

''कोणत्याही दिलेल्या कालावधीत पृथ्वीवर असे पाच सद्‌गुरु विद्यमान असतात व ते विश्वाच्या घडामोडी व मानवी जगतांचे व्यवहार नियंत्रित करतात. केवळ जेव्हा ह्या पाच सद्‌गुरुंपैकी एखादा आपले शरीर त्यागतो तेव्हा परमात्म्यात परमात्मा म्हणून प्रस्थापित झालेल्या आत्म्यांपैकी एक पुढे येतो व तिसऱ्या यात्रेत प्रविष्ट होऊन रिक्त झालेली जागा भरुन काढतो.

''याच पाच सद्‌गुरुंची जबाबदारी असते की, त्यांनी पुरातन पुरुषाचे – अवताराचे अवतरण पृथ्वीवर घडवून आणून त्याला त्याच्या स्वतःच्या सृष्टीचा कार्यभार सोपवावा.

''जे सर्व पृथ्वीवर परमात्म्याचे जीवन जगतात व जे सर्व पृथ्वीवर परमात्म्यात परमात्मा म्हणून निवास करतात व जेव्हा ते शरीराचा त्याग करतात तेव्हा ते नेहमीकरिता आपल्या सूक्ष्म व मनोदेहाचा देखील त्याग करतात व अनंत व्यक्तित्व राखून ठेवतात व अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाचा अनुभव घेत पूर्णतः परमात्मा म्हणून निघून जातात. ही आहे चौथी यात्रा.

''यथार्थतः ह्या चार यात्रा कधीच केल्या जात नाहीत कारण परमात्म्याला यात्रा करण्यासाठी अशी काही जागाच नसते. त्याला ना आदि ना अंत व सर्व काही ज्याला अस्तित्व असल्यासारखे दिसते ते त्याच्यापासून प्रकट होते ज्याला प्रारंभ नाही व ते परत त्याच अस्तित्वात सामावले जाते ज्याला अंत नाही.

## ३७. ॲस्ट्रल जगत *(३०५)

'ॲस्ट्रल जगत' म्हणून असे काही नाही. ॲस्ट्रल जगत हा सूक्ष्म जगताचा भाग नाही. तथापी स्थूल व सूक्ष्मजगत ह्या दोन्हीमध्ये सात कोष (भाग) आहेत. ज्यापासून तथाकथित ॲस्ट्रलजग बनते व हे कोष दोन जगतांचेमध्ये एका कडीचे काम करतात.

स्थूलचेतन आत्म्याला ॲस्ट्रल देह आहे असे म्हणता येईल व ते शरीर स्थूल व सूक्ष्म यांना जोडते. ॲस्ट्रलला स्थूलावरील सूक्ष्माचा ठसा म्हणता येईल. जो ठसा स्थूलही नसतो व सूक्ष्महीही नसतो.

निद्रेत सामान्य स्वप्नावस्थेत मनुष्य स्थूल जगताचे संस्कार

सूक्ष्मदेहाने अर्ध जाणीवेणे अनुभवितो अर्थात अॅस्ट्रल देहाने नाही. अॅस्ट्रल जगतातील सर्व अनुभव जे अॅस्ट्रल देहाव्दारा अनुभविले जातात ते स्वप्नाप्रमाणे निरर्थक असतात.

स्थूल शरीराचा त्याग केल्यानंतर आत्मा अॅस्ट्रल देहाने अॅस्ट्रल जगताचा अनुभव घेतो. याला आत्म्याचा अॅस्ट्रल प्रवास म्हणता येईल. जेव्हा आत्मा नवीन स्थूल शरीर घेतो तेव्हा तो अॅस्ट्रल देहाचा त्याग करतो व नवीन स्थूल देहाबरोबर त्याला नवीन अॅस्ट्रल देह मिळतो. परंतु जोपर्यंत तो स्थूल शरीर घेत नाीह तो पर्यंत त्याचे सूक्ष्म व मनोदेह स्वर्ग किंवा नरकावस्थेचा अनुभव अॅस्ट्रल देहाच्या माध्यमातून घेतात. जे संस्कार शरीरात असतांना गोळा केले होते त्या संकलीत संस्कारांचा हा अनुभव असतो.

चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांती बरोबरच अध्यात्म मार्गाचा प्रारंभ होतो व आत्मा सूक्ष्मजगताच्या प्रथम भूमिकेचा अनुभव घ्यायला सुरुवात करतो, परंतु या अनुभवाचा, स्थूलजगतातून घेतलेल्या अॅस्ट्रलच्या चमत्कारिक अनुभवांशी काहीही संबंध नसतो. आत्मा जेव्हा सूक्ष्म जगताच्या पहिल्या भूमिकेचा पूर्ण अनुभव घेतो तेव्हा अॅस्ट्रल कोष ज्याने स्थूलाला सूक्ष्मांशी जोडण्याचे काम केले होते, तो एकदम तोडल्या जातो.

* * *

## मानवाचा

**(मानवाचे शाश्वतरित्या**

**'मी परमात्मा आहे' हे आध्यात्मिक**

**आणि शरीरिक मृत्यूने**

| विशेष शब्द | दर्जा | अवस्था |
|---|---|---|
| सुफी | मज्झूब–ए– कामिल | जाम किंवा हालात–ए–मुहम्मदी |
| वेदांती* | ब्रह्मीभूत | निर्विकल्प समाधी |
| रहस्यवादी | परिपूर्ण पुरुष | परमात्म्यात निमग्न |
| सुफी | मज्झूब सालिक किंवा सालिक मज्झूब | जाम आळीपाळीने–फर्क सह किंवा शिवाय |
| वेदांती | परमहंस | निर्विकल्प समाधी आळीपाळीने त्रिभुवनाच्या चेतनेशिवाय किंवा सह |
| रहस्यवादी | दैवी श्रेष्ठ पुरुष | परमात्म्याची चेतना आळीपाळीने सृष्टीचेतनेसह किंवा शिवाय |
| सुफी | आझाद–ए–मुतलक किंवा साहेब–ए–जमो–फर्क | जाम फर्क सह |
| वेदांती | जीवनमुक्त | सहजसमाधी त्रिभुवनाच्या चेतनेसह |
| रहस्यवादी | देहात असलेला मुक्त | ईशसचेत सृष्टीचेतनेसह |
| सुफी | कुतूब | जाम–उल–जाम किंवा बका–बिल्लाह किंवा फर्क –बा–दूल–जाम |
| वेदांती | सद्‌गुरु | सहजसमाधी किंवा आत्मप्रतिष्ठापना त्रिभुवनाच्या कर्तव्यासह |
| रहस्यवादी | पूर्णपुरुष | नर नारायण |

टीप– जाम म्हणजे परमात्म्याशी ऐक्य असल्याची चेतना. फर्कः परमात्म्यापासून पृथक असल्याची चेतना. म्हणून फर्कचा आशय होतो कोणत्याही किंवा सर्व स्थूल, सूक्ष्म किंवा मनोभुवनाची चेतना.

# परमात्म-साक्षात्कार

**परमात्मा होणे) – सत्याचे भुवन**

**गूढ-ज्ञान प्रत्येकाकरिता समान आहे.**

**त्याचा अंत होत नाही.**

| स्थिती किंवा पैलू | गूढज्ञान |
|---|---|
| आलम-ए- लहूत<br>विज्ञान<br>महाचैतन्य | अनल हक<br>अहं ब्रह्मास्मि<br>मी परमात्मा आहे |
| फना-मा-अल-बका<br><br>तुरिया अवस्था<br><br>दिव्य संगम | 'अनल-हक' आळीपाळीने<br>'हमे-बा-मन-अस्त' सह किंवा शिवाय<br>'शिवोहम्' आळीपाळीने<br>जिवोहम् सह किंवा शिवाय<br>'मी परमात्मा आहे' आळीपाळीने<br>'सर्व माझ्याबरोबर आहे' सह किंवा शिवाय. |
| फना-मा-अल-बका<br><br>तुरिया अवस्था<br><br>दिव्य संगम | 'अनल हक' हमे-बा-मन-अस्त सह<br><br>'शिवोहम्' जिवोहम् सह<br><br>'मी परमात्मा आहे' 'सर्व माझ्या बरोबर आहे.' सह |
| मुकाम-ए-मुहम्मदी<br><br><br>विज्ञान भूमिका<br>परमात्म्याची व सृष्टीची<br>चेतना एकाचवेळी | 'अनल हक' 'हमे-मन-अम'<br>'हमे-दर-मन-अस्त' आणि<br>'हमे-अज-मन-अस्त' एकाच वेळी<br>'शिवोहम् व सर्वोहम्' एकाच वेळी<br>'मी परमात्मा आहे' 'सर्व काही मी आहे,माझ्यात आहे व माझ्यापासून आहे'- एकाच वेळी |

हाल - (सापेक्ष अस्तित्वाचा आंतरिक अनुभव) केवळ पहिली ते सहाव्या भूमिकेपर्यंत.

सातव्या भूमिकेत हाल नाही.

* वेदांती व जवळपास वेदांती शब्द

# समारोप

परमात्मा सर्वत्र आहे व तो सर्वकाही करतो.

परमात्मा आपल्या अंतर्यामी आहे व तो सर्वकाही जाणतो.

परमात्मा आपल्या बाहेर आहे व तो सर्वकाही पाहतो.

परमात्मा आपल्या पलिकडे आहे व तो सर्वकाही आहे.

परमात्मा एकमेव आहे.

# पारिभाषिक शब्द-स्पष्टीकरण कोष

मेहेर बाबांनी 'गॉड स्पिक्स' लिहवून घेण्यास सांगताना उपयोगात आणलेल्या शब्दांचा हा पारिभाषिक शब्दकोष आहे.मूळ इंग्रजी नसलेल्या शब्दांची उत्पत्ती अधिकांशरुपात सुफी व वेदांती परंपरेत आहे. त्यापैकी जवळजवळ सर्व शब्द अरेबिक, पर्शियन व संस्कृत भाषेतून आलेले आहेत. या ग्रंथावर आपल्या मौनातून वर्णमाला फळीव्दारे सांगत असताना बाबा वेळ वाचविण्याकरिता असंदिग्ध अर्थ स्पष्ट करण्यासाठी चार वेगवेगळ्या भाषेतील शब्दांचा उपयोग करीत असत. दुसऱ्या बाजूने ते कधी कधी वेदांत शिकवणीमध्ये ज्याचा असंदिग्ध अर्थ निघतो असा एखादा शब्द ते काहीसा वेगळ्या अर्थाने वापरीत असत अशावेळी ज्या संदर्भात त्याचा उपयोग केला असेल त्याचा अर्थ मेहेरबाबा सांगत असत.

मेहेरबाबांनी ज्या अर्थाने तो शब्द वापरला ते अर्थ सांगणाऱ्या या पारिभाषिक शब्दकोषातील व्याख्या आहेत. शब्दानंतर (स) अक्षर त्या शब्दाची मूळ उत्पत्ती सुफीमधून आहे. व तो शब्द अरेबिक किंवा पर्शियन भाषेतून आलेला आहे याचे निदर्शक आहे. तसेच शब्दानंतर (व) आल्यास तो शब्द संस्कृत आहे असे सामान्यतः सुचवितो. परंतु वेदांती परंपरेत नेहमीच तो शब्द त्याच अर्थाने वापरला असेल असे नाही. ज्या शब्दांची उत्पत्ती इतर भाषेतून आहे ( उदा. हिन्दी, मराठी ) त्याप्रमाणे ते चिन्हाकिंत केले आहेत. इंग्रजी शब्द 'इटॅलिक ' टाईपमध्ये छापले नाहीत.

इंग्रजीत नसणाऱ्या शब्दांची अक्षरे (Spelling) मेहेरबाबा व त्यांची मंडळी ज्याप्रमाणे वापर करीत असत त्याप्रमाणे 'गॉड स्पिक्स' मध्ये आलेली आहेत. पारिभाषिक शब्दकोषात त्यांची यादी त्या शब्दरचने प्रमाणे आहे. आमच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट ही की, मेहेरबाबांनी देहत्यागापूर्वी हा पारिभाषिक शब्दकोष नजरे खालून घातला व त्याला मान्यता दिली.

या शब्दकोषातील प्रत्येक शब्दाचा अर्थ इंग्रजी लिपीतून दिलेला आहे व याकरिता यु. एस. लायब्ररी ऑफ क्रॉंग्रेसच्या पध्दतीचा उपयोग केला आहे. याचे वर्णन त्यांच्या कॅटलॉगींग सर्व्हिस बुलेटीन ६४, फेब्रुवारी १९६४ मध्ये आलेले आहे. ५ एप्रिल १९७१

**–लुडविग एच् डिम्फल**

**अब्दल (स) :**

एकउन्नत अवस्थेतील गुरु ज्याचे विशेष लक्षण हे असते की, तो आपल्या स्थूल

देहाला दुसऱ्या शरीरात बदलू शकतो व बदलतो
**अबरार (स) :** पाचव्या भूमिकेवरील संत (व) महापुरुष संत
**आदम** : ज्याने पाषाणापासून मानवापर्यंतचे उत्क्रांतीचे चक्र परत मानवापासून परमात्म्या पर्यतचे .आत्मानुवर्ती उत्क्रांतीचक्र पूर्ण केले आहे. परंपरांगत रीतीने प्रथम मानव व प्रथम अवतार देखील.
**अध्यात्म मार्ग :** (व) आध्यात्मिक मार्ग (स) तरीकत,राह–ए– तरीकत
**आध्यात्मिक मार्ग :** (व) अध्यात्म मार्ग .
**आदम (स) :** (आदम) 'काही नसणे' शून्यत्व .
**अव्दैत (व) :** परम ऐक्य. एकमेवाव्दितीय. (स) : तौहीद –ए– तन्झीही .
**अव्दैतिझम** : अव्दैतवाद – –शंकराचार्यांनी प्रस्थापित केलेला वेदांताचा 'अव्दैत'संप्रदाय याची तुलना सुफी 'वजूदियाह' दृष्टीकोनाशी करतात.
**अफराद (स) :** सहाव्या भूमिकेवरील यात्री (व) सत्पुरुष
**अफरीदगार (स) :** निर्माता (व) :(ब्रह्मा)
**अहदियत (स) :** अक्षरशः ऐक्य, सचेत ऐक्य उच्चतम चेतना, (स): हालात–ए– मुहम्मदी (व): विज्ञान
**अहं ब्रह्मास्मि** (व) 'मी परमात्मा आहे' (स) अनल हक.
**अहल–ए– तौहीद** (स) : तौहीदशी परमात्म्याशी ऐक्य संबंधित गूढवादी संप्रदायाचे सदस्य . वजूदियाह व शुहूदियाह.
**आहूरमज्द** (झोरोस्ट्रियन) : सर्व शक्तिमान परमात्मा (स) अल्लाह (व) परमात्मा
**ऐक्य** (व) : मिलन (स) : हकीकत, वस्ल. (ऐन–उल–यकीन : यकीन पहा. )
**अख्यार** (स) : (व) महात्मा (मार्गावरील उन्नत यात्री)
**अकमल** (स) : अत्यंत पूर्ण पुरुष. बकाबिल्लाहमध्ये एक दुर्लभ प्रकारचा परमात्म–साक्षात्कारी सालिक ज्याला व्दैतामध्ये कर्तव्य असते. परंतु त्याला शिष्य नसतात. त्याला सालिक –ए– अकमल असे देखील म्हणतात.
**अल :** अरेबिक उपपद, वर्णमालेत लिहिले जात नाही.
**आलम –ए– हहूत** (स) : स्वामीत्वाचे भुवन पाचव्या यथार्थ भुवनातील स्थान ज्या ठिकाणावरुन कुतूब व अवतार विश्वाचे संचालन करतात (व) विज्ञान भूमिका
**आलम–ए– जब्रुत (स)** : मनोभुवन –चेतनेची पाचवी व सहावी भूमिका (व) मनोभुवन
**आलम–ए–कबीर** (स) : पाच प्रकारच्या अस्तित्वांनी युक्त अशी विश्वाची लहान

प्रतीकृती– खमसा बुजूदत.

**आलम–ए– लहूत** (स) : परिपूर्ण भुवन (व) :विज्ञान

**आलम–ए–मलकूत** (स) : सूक्ष्म भुवन . चेतनेच्या पहिल्यापासून चवथ्या भूमिकांनी युक्त (व) प्राणभुवन

**आलम –ए– नसूत** (स) : स्थूल भुवन (व) अन्न भुवन

**आलम – ए– सघीर** (स) : सूक्ष्मविश्व –मानवदेह

**अल्लाह** (स) : परब्रह्म अवस्थेत परमात्मा. सर्व– शक्तिमान परमात्मा (व) : परमात्मा. झोरोस्ट्रियन– अहूरमज्द, यजदान.

**अलअमा** (स) : दाट धुके परमात्म्याच्या 'परात्पर परब्रह्म' अवस्थेचे पद

**अनल हक** (स) : 'मी परमात्मा आहे' (व) अहं ब्रह्मास्मि

**आनंद** (व) : स–मुसर्रत

**अनंत** (व) : (स) ला महदूद

**आना** (हिन्दी) : एक लहान नाणे

**अन्न भुवन** (व) : स्थूल जगत (स) : आलम–ए– नासूत.

अन्नभूमिका (व) : स्थूल भुवन (स) : आलम–ए– नासूत,

अंतर्दृष्टी (व) शब्दार्थ आंतरिक दृष्टी (परमात्म्याला पाहणे) दृष्टीव्दारा दृढ विश्वास (स) ऐन–उल–यकीन. यकीन पहा.

**अनवर** (स) : नूरचे बहुवचन पहा –तजल्ली

**अक्ल–ए– कुल** (स): विश्वात्मक मन सद्‌गुरुंना प्राप्त असलेले (व) सार्वभौमिक मन

**आरिफ** (स) : शब्दशः ज्ञाता . चेतनेच्या पाचव्या भूमिकेवरील आत्मा

**आरिफ–उल– वुजूद** : पहा –वुजूद

**अर्श–ए–अला** (स) : उच्च सिंहासन .उच्चतम आध्यात्मिक अवस्था– **अवताराची,सद्‌गुरुची** (व) : विज्ञान भूमिका

**आसन** (व) : बसण्याची पध्दत, जशी ध्यानासाठी

**असर** (स) : परमात्म्याचा प्रभाव (ज्याचा अनुभव हाल अवस्थेत येतो.)

**आशिक** (स) : प्रेमी, चेतनेच्या सहाव्या भूमिकेवर असलेला आत्मा

**आशिक** –ओ–माशूक (स) : प्रेमी व प्रियतम एकात. पूर्णतेच्या भुवनातील परमात्म्याचा पैलू– आलम–ए–लहूत

**आशकियत** (स) : प्रेमी होण्याची स्थिती. पहिल्या अभिव्यक्तीतील वैभवाचा अविष्कार ज्यात परमात्मा प्रियतम व मनुष्य प्रेमी असतो.

**आसमान** (स): भूमिका (व) भूमिका

**आत्मा** (व) : आत्मा (स) : जान किंवा रूह

**आत्मप्रतिस्थापना** (व) : सहज समाधी : पहा – बकाबिल्लाह

**अत्तर , शेख फरिदुद्दीन** – निशापूरचे मन्तिक–उत–तायर (पक्षांचे सम्मेलन) चे लेखक ज्यांचा १९२९ मध्ये निशापूर येथे झालेल्या मोगलांच्या लुटीत वध झाला.

**अवतार** (व) : ख्राईस्ट, (स) रसूल, साहेब–ए–जमॉ

**अवागमन** (हिन्दी) : पहा रि फत

**आवरिफ –उल– मारिफ** (स) : आध्यात्मिक गूढ ज्ञानाच्या देणग्या, हा प्रबंध तेराव्या शतकातील सुफी, शेख सुऱ्हावर्दी यांनी लिहिला होता.

**ऐन** (स) : सार. पयार्यवाचक जात या शब्दाचा. नेत्र  किंवा दृष्टी देखील.

**आझाद –ए– मुतलक** (स) :नवव्या अवस्थेतील मुक्त पण शरीरात –परमात्मा (व) जीवनमुक्त

**अझल–उल–अझल** (स) शाश्वतांची शाश्वततः परमात्म्याच्या परात्पर परब्रह्म अवस्थेचे पद.

**बन्दा** (स) –गुलाम, सेवक. मायेतबध्द असा सीमित आत्मा.

**बका** (स) : निवास करणे. पहा– फना–बका.

**बका–बिल्लाह** (स): दुसऱ्या दिव्य प्रवासा–अखेर परमात्म्यात निवास, (व) आत्मप्रतिष्ठापणा, सहज समाधी

**बका –उल–बका** (स) परमात्म्याची अवतार होण्याची अवस्था

**बा–सिफत–बा–सुरत** (स) : सगुण साकार

**भाव** (व) अत्यानंदः भक्तिचे रुप ( हर्षोन्माद देवतांच्या संदर्भात (स): हाल

**भूमिका** : (व) भूमिका, अवस्था (स) आसमान

**बेहोषी** (स) : अचेतना वैयक्तिक संकट किंवा जीवनातील अपयशामुळे अनैच्छिक निर्माण झालेली रुची –ज्याल अल्प आध्यात्मिक मुल्य असते.

**बेखुदी** (स) : स्वतःची विस्मृती अध्यात्म मार्गावर प्रथम पाऊल.

**ब्रह्मा  (व) निर्माता** (स) : अफरीदगार

**ब्रह्मन (व)** सत्य (स) हक

**ब्रह्मांड (व)** विश्व. मायावी विश्व

**ब्रह्मीभूत (व)** परमात्म्यात निमग्न आत्मा. आठव्या अवस्थेतील परमात्मा (स) मज्झूब–ए–कामिल.

**बुध्द** : अवतार, ज्याची शिकवण बौध्द धर्मातून प्राप्त होते. त्याचा जन्म ख्रिस्तपूर्व

५६८ या दरम्यान मगध (बिहार–भारत) येथे झाला व मृत्यू ख्रिस्त पूर्व ४७४

**चिल्ला** (स) : चाळीस दिवसाची  (साधना)

**चिल्ला**– नशीनी (स – हिन्दी): चाळीस दिवसाची एक कठोर साधना.

**चित्** (व) : दिव्य ज्ञान (स) : मारेफत

**करोड** (हिन्दी) : १०० लाख

**दौर** (स) झमॉ – ७०० ते १४०० वर्षांचे कालचक्र ज्याचा आरंभ होतो अवताराच्या अवतीर्ण होण्यापासून (व) युग.

**दौर** –ए कलन्दरी (स) : प्रभुत्वाचे चक्र.

**दर्शन** (व):पाहणे श्रवण सद्गुरुचे प्रसंगी प्रकट होणे – आशीर्वाद देण्यासाठी – कधी कधी प्रसादाचे रुपाने.

**धर्म शास्त्र (व) कर्मकांड** (स): शरियत

सम्भाषण –  Discourses - मेहेरबाबांनी १९३८ ते १९४४ मध्ये दिलेल्या वचनांचा संग्रह

**दिवाण** (स) : फारशी काव्याचा महत्वाच्या शैलीपैकी एक. या शैलीत बऱ्याच कवींनी रचलेल्या काव्यसंग्रहाला दिवाण म्हणतात. हाफीज पहा, इतर ग्रंथ मसनवी, रुबाया

**डिव्हाइन थिम** : गॉड स्पिक्स या ग्रंथातील विषय वस्तुची मेहेरबाबा प्रणित दिलेली रुपरेषा –१९४३ मध्ये प्रथम प्रकाशित –ती आता पुरवणी १४ म्हणून 'गॉड स्पिक्स' मध्ये छापल्या गेली आहे.

**ज्ञान** (व) Gnosis (स)इर्फान

दो आलम (स) : दोन भुवनेः स्थूल भुवन ( दुनिया) व सूक्ष्म–मनोभुवन (उकबा) चवथे भुवन देखील धरुन (एकत्र) (व) : त्रिभुवन

**डॉंकिन डॉ. विल्यम** : ( १९११–१९६९) इंग्लडचा डॉक्टर मेहेरबाबांचे दीर्घकाळपर्यंत शिष्य. १९३३ मध्ये लंडन येथे मेहेरबाबांचे दर्शन. दि वेफअरर्सचे लेखक

**दुनिया** (स) : पहा –दो आलम.

**सबकुछ** : अनंत परमात्मा. सर्वकाही–सर्वकाही असल्यामुळे 'काही नाही' देखील त्यात अंतर्हित.

**फना, अंतिम** (स) : मनोनाश (' स्व'चा ) (व) : मनोनाश (निर्वाण)

**फना–बका** (स) : तीन प्रकारच्या स्थायी नाशाच्या अनुभवापैकी एकाला संदर्भित करता येईल, यामध्ये सारखे  काढले जाऊ शकतात– (१)सामान्य

माणसाचे प्रत्येक दिवशी झोपी जाणे आणि जागे होणे. (२)मिथ्या 'स्व' च्या काही पैलूंचा नाश (फना), मार्गावरील प्रत्येक भूमिकेत प्रविष्ठ होण्यापूर्वी जो नाश होतो व त्या भूमिकेत जीवन (बका) जगणे

(३) मज्झूब – ए–कामिलचा यथार्थ फना–फिल्लाह व जीवनमुक्त व सद्‌गुरुचा बका–बिल्लाह

**फना –फिल्लाह** (स) : पूर्ण पुरुषाची 'मी परमात्मा आहे ही अवस्था (व) : निर्विकल्प समाधी

**फनाकार** (स) : संहारकर्ता (व) : शिव, महेश

**फना–मा–अल–बका** (स) : दैवी संगमावरील परमात्म्याची नववी अवस्था (व) तुरीयावस्था

**फना–उल–फना** (स) : परमात्म्याचे अवतार म्हणून मानव रूपात अवतरण

**फकीरी** (स): शब्दशः गरिबी.दरवेशाचे जीवन उच्चतम आध्यात्मिक प्रकटीकरण–पूर्णता.

**फक्र** (स) : फकीरी

**फर्क** –बा– दूल–जाम (स) : बका– बिल्लाह

**अल–फुतूहत–अल–मक्किय्य** (स) : पहा – इब्न अरबी.

घैब–उल–घैब (स) : लपलेल्यात लपलेला परात्पर परब्रह्म – परमात्म्याची अवस्था.

**गैर –** (स) : शब्दशः दुसरा – व्दैत

**घझली, इमाम मुहम्मद** : प्रसिध्द इस्लाम ब्रह्मज्ञानी व सुफी लेखक इ.स. १०५९ मध्ये तुस (खुरासान) येथे जन्म व ११११ मध्ये मृत्यू.

**घुंघट** (हिन्दी) : शब्दशः स्त्रीचा पडदा. सांकेतिकपणे अज्ञानाचा पडदा.

**गॉड मॅन** : ख्राईस्ट मसीहा (स) :रसूल (व) अवतार

**गुलशन –ए–राज** (स) : गुलाबाच्या बागेचे रहस्य. तेराव्या शतकातील मौलानी शाबिस्तरी याची एक सुफी कविता

**गुण** : (सिफत पहा)

**हदस** (स) : बीजापासून उत्पन्न झालेले कादीमशी तुलनात्मक

**हाफिज** : शमशुद्दीन मुहम्मद. शिराज येथील चौदाव्या शतकातील सद्‌गुरु, मेहेर बाबांचे आवडते कवी (दिवाण करिता प्रसिध्द)

**हाहूत** (स): प्रभुत्व

**हैरत** (स) : माहिनी

**हाल** (स) : आध्यात्मिक समाधी – हर्षवर्धक ज्याचा अनुभव नवीन ठिकाणी किंवा भूमिकेत प्रविष्ठ होताना मिळतो (व) : भाव (समाधी)

**हालात–ए– मुहम्मदी** (स) : अहदियत परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या आत्म्याचे जाणीवपूर्वक तादात्म्य

**हमा – अज–मन–अस्त** (स) : सर्वकाही माझ्यापासून आहे.

**हमा– अज– उस्त** (स) : सर्व काही त्याचापासून आहे.

**हमा –बा – मन–अस्त** (स) : सर्व काही माझ्याजवळ आहे.

**हमा–बा–उस्त** (स) : सर्वकाही त्याच्या जवळ आहे.

**हमा –दर –मन –अस्त** (स) : सर्व काही माझ्यात आहे.

**हमा–दर–उस्त** (स) : सर्व काही त्याच्यात आहे.

**हमा–मन –अम** (स) : सर्व काही मी आहे.

**हमा– उस्त** (स) : सर्व काही तो आहे.

**हकीकत** (स) : सत्य, यथार्थ.

**हकीकत–ए–इन्सानी** (स) : मनुष्याची यथार्थता. सहाव्या भूमिकेतील महात्म्याची अवस्था, जो परमात्म्याला समोरासमोर पहातो.

**हकीकत–ए–मुहम्म्दी** (स) : मुहम्मदची यथार्थता. पूर्ण प्रभुत्व, परमात्म्याची दहावी अवस्था

**हकीकी** (स) : सत्य : इझाफीशी तुलना करा.

**हक** (स) : शब्दश : सत्य, यथार्थता परमात्मा (व) ब्रह्म

**हक–उल–यकीन** (स) – यकीन पहा.

**हू** (स) : शब्दशः तो परमात्मा.

**हुजवीरी, अली बेन उथमान** 'कश्म–अल–महजूब' (रहस्याचे उद्घाटन) चे लेखक जन्म – गझना येथे १००० इ.स. मध्ये व मृत्यू इ. स. १०७५ मध्ये

**हुवाल अखेर** (स) : तो शेवटचा आहे.

**हुवाल अव्वल** (स) : तो आदि आहे.

**हुवाल बातीन** (स): तो आंतरिक आहे.

**हुवाल झाहिर** (स) : तो सर्वव्यापी आहे.

**हुयत** (स) : परमात्म्याला स्वतःचे ज्ञान– ईश्वरत्व.

**इब्न अरबी मुहमुद्दीन** : सद्गुरु जन्म स्पेनमध्ये जुलै १९६५, मृत्यू दाभास्कस येथे आक्टोबर १९४० सुफी वादाची व्याख्या  त्यांची मुख्य कृती 'अल–फुतूहत–अल–माक्किया'

**अज्ञानता** – मायेचे ज्ञान–उच्चतर आध्यात्मिक ज्ञान नसणे. स्थूल सचेत आत्म्याच्या ज्ञानाची अवस्था.

**इल्युजन :**Illusion मायेपासून निर्मित –सृष्टी जे स्थूल चेतन आत्मे चुकीने सत्य समजतात.

**इल्म–उल– यकीन**– पहा यकीन

**इन्सान** (स) : मानव व्यक्ति (व) : मानव

**इन्सान –ए– कामील** (स) : पूर्ण पुरुष (म्हणजे ईश्वर साक्षात्कारी) (व) शिव–आत्मा

**अल–इन्सान–उल–** कामिल (स) : पूर्ण पुरुष, चौदाव्या शतकातील सुफी **अब्दुल करिम अल**–जिली यांचा प्रबंध

इकबाल, डॉ. मुहम्मद, पाकिस्थानातील कवी व दर्शनिक –जन्म १८७३ सियालकोट येथे

**इरफान** (स) : गूढज्ञान, अरीफचे ज्ञान. तसेच सहाव्या व सातव्या भूमिकेतील व्यक्तींचे ज्ञान (व) : ज्ञान

**इरतिका** (स) : उत्क्रांती

**इसरा फील** (स) : प्रधान देवदूत – राफेल

**इझाफी** (स) : संबंधित –सापेक्ष हकीकीशी तुलना करा.

**इजराईल** (स) : प्रधान देवता इजराईल

**जलाल** (स) : वैभव – आनंद –परमसुख

**जलालुद्दीन रुमी, मौलाना :** तेराव्या शतकातील सद्‌गरु. मेवलेवी (भवरा) फकिरांचे संस्थापक. मसनवीचे लेख

**जाम** (स) शब्दशः प्याला.परमात्म्याशी सचेत मिलन. परमात्म – साक्षात्कार .

**जमाल** (स) सौंदर्य

**जमाल–ए– अहदियत** (स) : पूर्ण ऐक्याचे सौंदर्य

**जाम–उल–जाम** (स) : बका बिल्लाह पहा.

**जान** (स) : आत्मा (व) आत्मा

**जान–ए–जिस्मी** (स): पहा जीवात्मा

**जानान** (स): प्रियतम

**जप** (व) : पुनरावर्तन (मंत्राचे किंवा प्रार्थनेचे)

**जिझसः** नझारेथ येथील ख्राईस्ट

**जिब्राइल**(स) (फारसी–कुराण–जिब्रिल) प्रमुख देवदूत गै ब्रियल

**अल–जिली, अब्दुल करीम** : अल–इन्सान–उल–कामिल(पूर्ण पुरुष) चा लेखक व शागीर्दीच्या सुफी संप्रदायाचा संस्थापक (वइदा–उल–शुहुद) मृत्यू – १४०८ मध्ये

**जिस्म –ए–अल्ताफ** (स)ः मनोदेह (व) कारण शरीर.

**जिस्म –ए–कासिफ** (स) : स्थूल शरीर (व)

**जिस्म–ए– लतीफ** (स) : तसेच (व) : सूक्ष्मदेह

**जीवनमुक्त** (व) : पूर्णपुरुष (स)ः आझाद–ए–मुतलक साहिब–ए–जमा–फर्क, सालिक–ए–कामिल हे देखील पहा –मुक्त.

**जीवनमुक्ती** : पहा ,मुक्ती

**जीवात्मा** (व)ः देहधारी आत्मा : व्यक्ती (स)ः जान–ए–जिस्मी

**जीवोऽहम** (व) :'मी जीव आहे '

**बगदादचा जुनायद** : नवव्या शतकातील प्रसिध्द सुफी शेख, मृत्यू इ.स. ९१०

**कान्न हू हू** (स) : शब्दशः अगदी तोच. त्याच्या सारखा, अंतिम फनाचे वेळी आत्म्याच्या अवस्थेचे वर्णन शुहुदियाह संप्रदायव्दारा.

**कबीर** : बनारसचे चवदाव्या शतकातील सद्गुरु इ.स. १४३५ ते १५१८

**काल (व)** :६५ते १२५ या दरम्यानचा काळ. प्रत्येक कालचक्रात ११ युगे असतात.

**कामिल**(स) : सालिक–ए– कामिल. सालिक पहा.

**करामत** (स) : पाचव्या व सहाव्या भूमिकेवरील आत्म्यांनी केलेला चमत्कार

**कारण शरीर** (व) : मनोदेह (स) जिस्म–ए– अल्ताफ

**कर्म** (व) शब्दशः कृती. प्रारब्ध. व्यक्तीच्या जीवनकालातील स्वाभाविक व आवश्यक घटना ज्या व्यक्तीच्या अनेक गत जीवनावर आधारीत असतात.

**कर्मकांड** (व) पहा शरीयत

**कस्ब** (स) : विकत किंवा व्यापारव्दारां प्राप्त झालेली मवहिबशी तुलना करा.

**कश्फ–अल – महजूब** (स) पहा उजविरी

**खमसा वुजुदत** (स) : पाच प्रकारचे अस्तितव मानवात असणाऱ्या परात्पर ब्रह्मातील परमात्म्याच्या पाच अवक्रांती. पहा –बुजूद –

**खुदी** (स) : मिथ्या अहं.

**कृष्ण** (व) : अवतार : पहा महाभारत – भगवद्गीता

**लहर** (हिन्दी–मराठी) : शब्दशः लहर,लाट, तरंग, कल्पना, परमात्म्याची उर्मी

जिने सृष्टी निर्माण केली.

**लहूत** (स) : पूर्णता.

**लाख**– लक्ष

**ला महदूद** (स) अनंत– (इन्फीनिट)(व)

**ला मकान** (स) : शब्दशः अनिकेत, शून्य बिन्दू मनोभुवनातील बीज जेथे स्थळकाळाच्या सर्व कल्पना एका बिंदूत केन्द्रित होतात व जेथून स्थूल व सूक्ष्म जगतांचा उद्‌भव होतो.

ला सिफ्त ला सूरत (स) : (व) : निर्गुण

**लीला** (व) : सृष्टीचा दिव्य खेळ. परमात्म्याची खेळ व ज्यामुळे सृष्टी निर्मिती

**मआरिफ** (स) : परमात्म्याच्या रहस्याचे क्षेत्र (दिव्य ज्ञानाचे क्षेत्र)

**महाचैतन्य** (व) : परिपूर्ण चेतना .सचेत चेतना म्हणून पूर्णपणे आत्मानुवती उत्क्रांत झालेली आहे.

**महाकारण शरीर** (व) : विश्वव्यापी शरीर.

**महाप्रलय** (व) एका ऐहिक (Cosmic)काळाच्या शेवटी विश्वाचा शेवट

**महापुरुष** (व) : पाचव्या भूमिकेचा संत (स): वली, अबरार

**महात्मा** (व) : महान आत्मा (स) अखयार

**महायोगी** (व) : चवथ्या भूमिकेचा योगी

**महेश** (व) : शिवः संहारकर्ता (स) : फनाकार

**मज्झूल उन्नत** (स) : अज्ञेय व अवर्णनीय परात्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्म्याचे पद.

**मज्झूब** (स): निमग्न. चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या भूमिकेत तल्लीन.

**मज्झूब–ए–कामिल** (स) : सातव्या भूमिकेचा परमात्म्यात निमग्न आत्मा (व) : ब्रह्मीभूत.

**मज्झूबियत** (स) : परमात्म्याची आठवी अवस्था मज्झूब–ए– कामिलची.

**मज्झूब सालिक** (स) : पूर्ण व्यक्ती ज्याच्यामध्ये मज्झूब सारखे गुण प्रभावी असतात (व) परमहंस

**मन–दर–हमा–अम** (स) 'मी सर्वात आहे '

मॅन गॉडःपूर्ण पुरुष (स) कुतूब (व) सद्‌गुरु पहा – गॉड मॅन

**मन–हमा–अम** (स) : 'मी सर्व काही आहे.'

**मन** –हिन्दी–मराठी : मन, मनोदेह देखील,(स) : जिस्म–ए–अल्ताफ (व) : मनः

**मानव** (व) : पहा इन्सान .

**मंडली** (हिंदी ) : मेहेरबाबांचे अंतरंग शिष्य (व) मंडल, वर्तुळ

**मनोभूमी** (व) मनोजगत (स) : आलम–ए– जबरूत

**मनोभूमिका** (व) : मनोभूमिका मेंटल प्लेन.

**मनोनाश** (व) मनाचा नाश (स) अंतिम फना

**मनोभुवन** (व) मेंटल स्फिअर (स) आलम–ए–जबरूत

**मान्तीक उत्–तैयर** (स): पक्षांचे संमेलन अकराव्या – बाराव्या शतकातील सुफी शेख फरीदुद्दीन अत्तारची रुपक कथा

**मंत्र** (व) आध्यात्मिक अनुशासनादाखल गुरुने शिष्याला दिलेला गुरुमंत्र (स) : वजीफा

**मओहिब** (स) दिलेला प्रसाद, करबशी तुलना करा.

मरेफत (स): दिव्य ज्ञान (व) चित् ज्ञान

मरेफत–ए– हकीकत (स) : सत्यतेचे आध्यात्मिक गूढ, ज्ञान, सुद्गुरु किंवा अवतार ज्याला ड्युटी आहे व सत्यानुभूती

**माशूक** (स): प्रियतम

**माशूकीयत** (स) शब्दश : प्रियतम असण्याची अवस्था. पहिल्या अभिव्यक्तीमध्ये सौंदर्याचा अविर्भाव (तजल्ली–ए–अव्वल) ज्यात परमात्मा प्रेमी व मनुष्य प्रियतम असतो.

**मसनवी** (स) : जलालुद्दीन रुमीची प्रधान साहित्यकृती दिवाण देखील पहा.

**मस्त** (स): मार्गावरील इश्वरोन्मत्त आत्मा,

**मस्ती** (स) : पहा सुलूक

**मवाहिद** (स) : एक अव्दैतवादी. अहल–ए– तौहादची एक व्यक्ती

**माया** (व) : शब्दशः भ्रम, मिथ्या भास जे शुन्याला सर्वकाहीचे रुपात दाखविते अज्ञानाचे मूळ, परमात्म्याची मूळ छाया (स): मेजाज.

**मेजाज** (स): माया

**मेवलेवी** (स) : पहा जलालुद्दीन रुमी

**मिकाईल** (स) ) प्रधान देवदूत मायकेल.

**मोजेजा** (स): (अ–वचन– मोजेजत) अवतार किंवा कुतूब यांनी केलेला चमत्कार

**मोक्ष** (व) : पहा मुक्ती

**मुहम्मद** : नबी– प्रेषित इ. स. ५७० ते ६३२

**बसऱ्याची मुहासिबी :** अब्दुल्ला हरिस हाल व मुकाम या विषयाचे लेखक मृत्यू इ.स.८५७

**मुजाद्दिद** (स) : शागीर्दीवादी वहदत्त–उल–शुहूद या मताचे अनुयायी (मताभिमानी)

**मुजाहिदा** (स): अभ्यास संघर्ष करणे प्रयास (व) : साधना

**मुकम्मिल** (स) : पुरुषोत्तम सद्गुरु कुतूब (व) : सद्गुरु. सालिक –ए–मुकम्मिल देखील म्हणतात.

**मुक्त** (व) पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्त झालेली व्यक्ती

**विदेहमुक्त** – ईश्वर नमग्न आत्मा, ब्रह्मीभूत (स) मज्झूब–ए–कामिल

**जीवनमुक्त** : देहधारी मुक्त (स) : आझाद ए–मुतलक,सालिक–ए–कामिल–ए– मुकम्मिल

**परममुक्त** : सद्गुरु (स) कुतूब सालिक–ए–मुकम्मिल

**मुक्ती** (व) : मुक्ती–जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका. सामान्य मुक्ती (स) – बहुतांश आत्म्यांना मिळणारी मुक्ती (स): नजात.

**विदेह मुक्ती** : ''मी परमात्मा आहे '' ही व्दंव्दाच्या चेतनेविरहित अवस्था

**जीवन मुक्ती** : 'मी परमात्मा आहे ही व्दंव्दांच्या चेतनेसह अवस्था.

**परम मुक्ती** : ''मी परमात्मा आहे'' ही एकाच वेळी परमात्म्याच्या चेतनेसह व सृष्टीचेतनेसहची अवस्था

**मुलहिद** (स) : (व) नास्तिक

**मुम्किन – उल–वुजूद** (स) पहा, वुजूद,

**मुनी** (व) शब्दशः मौनी, एक पवित्र मानव, साधू तपस्वी.

**मुनकत–उल–इजहारात** (स) : ती अवस्था की, ज्या संबंधात सर्व लक्षणे लुप्त होतात. परात्पर परब्रह्म अवस्थेती परमात्म्यांचे पद

**मुन्सिफ, डॉ. अब्दूल गनी** : मेहेरबाबांचे दीर्घकाळ अनुयायी मृत्यू २० ऑगस्ट १९५१

**मुमतन**–उल–वुजूद (स) पहा, वुजूद

**मुकद्दर** (स) प्रारब्ध

**मुकाम** (स) : मार्गावरील थांबा किंवा भूमिका

**मुकाम –ए– फुरुतत** (स) : दिव्य संधी (व): तु रीया अवस्था.

**मुकाम–ए–हैरत** (स) : मोहित होण्याचे ठिकाण तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधील थांबा जेथे पथिक आध्यात्मिक प्रगतीमध्ये दीर्घकाळ खोळबूंन राहू

शकतो.

**मुकाम–ए– मुहम्मदी** (स) : एकाच वेळी परमात्म्याची व सृष्टीची चेतना (व) विज्ञान भूमिका

**मुसर्रत** – (स) : परमानंद (व) आनंद

**मुतवरिसत** (स): प्रगत आत्मा (व) साधू

**नाद** (व) आवाज स्वर्गीय संगीत, मूळ शब्द

**नफ्स** (स) 'स्व'मिथ्या अहं.

**नफ्स –ए– अम्मारह** (स): कामुक अहं. स्थूल जगताची किंवा भुवनाची चेतना

**नफ्स –ए– लव्वामह** (स) तिरस्कारयुक्त अहं – सूक्ष्म भुवनाची चेतना

**नप्स –ए– मुतमयिन्न**ह (स): परमानंदित 'स्व' पाचव्याभूमिकेवरी आत्म्याची चेतना.

**नजात** (स) : मोक्ष सामान्य मुक्ती पहा.

**नास्तिक** (व) : (स) मुलहिद

**निराकार** (व) – रुपाविरहीत (स) ला सूरत

**निर्गुण –गुणविरहीत** (स) : ला सिफत

**निर्वाण** (व) : यथार्थ फनाची पहिली स्थिती. काही उदाहरणात त्यानंतर दुसरी अवस्था अनुसरली जाते फना – फिल्लाह.

**निर्विकल्प समाधी** : पहा –समाधी

**नथिंग द** –सर्व व्यापी परमात्म्याची अनंत छाया

**नकुश–ए–अमल** (स): शब्दार्थ – कर्माचे संस्कार (व) संस्कार पहा.

**नूर**– (स) : अनवर , तेज

**नूर–ए– मुहम्मदी** (स) : स्वतःला जाणून घेण्याच्या इच्छेचा (लहरीचा) परिणाम म्हणून ज्या प्रकाशाचे परमात्म्याला प्रथमभान आले.

**ओम** (व) : परमात्मा सृष्टीच्या प्रारंभापूर्वीच्या प्रारंभीचा मूळ ध्वनी –देखील प्रथमशब्द पहाः नाद देखील

**परमात्मा** (व) : परमात्मा किंवा परमात्मन– सर्वशक्तीमान (स) अल्लाह, झोरोस्ट्रियन आहूरमज्द, यजदान.

**परमहंस** (व) : पूर्ण पुरुष जो कधी परमात्म्यात निमग्न होतो अशा स्थितीत त्याला मज्झूब –सालिक म्हणतात तर कधी तो सृष्टी सचेत असतो तेव्हा त्या स्थितीत त्याला सालिक–मज्झूब म्हणतात.

**परात्पर परब्रह्म** (व) : परमात्म्याची पहिली परात्पर अवस्था (स) : वरा–उल–

वरा, घैब–उल– घैब.

परवरदिगार (स) : रक्षणकर्ता किंवा धर्ता (व) विष्णू

**पीर** ( स) : सहाव्या भूमिकेचा गुरु (व) :सत्पुरुष

**प्राण** (व) : शब्दशः प्राणशक्ती. सूक्ष्मशरीर. समग्र जीवनाचा श्वास देखील.

**प्राणभूमी** (व): सूक्ष्म जगत (स) आलम–ए– मलकूत

**प्राण भूमिका** (व) : सूक्ष्म भूमिका

**प्राण भुवन** (व) : सूक्ष्मलोक–भुवन (स): आलम–ए–मलकूत

**प्रारब्ध** (व) : संस्कारांचा संबंध की, ज्यामुळे त्यांचे आयुष्य मर्यादा ठरते व त्याचा जीवन मार्ग सुध्दा ठरतो. नशीबप्रमाणेच घडणे. (स): मुकद्दर

**प्रसाद** (व) : अल्पभेट– खाद्य वस्तू जी गुरुने त्यांच्या प्रेमाची पूर्ण अभिव्यक्ती म्हणून दिलेली असते. खाल्ल्यानंतर बीजवत परिणाम व शेवटी परिपूर्ण वृध्दिंगत होते.  सद्गुरुचा कृपाप्रसाद

**पुनर्जन्म** (व): पुन्हा :पुन्हा जन्माला येणे (स) : रिजत.

**पुरातण पुरुष** (व) : शब्दशः पूर्ण पुरुष (स): साहेब–ए– जमा

**कदीम** (स) : ते जे मूळ आहे (पुरातन) हदसशी तुलना करा .

**कयामत** (स): विश्वाचा महाप्रलय (व)महाप्रलय

**कुदरत** (स) : दिव्यशक्ती (व) सत्

**कुर्बत** (स) : शब्दशः सान्निध्य (व) : परमात्म्याशी नाते .

**कुर्ब–ए–फरायिज** (स): अनैच्छिक ( आवश्यक) : सान्निध्य अवताराचा परमात्म्याशी संबंध

**कुर्ब–ए– नवाफिल** (स): ऐच्छिक निकटता सद्गुरुचा परमात्म्याशी संबंध

**कुतूब** (स) :शब्दशः आस. पूर्ण पुरुष (व) सद्गुरु

**कुतूब–ए–इर्शाद** (स) : पाच विद्यमान कुतूबांचा प्रमुख जो विश्वाचे व्यवहार दिग्दर्शित करतो. अवतार काळात ही जागा अवतार भरुन काढतो.

**कुतूबियत** (स) : पूर्ण स्वामित्व परमात्म्याशी दहावी अवस्था

**राह–ए–तरीकत** (स) : पहा तरीकत.

**रहरेव** (स): ती व्यक्ती जी साधनामार्गावर चालते (व) : साधक

**राम** : रामयणातील राम–अवतार

**रसूल** (स) : रक्षणकर्ता ख्राईस्ट (व) अवतार

**रिजत** (स): पुनर्जन्म (व) : पुनर्जन्म,आवागमन.

**रुह** (स): जान (व) आत्मा

**सद्‌गुरु** (व) –पुर्ण पुरुष (स) कुतूब
**साधक** (व) : (स) रहरेव.
**साधना** (व) : पहा – मुजाहिद
**साधू** (व) : यात्री, प्रगत आत्मा (स) : मुतवस्सीत
**सदरत–उल–मुन्तह** (स) : चरम सीमा (संमिश्र) चवथ्या भुवनातील एक बिंदू ज्याच्या पलिकडे कोणताही निराकार आत्मा (देवदूत किंवा प्रमुख देवदूत) परमात्म्याप्रत पोहचू शकत नाही.
**सगुण** (व) : गुणांसह, पात्र(स): बा–सिफत
**सहज समाधी** – पहा समाधी
**सहवास** (हिन्दी) – गुरुने आयोजित केलेले मीलन की ज्यामुळे त्याचे अनुयायी त्याच्या भौतिक उपस्थितीचा आनंद घेतील
**साहेब–ए–जमॉ – फर्क** (स): आझाद–ए–मुतलक. देहधारी मुक्त आत्मा. पूर्ण पुरुष. परमात्म्याच्या नवव्या अवस्थेतील आत्मा (व) जीवनमुक्त
**साहेब–ए–जमॉ** (स): रसूल पहा.
**साकार** (व) :(स): बा–सुरत
**सल्ब–ए–विलायत** (स) : सद्‌गुरु किंवा अवतारव्दारां पहिल्या चार भूमिकेवरील आत्म्यांच्या चमत्कार करण्याच्या शक्तींना हिरावून घेणे.
**सालिक** (स): सहा पैकी कोणत्याही भूमिकेवर ज्याला जाणीवपूर्वक दिव्यानुभूती आहे तो यथार्थ सालिक–मनुष्य–परमात्मा–बका–बिल्लाह अवस्थेत अनुभव घेत असलेला
**सालिक–ए–अकमल** (स): अत्यंत पूर्ण पुरुष.
**सालिक–ए–कामिल** (स) पूर्ण पुरुष (व) : जीवन मुक्त.
**सालिक–ए– मुकामिल** (स) : सर्वोच्च गुण पुरुष– कुतूब (व) : सद्‌गुरु
**सालिक मज्झूब** (स) :पहा परमहंस
**समाधी** (व) समाधी – ध्यानातून निर्माण झालेली
**निर्विकल्प समाधी** (ब) : पूर्ण पुरुषाची ''मी परमात्मा आहे ही अवस्था.'' (स) फना–फिल्लाह
**सहज समाधी** (व) : अवतार ब सद्‌गुरुच्या पूर्णतेची प्रयासरहित चिरंतन **अवस्था**
**कृतीतील दिव्यता** (स) बका–बिल्लाह
**शंकराचार्य** – हिन्दू सद्‌गुरु वेदांताच्या अव्दैत संप्रदायाचे संस्थापक इ.स. ६८६ ते ७१८

**संस्कार** (व) : ठसेः अधिच्या जन्मातील अनुभवामुळे मनावर उमटलेले संस्कार जे सांप्रत जन्मात इच्छा व कर्मे निर्धारीत करतात.

**संत** : हिन्दी : (स): अबरार, वली (व) महापुरुष.

**संन्यासी** (व) सर्वसंगपरित्याग केलेला.

**सार्वभौमिक मनस** (व) : विश्वात्मक मन (स) : अक्ल –ए– कुल.

**सर्वोहं** (व) : मी सर्वस्व आहे (स): हमा–मन–अम

**सत** (व) : दिव्यशक्ती (स) : कुदरत

**सत्पुरुष** (व) सहाव्याभूमिकेचा संत (स) पीर, अफराद.

**सत्यानुभूती** (व) : सत्याचे ज्ञान (स)  मारेफत–ए– हकिकत.

**सेयर – ए–मा–अल्लाह** (स) : शब्दशः परमात्म्याबरोबर प्रवास. तिसरा दिव्य प्रवास

**शबिस्तारी मौलाना महमुद** : तेराव्या शतकातील, 'गुलशन–ए– राझ' चा सुफी लेखक

**शक्ती** (व) : सामर्थ्य.

**शम्सी ताब्रिज** : सद्गुरु, भटकणारा फकीर व जलालुद्दीन रुमीचा आध्यात्मिक गुरु.मृत्यू इ.स. १२४६

**शरियत** (स): कर्मकांड, धर्मभोळेपणा (व) कर्मकांड, धर्मशास्त्र

**शरीर** (व) देह,स्थूल देह

शिब्ली, अबू बक्र : बगदादच्या जुनायदचा अनुयायी :मृत्यू इ.स.९४६

**शिव** (व) महेश : संहारक, ईश्वर देखील, (स) फनाकार

**शिव–आत्मा** (व) : शिवात्मा परमात्म साक्षात्कारी (स) इन्सान–ए– कामिल.

**शिवोऽहं** (व) : मी परमात्मा आहे – अहंब्रह्मास्मि (स) : अनल हक

**शोबदा** (स) : पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंतच्या आत्म्यांचे शक्तिप्रदर्शन

**शुहूदिय्यह** (स) : सुफी वादाचा प्रत्यक्षवादी संप्रदाय. या अनुरुप वेदांती संप्रदाय आहे विशिष्ट अव्दैत

**सिध्दी** (व) :दिव्य शक्ती. गूढ शक्ती देखील (स) : तजल्लीयत.

**सिफत** (स) : परमात्म्याचे  गुणधर्ण  त्याच्या दिव्य साराच्या विपरित – झत (व) गुण

**स्थान** (व) : थांबत (स) : मुकाम

**स्थूल शरीर** (व) :स्थूल देह (स): जिस्म–ए– कासीफ.

**सुफी** (स) : मूळ ठिकाण मध्य पुर्वेत असलेले रहस्यवादी – त्यांचा प्रारंभ–काळ प्राचिन काळात लुप्त झाली. झोरोस्टरच्या काळात ते अस्तित्वात होतो व मुहम्मदाने त्यांना नवजीवन प्रदान केले आज जगाच्या सर्व भागात त्यांचे अस्तित्व आहे.

**सुऱ्हावर्दी शेख शहाबुद्दीन** : इ.स. ११४५ते १२३४अवारिफ–उल–मारिपचे लेखक प्रत्यक्षवादाचे उद्घाते (वहदत–उल–शुहूदचे निर्देशक)

सूक्ष्म शरीर (व) : स : जिस्म –ए– लतीफ

**सुलूक** (स) मस्तीच्या विरुध्द. परमात्म साक्षात्कारानंतर सृष्टी चेतनेवर परत येण. ज्याचा यथार्थने अनुभव घेतल्या जातो. बका–बिल्लाह मधील यथार्थ सलिक कडून

**सुलूकियत** (स) : अंतिम सुलूकियत ही अवस्था आहे बका–बिल्लाहमधील यथार्थ सालिकची

**तजल्ली** (स) : (अ.वचन–तजल्लीयत ) शब्दशः अभिव्यक्ती, अध्यात्म पथावरील साधनाकडून घेतल्या जाणारा परमात्म्याच्या वैभवाचा अनुभव

(१) परमात्म्याचे त्याच्या मायावी सृष्टीचे रुपात प्रकटीकरण

(२) सूक्ष्म भुवनाच्या पहिल्या तीन भूमिकांच्या शक्ती

(३) चवथ्या भूमिकेच्या दिव्यशक्ती (अनवर –ओ–तजल्लीयत)

**तजल्ली–ए–अव्वल** (स) : पहिले प्रकटीकरण (वहिद–उल–वुजूद)

प्रकटीकरण मुमकीन–उल–वुजूद

**तजल्ली –ए– चहरुम** (स) : चवथे प्रकटीकरण मुमकीन–उल–वुजूद

**तज्जल्ली –ए– दुव्वूम** (स) दूसरे प्रकटीकरण आरिफ :उल वुजूद

**तजल्ली–ए–जलाली** (स) : वैभवाची अभिव्यक्ती किंवा आविर्भाव जो आत्म्याला फनाचा अनुभव देतो. आशकियत

**तजल्ली–ए–जमाली** (स) : सौंदर्याचे प्रकटीकरण किंवा अविष्कार जो परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या आत्म्याला पुन्हा सामान्य चेतना देतो. माशु कियत

**तजल्ली –ए–पंजुम** (स) : पाचवे प्रकटीकरण वाजीब –उल– वुजूद .

**तजल्ली –ए– सिव्युम** (स): तिसरे प्रकटीकरण मुमतान–उल –वुजूद

**तजल्लीयत** (स) : तजल्लीचे अनेकवचन

**तजल्लीयत–ए– खमसह** (स) – पाच प्रकटीकरणे – खमसह वुजूदत. पाच प्रकारचे अस्तित्व पहा.: वुजूद

**तालिब** (स) : मुमुक्षु

**तनजुल्लत** (स) : पाच प्रकारच्या अस्तित्वाव्दारा परमतत्वाची अवक्रांती

**तांत्रिक** (व) : तांत्रिक अभ्यासाव्दारां जे गूढ शक्तिमध्ये प्रवीण झालेत. तांत्रिक अभ्यास तांत्रिक धर्मग्रंथावर आधारित आहे. तंत्र असा अभ्यास सुचवितात (पौराणिक कथा ज्या भगवान शंकराने लिहिल्या आहेत ) जे गूढ शक्तीकडे अग्रेसर करते.

**तन्जीह** (स): अलौकिक

**तप** (व) : तपश्चर्या

**तपस्वी** (व) : तपश्चर्या करणारा

**तरीकत** (स) : (व) आध्यात्मिक मार्ग, आध्यात्मिक उन्नतीचा गूढ मार्ग

**तसव्वुफ** ( स) : आध्यात्मिक ज्ञान

**तश्बीह** (स) : गुणयुक्त, समान, त्यासमान तुलना केलेला.

**तौबा** (स): प्रायश्चित. इंद्रियजीवनाकडून परमेश्वराकडे वळणे–उत्सफूर्त उत्कट इच्छेपासून उद्‌भवित. आध्यात्मिक अवस्थेत प्रथम पायरी किंवा मुकाम

**तौहिद** (स) परमात्म्याची ऐक्यावस्था

**तौहिद –ए– अफाली** (स) : परमात्म्याचे क्रियात्मक ऐक्य. सूक्ष्म भुवनावर आत्म्याने प्राप्त केलेली एकता.

**तौहिद–ए– अहवाली** (स) : परमात्म्याशी ऐक्याची अनुभूती. पाचव्या भूमिकेत आत्म्याने प्राप्त केलेली एकता.

**तौहिद–ए–अकवाली** (स) : परमात्म्याशी शाब्दिक ऐक्य. बहुसंख्य मानव जातीव्दारा प्राप्त करण्यायोग्य ऐक्य, ज्यांनी अजून मार्गावर प्रवेश केलेला नाही.

**तौहिद–ए– शरियत** (स) : विधानाचे ऐक्य. –तौहीद–ए–अकवाली.

**तौहीद–ए–सिफती** (स) : गुणात परमात्म्याशी ऐक्य. सहाव्या भूमिकेवर आत्म्याने प्राप्त केलेले ऐक्य

**तौहिद –ए–तन्जीही** (स) निरकुंश ऐक्य (व) : अव्दैत .

**तौहीद–ए– तरिकत** (स) : आाध्यात्मिक मार्गावर असणारांचे ऐक्य .

**तौहीद–ए– झती** (स) : सारतत्वात परमात्म्याशी ऐक्य, परमात्म्य –साक्षात्कार झालेल्या आत्म्याचे ऐक्य.

**तवज्जुह** (स) : शब्दार्थ –प्रभाव. वलीव्दारां साधकाच्या भौतिक नेत्रात टक लावून पाहून तृतीय नेत्रावरील पडदा फाडणे.

**त्रिभुवन** (व) : तीन भुवने, निर्मित विश्वचतुर्थ (मिश्रित ) भुवन धरुन

स्थूल,सूक्ष्म व मनोभुवन समाविष्ट असलेले (स) : दो आलम (दुनिया व उकबा)

**तुरिया अवस्था** (व) : दिव्य संगमावर (स) : मुकाम–ए– फुरुततचे ठिकाणी फना–मा–अल–बका

**उबूदियत** (स): दास्य–यथार्थ सालिकची भूमिका बंधनात असलेल्या मानवतेला लाभ करुन देण्यासाठी जे सामान्य चेतनेप्रत परतले आहेत.

**उकबा** (स) : पहा– दो आलम

**उर्फ–उल– यकीन** : यकीन पहा.

**उत्कांती** (व) उत्क्रांती (स): इरतेका

**वैराग्य** (व) : स्थायी त्याग.

**वैताग** (मराठी ) : स्मशान वैराग्य

**वस्ल** (स) पहा ऐक्य

**वेदांती** (व) वेदशास्त्राचा अभ्यास व त्यानुसार आचरण करणारे व जे फक्त चार वेदांवर अवलंबून न राहता त्यानंतर लिहिलेल्या उपनिशदासहीत इतर पवित्र ग्रंथाप्रमाणे आचरण करतात.

**विदेह मुक्ती** (व) : पहा मुक्ती

**विदेह मुक्त** (व) : पहा मुक्त

**विज्ञान** (व) सचेत ऐक्य. सर्वौच्च दिव्य चेतना (स) अहिदयत.

**पूर्ण पुरुषाची महासचेत अवस्था** –(स) : आलम–ए– लाहूत

**विज्ञान भूमिका** (व) परमात्म्याची व सृष्टीची एकाच वेळी चेतना, सद्गुरुची चेतना (विज्ञान भूमिकेत मज्झूब–ए– कमिलला परमात्म्याची चेतना असते. (स) :मुकाम : ए– मुहम्मदी

**विशिष्टाव्दैत** (व) : वेदांतीक संप्रदाय ज्याच्या विचाराची तुलना शुहूदियाहशी करता येईल. प्रत्यक्षवादी

**विष्णू** (व) : पौषाणकर्ता (स) : परवरदिगार

**वहदत –उल– शुहूद** (स) : शब्दशः द्दष्टीचे मिलन – प्रत्यक्षवाद

**वहदत–उल–वुजूद** (स) : शब्दशः अस्तित्वाचे मिलन. एकतावाद

**वहदियत** (स): सचेत एकता.

**वहदियत–ए– वहिदियत** (स) : अनेकतेत एकत्वाचे भान, ही आलम –ए– हाहूत मधील (प्रभुत्वाच्या क्षेत्रातील) हकिकत–ए–मुहम्मदाची चेतना.

**वहिदियत** (स) : अनेकतत्वाची एकत्वास जाणीव .मायेचा ताउहीद

**वहिद–उल– वुजूद** : वुजूद पहा.

**वजिब** –उलः वुजूद –पहा वुजूद

**वली** (स): शब्दशः मित्र.  परमेश्वराशी सख्य ठेवणारा.याचा उपयोग नेहमी मर्यादित अर्थाने केला जातो,जसे पाचव्या भूमिकेवरील संत (व) महापुरुष.

**वल्ली अल्लाह** (स) शब्दशः परमेश्वराचा मित्र वली.

**वाकिफ** (स) : शब्दश :ज्ञानी स्थूल सचेत आत्मा

**वक्त** (स)६५ ते १२५ वर्षे कालखंडाला युग म्हणतात. एका कालचक्रात अकरा युगे असतात (व) काल.

**वरा–उल–वरा** (स) :पहिल्या अवस्थेतील परमात्मा. परमात्म्याची परात्पर

**परब्रम्ह अवस्था** (व) : परात्पर परब्रह्म

**वासिफ** (स) : शब्दशः स्तुती कर्ता. सूक्ष्म सचेत आत्मा

**वेफअरर्स** : विल्यम डॉकिनकृत पुस्तक ज्यात मेहेरबाबांनी मस्तांसोबत केलेल्या कार्याचा अहवाल आहे. प्रकाशन १९४८, आदि के. इराणीव्दारा,

**वजीफा** (स) : मंत्र

**विलायत** (स) :शब्दशः मैत्री–परमेश्वराशी. पाचव्या व सहाव्या भूमिकेवरील आत्म्याची अवस्था

**वुजूद** (स) शब्दश : अस्तित्व

**आरीफ–उल– पुजूद** : आस्तिवाचा ज्ञाता ( अस्तित्वाचा जाणता.) प्रभुत्वाच्या (आलम–ए–हहूत) भुवनात कुतूबाचे वर्णन. दुसऱ्या प्रकटीकरणाशी अनुरुप (तजल्ली –ए–दुव्वुम)

**मुमकीन–उल– वुजूद** (स) : सूक्ष्म भुवनात (आलम–ए–मलकूत) आत्म्याचे संभाव्य अस्तित्व चवथ्या प्रकटीकरणाशी अनुरुप (तज्ञली– ए–चहरूम )

**मुमतान–उल–वुजूद** : मनोभुवनात (आलम–ए– जबरुत)आत्म्याचे नकारात्मक अस्तित्व तिसऱ्या प्रकटीकरणाशी अनुरुप (तज्ञली–ए– सिव्वूम)

**वहिद–उल– वुजूद** : एकात्मक अस्तित्व पूर्णतेच्या भुवनातील ( आलम–ए,लहूत) मज्झूबव्दारां अनुभवलेले सचेत ऐक्य (अहदियत) पहिल्या प्रकटीकरणाशी अनुरुप (तज्ञली –ए– अव्वल)

**वजीब –उल–वुजूद** (स) : ( स्थूल भुवनातील (आलम–ए– नसूत) सामान्य स्थूल सचेत व्यक्तीचे आवश्यक अस्तिव. पाचव्या प्रकटीकरणाशी अनुरुप (तज्ञली –ए– पंजुम )

**वुजुद –ए– मुतलक** (स): निरकुंश अस्तित्व

**वुजुदत** (स): अस्तित्व. खमसा वुजूद त.पाच प्रकारचे अस्तित्व पहा वुजूद.

**वुजूदिय्यह** : (स) : हा एकरुपात वादाचा सुफी संप्रदाय ज्याच्या विचाराची तुलना वेदांताच्या अव्दैत संप्रदायाशी करता येईल,

**यकीन** (स): निश्चितता दृढ विश्वास श्रध्दा

**ऐन–उल–यकीन** : दृष्टीव्दारां दृढविस्वास जी सहाव्या भूमिकेवर परमात्म्याला समक्ष पाहण्यामुळे प्राप्त होते (व) : अंतर्दृष्टी

**इल्म–उल–यकीन** : बौध्दिक दृढ विश्वास प्रखर अचल निष्ठेव आधारित

**उर्फ–उल–यकीन** : अध्यात्मिक गूढ ज्ञानाव्दारां दृढ विश्वास ( निश्चिती ) – अवतार व सद्गुरुंचा जे आपल्या ज्ञानाचा वापर बंधनातील आत्म्यांच्या सह्यार्थ करतात.

**हक–उल–यकीन** : साक्षात्कार निश्चितता (साक्षात्कारामुळे दृढविश्वास)

**यकीन–उल–यकिन** : पहिल्या ते पाचव्या भूमिकेवरील आत्म्यांचा दृढ विश्वास.

**यजदान** ( झोरोस्ट्रियन ) : सर्व – शक्तिमान परमात्मा (व) परमात्मा (स) अल्लाह

**योग** (व) शब्दशः मिलन. मनुष्याचे कृतिशील जीवन व विचार पूर्णतया त्याच्या स्वतःच्या जीवन. स्त्रोताशी संगत असलेली अवस्था. योगाचे विविध प्रकार आहेत उदा.

**भक्ति योग** : प्रेम किंवा भक्तीचा योग

**ज्ञान योग** : ज्ञानाचा योग

**कर्म योग** : कर्माचा योग

**राज योग** : ध्यान व चिंतन

**योगी** : साधक जो अध्यात्म पथावर आक्रमितो (स) रहरेव

**युग** (व) : ७०० ते १४०० वर्षाचा कालखंड ज्याचा आरंभ अवताराच्या आगमनाबरोबर होतो (स) दौर. जमॉ.

**जमॉ** (स) : युग

**ज्ञात** (स): परमात्म्याचे दिव्यसार तत्व

**ज्ञात –अल–बहत** (स) :निर्मळ सारतत्व. परमात्म्याची परात्पर परब्रह्म अवस्था

**झिल** (स) : परिशिष्ट, पुष्टी, शब्दशः तळटीप, परमात्म्याचे मायावी प्रकटीकरण

**झोरोस्टर** ( झरथुष्ट्र देखील ) प्राचीन अवतार ज्याचे वास्तव्य इराणमध्ये होते. ज्याच्या नोंदी उपलब्ध आहेत अशांच्या पैकी प्राचीनतम

* * *

## कृतज्ञता–

या ग्रंथाची मूळ किंमत कमी करण्याकरिता म्हणजे छपाई खर्चापेक्षा कमी किंमतीत वाचकांना हा ग्रंथ उपलब्ध करुन देण्याकरिता मेहेर प्रेमाने ज्या प्रेमीजनांनी उदार भावनेने योगदान दिले त्यांची यादी

| | |
|---|---|
| १) श्रीमान श्रीधरजी केळकर, अध्यक्ष– अवतार मेहेर बाबा ट्रस्ट,अ.नगर | ५०००/– |
| २) श्री. एम.एम. पाटील, अध्यक्ष– अवतार मेहेर बाबा केन्द्र धपेठ,नागपूर | ५००/– |
| ३) सौ. सुरेखा डोंगरे, मेहेर दरबार केंद्र, नागपूर | १००००/– |
| ४) सौ. अर्चना संजय डोंगरे, नेरी (चंद्रपुर) | ५०००/– |
| ५) श्री. पंकज रा. लोंधे, दर्यापूर | ११०००/– |
| ६) सौ. देवकाबाई सु. निमजे, नागपूर | ११००/– |
| ७) श्रीमती सविताबाई नेवारे, नागपूर | १००१/– |
| ८) कु. इन्दू गुप्ता, नागपूर | १०००/– |
| ९) श्री. बी. एस. सुर्जेकर, नागपूर | ३००/– |
| १०) श्री. त्र्यंबक ल. तांबटकर, चिखली | ११००/– |
| ११) अवतार मेहेरबाबा केन्द्र, भाईमारे ले आऊट हिंगणघाट (मार्फत श्री. डि. डब्ल्यू. इंगोले) | ४०००/– |
| १२) अवतार मेहेर बाबा केन्द्र हिंगणघाट (मार्फत श्री. कोपूलवार) | ६०००/– |
| १३) श्री. भय्याजी म. धंदरे, नागपूर | १३००/– |
| १४) सौ. मंदाताई भ. धंदरे, नागपूर | १३००/– |
| १५) महेन्द्र म. धंदरे, बडोदरा | १३००/– |
| १६) श्री. मधुसूदन के. भिसिकर, नागपूर | १५००/– |
| १७) श्री. वसंतराव ग. पांडे, उमरखेड | २०००/– |
| १८) श्री. अशोक भागवतकर, वर्धा | ३००/– |
| १९) श्रीमती मिनल सा. भेंडे, अकोला | ६१००/– |
| २०) श्री. दिपक वैरागकर, मेहेराबाद | ५०००/– |
| २१) सौ. मिनल नितीन सातव, ठाणे | ५०००/– |
| २२) श्रीमती विद्या व शाहाकार, नागपूर | १००७/– |
| २३) श्री. नरेंद्र ज. पाटील, शहादा (नंदुरबार) | ४०००/– |
| २४) अ. मे. बाबा केंद्र, पारस (मार्फत – श्री. राजाभाऊ रोहणेकर) | २५००/– |
| २५) श्री. अनिल अनंतराव पोटे (उमरखेड) | ५०००/– |
| २६) श्री. रामचंद्र गायकवाड, मेहेराबाद | २०००/– |
| २७) श्री. अनंत म. खंडाळे, मेहेराबाद | १००००/– |